# तात्या

## भाग पहिला

आवृत्ति दुसरी

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का० वा०
दा. क्र. १९२३

IRBK-0101923
IRBK-0101923

ना. धों. ताम्हनकर

किंमत ४ रुपये

# देशमुख आणि कंपनीचीं प्रकाशनें

## वि. स. खांडेकर

फुलें आणि दगड ( आ. दुसरी ) ३
घरट्याबाहेर ( ,, ) ३
पहिली लाट ( ,, ) ३
स्त्री आणि पुरुष २
कालचीं स्वप्नें
आजचीं स्वप्नें
कलिका २।
मृगजळांतील कळ्या २॥
सायंकाल ( आ. २ री ) २॥
अविनाश १॥।
मंदाकिनी १॥।
सहा भाषणें २
फुलें आणि कांटे २।
हिरवा चांफा ( आ. तिसरी ) ५
दोन ध्रुव ( ,, ) ५
पहिलें प्रेम ( आ. दुसरी ) ३
क्रौंचवध ( ,, ) ५
पांढरे ढग ( ,, ) ४।
जळलेला मोहोर ३

## ग. त्र्यं. माडखोलकर

अवशेष २
नागकन्या २
माझी नभोवाणी
नवे संसार ( जप्त )
चंदनवाडी

व्यक्तिरेखा २।

## ना. धों. ताम्हनकर

तात्या भाग १ ला ( आ. दुसरी ) ४
तात्या भाग २ रा ३
निवाडे भाग १ ला २॥
निवाडे भाग २ रा ४
चकमकी १॥
बच्चा नवरा १॥
अनेक आशीर्वाद ३॥
दाजी भाग १ ला ३॥

## चिं. वि. जोशी

आणखी चिमणराव (आ. २ री) ४
नवें भारूड २
स्टेशनमास्तर २
नटश्रेष्ठ -॥।-

## साने गुरुजी

पुनर्जन्म ( आ. दुसरी ) ३
आस्तिक ( ,, ) ३
सोन्यामारुति ! ( आ. २ री ) २
गोड निबंध भाग १ ला ३
गोड निबंध भाग २ रा

## दत्तु बांदेकर

आ. दुसरी ) १॥
१॥
२।


IRBK-0101923
IRBK-0101923

**प्र. के. अत्रे**

साखरपुडा १॥

ललितवाङ्मय ३॥

**द. र. कवठेकर**

अपुरा डाव ३

रेशमाच्या गांठी ३

**वा. म. जोशी**

स्मृति-लहरी २

विचार-लहरी २।

विचार-विहार ४

**पु. य. देशपांडे**

नवें जग ! २॥

**भाई बेके**

रॉयचरित्र १॥

**वि. स. खांडेकर (परिचय लेखक)**

काव्यज्योति १

**आनंदीबाई जयवंत**

पारंब्या २

**लक्ष्मणराव सरदेसाई**

ढासळलेले बुरुज २

**प्रो. वि. ह. कुलकर्णी**

व्यक्तिचित्रें २॥

**ना. ह. आपटे**

फसगत १॥

साजणी ५

**शकुंतला परांजपे**

भिल्लिणीचीं बोरें ३

**कृष्णाबाई मोटे**

मीनाक्षीचें जीवन २।

**र. गो. सरदेसाई**

चलतीं नाणीं २

**रा. श्री. जोग**

सौंदर्यशोध आणि आनंदबोध ८

**ना. म. पटवर्धन**

हितपत्रें ३

वा. म. जोशी यांचें चरित्र ४।

**वि. वि. बोकील**

बेबीची बहीण ३

**सत्यग्राही**

ग्रह आणि तारे ४॥

**अनंत काणेकर**

पिकलीं पानें (आ. दुसरी) ३॥ [?]

धुक्यांतून लाल ताऱ्याकडे ,, ३

**काकासाहेब कालेलकर**

ब्रह्मदेशाचा प्रवास ३॥ [?]

**य. दि. पेण्ढरकर**

प्रापंचिक पत्रें ३ [?]

घायाळ

**वि. म. भुस्कुटे**

स्टॅलिन ३॥ [?]

**कमलाबाई टिळक**

आकाशगंगा २॥ [?]

**रामतनय**

साखरगोटी १ [?]

समर्पण—

माझें मलाच

—ना. धों. ताम्हनकर

# पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना

ब्राह्मणाला यज्ञोपवीत, तशी पुस्तकाला प्रस्तावना पाहिजेच अशी माझी समजूत नाहीं. प्रस्तावनेनें विषयाकडे लक्ष वेधण्याऐवजीं त्या विषयानेंच आपल्या मगदुराप्रमाणें तें कार्य करावें हें मला रास्त वाटतें. म्हणून कसलीहि प्रस्तावना न करतां हें तात्या–चरित्र मी वाचकांना सादर करतों.

आणि तात्या–चरित्राची प्रस्तावना तरी कशी आणि काय करावयाची ? तात्याच्या चरित्रांत मन उल्हसित करील असा भाग आहे असें मीं म्हटलें, तर त्यांतील विषादपूर्ण घटना वाचल्यावर वाचक मजवर लबाडीचा आरोप करतील; आणि तात्या–चरित्र सर्वस्वीं संतापकारक आहे असें मीं सांगून टाकलें, तर त्यांतील कांहीं कारुण्यपूर्ण व्यक्तिदर्शनानंतर वाचक माझें तेंहि म्हणणें खोडून काढतील. अशा स्थितींत स्वतः कांहीं न सांगतां ग्रंथाचा कडूगोडपणा ज्याचा त्यानें ठरवावा असें सांगणेंच इष्ट नाहीं काय ?

ग्रंथविषयाबद्दल प्रस्तावना अनावश्यक असली तरी, ग्रंथनिर्मितीबाबतींत चार शब्द सांगणें मला अवश्य वाटतें. तात्याच्या उत्पत्तीनंतर कांहीं अपरिहार्य अडचणींमुळें तो मागें पडला आणि देशमुख आणि कंपनीचे श्रीयुत रा. ज. देशमुख यांनीं मनावर घेतलें नसतें तर तो तसाच पडून राहिला असता. पण त्यांनीं त्याला बाहेर खेचलें. एवढ्यासाठींच तात्या–चरित्राचें खरें श्रेय त्यांच्याकडे जातें. तात्या ज्यांना आवडेल त्यांनीं खरे आभार मानावे देशमुखांचे, आणि तात्यांतल्या दोषांबद्दल कानउघाडणी करायची असेल तर ती माझी करावी.

तात्याच्या प्रकाशनाच्या कामीं श्रीयुत देशमुख आणि राजगुरु मुद्रणालयानें दिलेल्या साहाय्याबद्दल उभयतांचाहि मी ऋणी होऊन राहिलों आहे.

—ना. धों. ताम्हनकर.

# तात्या

ना. धों. ताम्हनकर

— देशमुख आणि कंपनीचीं —

# आगामी प्रकाशनें

### वि. स. खांडेकर

१ अश्रु २ तिसरी भूक
३ बुद्ध आणि हिटलर
४ वर्षाकाल ५ चार भिंती
६ छाया भाग १–२
७ चक्रवर्ती ८ बडी मां
९ उद्यांचीं स्वप्नें
१० विसावें शतक ११ कल्पलता
१२ वालुका १३ मंजिऱ्या
१४ मराठीचा नाट्यसंसार
१५ चल ये राणी १६ सुवर्णकण
१७ माझ्या कादंबऱ्या

### ग. त्र्यं. माडखोलकर

१ तीन दिवस २ ऋणभार
३ माझे आवडते कवि
४ चक्रवर्ति उदयन ५ उर्वशी
६ उमरखय्याम ७ विलापिका
८ दोन तपें ९ हें युद्ध

### द. र कवठेकर

१ आपुलकीची झळ
२ दगाआड ३ आग आणि पाणी
४ आभाळाची सांवली

### ना. धों. ताम्हनकर

१ गुजाताई २ शेजारी

### प्र. के. अत्रे

१ दुर्वा आणि फुलें
२ 'मी' कसा झालों

### कृष्णाबाई मोटे

१ अनामिकेची पूजा
२ कलक्षेत्रांत
३ मवाली ४ गुणाची पोर

### काकासाहेब कालेलकर

१ स्मरण–यात्रा

### अनंत काणेकर

१ उघड्या खिडक्या
२ काळे आणि पांढरे

### चिं. वि. जोशी

१ गंड्याभाऊ २ दरबार कथा
३ लंकावैभव

### दत्तु बांदेकर

१ हिरवी माडी २ कबुली जबाब
३ नजरबंदी

### साने गुरुजी

१ गोड निबंध भाग तिसरा

### १ लक्ष्मीबाई राव

### १ आचार्य भागवत

### ह. रा. महाजनी

१ आपलें आर्थिक नियोजन

# प्रथम परिचय

नाना ठिकाणचीं नाना काष्ठें समुद्रांत वाहत येतात, त्याचप्रमाणें संसारांत निरनिराळ्या ठिकाणच्या आणि निरनिराळ्या स्वभावाच्या माणसांचा मिलाफ होतो असें एक सुभाषित आहे, तें अगदीं यथार्थ आहे. एक फांदी गिरनार पर्वतावरील, तर एक सह्याद्रींतील वेगवेगळ्या नद्यांतून समुद्राच्या एकाच विशाल उदरांत जाते, त्याचप्रमाणें पोटाच्या पाठीं लागलेलीं माणसें कुणी दक्षिण महाराष्ट्रांतून तर कुणी मध्यप्रांतांतून एकत्र येतात. आमचेंच पाहा. मी आणि तागडी यांच्या जन्मभूमींत शेकडों मैलांचें अंतर असून आज एका छपराखालीं राहत आहों !

'तागडी' ! हें माणसाचें नांव आहे ह्या कल्पनेनें तुम्हांला आश्चर्याचा धक्का बसेल हें मी स्वानुभवानें सांगतों. आमच्या शेजारीं नवें बिऱ्हाड आलें आणि त्यांचें नांव तागडी आहे हें कळतांच मला इतकें नवल वाटलें कीं, मला त्यांचें राहूनराहून हसूं येत होतें. मीं 'पै' सारखीं कंगाल नांवें जशीं ऐकलीं होतीं, तशींच 'कुबेर' सारखीं श्रीमान् नांवेंहि मला ठाऊक होतीं. 'काळे' माझ्या परिचयाचे होते, तसे 'गोरे'हि होते. 'ओक' सारखीं ओंगळ आणि 'श्रीखंडे' सारखीं रुचकर नांवेंहि मीं ऐकलीं होतीं. 'कोल्हे' आणि 'वाघ' या जंगली नांवांप्रमाणें 'राजवाडे' आणि 'हवेलीवाले' असे शहरी लोक मला ठाऊक होते. चिमुकले 'थिटे' आणि ऐसपैस 'हरपनहळ्ळी' माझ्या माहितीचे होते. श्रुतिमनोहर 'वाचासुंदर' आणि कर्णकटु 'घरघरे' मला

अपरिचित नव्हते. ' टण्णू ' आणि ' सहस्रबुद्धे ', ' कापशे ' आणि ' रेशिमवाले', ' भालेराव ' आणि ' तोफखाने' अशा हजारों कडूगोड लहानथोर नांवांची मला ओळख होती. आपलीं नांवें जंगलापासून राजवाड्यापर्यंत जातात; त्यांना मज्जाव असा कुठेंच नाहीं. अशी वस्तुस्थिति असली तरी आपल्या नांवांनीं 'तागडी'चा आश्रय केलेला मला अद्यापपर्यंत तरी माहित नव्हता. म्हणूनच माझ्या नव्या शेजाऱ्याच्या ' तागडी 'चें मला नवल वाटलें आणि मी हसलों.

मला आश्चर्य वाटूनच राहिलें नाहीं, तर मी बराच बुचकळ्यांत पडलों. 'तागडी' हें माझ्या शेजाऱ्याचें नांव कीं आडनांव हें कोडें अद्यापि उलगडलें नव्हतें, आणि एका रविवारची दुपार आम्हीं तें सोडविण्याचा निष्फळ प्रयत्न केला. मी म्हणे ' ठेंगडी ' ' अगडी ' सारखेंच 'तागडी' हें आडनांव असेल, तर ती म्हणे ' छकडी ', ' बगडी ' च्या जातींतील ही 'तागडी' असेल. पण हा तागडी पुरुष असल्यानें मी त्यास छकडी-बगडीच्या बायकी तोलानें तोलण्यास तयार झालों नाहीं. तरी पण ती आपला हट्ट थोडाच सोडते? कृष्णा, भिमा, सुधा हीं नांवें जशीं स्त्री-पुरुषांना सारखींच वापरतां येतात, तसें ' तागडी ' हेंहि वापरणें शक्य आहे, हा मुद्दा ती धरून बसली आणि मला तो सुलभपणें खोडून काढतां येईना. आमचा हा तागडीवाद आणखी किती वेळ चालला असता कोण जाणे, पण एका निराळ्याच घटनेनें तो आकस्मिकपणें सुटला.

तागडी हें माझ्या शेजाऱ्याचें नांवहि नव्हे आणि आडनांवहि नव्हे!

आमचें तागडीसंशोधन खूप रंगांत आलें होतें, इतक्यांत एक वृद्ध गृहस्थ दरवाजांतून आंत येतांना दिसले. साहजिकच वाद थांबवून प्रश्नार्थी नजरेनें आम्ही त्यांच्याकडे पाहूं लागलों.

" पाताळ पेठ ५८५ चं घर हेंच ना?" म्हातारबुवांनीं विचारलें.

" होय; कोण पाहिजे आपल्याला?" मीं विचारलें.

" इथं आमचे चिंतामणराव राहतात ना?"

" छे! इथं कुणी चिंतामणराव नसतात. आपण नंबर चुकलां वाटतं?"

" भलतंच कांहींतरी! पांचशेंपंच्याऐंशी पाताळपेठच्या पत्त्यावर माझीं पत्रं बरोबर पोंचतात आमच्या चिंतूला."

" आश्चर्य आहे ! या घरांत आम्हां दोघांशिवाय तिसरं बिऱ्हाड नाहीं एक आमचं, अन्—"

" दुसरं कुणाचं ? "

" दुसरे एक तागडी नांवाचे तरुण गृहस्थ राहतात या अंगणांतल्या खोलींत. "

" अहो ! मग तोच कीं आमचा चिंतामणी. घरीं नाहीं वाटतं तो ?"

" कुलूप दिसतंय दाराला. "

" केव्हां येईल घरीं ? "

" कांहीं नेम नाहीं त्यांचा. कधीं मी बाहेरून येण्यापूर्वीच ते आलेले असतात; तर कधीं रात्रीं दहा वाजून गेले तरी यायचे असतात. "

" तसाच आहे तो अव्यवस्थित लहानपणापासून. आतां त्याला शोधायचा तरी कुठं ? "

त्यांची ती अडचण पाहून मीं त्यांना आंत बोलावलें आणि शेजारधर्माप्रमाणें त्यांना चहापाणीहि दिलें गृहस्थ चांगला गोष्टीवेल्हाळ असल्यानें पुष्कळ गोष्टी आपोआप कळल्या. आमचे 'तागडी' हे म्हातारबुवांचे पुतणे असें आम्हांस समजून आलें. पांच मुलींच्या पाठीवर आणि संकष्टीच्या नवसानें झालेल्या या अपूर्वाईच्या पुतण्याचें नांव गणपतीचें ठेवावयाचें म्हणून 'चिंतामणि' ठेवलें, अशा प्रारंभापासून आतांपर्यंतचा इतिहास त्यांनीं आम्हांला ऐकवला. या चिंतामणीचें व्यावहारिक नांव चिंतू असें साहजिकच झालें, आणि शाळा—सोबत्यांत चिंतूचा चिंत्या झाला यांतहि कांहीं नवल नाहीं. पण चिंतू अपूर्वाईचा म्हणून लाडावलेला मुलगा. त्याला घरच्या माणसांनीं 'अहो चिंतूबाळ' म्हणून बोलावयाचें. शाळासोबती त्याला इतका मान कशासाठीं देतील ? ते त्याला ' चिंत्या ' म्हणत आणि त्या खडबडीत संबोधनानें चिंतूबाळ रडूं लागत. ते आतां आहेत तसेच बाळपणींहि बुजरे, मिळमिळीत आणि चिडखोर होते. राग खूप पण जोर नाहीं, अशी त्यांची अवस्था असल्यानें सोबत्यांनीं चिडविल्यास रडण्यावांचून दुसरें कांहींच त्याला करतां येत नसे. माणूस चिडूं लागला कीं चेष्टा वाढत्या प्रमाणांत व्हायची हें जगांतलें ठरलेलें तत्त्व आहे. ' चिंत्या ' म्हणतांच हा चिडतो या आपत्तींतून चिंतूबाळाला सोडविण्याचें श्रेय, त्याच्या धाकट्या काकांना आहे. त्या काकांनीं

विचार केला कीं, गणू, गंपू, बापू, रामू अशा कोणत्याहि नांवांत गण्या, गंप्या, राम्या असें क्षुद्रत्व आणतां येणें शक्य आहे. चिंतूबाळाला ठेवलेलें पहिलें नांव बदलून दुसरें असें नांव ठेवावयाचें कीं, त्याचें इतर नांवांप्रमाणें क्षुद्रीकरण करतांच येऊं नये. खूप डोकें खाजवून त्या कल्पक काकानें काढलें एक नांव शोधून. तें नांव म्हणजे 'तात्या'.

"तात्या" हें नांव आम्ही हरघडीं ऐकतों 'काका', 'आप्पा', 'दादा'-सारखेंच तेंहि एक आहे अशी आतांपर्यंतची आमची समजूत. वास्तविक नांवांतील गुणदोष आणि सोयी–गैरसोयी कोण पहायला बसलें आहे? पण नांवांतसुद्धां गैरसोय कशी असूं शकते आणि ती दूर करणारा कल्पक काका नसेल, तर रडत बसण्याची पाळी एखाद्यावर कशी येते, हें या चिंतामणि-पुराणावरून माझ्या चांगलेंच प्रत्ययाला आलें. आणि माझ्या परिचितांतल्या एकदोन व्यक्तींवर नांवामुळेंच कशीं वादळें उठलीं तेंहि मला आठवलें.

विषयांतराचा दोष पत्करूनहि तें उदाहरण येथें सांगण्याचा मला मोह होतो. माझी मावसबहीण मनूताई इचें लग्न झालें आणि तिला पतीहि हौशी आणि प्रेमळ मिळाला. मनूताईहि गोड स्वभावी आणि चतुर असल्यानें तिनें पतिराजांना अल्पावधींत पुरतें जिंकलें. ती पहिल्या खेपस माहेरीं आली आणि तिचा तेथें महिनाभर मुक्काम व्हावयाचा होता. इतका काळ विरहांत कंठणें तिच्या पतिराजांना दुःसह झालें, आणि कामासाठीं धारवाडला जायचें आहे या सबबीवर, त्यांनीं आठव्याच दिवशीं बेळगांवास सासुरवाडीस मुक्काम ठोकला! आठ दिवस राहूनहि त्यांना धारवाडच्या कामाची निकड लागेना आणि त्यामुळेंच जावईबापूंना नाहीं, तरीं मनूताईला चेष्टेच्या शब्दांनीं आम्ही खूप रडकुंडीस आणलें.

पण एके दिवशीं जावईमहाशय एकदम उठून निघून गेले! त्यांच्या अवचित आगमनापेक्षां अवचित प्रयाणाचें आम्हांस नवल वाटलें; आणि जाण्यापूर्वीं त्यांनीं जें त्रासिक वर्तन केलें, त्याची भीतिहि वाटली. नाहीं-तरी म्हणतातच कीं, डिवचलेल्या वाघापेक्षांहि चिडलेला जावई अधिक भीतिप्रद असतो.

यजमानांच्या या बिथरण्याचें कारण मनूताईलाहि उमगेना. ठराविक वेळीं तिला यावयाचें सासरचें बोलावणें तर आलें नाहींच; पण मुलीला सोबत

पाहून चार-आठ दिवसांत पाठवतों म्हणून लिहिलेल्या पत्रासहि ‘ मनोहरपंत महिनाभर परगांवीं जाणार आहेत, तेव्हां सूनबाईस इतक्या लगबगीनें पाठविलेंच पाहिजे असें नाहीं,’ असें तिच्या श्वशुरांचें उत्तर आलें, तेव्हां तर बिचारी फारच घाबरली आणि त्याच दिवशीं सासरीं जाण्याचा तिनें हट्ट घेतला.

तिला पोंचविण्याचें काम माझ्याकडे आलें. आम्ही उजाडतांच तिच्या गांवीं पोंचलों. दुपारीं जेवणेंखाणें उरकेपर्यंत विशेष कांहींच झालें नाहीं. इतर मंडळी माझ्याशीं खूप बोललीं. मनोहरपंत मात्र माझ्याशीं अगदीं बेतास बात बोलत होते. भिंतीला हसविण्याइतका विनोदाचा पाऊस पाडणारे मनोहरपंत आज असा उसनेपणा कां करतात या बुचकळ्यांत मी असतांनाच मनूताई तेथें आली. मनोहरपंतांनीं आपलें लक्ष पुस्तकांत घातलें. मनूताईच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले.

“ कांहीं चुकलं का माझ्या हातून ? ” मनूताईनें सद्गदित होऊन विचारलें.

“ छट्, आर्यपतिव्रता चूक करील तरी कशी ? ” मनोहरपंत उत्तरले.

“ अशा टोमण्यांनीं काय समजावं माणसानं ? जाणून बुजून मीं कोणतीहि चूक केली नाहीं —”

“ शरम नाहीं वाटत आणि बोलायला ? ” मनोहरपंत कडाडले. “ परपुरुषाला ‘ नाथ ’ म्हणून हाका मारल्यापेक्षां दुसरी मोठी चूक स्त्रीला कोणती करतां येईल ? ”

“ बोलायला कांहींतरी वाटायला हवं माणसाला —”

गलिच्छ आणि खोट्या आरोपानें चिडलेल्या मनूताईनें निषेध व्यक्त केला.

“ काय वाटायचं ? या कानांनीं ऐकलंय मीं तूं घरच्या आचाऱ्याला ‘ नाथ ’ म्हटलेलं. ”

मनोहरपंतांच्या या खुलाशानें मला हसूंच लोटलें. रडूं लागलेली मनूताईहि हसूं लागली. मनोहरपंत वेड्यागत आमच्याकडे पाहूं लागले.

“ हें पहा मनोहरपंत,” मी म्हणालों, “ आचाऱ्याला, नाथ म्हणण्यांत दोष झालाच असेल, तर तो आमच्या मनूताईचा नसून त्या आचाऱ्याच्या आईबापांचा. त्या मूर्खांनीं आपल्या मुलाचं नांव ‘ नाथ ’ ठेवलं त्याला मनूताई काय करणार ? ”

"म्हणजे!" एवढंच म्हणून मनोहरपंत उठले आणि त्यांनीं मनूताईचा हात आपल्या हातांत घेऊन म्हटलें, "खरंच! काय तरी नांवं ठेवतात एकेक!"

मनूताई यावर काय बोलली हें मला माहीत नाहीं. मी राहिलोंच नाहीं मग तिथें.

आठवलेली दुसरी गोष्ट म्हणजे आमच्या सुधाकराची. त्याच्या घरची मोलकरीण जशी ऐदी तशी मूर्खहि होती. त्याच्या खोलींतल्या जिनसा अमुकएक प्रकारें ठेवण्याच्या ताकिदी, आतांपर्यंत अनेकदां वायां गेल्या होत्या. आज त्याचीच पुनरावृत्ति झाली होती. त्याच्या टेबलावरील त्याच्या बायकोचा फोटो आज तिनें पुस्तकाच्या शेल्फवर ठेवला होता. आणि या चुकीचा संताप येऊन त्यानें तिला पुढें बोलावून खूप खरडपट्टी काढली. कोडगेपणानें ती हसतच होती. शेवटीं चिडून सुधाकर म्हणाला, "सखे, सखे, नाहींच का ऐकायचं तुला माझं?"

दीड दमडीच्या बटकीला 'सखे, सखे' म्हणून कंठशोष करणाऱ्या जावईबुवांना प्रथमच त्यांच्याकडे आलेल्या सासूबाईनीं काय बोलून घेतलें असेल त्याची कुणालाहि कल्पना करतां येईल. 'सखू' हें मोलकरणीचें नांव असून सुधाकराच्या हाकांत भलतेंसलतें कांहीं नाहीं हा खुलासा जेव्हां त्यांच्या खुद्द लेकीनें केला तेव्हां ती गृहगर्जे तोफ थंडावली.

सांगायचें तात्पर्य एवढेंच कीं, निरुपद्रवी नांवापासूनहि पुष्कळदा नसता त्रास होतो. आणि तो चुकविण्यासाठीं चिंतामणीचें 'तात्या' असें नामांतर झालें तें खरेंच चांगलें झालें असें मला वाटलें.

तरी पण तागडीचा उलगडा झाल्यावांचून माझी रुखरुख कमी होईना.

"पण 'तात्या'ची 'तागडी' कशी झाली?" बराच वेळ वाट पाहिल्यानंतर मी म्हातारबुवांना विचारलें.

"तात्याला इंग्रज भोंवला" असें म्हणून ते खूप मोठ्यानें हसूं लागले.

इंग्रजांची तागडी हिंदुस्थानच्या बोकांडीं बसली असें लाक्षणिक अर्थानें पुष्कळदा म्हणतात. पण ती तागडी तात्यांच्या गळ्यांत कशी अडकली हें माझ्या ध्यानांत येईना. मी जास्तच बुचकळ्यांत पडलों.

हशाचा उमाळा ओसरल्यावर म्हातारेबुवा सांगूं लागले, "अहो, या इंग्रजांनीं चोहोंकडून खेची करत आणलंय आम्हां हिंदी माणसांना. नांवा-

पुरता देखील ऐसपैसपणा शिल्लक ठेवला नाहीं. आमचीं पहिलीं नांवं बघा कशीं भरभक्कम होतीं! दादाजी कोंडदेव, आबाजी सोनदेव, बाळाजी बाजीराव, परशुराम त्रिंबक! खिरटं नांव एक नाहीं मिळायचं. अगदीं परवांपर्यंत ही जुनी परंपरा शाबूत ठेवली आमच्या देशभक्तांनीं. श्रीधर विठ्ठल, बाळ गंगाधर, महादेव गोविंद, हरि नारायण अशीं नांवं असायचीं. पण स्टेशनमास्तरांचं पीक वाढल्यापासून झाली चोहोंकडे खची. हे बी. जी. मास्तर तर ते सी. डी. मास्तर. शाळेंतहि शिरला तो प्रघात. लागलीं पोरं तशा सह्या करायला. आमचा तात्या खरं म्हटलं तर असायचा 'तात्याजी गजानन डिग्रजकर' पण बरोबरच्या पोरांनीं केली त्याची तागडी! आणि आमचे हे मुखदुर्बळ राजेश्री बसले गप्प!"

तागडीचा हा साधा आणि सरळ उलगडा पाहून तर आम्हांला मौज वाटलीच, पण तो उलगडा तागडीच्या म्हणजे तात्यांच्या काकांनीं ज्या गमतीदारपणें केला त्या गमतीदारपणाची मौज अधिक वाटली

बराच वेळ वाट पाहूनहि तात्यांचें आगमन होईना तेव्हां मीं काकांना म्हटलें, "आपण प्रवासांत बरेच दमलां असाल. तेव्हां थोडा वेळ आराम करा. संकोच करायचं कांहीं कारण नाहीं, आम्ही थोडे फिरून येतों. शिवाय लायब्ररींतहि जायचं आहे मला."

"मग मीहि येतों कीं तुमच्याबरोबर. दमायला काय झालंय? आगगाडी आणि मोटार झाल्यापासून प्रवासाचे श्रम गेले बरं का. नाहींतर आमच्या लहानपणीं चार कोस जमीन तुडविण्यांत दिवस जायचा, अन् जीवहि शिणून जायचा. आतां तें कांहीं नाहीं. दिवाणखान्यांत बसल्यागत बसायचं अन् तासाभरांत दहावीस कोसांची मजल मारायची! पण हे मोटारवाले मात्र बदमाष हं. पैसे घेऊन प्राण घ्यावयालाहि तयार लेकाचे. सांगतोंच तुम्हांला मोटारवाल्याच्या पाजीपणाची एक गोष्ट फिरायला गेल्यावर." असें म्हणून काकांनीं रुमाल चढवला, अन् काठी घेऊन ते अंगणांत उतरलेहि.

माझ्या खुणेनें तिनें बरोबर यण्याचा बेत रहित केला, आणि मी काकांना घेऊन बाहेर निघालों. पण—दरवाजांत तात्या उभे!

"आज अदितवार ना रे? आज देखील सुट्टी नसते का तुझ्या हापिसाला!"

"सुट्टी असते—पण—"

" पण काय ? तूं जात असशील इतर लोकांचीं कामं उपसायला. तुला कोणी कामाला बोलावलं तर 'नाहीं' म्हणणं कुठलं व्हायला तुझ्या हातून ?"

" अहो पण काका—"

" अरे तुझा हा मुखदुर्बळपणा आणि भिडस्तपणा तुझ्या जन्मापासून पाहतों आहे मी. तूं काय सांगतोस कपाळ ? "

फारा दिवसांनीं भेटलेल्या या काका-पुतण्यांत मायाममतेऐवजीं कावाकावीच प्रकट झालेली पाहून मला विस्मय वाटला. माझ्यासारख्या त्रयस्थासमोर आपली शोभा झाल्यामुळें तात्यांना वाईट वाटेल म्हणून मी एकटाच फिरावयास निघून गेलों.

पण रात्रीं परत आलों तरी काकांचें तोंड वाजतच होतें !

त्यांच्या संतापाचें कारण मला तिच्याकडून कळलें. तात्यांनीं कुलूप काढतांच चुलतेपुतणे घरांत गेले. तात्यांच्या अंथरुणाखालच्या सतरंजीवाचून बसायला दुसरें साधन नाहीं ! तात्यांनीं टेबल, खुर्ची, फार काय एखादी चटईसुद्धां घेतलेली नाहीं. जमिनीवर बसावें तर केर साचलेला ! बिऱ्हाड थाटल्यापासून केरसुणी फिरली नव्हती ! कारण केरसुणीच नव्हती. काकांनीं पाणी प्यावयास मागितलें तेव्हां तात्यांनीं पेटींतून तांब्या-भांडें बाहेर काढलें. पाणी भरून न ठेवण्याचें कारण, सकाळीं पाणी येतें तेव्हां नळावर बायकांची गर्दी असते आणि त्या असतांना पाणी आणावयास जाणें तात्यांना जमत नाहीं. बायका नळावरून जाईपर्यंत नळांतून पाणीहि निघून जातें आणि मग तात्यांना पाण्यावांचून भागवावें लागतें. पाण्यावर अवलंबून असणारे स्नानादि व्यवहार तात्या खानावळींतच उरकतात !

तात्यांची ही राहणी काकांना मंजूर झाली नाहीं. त्यांनीं चिरंजीव चिंतुतात्याची चांगली हजेरी घेतली, व आमच्या घरची बादली घेऊन शेजार घरच्या आडाचें पाणी आणलें. चोहोंकडे पाणी मारलें आणि खराटा घेऊन केरहि काढला.

हा सारा प्रकार पाहून मला नवल वाटलें आणि रागहि आला. मी काकांच्या जागीं असतों तर ते बोलले त्याहून कितीतरी अधिक बोलून घेतलें असतें. किंवा आल्या पावलीं परत चालता झालों असतों, असें मला वाटलें.

"बरं आतां गिळून या एकदा !" काकांचा असा हुकूम सुटला आणि कोट–टोपी चढवून तात्यांची स्वारी बाहेर निघालीहि. दरवाजापर्यंत गेल्यावर तात्यांना आठवलें कीं काकांच्या जेवण्याचीहि जबाबदारी आज आपल्यावर आहे. ते परत आले व म्हणाले,

"तुम्हीहि चला कीं जेवायला ?"

"आहे म्हणायची एवढी तरी अक्कल? मागून तरी झाली काकाची आठवण ! पण मला नाहीं यायचं खाणावळींत. सारा रामरगाडा असणार तिथं. त्यापेक्षां अच्छेर दूध घेऊन मोकळा होईन आणि उद्यां माझा मी स्वयंपाक करीन घरीं. दूध घेऊन ये चांगलं म्हणजे झालं." काकांनीं आज्ञा केली.

हा वेळपर्यंत तिच्या माझ्या विचारें ठरलें कीं, काकांना आमच्याकडेच जेवावयास बोलवावें, आणि काकांना बोलावल्यावर तात्यांना तरी कशाला वगळायचें ? असें म्हणून मीं दोघांनाहि निमंत्रण केलें. प्रथम थोडे आढेवेढे घेऊन काकांनीं माझें आमंत्रण स्वीकारलें. तात्यांनीं आधींच पोषाक उतरण्यास प्रारंभ केला होता !

"सध्यांच्या काळांत असा भिडस्तपणा उपयोगी नाहीं, तात्यासाहेब !" जेवायला बसल्यावर मी म्हणालों. "आमच्या शेजारीं दोन महिने आहेत पण अक्षर नाहीं बोलले कधीं. कांहीं हवं नको असलं तर सांगितल्याशिवाय कसं कळायचं ?" तिनें मला पुष्टि दिली.

'अहो, अशा साध्या सूचनांनीं समजूत पटायची नाहीं याची. याच्या पाठीवर गदापूरच्या गंगूनानासारखा एकादा कर्दनकाळ सोटा घेऊन असायला पाहिजे." काका म्हणाले.

"कोणते गंगूनाना म्हणालांत आपण ?" मीं विचारलें.

"गंगूनाना म्हणून आमचे एक मित्र किंवा दूरचे नातलग म्हणा–होते. भारी करडा अन् शिस्तीचा माणूस. अमुक माणसानं अमुक वेळां अमुक गोष्ट अमक्या पद्धतीनं करायची असं म्हटल्यावर ती तशी झाली पाहिजे. अहो, त्यानं आपल्या बारा वर्षांच्या भाचीला, भाकऱ्या करायला सांगितल्या. तिला प्रथम जमेना, पण दुपारपासून संध्याकाळपर्यंत आपण तिच्याजवळ बसून त्यानं पोरीला भाकऱ्या करायला लावल्या. पायलीचं पीठ सरलं, पण अखेर भाकरी बरोबर साधली तेव्हांच थांबला तो कारखाना !"

काकांच्या या माहितीनें एका निराळ्याच नात्यावर प्रकाश पडला, आणि त्याचें आम्हांला भारी नवल वाटलें. आम्ही एकमेकांकडे पाहून हसलों. " कां हो हसलांतसे ? " काकांनीं विचारलें.

" आम्ही तुमचे झालों म्हणून गंमत वाटली. " मीं सांगितलें.

" म्हणजे ? "

" म्हणजे काय? तुम्ही म्हणतां त्या गंगूनानांची ती भाकरीभाजी भाचीच आतां तुमच्यापुढं भाकरी करीत बसली आहे. "

" खरं ! तरी मला वाटलंच पहिल्या प्रथम. हिचा चेहरा ओळखीचा दिसतोय. पण म्हटलं विचारावं कसं ? बाकी हिला बघून किती दिवस झाले !"

अशा प्रकारें तात्या आमचे शेजारी होते ते नातेवाईक ठरले. लागलीच तिच्या मनांत त्यांच्याविषयीं आपुलकी उत्पन्न झाली आणि तिनें त्यांच्या घरची माहिती विचारून घेतली. मला कांहींच बोलावें लागलें नाहीं. तात्याप्रमाणें मीहि नुसत्या जेवण्यासाठींच तोंड हलवीत होतों. माहेराकडचा संबंधी इसम—मग तो बादरायणसंबंधाचा का असेना—भेटला, आणि बायका त्याच्याशीं बोलण्यांत दंग झाल्या नाहींत असें कधींतरी झालें आहे का ?

" तात्यांच्या लग्नाचं कुठपर्यंत आलंय काका ? " ताक वाढतां वाढतां तिनें विचारलें.

"कशाचं लग्न घेऊन बसली आहेस याचं ? " इतर मुलगे मुली नापसंत करतात, तर आमच्या या राजश्रींना मुलीच नापास करतात. परवां परशुरामपंत आले—मुलगी म्हणजे नुसती नक्षत्रागत होती. हुंडा देखील द्यायला मागंपुढं बघितलं नसतं त्यांनीं."

" मग बिनसलं कुठं ? "

" याची बत्तिशी पाघळली ना ! गळ्यावर सुरी ठेवली तरी तोंडांतून शब्द निघायचा नाहीं याच्या; आणि न होऊन निघाला तर असा निघायचा कीं सारा कारभार एकदमच खलास व्हायचा ! " असें म्हणून काकांनीं तात्यांच्या वरपरीक्षणाचें रसभरित वर्णन केलें. परशुरामपंतांनीं विचारलेल्या अनेक प्रश्नांचीं उत्तरें तात्यांनीं दिलीं नाहींत, आणि कंटाळून जेव्हां त्यांनीं " लग्न करण्याचा तुमचा मानस नाहीं कीं काय " असा निर्वाणीचा प्रश्न केला, तेव्हां " मला कांहीं माहीत नाहीं " असें तात्यांनीं उत्तर दिलें.

तात्यांच्या या अजागळपणानें परशुरामपत तर चकित झालेच, पण त्यांनीं तात्यांना जांवई करण्याचा आपला नादहि कायमचा सोडून दिला.

" आतां हें रत्न मी तुमच्या स्वाधीन करतों आहे. तुम्ही बघा कांहीं जमलं तर." आम्हां दोघांकडे आळीपाळीनें पाहत काका म्हणाले.

" त्यांत पाहायचं काय काका ? चांगला मिळवता मुलगा आहे. मुलींना काय हो कमी ? " ती म्हणाली.

" आतां नोकरीप्रमाणें छोकरीहि अवचित मिळाली तर काय कीं ! "

" म्हणजे काय काका ? " तात्याला मिळालेल्या नोकरीचा अवचितपणा समजावून घेण्यासाठीं मीं विचारलें.

" अहो, सध्यां बी. ए., एम्. ए. लोकांना नोकरी महाग झाली अन् आमचे हे मॅट्रिकराव मामाच्या वशिल्यानं बॅंकेंत कारकून झाले " प्रथम कुरकूर करीतच होते पण आमच्या आग्रहामुळें हे चिंतुतात्या चिकटले आणि आतां इथल्या शाखेंत बदलून आले आहेत."

तात्या ऊर्फ तागडीचा असा ऋणानुबंध जोडून काका दुसरे दिवशीं निघून गेले. या अजागळ प्राण्याबद्दल मला सहानुभूति फारशी वाटली नाहीं. पण तिला मात्र त्याच्याबद्दल ममत्व वाटूं लागलें. एके दिवशीं ती मला म्हणाली " आमचा तातू देव माणूस आहे नाहीं ? "

"होय." मी म्हणालों. "कांहीं आंधळे भक्त त्याची पूजा करताहेत खरे !"

माझ्या बोलण्याचा रोख ओळखण्याइतकी ती चाणाक्ष आहे.

" तुम्ही कशाला चांगलं म्हणतां, म्हणून याला म्हणाल ? " असें म्हणून तिनें निषेधाचा झटका मानेला दिला आणि आंत चालती झाली. दोन दिवसपर्यंत तिच्या मनांतला माझ्यावरचा राग अधून-मधून प्रकट होत होता !

---

# विवाह

महाशय तात्या आपल्या नात्यांत आले, याचा तिला हर्ष झाला. नातीं आणि मैत्री जोडण्यांत बायकांची वाकबगारी और असते खरी! माझ्या या शिफारसपत्रानें माझ्या भगिनींनीं शेफारून मात्र जाऊं नये. कारण मैत्री जोडण्याप्रमाणें मैत्री तोडण्यांतहि त्या तितक्याच तरबेज असतात.

पण करायचें आहे काय ही स्त्रीस्वभावाची चिकित्सा करून? मुद्द्याची गोष्ट ही कीं, आतां तिला तात्याविषयीं मनस्वी ममत्व वाटूं लागलें.

तिचें तें ममत्व अनेक प्रकारें प्रकट होऊं लागलें. तात्याचा उल्लेख ती 'आमचा' या शब्दावांचून सहसा करीनाशी झाली व कधीं कधीं तर 'आमचा तातू' म्हणण्याइतका लडिवाळपणाहि तिच्या बोलण्यांत दिसूं लागला. सात दिवसांच्या चौदा जेवणांपैकीं निदान पांच-सहा जेवणांस तरी तात्यास आमच्याकडले आमंत्रण मिळूं लागलें. आणि ज्या दिवशीं जेवायलाच बोलावण्यापर्यंत तिची मजल जात नसे, त्या दिवशीं त्याला कांहींतरी पोंचवायला ती विसरत नसे. पाहुण्यासाठीं केलेला शिरा, नवीं बनविलेलीं बिस्किटें, राजेवाडीहून आणलेलीं अंजिरें, कोंकणांतून आणलेला फणस या सर्वांतला प्रसाद तिच्याकडून तात्याला स्मरणपूर्वक दिला जाई.

सुरवातीला दबकत-थबकत चालणारी ही आपुलकी लवकरच राजरोसपणें मिरवूं लागली.

प्रेम करणें आणि करून घेणें या मनुष्याच्या नैसर्गिक भावना आहेत. म्हणूनच ती तात्यावर बंधुप्रेम करूं लागली, याचें मला आश्चर्य वाटलें नाहीं. पण तिचें हें प्रेम अनाठायीं वाया दवडलें जात आहे, अशी हळहळ मला वांटल्यावांचून मात्र राहिली नाहीं. कारण प्रेम द्यावें नि प्रेम घ्यावें असें माझें मत. आमच्या घरीं ही गोष्ट एकतर्फी होऊं लागली. तात्यावर ती मनापासून प्रेम करी; पण तात्या मात्र तिच्याविषयीं आपला बंधुभाव कधींच प्रकट करीत नसे. फार काय, तिच्यासाठीं दोन दिडक्यांचा स्वार्थत्याग करायचा मनाचा मोठेपणाहि त्यानें दाखविला नाहीं! तात्याला ऑफिसांतून घरीं येतांना एक नारळ आणावयास तिनें सांगितलें आणि त्यासाठीं एक आणाहि त्याला देऊन ठेवला. तात्या घरीं आला तो नारळ न आणतांच ! तिनें विचारलें, "नारळ नाहीं का आणलास ?"

"नाहीं. सहा पैशाखालीं नारळ मिळत नव्हता दुकानांत." तात्यानें उत्तर दिलें.

"मग तसा आणायचा होतास ?" ती.

"पण तुम्हीं चार पैसेच दिले होतेत." तात्या.

तात्याचें हें उत्तर ऐकून मला चांगलाच संताप आला; आणि कां न यावा ? जी त्याच्यासाठीं एवढा जीव तोडते तिच्याकरितां तात्यानें दोन दिडक्यासुद्धां का खर्च करूं नयेत ! आणि त्या दोन दिडक्या तरी त्याला परत मिळणार नव्हत्या असें थोडेंच होतें ? तिनें त्या दिल्याहि असत्या. पण तात्याला कुठें होता तेवढा विश्वास ?

दिलदारपणाचा तात्याच्या स्वभावांत असलेला हा अभाव मीं तिला दाखवला आणि त्याच्यावर खरपूस टीकाहि केली; पण मला वाटत होता तसा तात्या तिला टाकाऊ वाटला नाहीं ! प्रेम-मग तें भ्रातृप्रेम का असेना-कसें आंधळें असतें, त्याचा तिनें मला अनुभव आणून दिला. माझें म्हणणें पटण्याऐवजीं तात्याचा कैवारच तिनें घेतला. ती म्हणाली—"नेहमींचंच आहे हें तुमचं. एखादं माणूस एकदां मनांतून उतरलं कीं त्याचं कांहीं म्हटल्या कांहीं चांगलं दिसायचं नाहीं ! आमच्या तातूनं नारळ आणला नाहीं तो दोन पैशांकरतां आणला नाहीं असंच कां समजायचं ? नसतील त्याच्याजवळ पैसे त्या वेळीं. आणि मी म्हणतें, असले तरी दुसऱ्या कशासाठीं हवे असतील

ते. त्यांतून त्यानं कद्रूपणानं पैसे खर्चले नाहींत असं तुमच्या हट्टासाठीं मानलं तरी, तो शहाणपणाच म्हणेन मी त्याचा. माणसानं पैसा जतन केलाच पाहिजे सावधपणानं. आत्तां पैसा साठविला तर म्हातारपणीं उपयोगी पडेल. नाहींतर तुम्ही! परवां मुंबईहून पन्नासजणांचे पन्नास जिन्नस आलां घेऊन. आणि घरीं यायची फुरसत, कावळ्यासारखे उचलून नेले मेल्यांनीं! पण पैसे आणून देण्याची आठवण आहे का एकाला तरी? सांगा कीं तुम्हीच? दिलेत कुणी पैसे आणून?"

तिच्या या सवालास 'नाहीं' म्हणून उत्तर मुकाट्यानें देण्यावांचून मला गत्यंतर नव्हतें. त्या वेळेपुरतें तरी तिनें मला गप्प बसविलें खरें!

तात्यासाठीं स्वतः धडपड करूनच ती स्वस्थ रहात नसे. मलाहि ती दग-दग करावयास लावी. त्याच्यासाठीं मुली पाहण्याची काकांनीं केलेली सूचना तिच्या लक्षांत होती व त्याच गोष्टीचा ती मला वरचेवर तगादा लावी. मी 'ठीक आहे' असे तिच्या तोंडापुरतें म्हणत असलों, तरी करीत मात्र कांहींच नव्हतों. तात्याचा विवाह म्हणजे दोन माणसांना आमरण दुःखांत लोटणें होय असें मला खरोखर वाटे. नवरा-बायकोचें जीवन सुखपूर्ण होण्यास उभयतांमध्यें जी तडजोडीची आणि देवाण-घेवाणाची वृत्ति लागते, तिचा तात्यास गंधसुद्धां नाहीं; अशी माझी खात्री होती. आपल्या स्वतःच्यापलीकडे पाहण्याची उदारता तात्याच्या मनांत नव्हती आणि अशा नवऱ्याच्या बायकोस सुख लागणार नाहीं हें उघड होतें. अर्थात् हेंहि उघड होतें कीं, असमाधानी बायकोच्या सहवासांत तात्याचें जिणेंहि कष्टमयच होणार. ही वस्तुस्थिति उघड दिसत असल्यावर तात्याचा लग्नाचा विषय मीं शक्यतोंवर बाजूस सारला तर नवल काय? मला ती गोष्ट इष्ट वाटली असती तर मी हा वेळपावेतों त्याला चतुर्भुज करून मोकळाहि झालों असतों. ज्याच्यापाशीं लग्नाचा मुलगा आहे त्याच्याकडे मुलींच्या बापाच्या मागण्यांना कधींच कमतरता नसते. माझ्याकडेहि मुलींचे नडलेले बाप तात्याविषयीं कितीतरी येत. पण ज्यावेळीं जें जुळेल तें सांगून आतांपर्यंत त्यांची बोळवण मी करीत होतों. तथापि ती या बाबतींत माझें फारसें चालू देणार नाहीं असें मला हळू-हळू दिसून येऊं लागलें. आणि निरुपाय होऊन तात्याच्या लग्नाची खटपट करावयाचीच झाल्यास लग्नाच्या बाबतींत तात्याचे स्वतःचे विचार काय आहेत

ते समजून घ्यावे, म्हणून मी त्याला एकदां म्हणालों—" तात्यासाहेब' वैशाख महिना सरत आला कीं ! यंदा पोळीचा विचार आहे कीं नाहीं ? "

तात्या नुसता गालांतल्या गालांत हसला.

" हें काय विचारणं तुमचं ? लग्नाचा विचार नसायला आमचा तात्या लहान का आहे आतां ? त्या हरिभाऊंच्या गोविंदापरीस मोठाच असेल वरीसभरानं. गोविंदाची बायको दुसऱ्यांदा गर्भार आहे आतां. "

तात्याचें लग्न आतां किती अपरिहार्य आहे हें तिनें मला पटविलें.

" तें खरं ग. पण त्याबद्दल त्यांनीं प्रयत्न नको का करायला ? घरबसल्या कसं होईल त्यांचं लग्न ? काय तात्या, मग चालवली आहे का कांहीं खटपट ? "

" चालवली असेलच कीं ! " अगदीं निर्विकार मुद्रेनें तात्या बोलले.

" म्हणजे कुठं पाहून आला आहेस कीं काय तरी ? " ती म्हणाली. " पण ठरवून नाहीं ना आलास कुठं ? आम्हांला नसली तर नसू दे मेली, पण काकांना आणि घरच्या माणसांना तरी आहे का तुझ्या या खटाटोपाची वर्दी ? " सुचणें शक्य होतें तेवढे सगळे प्रश्न तिनें तात्यापुढें मांडले.

" तुमच्या खटपटीला यश कितीसं आलंय ? " मीं विचारलें.

" माझी खटपटच नाहीं मग यश कसलं ! " तात्या उत्तरला.

" म्हणजे ! खटपट चाललीच असली पाहिजे असं अत्तांच म्हणालास कीं ! " तात्याच्या बोलण्यांतील गैरमेळ पाहून तिनें आश्चर्य दर्शविलें.

" माझ्या लग्नाची खटपट चालविली असली पाहिजे असं मीं म्हटलं आणि तें खरंहि असलं पाहिजे; पण ती खटपट मीं स्वतः करावी असं कुठं आहे ? परभारेंच होईल सारं कांहीं ! "

तात्याच्या या खुलाशानें आम्ही अधिकच बुचकळ्यांत पडलों

" कोण करतंय तुझ्या लग्नाची खटपट ? " तिनें विचारलें.

" उपवर मुलींचे बाप आणि घरची वडील मंडळी ! मझ्यासारख्या लग्नाच्या मुलाचा वास लागतांच पोरींचे पाऊक घडपड केल्यावांचून कसे राहणार ? "

" तें सारं खरं, पण त्यांत तुझं स्वतःचं असं कांहीं मत असणारच कीं ! तुला बायको कशी पाहिजे, गोरी कीं काळी, शिकलेली कीं अडाणी ? लगीन थाटानं करायचं कीं अगदीं गांधी-पद्धतीनं करायचं ? "

" या गोष्टी मला विचारल्याच तर मी देईन माझं मत ! "

" आणि नाहीं विचारल्या तर ठरवतील त्या मुलीशीं आणि सांगतील त्या तऱ्हेनं लग्न लावून मोकळा होशील ? "

" हो, न व्हायला काय झालंय ? "

" भारीच गरीब तूं तात्या ! " ती म्हणाली. " नाहींतर आजकालचीं मुलं मी बघतें, असे विक्षिप्तराव असतात एकेक ! आधीं बायकोच पसंत पडतां पडत नाहीं बापड्यांना. "

तात्याचे स्वतःच्या लग्नाच्या बाबतींतले विचार मला अजागळपणाचे वाटले. पण त्यांतच तिला त्याचा गरीबपणा दिसला आणि नंतर त्याच्यासाठीं चांगलीशी मुलगी पाहण्याचा तिचा लकडा पूर्वीपेक्षां दुप्पट जोरानें सुरू झाला.

आणि योगायोग असा कीं, एक-दोन दिवसांत एक चांगली मुलगी आलीहि. आमचे कचेरीबंधु दामुअण्णा यांचे एक मित्र वरसंशोधनार्थ हिंडतां हिंडतां आमच्या गांवीं आले व दामुअण्णांच्या घरींच त्यांची माझी भेट झाली. त्यांची कुसुम मला मनापासून आवडली. निकोप शरीरबांधा, गौरवर्ण, गोंडस चेहारा, या गुणांमुळें कुसुम कुणालाहि पसंत पडण्यासारखी होती. इंग्रजी, पांच यत्तेपर्यंत तिचें शिक्षण झालें होतें. कशिद्याच्या कामाबद्दल तिला बक्षिसें मिळालीं होतीं. बेताचें का होईना पण तिला गाणें-वाजवणेंहि येत होतें. तिच्यांत वैगुण्य एकच होतें. तें म्हणजे तिच्या बापाचा निर्धनपणा. फार फार तर दोनतीनशें रुपये तो खर्च करूं शकला असता. लग्नसंबंधांत पैसा ही बिनमहत्त्वाची अर्थात् उपेक्षणीय बाब होय असें माझें मत असल्यानें कुसुमचा चांगुलपणाच तेवढा माझ्या मनांत भरला. पण त्याच वेळीं तिच्यासारखी गोड पोर तात्यासारख्या रूक्ष नवऱ्याच्या हातीं द्यावी कीं देऊं नये अशी शंकाहि माझ्या मनांत चमकून गेली. ही शंकाहि मीं फार वेळ मनांत ठरूं दिली नाहीं. त्याचें कारण आजची आमची समाजस्थिति. मनाप्रमाणें वधूवरांची पारख व निवड करायला आज आमच्या समाजांत वाव नाहीं. मुलगी-जातीच्या एका प्राण्याची पुरुष जातीच्या एका प्राण्याशीं सांगड घालणें एवढेंच लग्नाच्या बाबतींत आम्हांस करतां येतें आणि करावेंहि लागतें. म्हणूनच तात्या विचारानें आणि आचारानें कसाहि असला, तरी कुसुमसारख्या निर्दोष मुलीचें पतिपद त्याला बहाल

करण्यांत गैर कांहींच नाहीं असें मला विचारान्तीं वाटूं लागलें. उलट एका मुलीच्या काळजींतून एक गरीब-बाप मोकळा होईल हा फायदाच मला दिसूं लागला. आणि म्हणून मी कुसुमचें तात्यापुढें प्रदर्शन करण्यासाठीं त्या बापलेकीस आमच्या घरीं घेऊन गेलों. तात्याच्या त्या वेळच्या वृत्ती-वरून त्याला मुलगी दाखवण्याच्या फंदांत मी कां पडलों असें मला वाटलें. आपल्यासाठीं वधू म्हणून आणलेल्या मुलीकडे पाहण्याची तरुणाची दृष्टि वास्तविक मोठी अद्‌भुतरम्य असते. जमलेल्या वडीलधाऱ्या मंडळींची भीड आणि युवतीमुखदर्शनाची तारुण्यसहज उत्कंठा यांचें रमणीय द्वंद्व त्या वेळीं तरुणांच्या मुखावर पाहावयास सांपडतें. पण आमचा तात्या त्या प्रसंगींहि अगदीं दगडी पुतळ्यासारखा निश्चल, निर्विकार होता! त्यानें कुसुमकडे डोळे वर करून पाहिलें कीं नाहीं, याचीच मला शंका वाटली. वेळ साजरी करावी म्हणून मीं होऊन म्हटलें, 'पाहून घ्या नीट तात्यासाहेब!' पण या इशाऱ्याचाहि कांहीं उपयोग झाला नाहीं. तात्यानें खालीं घातलेली मान वर केली नाहीं, कीं जाजमावर बोटानें चालविलेलें लेखन थांबवलें नाहीं!

" कांहीं वाचून–बिचून घ्यायचं असलं तर घ्यायला कांहीं हरकत नाहीं. " कुसुमचे वडील म्हणाले.

" तात्या, तो मासिकाचा ताजा अंक टाका बरं इकडे? कोणता लेख वाचूं दे?" मीं तात्याला जागृति यावी म्हणून म्हटलें.

"वाचायची कांहीं जरूरी नाहीं. " अंक न देतांच तात्या म्हणाला.

"आमच्या कुसुमला स्वयंपाक चांगला येतो." कुसुमचे वडील म्हणाले. तात्याकडून कांहींच जाब नाहीं!

" आणि तिला पेटीहि वाजवायला येते बरं का, तात्यासाहेब!" मीं कुसुमच्या गुणवर्णनांत भर घातली.

तरीपण तात्यावर कोणाचीच कांहीं मात्रा चालली नाहीं. ' आणि विचार करून कळवतों काय तें ' असें सांगून पाहुण्यांची बोळवण करण्यावांचून मला अन्य मार्ग उरला नाहीं.

पाहुणे गेल्यावर मीं थोडें चिडूनच तिला म्हटलें, "आतां तुम्ही नि तुमचे तात्या पाहून घ्या आपलं. या भानगडींत यापुढं साफ पडणार नाहीं आपण. बायको दाखवायला आणली तर बघायचंसुद्धां जिवावर येतं त्याच्या!"

खरें सांगायचें म्हणजे तिलाहि तात्याच्या त्या घुमेपणाचा रागच आला होता. तरीपण तो व्यक्त केल्यास तात्याविषयींचा माझा संताप जास्त उग्रता धारण करील आणि मग त्याच्या लग्नास माझी मदत मिळणें कायमचें अशक्य होऊन बसेल या भयानें ती म्हणाली—

" तातूनं कांहीं मुळींच मुलगी पाहिली नाहीं असं नाहीं हं! आपण तिच्या वडिलांबरोबर बोलत होतां कीं नाहीं, तेव्हां पहात होता तो हळूच मान तिरकी करून. " तात्याकडे वळून ती म्हणाली, "पाहिलीस ना मुलगी तात्या? मग सांगून टाक एकदां पसंत आहे कीं काय तें? हो, उगीच लोंबकळत नको ठेवायला दुसऱ्याला. हं बोल, मघाशीं परक्या गृहस्थापुढं भिडस्तपणा दाखवलास तें ठीकच झालं म्हणा, पण आतां घरच्या माणसापुढं नको बाबा तोंडाला कुलूप घालूं— बोल काय तें? मुलगी पसंत आहे ना तुला? "

तात्यानें उत्तर दिलें " हो. आहे कीं. "

त्याच्या या उत्तरानें मला अधिकच चीड आली. न बोलतां माणसांची पारख!—" या मुलीचा कोणता गुण पसंत पडला आपणांला? " मी खोचून बोललों. तात्या कांहीं उत्तर देणें शक्य नव्हतें; आणि त्याला तें देण्याची गरज तरी काय होती? तिनें त्याचें वकीलपत्र घेतलें होतें आणि त्याची बाजू मांडायला ती सज्जहि होती! " तात्या मुलगी पसंत आहे म्हणतोय ना? झालं तर मग. आतां जास्त चिकित्सा नको त्याची. काय रे तातू ठरवायचं का मग? "

" तुम्हांला योग्य दिसेल तसं. "

तात्याच्या या उत्तरानें तिला गड सर केल्याइतका आनंद वाटला. आधीं लग्नासारखा अत्यंत आवडता विषय—आणि त्यांतून आवडत्या माणसाच्या लग्नाचा—मग कोणती बायको हुरळून जाणार नाहीं? ती माझ्यापुढें पंचांग टाकून म्हणाली, " आतां मुहूर्त कोणते कोणते आहेत तें पाहायचं. आठ दिवस तरी सवड पाहिजे मधें. "

पण मुहूर्त-निश्चयापेक्षांहि अगोदर करावयाच्या कांहीं गोष्टी मीं तिच्या निदर्शनास आणून दिल्या. प्रथम तात्याच्या वडील मंडळींचें या बाबतींत काय म्हणणें आहे, तें समजल्याखेरीज या कामीं पुढें पाऊल टाकणें उचित होणार नाहीं असें सुचवितांच ती म्हणाली—

“ मग आत्तांच्या आत्तां तार करा ना काकांना ? ” पण मीं तार केली नाहीं. पत्रच लिहिलें. त्यांत मुलीचें वर्णन, तिच्या बापाची परिस्थिति या गोष्टी तर सविस्तर लिहिल्याच, पण मुलीचा फोटोहि पाठविला. तात्याला पुन्हा एकदा विचारून त्यानें कबूल केल्यावर त्याला मुलगी पसंत असल्याचें कळविलें व पुढील गोष्टी निश्चित करण्यासाठीं केव्हां येणार अशी पृच्छा केली.

काकांचें उत्तर उलट टपालीं आलें. कांहीं निकडीच्या कामामुळें त्यांना ताबडतोब येणें जमण्यासारखें नसल्यानें पुढील ठरवाठरव सौ. ताईच्या ( म्हणजे तिच्या ) विचारानें मींच करावी असें त्यांनीं मला मुखत्यारपत्र दिलें. ज्या भानगडीपासून शक्यतोंवर दूर राहावें अशी माझी इच्छा, ती भानगड माझ्याच डोक्यावर येऊन बसूं लागली आणि ती झाडून टाकणें आतां शक्य तरी कुठें होतें !

अखेर मीं तात्याचें कुसुमशीं लग्न ठरविलें. तिच्या वडिलांची आर्थिक कुवत मला माहीत होती म्हणून, आणि हुंडा. मानपानादिक प्रकार मला रानटी वाटतात म्हणून, मीं ते विषय या विवाह–निश्चियाचे वेळीं पूर्णपणें दृष्टिआड केले. अवश्य तेवढेच विधि करून हें शुभमंगल साजरें करावें अशी माझी योजना होती. मी करतों आहे याबद्दल यत्किंचितहि नापसंती त्यानें शब्दानें वा कृतीनें दर्शविली नाहीं. तिला मात्र माझी ही मिळमिळीत आवड तितकीशी रुचली नाहीं. निदान अक्षत–वरातीच्या मिरवणुकी काढाव्या, थोड्या तरी नळे–चंद्रज्योति लावाव्या, बँड वाजवावा, अशी तिची इच्छा, आणि मांडव–परतणीची एक तरी मेजवानी वधूपक्षाकडून उकळावी असा तिचा आग्रह. पण मीं तो चालूं दिला नाहीं. ती हट्ट धरील असा रंग दिसतांच ‘ मग तुमचं तुम्ही पाहून घ्या, आपण इकडे फिरकणार सुद्धां नाहीं ’ असा मी त्रागा करी. याचा परिणाम म्हणजे मला माझ्या मनाप्रमाणें सर्व गोष्टी ठरवितां आल्या.

मिति ज्येष्ठ शुद्ध सप्तमी हा मुहूर्त निश्चित झाला. शुक्रवारचें लग्न तर तात्यानें बुधवारपासून रजा घ्यावी, काकादि घरच्या मंडळींनीं गुरुवारीं संध्याकाळपर्यंत येऊन दाखल व्हावें, इत्यादि कार्यक्रम ठरला. कुसुमच्या अंगच्या चोळ्या आणि ब्लाऊझ बेतण्यास तिनें सुरवात केली. तिच्या हाताचा वीड घेऊन बिलकर करावयास टाकले.

पण माणसानें योजलेले बेत सुसूत्रपणें सिद्धीस जाऊं देण्यांत दैवाला आपला पराजय झाल्यासारखें वाटतें. दुर्दैव, दुर्दैव कसलें ? तात्याच हे सारे बेत ढासळून टाकण्यास कारणीभूत झाला. तात्याची बहीण पुण्यास दिली होती. तिला लग्नसमारंभाला घेऊन येण्याचें काम काकांच्या सूचनेप्रमाणें तात्यावर आलें. तात्या गेला; पण ठरलेल्या वेळीं तिला घेऊन आला नाहीं. लग्नदिवस उजाडला तरी त्याचा पत्ता नाहीं ! आमचें धाबें दणाणलें. तार केली. तिचें उत्तर आलें कीं–' तात्या पुण्यास आलाच नाहीं. ' त्याच्या शोधाला पाठविलेलीं माणसेंहि वांकडें तोंड करून परत आलीं.

साहजिकच लग्न राहिलें, पण त्या निराशेपक्षां तात्याच्या सुरक्षितपणाच्या फिकीरींत आम्हीं पडलों होतों. व्याह्यांना अधिक लोंबकळत ठेवण्यांत अर्थ नाहीं, म्हणून मीं त्यांना दुसरा मार्ग पाहण्याचा सल्ला दिला आणि त्यांना तो पटलाहि. कुसुमचें बाशिंगबळच चांगलें. सप्तमीचा मुहूर्त फसला, तरी दशमीच्या मुहूर्तावर शेजारच्या गांवीं ती पोस्ट—मास्तरीण झाली. मी तिला घेऊन मुद्दाम त्या लग्नाला गेलों. कुसुमच्या वडिलांना आमच्याबद्दल कांहीं भलतेंसलतें वाटूं नये हाच त्या लग्नाला जाण्याचा माझा उद्देश.

काका आणि तात्याच्या घरची सर्व मंडळीहि जड अंत:करणानें परत गेली.

आठवडाभर शोध करूनहि तात्याचा पत्ता लागला नाहीं. नववे दिवशीं काकांची तार आली ! ' तात्या आपल्या बायकोसह आज येथें आला. '

तात्या सुखरूप असल्याबद्दल आनंद वाटण्याऐवजीं त्याच्या या अशिष्ट वर्तनाबद्दल माझा संताप उडाला. तीहि चिडली आणि आपल्याशीं तणतणली. तरीपण सर्व दोष तात्यावरच लादावयास तिचें मायाळू मन तयार नव्हतें. ती म्हणाली, " लग्नाची गांठ माणसापेक्षां ब्रह्मदेवच अगोदर बांधतो म्हणतात तें खरं ग बाई ! कुसुमची गांठ ब्रह्मदेवानं पोस्ट—मास्तराशीं बांधली होती, म्हणूनच तातूला अशी बुद्धि झाली आणि त्यानं दुसऱ्या मुलीशीं लगीन लावलंन्—"

तात्या आपल्या नव्या नवरीला घेऊन येणार असें पत्र आल्यावर मीं ठरविलें कीं, या माणसाबरोबर यापुढें अक्षरहि बोलायचें नाहीं. आणि त्याच्या वर्तनाचाहि खुलासा विचारायचा नाहीं; पण तिला गप्प बसणें कसें जमावें ? तात्या येतांच तिनें त्याच्यावर सरबत्ती सुरू केली आणि त्याचा विवाहवृत्तांत

अव्वलपासून अखेरपर्यंत काढून घेतला. त्याचा सारांश असा होता—

पुण्याच्या गाडींत एक पोक्त गृहस्थ तात्यास भेटले. शंभर खेटे घालूनहि मुलीचें लग्न न जमल्यामुळें ते अगदीं रडकुंडीस आले होते. अशा स्थितींत दिसेल त्या तरुण मुलाकडे त्यांनीं आशाळभूत नजरेनें पाहिल्यास नवल काय? तात्याकडे पाहतांच त्यांनीं चौकशी केली. 'अजून आपलें लग्न झालें नाहीं' असें त्यानें सांगितलें; पण तें ठरलें आहे हें मात्र सांगितलें नाहीं. त्यांनीं तो कोठें असतो, काय करतो हें विचारून घेतलें; आणि असा मिळवता मुलगा मिळाल्यास एक हजार रुपये मुलीबरोबर देण्याचें आमिष दाखविलें. या आमिषास बळी न पडेल तर तो तात्या कसला?

"हे पहा ताई, पैसा मिळत असतांना तो न घेणं हें शहाणपणाचं होईल काय?" असा महाशय तात्यांनीं उलट तिलाच सवाल घातला!

"अरे, पण तुझ्या या द्रव्यलोभानं खोटेपणा आला तो? आणि एका निरापराध मुलीचं जन्माचं अकल्याण झालं असतं तें?" ती.

"अकल्याण कसलं! आज नाहीं उद्यां तिचं लग्न झाल्याशिवाय का राहील? आणि त्या अनोळखी मुलीची सोय करण्यासाठीं, मी चालत आलेला पैसा लाथाडावा हा कसला न्याय? तिला झालं तरी एकादा राजपुत्र मिळाला असता, तर आधीं ठरलं म्हणून मला दिली असती का ती तिच्या बापानं?" तात्या.

"बरं पण चोरटा कारभार कां केलास असा?"

"तुम्ही तो सरळपणानं होऊं देणार नाहीं म्हणून." तात्याच्या उत्तरावरून त्याला शब्दाचा सच्चेपणा किती किंमतीचा वाटतो आणि त्याच्यासाठीं निरपेक्ष खटपट करणाऱ्या माणसांविषयीं सुद्धां त्याला विश्वास कसा वाटत नाहीं, या गोष्टी समजून आल्यामुळें तर तो माझ्या मनांतून पार उतरला. पण तात्याच्या सौभाग्यवतीची माहिती कळल्यानंतर मात्र तिच्यासाठीं तरी तात्याचा तिटकारा करणें योग्य नव्हे असें माझें मन मला सांगूं लागलें. "तुझे श्वशुर कुठें असतात? काय करतात, नांव काय त्यांचं?" तिनें विचारलें. तात्यानें माहिती सांगितली—"माझे श्वशुर स्वर्गांत असतात. म्हणून ते काय करतात हें सांगतां येत नाहीं. त्यांचं नांव श्रीपतराव देवगांवकर."

" काय श्रीपतराव देवगांवकर! हे तुमचे सासरे! म्हणजे भैराळराव देवगांवकरांची नात झाली ही तुमची बायको?" माझी इच्छा नसतांहि मी बोलून गेलों. आणि माझ्या वरील शंका अगदीं खऱ्या ठरल्याचें कळल्यावर मीं एकदा कपाळाला हातहि लावला. कारण श्रीपती देवगांवकर हा माझा शाळासोबती, जिगर दोस्त! बिचारा मोटार-अपघातांत ऐन तरुणपणींच मरून गेला होता. त्यानंतरची त्याच्या घरची कांहींच हकीकत कळली नव्हती. आज त्याची मुलगी निराळ्याच नात्यानें माझ्या घरीं आली. आतां कितीहि अप्रिय असला तरी तिच्या नवऱ्याचा धिक्कार मी कसा करूं?

---

# संसाराची सुरुवात

"तातूनं मालीला मारलं-बिरलं कीं काय तरी!" मला वाढतां वाढतां ती म्हणाली. "कशावरून ?" मीं विचारिलें.

"सकाळपासून पाहतें आहें, तिचा चेहरा कोमेजलेला दिसतोय मला!"

"तुझ्या तात्याच्या बाबतींत कोणतीहि गोष्ट शक्य आहे." मी म्हणालों. आणि तो विषय तेथेंच सोडण्याचा प्रयत्न केला. पण मला त्यांत यश आलें नाहीं. कांहींच न बोलतां मीं चार-पांच घास खाल्ले, पण मालीला तात्यानें मारल्याची तिनें काढलेली शंका मला दडपून ठेवतां येईना. माझ्याहि मनांत ती डुचमळूं लागली, व मीं विचारलें—

"मग तूं तसं विचारलं कां नाहींस मालीला ? बोलायला नको तें तासन् तास बोलतात, पण जें अवश्य बोललं पाहिजे त्याला मात्र हमखास चुकतात. ही बायकांची खोडच!"

"मग पुरुष सुधारूं देत कीं बायकांची चूक. नको का म्हटलंय कुणी ?"

तिच्या या उत्तरानें मात्र मला कळून चुकलें कीं, आपण अकारण तिला तो टोमणा दिला. मन अस्वस्थ झालें कीं बोलण्याला तोल राहत नाहीं.

त्यानंतर माझें जेवण जवळ जवळ तोंड मिटूनच ( बोलण्यापुरतें ) झालें. आणि हात धुऊन ऑफिसचे कपडे करीत असतांना माली जेव्हां अंगणांत

लुगडें वाळत घालायला आलेली दिसली, तेव्हां मी तिला हाक मारून म्हटलें—

"माले, तात्या काय करताहेत ग?"

"ऑफिसांत जायचंय्." माझ्याकडे न पाहतांच मालीनें उत्तर दिलें. मला आपलें तोंड दिसूं नये असा तिचा प्रयत्न असावा असा मला संशय आला. खात्री करून घेण्यासाठीं मीं पुनः विचारलें—

"कां ग? आज लवकरसं? जेवून गेले कीं तसेच?"

"जेवण झालंय" पुनः तसेंच उत्तर.

"तुझंसुद्धां? आज काय धुंधुरमास केलात कीं काय ग!"

मला वाटलें होतें कीं माझ्या या विनोदमिश्र प्रश्नावर 'इश्श, कांहींतरीच' अशासारखें एखादें उत्तर मालीकडून मिळेल. पण तसें झालें नाहीं. कांहींच उत्तर न देतां व माझ्याकडे न पाहतां धुणें वाळत घालून ती आंत गेली.

मी मनांत चपापलोंच. तिच्या येण्यापासून असा एकहि दिवस गेला नव्हता, कीं ज्या दिवशीं मी मालीचा कांहीं तरीं थट्टाविनोद केला नाहीं, आणि तिनेंहि आपल्या लडिवाळ उत्तरानें त्यांत माधुर्य निर्माण केलें नाहीं. तिनें आपल्या हसऱ्या बोलक्या वागणुकीनें आपल्या पित्याची—माझ्या बालमित्र श्रीपतीची—स्मृति अनेकदां ताजी केली होती आणि त्यासाठींच मालीला कांहीं ना कांहीं कारणानें बोलविण्याचा मी प्रयत्न करीत असें. माझा प्रयत्न अयशस्वी होण्याचा हा पहिलाच प्रसंग होता आणि म्हणूनच त्याची मला चुटपुट लागून राहिली. अपयश अंगवळणीं पडलें म्हणजे त्याचें कांहीं वाटेनासें होतें.

मी तसाच ऑफिसांत गेलों आणि तिथला माझा कार्यक्रम जरी रोजच्या-सारखाच चालला होता, तरी माझ्या मनांत तात्या आणि मालीची मूर्ति अनेकदां येऊन गेली. तात्या तिला कांहीं लागट बोलतो आहे, माली खालीं मान घालून मुसमुसून रडते आहे; तात्या तिला मारीत असून ती तसें न करण्याबद्दल त्याला हात जोडते आहे, तात्या तिला कांहींतरी भयानक धाक घालतो आहे आणि ती भाबडी पोर अगदीं घाबरून गेली आहे, अशीं विविध दृश्यें माझ्या कल्पनाचक्षूंपुढून सरकून गेलीं. प्रत्येक चित्रांत मला तात्या वाघासारखा उग्र आणि माली हरिणीसारखी असहाय दिसत होती.

कचेरी सुटल्यावर रोजच्यासारखा रमत गमत न येतां मी तडक घरीं आलों. मालीच्या उदासीनतेचा उलगडा झाल्यावांचून दुसरी गोष्ट मला सुचणेंच शक्य नव्हतें. हा उलगडा आतां माझा मलाच करून घ्यावयास पाहिजे होता. कारण, दुपारीं जेवतेवेळीं तिला आलेला घुस्सा इतक्या लवकर ओसरणार नाहीं अशी माझी कल्पना होती.

पण मला दरवाजांत पाहतांच सुटकेचा निःश्वास टाकल्यासारखें करून ती म्हणाली—

“ बरं झालं बाई, लवकर घरीं यायला झालं तें. ”

मी आश्चर्यानें तिच्याकडे पाहतच राहिलों.

“ पण कपडे उतरायपूर्वी डॉक्टरना आणायचं बोलावून झटकन्. ”

अधिकच गोंधळून मीं विचारलें—

“ डॉक्टरना ! आणि तें कशाला ? ”

“ मालूताईनीं करून ठेवलाय् कीं कारभार. नळावरून येतांना पडल्या आहेत बाईसाहेब आणि कपाळाला चांऽगली दोन अंगळं खोक घेतली आहे पाडून ! ”

मालीनें जणूं कांहीं हौसेनेंच ही आपत्ति आपल्यावर ओढवून घेतली आहे अशा सुरांत जरी ती बोलत असली, तरी तिच्या मनांत मालीविषयीं सहानुभूति आणि चिंता पूर्णपणें भरलेली तिच्या चर्येवर दृग्गोचर होत होती. मीं अधीरतेनें विचारलें—

“ आहे कुठं ती ? ”

“ आपल्याकडेच ठेवली आहे मी तिला निजवून. जखमेला कातणीचं घर लावून रगत बंद केलंय. ”

मीं लगबगीनें आंत जाऊन मालीला पाहिलें. “ काय झालं ग माले ?”

माझा आवाज ओळखून मालीनें एकदा डोळे उघडून माझ्याकडे पाहिलें व अक्षरहि न बोलतां पुनः डोळे मिटून घेतले. “ कशी पडलीस ? खोक फार का दुखती आहे? घेरी आली कीं पाय निसरला ? ” असे किती तरी प्रश्न मीं विचारिले, पण मला मुळींच उत्तर मिळालें नाहीं! तिचेंहि असेंच झालें होतें.

“ हा काय मेला घुमेपणा ! माणसं इतकं विचारताहेत, तर बोलायचं नाहीं म्हणजे काय ! इश्श ! ”

ती आणखीहि कांहींतरी बोलत राहिली असती, पण आजारी माणसांवर कावणें मला श्रेयस्कर न वाटल्यानें तिला थोडें बाजूस नेऊन मी म्हणालों—

" हें पहा, उगीच कांहीं बोलूं नको पोरीला. तिला बोलवत नसलं तर तिनं तरी काय करावं ? रोज बुलबुलासारखं बोलणारी छोकरी उगीच्या उगीच तोंड शिवून घईल हें शक्य तरी आहे का ? आतां आलोंच मी डॉक्टरला घेऊन, अं ! "

आणि पंधरावीस मिनिटांतच मीं डॉक्टरना आणलें.

डॉक्टरनीं मालीची प्रकृति पाहून म्हटलें—

" प्रकृतींत क्षीणतेपेक्षां कांहीं कॉम्प्लिकेशन दिसत नाहीं. या कांहीं व्रतंवैकल्यं, उपासतापास करीत असतात का ? "

" ही पोरटी !—अन् उपास करणार ! महाशिवरात्रीला कांद्याचं थालीपीठ लावून खाईल ही "

त्याहि स्थितींत तिची थट्टा करण्याचा मोह मला आवरला नाहीं. पण डॉक्टरला माझें म्हणणें पटलेलें दिसलें नाहीं. ते तिच्याकडे वळून म्हणाले—

" हें पहा वैनी, प्रथम या मुलीला कपभर दूध नाहीं तर कॉफी पाजवा. तोंपर्यंत मी दवाखान्यांत जाऊन औषध आणि जखम धुवून बांधावयास माणूस देतों धाडून. तो सांगेल पुढं काय करायचं तें; आणि संध्याकाळीं क्लबांतून परत जातांना मी पुनः एकदां येऊन पाहून जाईन. "

डॉक्टरनीं सांगितल्याप्रमाणें सर्व व्यवस्था झाली. दूध पोटांत जातांच मालीची ग्लानी पार उडाली. तिनें डोळे उघडले आणि स्वतःहि उठायचा तिचा प्रयत्न चालू झाला.

" दुसरी खोक हवी आहे वाटतं ? पड स्वस्थ. " मीं दटावलें.

" पण यायला झालं असेल ना ? " माली बोलली.

" तात्या आला असता तर आलाच असता इकडे राणीसरकारचा शोध करीत ! " तिच्या या उत्तरावर मालीनें एक दीर्घ आणि जड निःश्वास सोडला.

मी आंत गेलों व कडीपाटाकडे दृष्टि लावून पडलेल्या मालीजवळ बसून म्हटलें—" मालूताई, बरं वाटतंय ना आतां ? "

" हो. "

" पण इतका अशक्तपणा आला तरी कसा एकाएकीं तुला ! "

" सकाळीं उलट्या होतात का ग आतांशा ? " तिनें माझ्याकडे डोळे मिचकावीत व ओठांतल्या ओठांत हसत मालीला विचारलें. मलाहि मौज वाटली त्याची आणि मी म्हणालों —

"खरं का ग माले ? तूं छपवून ठेवायला गेलीस, पण असं उघड झालं तें, होय ना ? "

" इश्श, कांहींतरीच असतं तुमचं ! " माली म्हणाली. त्या म्लानतेंतहि तिच्या मुखावर हसूं चमकलें.

" अग पण आमचं कांहींतरीच राहूं दे बाजूला. तुमचं कांहींतरी आहे तें कळूं दे कीं एकदा ! कीं उपास धरले आहेस कसले डॉक्टरनीं शंका काढल्याप्रमाणं ? "

माझा तो प्रश्न ऐकतांच मालीनें अशा भेदरलेल्या नजरेनें माझ्याकडे पाहिलें कीं, त्या पाहण्याचें मला भयच वाटलें. तिनें एकवार ओठ चावला. मनांतील उचंबळून येणारें कांहींतरी आंतल्या आंत दाबून ठेवण्यासाठींच ओठाच्या दरवाजाला ती बळेंबळें खीळ घालते आहे असें मला वाटलें.

" मी जातें बाई. येतील आतां. " माली आपल्या घरीं जायला उठली.

" उठूं नको म्हणतों ना ! दोन दिवस स्वस्थ पडून राहायला सांगितलंय तुला डॉक्टरनीं. "

" पण—"

" पण नाहीं, नी बिण नाहीं. तात्या आला म्हणजे सांगीन मी त्याला आणि त्यालाहि इकडेच बोलावीन तूं चांगली बरी होईपर्यंत. " तिनें मालीची समजूत घातली.

" मालूताई, माझे डोळे आज तूं चांगले उघडलेस. " माझा हा अनपेक्षित प्रश्न ऐकून माली चपापली. असें कांहीं तरी नाटक केल्यावांचून मालीचें गुपित बाहेर पडणार नाहीं या कल्पनेनें बुद्ध्याच हा दगड मीं टाकला होता, आणि माझ्या अपेक्षेप्रमाणें तो लागलाहि.

" असं कां म्हणतां दादा ? " माली आर्जवी स्वरांत म्हणाली.

" काय खोटं का म्हणतों मी ? तूं माझ्या मुलीसारखी, अशा ममतेनं मीं आतांपर्यंत वागत आलों, पण मुलीला बापाविषयीं जो जिव्हाळा नि आपले-

पणा वाटतो, तो माझ्याविषयीं तुला कुठं वाटतोय ? वाटत असता तर तूं आपलं दुःख संकोच न करतां मला सांगितलं असतंस."

माझं बोलून व्हायच्यापूर्वीच मालीनें माझ्या मांडीवर मस्तक टेकून मुसमुसून रडायला सुरुवात केली होती. मी बोलायचा थांबतांच एक जोराचा हुंदका देऊन ती म्हणाली—

"दादा, मी काय सांगूं आणि कसं सांगूं तुम्हांला ?" पुन्हा तिचें रडें अनावर झालें. तिची ती करुण अवस्था पाहून आम्ही दोघेंहि गहिंवरलों. तिनें मालीला उठवून आपल्या पोटाशीं धरलें आणि आपल्या पदरानें तिचे डोळे टिपीत म्हटलें--

"उगा हं बाळ, असं काय करावं वेड्यासारखं !"

प्रेमी जनांची सहानुभूतिसुद्धां दुःखी जीवाला कशी असह्य होते हें मला त्या वेळीं पाहावयाला मिळालें. तिच्या छातीवर मान टेकून माली अधिकच स्फुंदायला लागली होती.

पण अमळशानें तिचा दुःखावेग ओसरला. तिनें आपला तीन दिवसांचा मुका छळ आम्हांला ऐकवला.

तात्यानें तिला चार दिवसांच्या उपवासाची शिक्षा फर्मावली होती !

कोणत्या अपराधाबद्दल ?

अपराध कोणताच नव्हता. पण त्याच्या फाजील प्रपंचदक्षतेला आणि दयाशून्य स्वभावधर्माला अपराधाचा वास आला, शिक्षा फर्माविण्यांत आली आणि तिची अर्धीअधिक अंमलबजावणीहि होऊन गेली.

तात्यानें प्रपंच थाटतांना जर कोणता विचार प्रथम केला असेल तर खर्चाचा. तारुण्यांत स्फुरणाऱ्या विलासी वृत्तीनें तात्याच्या मनांत चुकून देखील उचल खाल्ली नाहीं ! नवयौवना आणि सुंदर सहचरी त्याला सुदैवानें लाभली होती. तरुणांचा कोंडमारा करणारी वडील मंडळीहि त्याच्या मार्गांत आड येणारी नव्हती. त्याची प्राप्तीहि त्याच्या मानानें भरपूर होती. अशी अनुकूलता असती, तर दुसऱ्या एखाद्या तरुणानें प्रणयक्रीडांना पूर आणला असता. तो त्या अतुलनीय आनंदांत रुपये-आणे-पैलाच काय, पण साऱ्या जगालाहि विसरून गेला असता ! पण—पण आमचे श्रीयुत तात्या जगावेगळे प्राणी असल्यानें त्यांना प्रणयाची बाधा यत्किंचितहि होऊं शकली नाहीं !

तरुण-तरुणींची उल्हसित आणि हसरी नाचरी वृत्ति पाहिली, कीं माझ्या-सारखे पोक्त प्राणी त्यांना 'थिल्लर' म्हणायला कमी करीत नाहींत. तरीपण त्याच तरुण जीवांनीं शुकाचार्यांची उदासीनता प्रकटविलेलीहि त्यांना पतकरत नाहीं. तरुण दंपतींनीं हौसा-मौजा तर केल्याच पाहिजेत, पण त्या शक्य तितक्या आपल्यापासून दूर राहून केल्या पाहिजेत, अशी आमची इच्छा असते. पोक्त मंडळींच्या या न्यायास अनुसरून तात्यानें आणि मालीनें आयु-ष्यांत एकदाच आणि अल्पकाळ येणारी तारुण्याची पर्वणी सार्थकीं लावावी अशी आमची अपेक्षा होती. आणि त्यांचें वैवाहिक जीवन आंतल्या आंत तरी आनंदमय असेल या आशेवर आम्ही आतांपर्यंत समाधान मानून होतों.

पण मालीनें तो आशेचा बुडबुडा आज फोडला! आधी सांगितलें आहेच कीं, तात्याच्या आयुष्य-नौकेचें सुकाणूं आनंदप्राप्तीपेक्षां धनसंचय हेंच होतें. त्यानें इतर कोणात्याहि बाबतींत नसलें तरी, प्रापंचिक बाबतींत महात्मा गांधींचें शिष्यत्व पतकरलें होतें. हिंदुस्थानांत माणशीं दीड आण्याचा अन्नखर्च त्यानें मान्य केला होता; व रोजच्या तीन आणे हिशेबांत बसेल इत-कीच अन्नसामुग्री विकत आणण्याचा परिपाठ त्यानें ठेविला होता. त्याला स्वतःला चहाची चटक असल्यानें चहाचा अंतर्भाव त्यानें अन्नखर्चांत केला नव्हता व त्यामुळें साखऱ्या आणि दूधहि त्यांतून सुटलें होतें!

रोज तीन आणे खर्चांत बसेल तितकीच अन्नसामुग्री तात्या विकत आणी, आणि मीठमसाला तो बायकोच्या स्वाधीन एकदमच करी, पण डाळ-तांदूळ व पीठ—कणीक तो आपल्याच कबजांत ठेवी. उजाडतां व संध्याकाळीं घरीं आल्यावर दरवेळचा शिधा काढून देण्याचा परिपाठ त्यानें ठेवला होता!

हें कैद्याचें जिणें कंठीत असतां मालीच्या मनाला उद्वेग वाटत नसणें शक्य तरी कसें आहे? पण मनांत दुःखाचा वणवा पेटला असतां मुद्रेवर समाधानाचा फुलबाग फुलविण्याची हिंदुगृहिणीची कला मालीनेंहि संपादिली असल्यानें, तात्याच्या छळवादाचें प्रतिबिंब तिच्या बोलण्याचालण्यांत आम्हांला एकदांहि दिसलें नाहीं. पण माणसाचें मन दगडासारखें घट्ट असलें तरी शरीर तसें होऊं शकत नाहीं. आवश्यक पोषण—द्रव्यें मिळालीं नाहींत तर तें लटपटतेंच लटपटतें!

मालीचें शरीर आज जें कोलमडून पडलें तें त्याला गेल्या दोन दिवसांत अन्नाचा कणहि मिळाला नव्हता त्यामुळें. तात्यानें तिला चार दिवसांच्या उपवासाची सजा दिली होती! तिचा अपराध झाला होता तो असा—

मालीचा डोळा चुकवून मांजरानें दूध मटकावलें आणि खाववलें नाहीं तें लवंडून दिलें. अर्थातच तात्यांना पुनः शेरभर दूध आणावें लागलें आणि चार आण्यांचा भूर्दंड भरावा लागला. मांजरानें दुधाची नासाडी केली तेव्हां तात्या घरींच होते व ते अवेळीं पेंगलें नसते, तर मांजराची दुधावरील स्वारी त्यांना परतवतांहि आली असती. यामुळें एखाद्याला वाटेल कीं या दुग्धनाशास तात्यांचा गाफीलपणा कारणीभूत झाला. पण तात्यांचा कोटिक्रम असा होता, कीं दुभत्याची जबाबदारी सर्वस्वीं बायकोवर आहे व त्यांतील नुकसानीची भरपाई तिनें एकटीनेंच करून दिली पाहिजे.

एखादा दिवस एखाद्याला मोठा खडतर जातो. नसतीं लफडीं त्याच्या मागें लागतात. त्या दिवशीं बिचाऱ्या मालीचेंहि तसेंच झालें होतें. तिनें खुंटाळ्यावरील तात्यांचा कोट व शर्ट परीट कपडे मागायला आला तेव्हां धुवावयास दिला, आणि तात्या बाहेरून आल्यावर त्यांना जेव्हां हें कळलें तेव्हां त्यांनीं बायकोवर चांगलाच गहजब केला! ते कपडे पुढील महिन्यांत परटाकडे द्यावयाचे होते व आतांच दिल्यामुळें ही दोन आणे धुलाई विनाकारण पडली. दुधाचे चार आणि धुलाईचें दोन असे घसघशीत सहा आणे नुकसान! तात्यांना कसें मानवणार हें?

हे सहा आणे भरून काढण्यासाठीं माली उपाशी राहण्यावांचून काय करूं शकली असती? ती मिळवती थोडीच होती? अर्थात् शिल्लक होता तो एकच मार्ग — तिला उपाशी ठेवण्याचा—तात्यांनीं पतकरला! मालीकडून ही हकीगत कळली तेव्हां माझा संताप अनावर झाला आणि—

'माणूस आहे कीं राक्षस आहे हा!' असें उद्गार एकदम माझ्या तोंडांतून निघाले.

"आपण कशाला संतापायचं? असतात एकेक माणसं चमत्कारिक पण आमचा तातू इतका हा असेल असं नव्हतं मला वाटलं." तिनें मला दुजोरा देतां देतां आपल्या तातूला सावरण्याचा प्रयत्नहि केला.

" पण माले, तुझी सगळी अक्कल गेली का कुठं मुलखावर? तुझ्या नवरोबांनीं तुला चार दिवसांच्या उपासाची शिक्षा दिली, तरी ते चार दिवस सलग भोगण्यापेक्षां आठवड्यांत एक याप्रमाणं कां नाहीं भरून काढलेस? "

" पण दादा, मी दुसऱ्या आठवड्यापर्यंत जिवंत राहीनच याचा काय भरंवसा? "

मालीचे हे उदास उद्गार तिचे स्वत:चे नसून, तात्याचें तें निर्दय मत होतें हें ओळखणें मुळींच कठीण नव्हतें. या त्याच्या मतानें तर त्याच्याविषयीं माझें मन पुरतें विटून गेलें आणि मी म्हणालों—

" मुखावलोकन सुद्धां नको अशा माणसाचं. मालक याचं बिऱ्हाड काढून टाकायला कबूल नसतील, तर मी दुसरं घर पाहतों उद्यांच्या उद्यां. "

" दादा, असं नका करूं, पायां पडतें मी तुमच्या. मी तुमची ना? " माली गहिंवरून म्हणाली.

' मी तुमची ना? ' हे त्या कोवळ्या असहाय मुलीचे शब्द ऐकतांच माझ्या पोटांत कालवाकालव झाली. संताप आणि वात्सल्य अशा परस्परविरोधी भावनांच्या कचाट्यांत मी सापडलों होतों आणि मला कांहींच कळेनासें झालें होतें.

मीं मालीच्या पाठीवरून एकवार ममतेनें हात फिरविला आणि एक अक्षरहि न बोलतां माझ्या खोलींत निघून गेलों.

एकेक दिवस जाऊं लागला. माली आपल्या घरीं जाऊन आपला कर्मभोग भोगूं लागली. सुदैव तिचें, कीं उरलेली एक दिवसाची उपवासाची शिक्षा तात्यांनीं तिच्यावर लादली नाहीं. दोन दिवस दोघेंहि आमच्याकडे असल्यानें सर्व नुकसान भरून निघालें असें तात्यांनीं मानलें असावें.

चार दिवसांनीं डॉक्टरांकडून बिल आलें. व्हिजिट फी, ड्रेसिंग व औषध मिळून साडेचार रुपयाची मागणी त्यांनीं केली होती. मीं आलेल्या इसमाकडे ते पैसे देऊनहि टाकले; पण परीक्षा तरी पाहावी या उद्देशानें मी तें बिल तात्याकडे धाडलें. तात्या पैसे देणार नाहीं ही माझी खात्री होतीच; आणि त्यानें ते दिले असते तरी ते घेण्याची माझी छाती झाली नसती. कारण त्या अकारण खर्चाची भरपाई करण्यासाठीं तो मालीची पुन्हा उपासमार करील अशी मला भीति वाटत होती.

तात्यानें स्वतःच तें बिल माझ्याकडे परत आणून दिलें आणि कांहीं न बोलतां तो परत निघाला. मीं त्याला विचारलें—

" मग केव्हां भागवणार ? "

" बिल माझ्या नांवचं नाहीं. "

" पण तें तुमच्या बायकोच्या उपचाराबद्दल आहे. "

" पण हे उपचार तुम्हीं अकारण घाबरेपणानं केले. त्यांची वास्तविक कांहीं गरज नव्हती. पुष्कळांना अशी भोंवळ येते आणि खोकाहि फुटतात. नुसतं फडकं भिजवून बांधलं तरी बऱ्या होतात त्या. आणि एक दिडकी-सुद्धां खर्चावी लागत नाहीं त्याबद्दल. "

" मग आम्हीं केला हा मूर्खपणाच झाला म्हणायचा ? "

" तें तुमचं तुम्हीं ठरवा काय तें. "

" तें कांहीं भागायचं नाहीं तात्या. या बिलाचे पैसे तुम्हीच दिले पाहिजेत. "

" कायद्याप्रमाणं माझ्याकडे अशी मागणी करतां येणार नाहीं. तथापि आपल्या घरोब्याच्या संबंधांत वाकडेपणा यायला नको म्हणून, मी हे पैसे वळते करायला कबूल आहे. तुमच्याकरितां मीं एकदां पांच रुपये गमावले आहेत. त्यांची आणि याची फिटंफाट झाली असं समजा. "

" कधीं गमावले आहेत तुम्हीं माझ्यासाठीं पांच रुपये ? "

" मीं हें कपाट दिलं आहे तुम्हांला. "

" पण याचे पस्तीस रुपये रोख दिलेत मीं. "

" याचं मला चाळीस रुपये मिळत होते त्या वेळीं, पण तुम्हीं घरचीं माणसं म्हणून घेतल्या किमतीलाच दिलं मीं. "

तात्याचा हा खुलासा ऐकून माझी त्याच्याविषयींची चीड दुणावली. घेतलेल्या किंमतीला जिन्नस विकण्यांत हा उपकार केल्याचा डौल मिरवील, अशी कल्पना नव्हती माझी. आणि जरी उपकार केल्यासारखें वाटलें तरी तें उच्चारून दाखवण्याचा क्षुद्रपणा त्यानें दाखवावा याचा मला खेद व व आश्चर्य वाटल्यावांचून राहिलें नाहीं.

तात्याच्या या एवढ्या उपकारांतहि राहूं नये असें मला वाटलें आणि पांच रुपयांची नोट तिच्या हातीं देत मीं म्हटलें—

" हे नेऊन दे जा तुझ्या तातूला. त्याचं नुकसान नको व्हायला."

ती नोट न घेतां म्हणाली—

" त्याला एक कळत नाहीं, म्हणून आपण का वेड्याबरोबर वेडं व्हायचं! तसा तो लहानच आहे. खाल्लेन् चार टक्के-टोणपे म्हणजे होईल शहाणा आपोआप."

" तो उपजतच शहाणा आहे. त्याच्यांत कमतरता आहे ती माणुसकीची. पण— करायचंय काय आम्हांला त्याच्याशीं? तूं पैसे देतेस नेऊन कीं मीच देऊं?"

निरुपाय होऊन ती तात्याला पैसे देण्यास गेली आणि दोनचार मिनिटांतच परत आली. मीं विचारलें, " काय झालं! घेतले का त्यानं पैसे?"

" मला नव्हतं बाई वाटलं तात्या पैशाला इतका लोभी असेलसा! माणूस रागानं देतो, कीं लोभानं देतो हें सुद्धां का लक्षांत येऊं नये त्याच्या!"

" तूंच पाहा आणि समज काय समजायचं असेल तें."

आतां तात्याच्या बाबतींत थोडेंसुद्धां लक्ष घालायचें नाहीं असें मीं मनाशीं ठरवून टाकलें. मालीच्या संरक्षणापुरता— प्रसंग पडलाच तर— त्याच्याशीं शब्द बोलायचा. नाहींतर तो कोण आणि मी कोण? जगांत आपल्याला अप्रिय असणारीं माणसें थोडीं का असतात? त्यांना नाहीं का आपण झाडून मोकळे होत? तीं तशींच हा तात्या.

माझा हा निश्चय दोन दिवससुद्धां तात्यानें टिकूं दिला नाहीं.

दुपारीं तीनच्या सुमारास ऑफिसांत मी काम करीत असतांना तात्याच्या ऑफिसचा पट्टेवाला धावतच आला आणि त्यानें त्याची एक चिठी दिली. तींत लिहिलें होतें—

" मला पोलिसच्या स्वाधीन करणार आहेत. तावडतोब या."

तिरस्कार किंवा वैरभाव आठवण्याचा तो प्रसंग नव्हता. मी तावडतोब गेलों आणि मला कळून आलें कीं, आजच्याच टपालानें जावयाचें एक इन्शुअर्ड पाकीट तात्याच्या कबजांतून गहाळ झालें आहे व त्याबद्दल व्यवस्थापकांनीं त्याला पोलिसांच्या हवालीं करण्याचा धाक घातला आहे.

तपास करतां कळलें कीं, इन्शुअर्ड पाकिटांत अडीचशें रुपयांच्या नोटा होत्या व तेवढ्या भरून दिल्या तर तात्याला कसली दगदग पडण्याचें कारण नव्हतें. हेड क्लार्कसाहेबांनीं तशी तोड सुचवली असूनहि तात्या रक्कम भरण्यास तयार झाला नाहीं. " मीं पैसे चोरले नाहींत व न केलेल्या अपराधाबद्दल मी दिडकीहि देणार नाहीं " हा त्याचा आचरट जबाब होता !

मीं त्या वेळीं त्याच्याशीं हुजत न घालतां मुकाट्यानें अडीचशेंचा चेक लिहून दिला व तें प्रकरण तात्पुरतें तरी मिटविलें; आणि कोणी चेष्टेनें पैसे दडवले असल्यास ते परत देण्याची तिथल्या सर्वांना विनंति केली. पण गुन्हा केला असला तरी कबूल कोण करणार ?

अखेर पोलीसकडे प्रकरण सोपवण्याचा आमचा विचार चालू झाला. पोलीस–इन्स्पेक्टर श्रीयुत विठ्ठलवाडी हे माझे सुपरिचित असल्यानें मी तात्याला घेऊन त्यांच्या बंगल्यावर गेलों आणि तात्याकडून सर्व हकिगतीचा पाढा त्यांच्यापुढें वाचवला. पुष्कळशा चोऱ्या मालकाच्या वेंधळेपणामुळें झाल्या नसतांच नोंदवल्या जातात असा त्यांचा अनुभव असल्यामुळें त्यांनीं तात्याचीच उलटतपासणी करून सुरू केली. "तुम्ही कुठें बसतां, जवळ कोण कोण असतात, तुमच्या टेबलाला कप्पे आहेत का, तुम्ही फाइलें कुठें ठेवतां, विडी कुठें ओढतां, चहा कुठें पितां ? " इत्यादि प्रश्नांनीं तात्या बेजार झाला. पण चहाच्या प्रश्नासरशीं त्याला काय आठवलें काय कीं ! तो एकदम उठून म्हणाला—

" पंधरा मिनिटें थांबा हं, आलोंच जाऊन. "

तात्या परत आला आणि मला म्हणाला—

" चला जाऊं या घरीं. "

" पण तुमच्या या चोरीचं काय ? "

" चोरी झाली नव्हती. चहाला जायच्या गडबडींत मींच तें पाकीट कॅश बॉक्समधें ठेवायच्या ऐवजीं फायलांच्या ढिगांखालीं सारून ठेवलं होतं आणि तें तिथंच होतं. आत्तां साहेबांनीं प्रश्न विचारल्यावर एकदम आठवलं."

" मग सांगतों काय तर ! " इन्स्पेक्टरसाहेब विजयानंदानें हसले आणि त्यांना निष्कारण दिलेल्या तसदीबद्दल माफी मागून मी त्यांचा निरोप घेतला.

तात्याच्या या गबाळेपणामुळें मला तास दोन तासांची यातायात व

टांग्याचा एक रुपया, इतका भूर्दंड भरावा लागला. रुपये भरावे लागले असले तरी ते मला परत मिळायचेच होते.

दुसरे दिवशीं तात्यानें मीं दिलेला चेक आणि एक अधेली माझ्या हातीं दिली.

" ही अधेली कसली ? " मी विचारलें.

" टांगाभाड्याची ! " तात्यानें खुलासा केला.

" पण टांगाभाडं रुपया दिलाय मीं ? "

" तें झालं दोघांचं. माझे एकट्याचे आठ आणेच होतात हिशेबानं. "

तात्याचें उत्तर ऐकून मी थक्कच होऊन गेलों. एक तर त्यानें भाड्याचा प्रश्नच काढायचा नव्हता आणि काढायचाच होता तर सगळें भाडें त्यानें द्यावयास हवें होतें. त्याच्या कामासाठींच तें खर्च झालें होतें. अशा प्रसंगींदेखील त्यानें भाऊबंदकी कांटेकोरपणानें हिशेब करावा यांत तात्याची व्यवहारशून्यता कीं द्रव्यलोभ हें कोडें मला उलगडेना.

" मला नकोय हें. " मीं ती अधेली त्याच्यापुढें फेकीत म्हटलें.

मुकाट्यानें ती उचलून घेऊन तात्या आपल्या बिऱ्हाडीं गेला !

---

# रसिकता

रोज सहाच्या आंत घरीं येणारा मी आज आठ वाजून गेले तरी घरीं आलों नाहीं हें पाहून तिचें मन अस्वस्थ झालें तर कांहींच नवल नव्हतें; आणि आज तर मी लवकर घरीं येणें तिच्या दृष्टीनें सोईचें म्हणून अवश्यहि होतें. पण ज्या वेळीं जें इवें तेंच नेमकें होऊं नये, असा योगायोग पुष्कळदां जमून येतो. आजहि तसेंच झालें होतें.

माझ्या बसा-उठायच्या ज्या चार-दोन जागा तिला माहीत होत्या तेथें माझी चौकशी तिनें केली. आणि तेथें माझा पत्ता लागला नाहीं तेव्हां तिनें अदमास केला कीं मी आज कचेरींतच अडकून पडलों आहे. तिचा हा अदमास खरा होता. ऑफिस बंद करावयाच्या वेळेसच आकस्मिकपणें एक निकडीचें प्रकरण आलें, आणि त्याची निर्गत लावून मोकळें व्हायला आठ वाजले.

मी घरीं येतांच ती माझ्या उशीराचें कारण विचारील, माझी फार दमचक्की झाल्याबद्दल ती सहानुभूति दाखवील, आणि अवेळीं खटलीं उत्पन्न करणाऱ्या मंडळींबद्दल 'मेल्यांना दुसऱ्याच्या त्रासाचं कांहींच कसं वाटत नाहीं!' अशासारखें कांहींतरी बोलून माझ्याविषयींची आपली कळकळ प्रकट करील, अशी माझी अपेक्षा होती. पण आज मला अनुभव मात्र अगदीं वेगळा आला! मी घरीं येऊन कोट काढूं लागतों तों माजघरच्या दाराशीं बसलेल्या मालीला उद्देशून ती म्हणाली, "तरी बरं मालूताई, कचेरींत भाराभर

शिपाई भरलेत. उशीर होणार म्हणून घरीं निरोप पाठवायला कांहीं खर्च नसता पडला ?"

मीं ओळखलें कीं स्वारी आज घुश्शांत आहे. आणि मग त्या आगींत तेल ओतायची लहर मला तरी कां येणार नाहीं? बायकोला चिडविण्यांत नवऱ्याला मजा वाटतेच नाहींतरी. मींहि मालीला उद्देशून उत्तर दिलें, "एवढ्यातेवढ्यासाठीं निरोपानिरोपी करायचा नियम केला बरं का मालूताई, तर साठ्यांच्या सारजाबाईकडे नि जोश्यांच्या जिजाकाकूकडे तासन् तास बैठकी बसतात तेव्हां सुद्धां तो पाळला पाहिजे, नाहीं का ?"

माझा हा टोमणा तिला बराच झोंबला आणि ती अधिकच फणकाऱ्यानें म्हणाली—

"एक दिवस बसलें दिवेलागणीपर्यंत तर इतकं नको कांहीं टोचून बोलायला ! एवढी मोठी बायको 'बस' 'बस' म्हणून हाताला धरून बसवून घ्यायला लागली तर तिला झिडकारून का निघून यायचं ? आणि घरीं तसं कामहि नव्हतं निकडीचं. पण आज आमचं नाटक निघायला आणि हा इतका उशीर ! आतां जेवणींखाणीं उरकून निघेपावतर साडेनऊ होऊन जातील. आणि मग जागा—"

"म्हणजे ! आज आपल्या स्वाऱ्या नाटकाला का जाणार आहेत ? मी सुद्धां यायचा आहे कीं काय ?"

"तीनच तिकिटं काढून आणलींत तातूनं."

तिचें हें उत्तर ऐकतांच मी अगदीं सर्द होऊन गेलों. तात्या नाटकाला जाणार ही गोष्ट मला मुळींच खरी वाटेना. नाटक पाहण्याइतकी रसिकता आणि त्यापायीं पैसे वेंचण्याइतकी उदारता तात्याच्या अंगीं आहे हें मला संभवनीय वाटेना. त्याला कोणीतरी कॉम्प्लिमेंटरी पास-बीस तर दिले नाहींत ना ? हो तेंच शक्य दिसतंय. माझा तो अंदाज खरा कीं खोटा हें पडताळून पाहण्याच्या हेतूनें मी म्हणालों—

"आज कुणाला गटवलं बुवा तात्यांनीं ! पोलीस प्रसन्न झाला त्याला, कीं थेटरवाला ?"

"तातू कशासाठीं करील मेली ही भिक्षांदेही ? चक्क साडेचार रुपये टिचून तीन तिकीटं आणलींत त्यानं."

मुस्लिम लीग आणि हिंदुसभा विसर्जन करून अखिल भारतीय राष्ट्रीय सभेंत जिना आणि सावरकर सामील झाले, असें कोणी सांगितलें तर मला आश्चर्याचा जेवढा धक्का बसेल त्याहून कितीतरी पट अधिक आश्चर्यानें मी थक्क झालों, आणि माझ्या तोंडून उद्‌गार निघाले—

" अशक्य! अगदीं अशक्य!! "

त्याच वेळीं तात्या आपल्या खोलीबाहेर येऊन म्हणाला, " ताई, नऊ वाजायला आलं. अर्ध्या तासाच्या आंत निघालं पाहिजे आपल्याला. "

आतां त्या गोष्टीवर अविश्वास दर्शविण्याची सोयच उरली नाहीं.

" आज कोणतं नाटक आहे ? " मीं विचारलें.

" इश्श! एवढं दिखील का माहीत असू नये ? इतकी चांगली अभिनव कलाप्रसारक मंडळी आली आहे आणि तिचं जगभर गाजलेलं ' कंगाल राजा ' हें नाटक आहे बरं का आज! अभिनयकुशल कलावती ही नटी नायिकेचं काम करणार आहे. मुंबईला म्हणे अभिनव मंडळीचा 'कंगाल राजा' सारखा सहा महिने होत होता, आणि म्हणे, कलावतीच्या कामावर खूष होऊन मुंबईच्या एका कोट्यधीश भाट्यानं तिला एक नवी कोरी मोटार बक्षीस दिली! " तिनें नाटकाचें गुणवर्णन केलें. पण त्याचा माझ्या मनावर फारसा परिणाम झालेला न दिसल्यामुळें तिनें माझ्या अरसिकपणावर प्रहार केला—

" दुसऱ्याला नांवं ठेवण्यांत पुढं पाय असतो माणसांचा. तातू कुठं जात नाहीं, तर तो अरसिकच आहे असं म्हणायचं होतं सत्रांदा. पण एवढी मोठी नाटकमंडळी आणि त्यांचं इतकं सुप्रसिद्ध नाटक गावांत लागलं, तर त्याची वार्ताहि नाहीं स्वतःला! तातूनं बघा, नाटक लागल्याचं कळतांच एक नव्हे--दोन नव्हे—तर तीन तिकिटं—आणि तींहि खुर्चींचीं काढून आणलीं! बिचारा फारसं बोलत नाहीं नि पुढं पुढं करीत नाहीं. तरी पण त्याला सुद्धां हौस आहेच बरं कां! "

माझी अशी हजेरी घेतल्यावर तिला तात्याची थट्टा करण्याची लहर आली. तात्याकडे दृष्टिक्षेप करून ती म्हणाली—

" आणि बरं का, राजेश्री वरकरणीं कितीहि सोवळेपणा दाखवीत असले तरी तरण्या आणि पहिलटकरीण बायकोचे डोहाळे पुरविण्याची हौस अशी बाहेर पडलीच शेवटीं. मी आपली मांडव-शोभेपुरती; पण आजच्या नाट-

काचा खरा बेत झालाय तो राणीसरकारसाठीं. होय कीं नाहीं ग माले ?"

मालीला या तिच्या थट्टेचें फारसें कौतुक वाटलें नाहीं असें मला दिसलें. तात्यालाहि या लाडीक थट्टेची मौज वाटली नाहीं.

साडेनवाला तिन्ही स्वाऱ्या घराबाहेर पडल्या. मी आपला दरवाजास कडी लावून खोलींत येऊन वाचीत पडलों. पण वाचनाकडे माझें लक्षच लागेना. तात्यानें नाटकाचीं तिकिटें कशीं विकत घेतलीं हा एकच प्रश्न फिरफिरून माझ्या मनांत येत होता. आतांपर्यंतच्या अनुभवावरून तात्यासारखा अरसिक आणि भावनाहीन प्राणी जगांत असूं शकणार नाहीं असें माझें मत बनून राहिलेलें होतें. त्याच्या रूक्ष प्रकृतीच्या कांहीं गोष्टी मला आठवूं लागल्या.

माझ्याकडे कवि काव्यमधुर पाहुणे आले होते. त्यांच्या काव्याची रसाळता आणि गायनांतील माधुरी यामुळें काव्यमधुर हें त्यांनीं घेतलेलें नांव यथार्थ आहे असें सर्व महाराष्ट्राचें एकमत आहे. त्यांचीं ठिकठिकाणीं होणारीं काव्य-गायनें श्रोतृवर्गास कशीं वेड लावतात हेंहि महशूर आहे. एका कॉलेजच्या कार्यक्रमांत गर्दीमुळें दरवाजे बंद केल्यावर खिडक्या फोडून लोक कसे आंत घुसले, त्याचीं ऐसपैस वर्णनें नुकतीच वर्तमानपत्रांत येऊन गेलीं होतीं. अशा कवीचें आगमन झाल्यावर, त्यांच्या काव्यगायनाचा कार्यक्रम करण्याबद्दल माझ्या परिचित मंडळींचा मला आग्रह झाला यांत कांहींच नवल नव्हतें. कवि काव्यमधुर यांनाहि प्रकृति बरी नव्हती तरी, माझ्या शब्दास मान द्यावा लागला होता आणि अशा प्रकारें तो समारंभ जुळून आला होता.

हा समारंभ माझ्या म्हणजे तात्याच्या अगदीं घरीं होता; आणि त्यापायीं त्याच्या खिशास दिडकीची चाट लागणारी नव्हती. तरी पण तात्यानें त्या मधुर काव्यगायनाचा आस्वाद घेतला नाहीं. त्या कार्यक्रमाच्या वेळीं तो घरींसुद्धां राहिला नाहीं. कार्यक्रम संपल्यावर अर्ध्या तासानें तो घरीं आला.

तात्याच्या या अरसिक वर्तणुकीवर मीं थोडीशी टीका केली. ती निदान माझ्यादेखत जरी त्याला नांवें ठेवण्यास तयार झाली नाहीं, तरी तिलाहि त्याची वर्तणूक मनांतून नापसंतच होती. तिचा व तात्याचा माजघरांत झालेला पुढील संवाद मला ऐकूं आलाच—

देखील त्याच्याकडून खुलासा करून घेण्याची मला इच्छा होईना. आतां नाहीं, तरी घटकाभरानें तिच्याकडून मला सर्व कांहीं कळेल अशी मनाची समजूत करून, मीं दरवाजास कडी घातली आणि खोलींत जाऊन पडलों.

तात्या आपल्या खोलींत माझ्यामागून आला आणि पांच रुपयांची एक नोट मजपुढें करून म्हणाला, " हे घ्या. "

" कशासाठीं ? " मीं विचारलें.

" हिला डोहाळजेवणाचं लुगडं घ्यायचं असं ताई म्हणत होती त्यासाठीं ! "

" मग त्याला एवढे कसे पुरतील ? जरीचं लुगडं नसलं घ्यायचं तर राहूं दे. पण साधं टोपपदराचंच घ्यायचं म्हटलं तरी बारा पंधरा रुपये तरी पडतील. "

" अलीकडे गिरणीचीं पातळं दोन–अडीच रुपयांला मिळतात, एवढ्यांत दोन येतील. "

" मग काय, डोहाळजेवणाला तसलं घ्यायचं म्हणतां ? "

" कसलंतरी घ्यायचं. समारंभ साजरा करायपुरतं ! उरतील ते पैसे देऊन ठेवा ताईकडे. मग घेईन मी मागून. "

" मग नको. आत्तांच घेऊन जा हे सगळे पैसे. " असें म्हणून मीं ती नोट तात्यापुढें भिरकावली. " तुमचं तुम्ही करा काय हवं तें. "

तात्या माझ्या त्या नापसंतीनें वरमेल अशी माझी समजूत होती; पण माझा तो वेडेपणाच होता असा मला अनुभव आला. नोट परत खिशांत घालीत तात्या माझ्या खोलींतून बाहेर गेला. सोप्यावर ती त्याला दिसली आणि तिला उद्देशून बोललेलें तात्याचें पुढील भाषण मला ऐकूं आलें :—

" अगोदर असले सोपस्कार करायची जरूरीच नाहीं. ते तर करायचे, आणि त्यांत भलती उधळपट्टी करायची ! "

त्याला कांहींच उत्तर न देतां ती चडफडत खोलींत आली नि मला ऐकूं जाईल अशा बेतानें पण स्वतःशीं म्हणाली:—

" पैसा–पैसा करून आतां चिंध्या फाडायला लागूं दे नको म्हणजे मिळवली ! "

मुख्य विषय काढावयास ही अनुकूल संधि आहे असें वाटून मी म्हणालों —

" आपल्या तातूच्याबद्दल का बोलते आहेस तूं हें ? "

" तर काय ! हा इतका हा असेल असं नव्हतं बाई मला वाटलं. कशाला गेलें त्याच्याबरोबर नाटकाला असं होऊन गेलं मला. रस्त्यावर जीं तीं रोखून पाह्यला लागलीं, तेव्हां डोकं मारल्याच्यावर होऊन गेलं आम्हांला. माली तर रडायच्या घाईला आली. "

यानंतर तिच्याकडून मला इत्थंभूत प्रकार कळला तो असा:—तात्याच्या बँकेच्या डायरेक्टर बोर्डावर रेवणसिद्दप्पा मिणशीणकाई नांवाचे एक व्यापारी आहेत. त्यांनीं अलीकडेच एक थेटर बांधलें आहे. आणि तिथें निर-निराळ्या नाटक मंडळ्या बोलावून, त्यांच्या खेळाचे मक्ते स्वतःच घेऊन, ते पैसा मिळवतात. आपल्या वर्गीतल्या आणि ज्यांच्यावर आपला सहज पगडा बसूं शकेल अशा मंडळींच्या गळ्यांत ते तिकिटें बांधतात. डायरेक्टरांची मर्जी धरून राहणें आपणास फायद्याचें आहे हें तात्या ओळखत असल्यानें, रेवणसिद्दप्पांनीं आज तिकीट घ्या म्हणतांच तात्यानें तीन तिकिटें घेतलीं. एर्वीतेर्वी पैसे गेलेच, मग त्याला कवडीचुंबक समजणाऱ्या आम्हां मंडळींना जिरवण्याची संधि कां साधूं नये असें तात्यामहाशयांनीं ठरविलें आणि आपल्या बायकोबरोबर तिलाहि तो नाटकाला घेऊन गेला.

पण नाटकगृहापाशीं जातांच त्याला वेगळा प्रकार दिसला. अभिनयतारका कलावतीला पाहण्यासाठीं प्रेक्षकांचा तिथें तोबा उडाला होता. तिकिटें बंद झालीं होतीं. दुप्पट काय पण तिप्पट किंमत देऊनहि जागा मिळविण्यास हौशी लोक तयार होते !

तात्याला ही महापर्वणी वाटली. त्यानें आपलीं दीड रुपया दराचीं तिकिटें चार रुपये दरानें विकून टाकलीं; आणि साडेचार रुपये भांडवलावर साडेसात रुपये रोख नफा मिळवून स्वारी विजयानंदानें घरीं परतली. डायरेक्टराची मर्जी संपादन केल्याचें श्रेय त्याला आधींच लाधलें होतें, आणि बायकोस हौसेचें सणंग घेऊन देऊन वर अडीच रुपयांचा नफा त्याला मिळणार होता. मग कला, प्रेम आणि लोकलज्जा यांची कदर त्यानें कां करावी !

सर्व हकीकत ऐकून मी मनांतून कमालीचा चिडलों असलों तरी बळेंच हसूं आणून म्हणालों—

" हें सुद्धां एक नाटकच बघायला मिळालं की तुम्हांला ! तुमचा कंगाल राजा बघायचा राहिला, पण हे राजेश्री कसे इरसाल कंगाल आहेत हें तरी दिसून आलं, हें काय थोडं झालं ? "

मी तात्यावर टीका करूं लागलों कीं, त्याचा कैवार घेऊन माझ्यावरच ताशेरा उडवायचा नेहमींचा प्रकार आज ती करूं शकली नाहीं. मौन स्वीकारून तिनें आज आपला पराजय मान्य केला होता.

याचेंहि मला एक प्रकारें समाधान वाटलें.

दुसरे दिवशीं सकाळीं आम्ही चहा घेत होतों इतक्यांत माझे मित्र दामुअण्णा उपस्थित झाले—

" का रे, चहा घेणार का ? " मीं विचारलें.

" माफ करा गुरु. आधींच डोकं चढलंय आणि त्यांत चहा पाजा कडक ! " दामुअण्णा म्हणाला—

" डोकं चढायला रे काय झालं सुखासुखीं ? "

" कालचा कंगाल राजा भोंवलाय बाबा ! पदरचे पैसे देऊन दुखणं विकत घेऊन आलों. "

" अरे पण उत्तम नाटक पाहून आणि अभिनयतारका कलावतीचा अभिनय पाहून—"

" गेली मसणांत कलावती नि तिचा अभिनय. या लेकाच्या नट्या ताळ्यावर असतील तर ना त्या अभिनय करणार ? आजपर्यंत पुरुष दारू पीत होते, आतां या जगदंबा सवाई दारुड्या झाल्या आहेत. आणि दारू पिऊन टेर झाल्यामुळं, ती मुळीं आलीच नाहीं थेटरकडं. दुसऱ्याच कुठल्या फडतुस पोरीनं तिचं काम केलं आणि तिचं काम म्हणजे नुसता बोंबाबोंबा ! "

दामुअण्णा कालचा हा प्रकार निवेदन करीत असतांना तात्याची स्वारी तिथें दाखल झाली होती. दामुअण्णा बोलायचा थांबतांच तो तिला म्हणाला—

" ऐका ताईसाहेब, काल माझ्यावर केवढा गहजब केलास ! "

" म्हणजे ! तुम्ही का नाटकाला जाणार होतां ! फार फार शहाणपणा

केलात गेलां नाहीं तें. नाटकाला जाऊन आम्ही बसलोंय कीं आतां वाजवीत! खरं सांगतों तुला दादा, कालचं नाटक मी पाह्यला गेलों त्या मूर्खपणाबद्दल फाडफाड तोंडांत मारून घ्याव्या असं सुद्धां वाटलं मला—"

दामुअण्णाच्या या भाषणानें आपला मूर्खपणाच शहाणपणाहून अधिक श्रेष्ठ आहे असें तात्यामहाशयांना वाटलें आणि ते विजयी दृष्टीनें माझ्या व तिच्याकडे पाहत हसूं लागले!

मी तिथून मुकाट्यानें उठून गेलों.

---

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रन्थालय शाखा.
ग्रं. क्र. १८२८३ नों. दि ..............
वि. ... क्र. ..................

# स्थलान्तर

घरमालकांना सांगून तात्याचें बिऱ्हाड आपल्या शेजारून काढून टाकण्याचा विचार वारंवार माझ्या मनांत आला; आणि या ना त्या कारणानें तो आजपर्यंत मागें पडला. ज्याला आपल्या दुर्वर्तनाची खंत वाटत नाहीं, उलट आपलें दुर्वर्तन हीच रास्त आणि शहाणपणाची वागणूक असें ज्याला वाटतें, त्याचें मुखावलोकनहि वर्ज्य करावें असें मला वाटे. तात्याला आपल्यापासून दूर घालवण्याची माझी इच्छा माझ्या घरमालकांनीं मान्य केली नसती असेंहि नाहीं. कारण त्यांना देखील तात्यानें आपल्या तात्यागिरीची चुणूक एक–दोनदां दाखविली होती. आपल्या घरांत वळवाच्या पावसानें गळलें म्हणून शाकारणी न केल्याच्या सबबीवर एक महिन्याचें भाडें देण्याच्या बाबतींत त्यानें खूपसा वितंडवाद घातला होता व नळाचें पाणी बेतानें वापरण्याच्या मालकांच्या सूचनेकडे त्यानें हेतुपुरःसर लक्ष दिलें नव्हतें. आपण भाडें भरतों तें पाणीपट्टीसकट भरतों व आपणांस हवें तेवढें पाणी घेण्याचा हक्क आहे अशी तात्याची समजूत होती. त्यानें जरूरी असेल तेवढें पाणी घेण्यास मालकांनीं कधींच हरकत घेतली नव्हती; पण त्यानें मोरींत नळ सोडून पाण्याची खराबी करावी, ह्या गोष्टीला त्यांचा विरोध होता; आणि तो गैर का होता ?

" तूं असं कां करतोस ? " असें तिनें विचारलें तेव्हां तात्या म्हणाला होता— " या भाडेखाऊ घरवाल्यांना असंच केलं पाहिजे. "

आपला फायदा नसला तरी दुसऱ्याचें नुकसान करण्याची तात्याची ही प्रवृत्ति पाहून कोणा समंजस माणसाला समाधान वाटेल ? आणि अशा खट्याळ कुळाची घरवाले तरी गय कशासाठीं करतील ? पण भाड्यावरील लोभामुळें ते तात्याला नोटीस देण्यास कचरत होते. तात्या माझा नातलग आणि त्याचें बिऱ्हाड काढून टाकलें तर मी नाराज होईन अशी खोटीच भीति त्यांना वाटत होती !

इकडे मीहि तात्याची हकालपट्टी करण्यास दुसऱ्याच कारणामुळें कचरत होतों. तें कारण म्हणजे माली. माली एक तर माझ्या मित्राची मुलगी आणि लहानपणींच आईबापाच्या मायेला पारखी झालेली. तिच्यासाठीं माझें मन कळवळे. आणि माली स्वभावानें अशी गोड, कीं कुणालाहि तिचा लळा लागावा. मग त्या पोरीवर हिचा लोभ जडला तर आश्चर्य कसलें ? आई आपल्या पोटच्या पोरीवर करणार नाहीं इतकी माया ही मालीवर करीत असते. अनोळखी माणसें तर ही आणि माली या मायलेकीच आहेत असें समजतात.

अशा गोड मुलीच्या नशिबीं तात्यासारखा रूक्ष आणि कठोर नवरा यावा याचा मला मनस्वी उद्वेग वाटतो. अशी प्रेमळ, खेळकर, हौशी आणि हसतमुख बायको मिळाल्यावर दुसऱ्या एखाद्या तरुणानें आपल्या घरीं नंदनवन फुलवलें असतें आणि त्या नंदनवनांत हीं फुलपाखरें आनंदाची लयलूट करीत राहिलीं असतीं. त्या रसिक दंपतीचा प्रेमविलास बघून माझ्यासारख्याचे डोळे निवले असते. पण प्रेमाच्या नंदनवनाऐवजीं छळ-वादाचें वाळवंट मालीच्या वाट्यास आलें होतें आणि तिचे ते धिंडवडे पाहण्याची पाळी आमच्यावरहि आली होती.

आमच्या डोळ्यांसमोर ती असली, तर तिचे क्लेश आपणास थोडेफार हलके करतां येतील, या कल्पनेमुळेंच मी तात्याचें अप्रिय सान्निध्य मन घट्ट करून सोशीत राहिलों होतों; आणि तीहि आपल्या तातूची बायको म्हणून नव्हे, तर आपलं लेकरूं या ममत्वभावनेनें मालीला नजरेआड करायला तयार होत नव्हती.

पण प्रेमभावना रबराप्रमाणें चिवट असल्या तरी फाजील ताण दिल्यावर

सुटतात. तात्याची आमच्या वाड्यांतून हकालपट्टी अशाच प्रकारें झाली. माली पहिल्या बाळंतपणासाठीं म्हणून आपल्या घरीं गेली. तिला न्यायला तिचे आजोबा मैराळकाका आले होते. ते माझ्याकडेच उतरले. पण शिष्टाचाराकरतां तरी त्यांना तात्यानें आपल्याकडे बोलवावें असें मला वाटत होतें. मुलीला मुलगा झाल्यावांचून जावयाकडे जेवायचें नाहीं, हा जुन्या काळचा नियम मैराळकाका पाळत असल्यामुळें ते तात्याकडे जेवायला जातील ही भीति नव्हती. तरी पण जनरीत म्हणून तात्यानें त्यांना आपल्याकडे चहाला तरी बोलवावें, क्षेमसमाचाराचे चार शब्द बोलावे, अशी माझी इच्छा होती. तात्याचा क्षुद्रपणा आणि व्यवहारशून्यता प्रकट झाली तर म्हाताऱ्यास कल्पनातीत वाईट वाटेल; आपल्या लाडक्या नातीचा सुखसमृद्धिपूर्ण आणि आनंदमय संसार डोळे भरून पाहावा या आशेनें आलेल्या त्या म्हाताऱ्यास जर तिच्या घरीं उदासवाणी अवकळा दिसली, आपल्या मुलीला आपण मिळवून दिला तो जोडीदार तिला अनुरूप नाहीं असें त्याला वाटलें, तर मैराळकाकांचें आधींच दुःखजर्जर मन अगदीं व्याकुळ होऊन जाईल अशी भीति मला वाटत होती. आणि म्हणूनच काकांचें आगमन झाल्यापासून तात्याचा कसलाहि उणेपणा दिसूं नये म्हणून मी धडपडत होतों.

पण तात्या श्वशुरांना आपल्या घरीं बोलविण्याचें कांहींच चिन्ह दिसेना. फार काय, आमच्या इथें येऊन त्यांच्याशीं चार शब्द बोलण्याचें सौजन्यहि त्यानें दाखवलें नाहीं. त्याला स्वतःची अक्कल नाहीं, तरी ती त्याच्या डोक्यांत कोंबून त्याच्याकडून शहाणपणा घडवावा, म्हणून मीं तिच्यामार्फत तात्याला सूचना देवविली. पण तिनें बोलवून घेऊन तशी सूचना करतांच तात्यानें उत्तर दिलें—

"ते तुमच्याकडे आलेत आणि इथं त्यांचं सगळं कांहीं ठीक चाललंय्. मग कशाला बोलवायचं उगीच?"

"अरे पण तातू, तूं त्यांना बोलावलं नाहींस तर बरं नाहीं दिसायचं तें."

"न दिसेना! त्यांनीं कुठं आपली रीत पाळलीय! लग्नानंतर एक तरी सण केलाय का त्यांनीं मला! इतर लोक जावयाचे किती सण करतात, किती देणग्या देतात; पण दिवाळसणाच्या एका रुमालाशिवाय एक चिंधी

नाहीं दिली लेकांनीं मला. बरं, तो रुमाल तरी चांगला किंमतवान् असायचा होता ? त्या नगीनशेठनं दहा रुपयाला मागितला अन् मग भिकूशेठला मोठ्या मिनतवारीनं पावणेअकराला विकला मीं ! हे लेकाचे असे दळभद्री आणि मी म्हणे यांना मेजवान्या आणि पार्ट्या द्यायच्या ! कांहीं द्यायचा नाहीं मी ! चहा तर राहूं देच, पण नुसतं पाणी मागितलं तरी मिळायचं नाहीं त्यांना माझ्या इथं. ”

तात्याचे असले प्रलाप ऐकल्यावर त्याला खांबाला बांधून घालून चाबकानें झोडपून काढावा अशी मला चीड आली. पण भैराळकाकांच्या विचारानें मला ती दडपून ठेवावी लागली. इतकेंच नव्हे, तर ‘ श्रीयुत तात्यासाहेब भिडस्त वृत्तीचे आहेत, विशेषतः वडील मंडळींपुढें तर ते कमालीच्या नम्रपणानें वागतात’ अशा थापांनीं मला त्याच्या नादानपणावर पांघरूण घालावें लागलें. भैराळकाकांच्या आदरातिथ्यासाठीं घरीं मेजवानीचा बेत करून मालीला आणि तात्यालाहि आमंत्रण द्यावें लागलें व ही मेजवानी माझी नसून तात्यांची आहे असें भासवण्याचा प्रयत्नहि आम्हांला करावा लागला !

अपात्र इसमाच्या पदरीं चांगुलपणा बांधायची शिक्षा अशा प्रकारें आम्हांस सोसावी लागली; आणि त्याबद्दल कुरबुर करायचीहि सोय नव्हती. मूग गिळून स्वस्थ बसण्यापेक्षां गत्यंतरच नव्हतें.

मालीला घेऊन भैराळकाका गेले, आणि तिसरेच दिवशीं पंचवीस रुपयांची मनिऑर्डर त्यांच्याकडून आली. ‘तात्यारावांच्या मागणीप्रमाणें हे पैसे पाठवले’ असल्याचें त्यांनीं कुपनमध्यें लिहिलें होतें. श्वशुराबरोबर मुळींच न बोलणाऱ्या तात्यानें त्यांच्याकडे पैसे कां आणि केव्हां मागितले याचा मला उमज पडेना. त्या बाबतींत मी तिला शरण गेलों आणि तिनें शोध लावला तो असा—

‘ बायको माहेरीं गेल्यामुळें आपणांस खानावळींत जेवावें लागणार; खानावळीचा सध्यांचा दर बारा रुपये आहे. घरीं पोटगी खर्च सहा-सात रुपयांहून अधिक येत नाहीं. म्हणजे बायकोच्या ऊर्फ स्वैंपाकिणीच्या गैरहजेरी-मुळें आपलें दरमहा पांच रुपये तरी नुकसान होणार; मुलगी माहेरीं न्यायची असेल तर हा भूर्दंड श्वशुरांनीं सोसला पाहिजे व ही गैरहजेरी साधारणपणें

पांच महिने चालू राहायची असल्यानें पांचापांचा पंचवीस रुपये त्यांनीं आपल्यास ताबडतोब दिले पाहिजेत ' असें लेखी फर्मान तात्यानें आम्हां सर्वांचा डोळा चुकवून मैराळकाकांच्या हातांत टाकलें होतें. या फर्मानाची अमलबजावणी म्हणजेच ही मनिऑर्डर होती. तात्याच्याच नांवानें पैसे न पाठवतां काकांनीं ते माझ्याकडे पाठवले यांत त्याचा क्षुद्रपणा माझ्या निदर्शनास आणण्याचा त्यांचा उद्देश असला पाहिजे हें माझ्या लक्षांत आलें.

ज्याचा बोज राखण्यासाठीं मीं इतकी धडपड केली त्यानें आपल्या हातानें आपली किंमत अशी घालवली, हें पाहून आपण भलत्याच ठिकाणीं आपला भलेपणा वायां दवडला असें मला वाटलें. आणि आतांपर्यंत दाबून ठेवलेला राग उसळून उठला. त्या आवेशासरशीं मीं घरमालकांकडे जाऊन म्हटलें—

" पुढल्या महिन्यापासून मी ही जागा सोडून दुसरीकडे राहायला जाणार आहे ! "

माझ्या या आकस्मिक सांगण्यानें मालक चकित होऊन उद्गारले, " म्हणजे! झालं काय असं एकाएकीं ? "

मी प्रथम कांहींच बोललों नाहीं ; पण आस्ते आस्ते तात्याचा शेजार हेंच माझ्या जागा सोडण्याचें कारण आहे ही गोष्ट मला उघड करावी लागली. तें कारण कळतांच मालक हसून मला म्हणाले, "हात् तिच्या ! मीं म्हटलं भाडं जास्त आहे, कीं जागे-बिगेची अडचण आहे? ही तुमची अडचण दूर झाल्यावर मग नाहीं ना तुमची कसली तक्रार? अहो, ही तातोबाची ब्याद घालवून द्यायची केव्हांपासून संधि पाहतों आहे ; पण तो तुमचा माणूस म्हणून मीं गय केली आतांपर्यंत. आतां पहिल्या तारखेपर्यंत दम काढा. आजच्या आज जागा खालीं करण्याला बजावतों. "

आणि मालकांनीं म्हणण्याप्रमाणें केलेंहि. घरवाल्यानें बिऱ्हाडकरूला जागा खालीं करायला सांगणें हा सरळ स्वभावाच्या माणसाला एक प्रकारें कमीपणाच आहे, पण तात्याला यांतहि आपली आयती सोय झाल्याचें समाधान वाटलें. कारण दोन माणसांच्या जागेचें एकटा असतांना भाडें भरणें हा त्याच्या हिशेबी मनाला भूर्दंड वाटत होता आणि आपल्या एकट्यापुरती लहानशी खोली घेऊन पांचसहा महिने तरी भाड्याची बचत करावी असा विचार त्याच्या डोक्यांत घोळत होता. ही त्याची इच्छा आपोआप पुरी

होण्याचा योग आलेला पाहून तो मालकांना म्हणाला, " पहिल्या तारखेलाच का, पण उद्यांच्या रविवारलाच जागा सोडायला तयार आहे मी. पण रविवारीं एकवीस तारीख आहे. तेव्हांपासून महिनाअखेरचं भाडं सोडलं पाहिजे तुम्हीं. "

" दहा दिवसांचंच का, सगळ्या महिन्याचं भाडं माफ करीन तुम्हाला ताबडतोब जात असाल तर. "

मालकांच्या या सवलतीचें तात्यानें दुप्पट समाधानानें स्वागत केलें आणि खरोखरी त्यानें रविवारीं सकाळीं छकडे भरून दुसरीकडे स्थलांतर केलें. तो बिन्हाड बदलणार आहे हें आम्हांला माहीत होतेंच. पण घरोब्यांतला माणूस म्हणून त्यानें मला नसला तरी तिला आपला बेत सांगणें अवश्य नव्हतें काय ? पण तिला देखील शेवटच्या क्षणापर्यंत त्यानें कांहीं सांगितलें नाहीं. त्याला आपण होऊन कांहीं विचारायचें नाहीं, दुरून दिसेल तेवढें पहायचें असें आम्हीं ठरविलें होतें.

मैराळकाकांकडून आलेले पैसे मीं आपल्यापाशींच ठेवून घेतले होते व ते आल्याची वर्दीहि तात्याला दिली नव्हती. पण श्वशुरांच्या उत्तराची उत्कंठा त्याला स्वस्थ बसूं देत नसल्यानें तो गेले दोन दिवस पोष्ट ऑफिसांत खेटे घालीत होता व तेथेंच त्याला मैराळराव देवगांवकरांकडून पंचवीस रुपये माझ्याकडे आले आहेत असें कळलें.

एवढा सुगावा लागल्यावर तो माझ्याकडे आला व पैसे कशासाठीं आले आहेत अशी पृच्छा करूं लागला. " या बाबतींत तुम्ही मला कांहीं विचारूं नका आणि तुम्हांला कांहीं सांगण्याची माझी इच्छा नाहीं " असें मीं साफ सांगून टाकलें.

कांहींहि न बोलतां तात्या माझ्यापुढून निघून गेला. त्याच्या चर्येवरील संताप मला दिसून आला; पण मनांत म्हटलें, 'काय करणार हा माझं ? चरफडेल मनांतल्या मनांत आणि बसेल गप्प. '

पण दुष्ट आणि कुटिल वृत्तीचा मनुष्य आपला डाव साधेपर्यंत कधीं स्वस्थ बसत नाहीं असा मला घटकाभरांत अनुभव आला. ती घाबऱ्या घाबऱ्या माझ्याकडे आली आणि म्हणाली—

" कशाला पडतां त्याच्या भानगडींत ? देऊन टाका त्याचे पैसे. ज्याचं

कर्म त्याला. नाहीं तर एक करतां दुसरंच कुलंगडं करून ठेवील तो."

"खुश्शाल करूं दे तो काय वाटेल तें. आम्ही जेव्हां तेव्हां पडतं घेतों म्हणून शेफारलाय् तुझा तात्या. पण यापुढं जशास तसं वागायचं ठरवलंय् मीं. साफ देणार नाहीं मीं हे पैसे त्याला. हे पैसे मैराळकाकांनीं त्याला देण्यासाठीं पाठविलेत हें तो कशावरून ठरवतोय्? काय पुरावा आहे त्याच्यापाशीं याबद्दल?"

मी इरेस पेटलों होतों आणि माझी तात्याविषयींची चीडहि परमावधीला पोंचली होती. अशा स्थितींत माझ्याशीं युक्तिवाद करून कांहीं फायदा होणार नाहीं हें तिनें ओळखलें आणि माझ्याकडे तात्याची रदबदली करण्याच्या फंदांत न पडतां वेगळेंच अस्त्र तिनें माझ्यावर सोडलें. डोळ्यांतलें पाणी टिपीत ती सद्गदित स्वरांत म्हणाली—

"पोरीची गाठ उलट्या काळजाच्या नवऱ्याशीं पडलीय्, तेव्हां आतां तिच्या जल्माचे धिंडवडे काय काय होतील ते मुकाट्यानं पाहण्यापरीस काय करतां येणार कुणाला? मालीला बिचारीला कायमची टाकून-"

ती बोलतां बोलतां थांबली. तिच्या अंतर्यामींच्या वेदना मलाहि समजत होत्या. पण त्या वेदनांनीं विव्हळ होण्यासारखी आज माझी मनःस्थिति लवचीक राहिली नव्हती. मी पहिल्याइतक्याच ताठरपणें म्हणालों—

"ताता मालीला टाकून देईल एवढंच ना? खुश्शाल देऊं दे. सात जन्म तपश्चर्या करून मिळायची नाहीं अशी फाकडू बायको या लेकाला मिळाली. माकडाच्या हातीं रत्न पडल्यासारखं झालंय हें. त्या बेअक्कल माकडानं रत्न फेकून दिलं तर त्याची सुटकाच झाल्यासारखं होईल. येऊन जाऊन तिच्या पोटाचाच प्रश्न ना? मी संभाळीन तिला. मला अर्धी भाकरी मिळेल त्यांतला चतकोर आधीं पोरीला खाऊं घालीन अन् मग मीं जेवीन. हा तात्या प्लेगानं नाहीं तर अपघातानं—"

"हं पुरे." मला मध्येंच अडवून ती म्हणाली, "कांहीं अशुभ नका बोलूं. साऱ्या वेळा कांहीं सारख्या नसतात. मालीला आपण आपला जीवमान असेपोत्तर कमी पडूं देणार नाहीं हें खरं. आम्ही उपाशी राहून सुद्धां तिला पोटभर जेवायला घालूं आपण. पण नुसत्या जेवण्यावर का

बायकांना जगतां येतं ? टाकलेल्या बायकोची बेअब्रू उपासमारीपेक्षांहि प्रखर असते हो. तुम्हा पुरुषांना नाहीं कल्पना त्याची. बायकांचीं दुःखं बायकांनाच कळतात. त्या बिचाऱ्यांना पुरुषांसारखं अंग झाडून मोकळं व्हायची सत्ता नाहीं; आणि तसं सामर्थ्यहि त्यांच्या अंगीं येऊं दिलं जात नाहीं; तोंपर्यंत पुरुषांच्या अंकित राहण्यावांचून गत्यंतर नाहीं बायकांना. त्या राजहंसांच्या रागिणीचंच बघा कीं ! तिच्या नवऱ्यानं दुसरी बायको करून हिला माहेरीं पिटाळलंय्. राजहंसांच्या घरीं अन्नवस्त्राची चंगळ आहे. पण रागिणीची दुर्दशा थांबलीय् का त्यामुळं ? 'टाकलेली' म्हणून सारा गांव बोट दाखवतो तिच्याकडे. बाहेरच पडलं नाहीं तर या बाहेरच्या छळाच्या झळा बाधायच्या नाहींत तिला. पण घरीं देखील पदोपदीं पाणउतारा होतो हो बिचारीचा ! परवां तिच्या घरची मोलकरीण तिला म्हणाली, 'रागिणीताई, तुमच्या नवऱ्याची नवी बायको बाळंतीण झाली म्हणे ! मुलगा झालाय् असं म्हणत होतीं माणसं. मग जा ना तुम्ही तिकडे. मूल संभाळायला त्यांना आतां हवंच कीं माणूस.' सत्तेच्या घरीं पोर संभाळणारी दाई म्हणून जाण्याचा सल्ला आणि तोहि घरच्या बटकीनं द्यावा, याचा रागिणीला थोडा का त्रास झाला असेल ? त्या रात्रीं म्हणे रागिणी विहिरीवर गेली होती पण कुणीसं वेळींच पाहून ओढून आणलं म्हणून निभावलं. पटकन् प्राण जाऊन आलेलं मरण शंभरपट पुरवलं, पण हें टाकून दिल्याचं नष्टचर्य—माले! माले! काय काय बांधून आली आहेस बाई पदरांत ?"

तिनें फिरून डोळ्यांना पदर लावला.

हृदय पिळवटून बाहेर पडणारे तिचे शब्द ऐकत असतांना माझ्या मनांतील तात्याविषयींचा तिटकारा बाजूस सरत होता व त्या जागीं मालीविषयींची अनुकंपा प्रकट होत होती. राजहंसांच्या रागिणीच्या रूपांत माली मला दिसूं लागली आणि विहिरीच्या कांठीं उभी राहून ती आपला देह आंत झोकते आहे असा भास होऊन मी दचकलों.

मी मस्तकाला हात लावून माझ्या जागीं बसलों होतों. ती केविलवाणी चर्या करून आपल्या जागीं उभी होती. मिनिट-दोन मिनिटें माझ्या खोलींत स्मशानशांतता नांदत होती. शेवटीं भानावर येऊन मीं विचारलें—

" पण तात्या मालीला टाकणार अशी धास्ती कशावरून घेतली आहेस तूं ? कांहींतरी तर्क करून—"

" तर्क करून ? " माझें वाक्य पुरें होण्याच्या आधींच ती म्हणाली, " मी कशाला तर्क करूं ? आणि तातूनं तसं स्पष्टच बजावल्यावर तर्काचं कारणच काय मुळीं ? "

" काय बजावलं तात्यामहाराजांनीं तुला ? "

" आणखी काय बजावणार ? तो म्हणाला, 'तुम्ही माझे पैसे अडवून ठेवले तरी ते वसूल केल्याशिवाय कुणाच्या देवाला सोडायचा नाहीं मी. अन् आतां तर पंचविसांऐवजीं पन्नास घेईन तरच सोडीन. माझ्यावर अविश्वास धरतोय् बुड्ढा ! आतां त्याला चक्क लिहितों, कीं चार दिवसांत माझ्या हातांत पन्नास रुपये नाहीं पडले तर तुमच्या नातीचा नि माझा संबंध सपशेल सुटला ! तिला माझ्या घरीं आजन्मांत पाऊल टाकतां यायचं नाहीं.' हें सांगतांना ती वरचेवर आवंढे गिळीत होती. त्यावरून तिच्या मनांत किती खळबळ उडाली होती हें दिसून येत होतें. अखेरचें म्हणून तिनें सांगितलें, 'येत्याच सराईत दुसरी बायको करून आणीन' असंहि लिहून टाकणार आहे तो आजच मैराळकाकांना. "

" लिहील—असंहि लिहील तो. अधम माणसं अधम कृत्यांत तरी बोलल्याप्रमाणं चालतात असा जगाचा अनुभव आहे. " असें म्हणून मी उठलों. कपाट उघडून मैराळकाकांकडून आलेले पंचवीस आणि स्वत:चे पंचवीस रुपये काढून तिच्या हातांत दिले आणि तिला सांगितलें, " जा अगोदर, हें अवदान त्या त्रस्त समंधाच्या घशांत घाल आणि त्याला शांत कर."

ती निघून गेल्यावर मी कितीतरी वेळ विषण्ण होऊन बसलों. मला कांहीं सुचेना किंवा अगणित विचार माझ्या मनांत गर्दी करूं लागले. प्रेम सामर्थ्यवान् असतें, माणुसकी प्रभावी होते, इत्यादि वाचलेलीं व ऐकलेलीं सुभाषितें सपशेल चुकीचीं आहेत असें मला वाटलें. प्रेम सामर्थ्यवान् असतें तर तें निष्प्रेम आणि स्वार्थी माणसापुढें कां नमतें ? माणुसकी प्रभावी असते तर अमानुष वृत्तीच्या माणसापुढें ती हतप्रभ कशी ठरते, अशा शंकांवर शंका माझ्या मनांत उसळूं लागल्या. नीचाची संगत तुटतां तुटतांहि कशी चटके देते याचा मला खासा पडताळा आला आणि ते विचार असह्य

झाल्यावर मीं माझ्या मनाची समजूत घातली, " ही पीडा दूर गेली, आतां तर नाहीं यायचा हा आपल्याला उपद्रव द्यायला ? चार चटके देऊन का होईना, पण सुटका झाली हें काय थोडं झालं ? "

त्याच वेळीं रस्त्यावर कसल्यातरी मिरवणुकीच्या घोषणा ऐकूं आल्या. कुणाचा तरी झिंदाबाद चालू होता. तो ऐकतांच मला वाटलें—या जगांत माणसं कुणाचा आणि कशाचा तरी जयजयकार करून आपल्या आकांक्षा व्यक्त करतात. पण त्यांच्या वाट्याला प्रत्यक्ष काय येतें ? दुर्जनांच्या लाथा सज्जनांनीं खाव्या हाच आजच्या जगाचा न्याय आहे. तात्याशीं ज्यांचा संबंध आला आहे तीं आम्ही माणसें अगदीं एकनाथ–तुकाराम नसलों तरी सरळ-मार्गी खचित आहों. पण आम्हांलाच नरराक्षस तात्या हवें तसें पिडतो आणि आम्ही तो छळ निमूटपणें सोसतों. माझ्या अंवतींभंवतीं कुणीतरी अदृश्य व्यक्ति " तात्या झिंदाबाद " अशा गर्जना करीत आहे असा मला भास होऊं लागला !

# नवा पराक्रम

तात्या आमच्या घरांतून गेला आणि योगायोग असा, कीं त्यानंतर आठच दिवसांनीं त्याची बँकेच्या पातळपूरशाखेंत बदली झाली. त्याचीं अपकृत्यें आतां आम्हांस पाहावीं लागणार नाहींत, एवढेंच नव्हे तर तीं आपल्या कानांवरहि येणार नाहींत, आणि त्यापायीं होणारा आमचा मनस्ताप चुकेल या समजुतीनें मीं सुटकेचा निःश्वास सोडला. तिला मात्र तात्याच्या दूर जाण्यानें पूर्णपणें बरें वाटलें नाहीं. फार काय, थोडें अवघडच वाटलें. 'नोकरी म्हणजे मेली वावटळीसारखी. ती पाचोळ्याप्रमाणं माणसांना, उडवते आणि एका ठिकाणच्या माणसांची दाही दिशांना पांगापांग करते. त्यांची गाठभेट पुन: कधीं होईल याचा कांहीं नेम नाहीं' असें म्हणून तिनें जडसा निःश्वास सोडल्यावर मला हसूं आल्यावांचून राहिलें नाहीं.

"तात्यांची गाठभेट रोज झाली नाहीं, तरी अधूनमधून होईल ती. आतांपासून वाईट नको वाटून घेऊं." मी म्हणालों.

"म्हणजे ? इकडे वरचेवर यावं लागणार आहे तातूला ?" तिनें उत्सुकतेनें विचारलें.

"छे. त्याला नाहीं इकडे यावं लागणार. आणि येणं भाग असलं तरी टाळाटाळी करील तो. आपल्या आप्तस्वकीयांविषयीं त्याला कितीशी आस्था आहे हें अजून लक्षांत येऊं नये तुझ्या! ज्यांनीं त्याला लहानाचा

मोठा केला, त्या आपल्या काकांना त्यानं किती वेळां बोलावलं आपल्या इथं आणि आपण तरी कितीदा गेला त्यांना भेटायला ? "

" होय बाई. भारीच हं मन घट्ट तातूचं ! काकांना अर्धांग झाल्याचं पत्र आलं त्याच्या चुलतभावाचं, तरी गेला नाहीं समाचाराला ! मीं कित्ती म्हटलं एकदा जाऊन ये म्हणून. तर— "

" नुसतं म्हणून काय उपयोग ? त्याच्या प्रवासखर्चाची सोय केली असतीस तर गेला असता तो. तुझ्या कोरड्या उपदेशाचं कसं वाटावं त्याला महत्त्व ? "

" पण सांगायचं राहिलं—पैसे नसले जवळ तर मी देतें उसने, असं म्हटलं होतं मीं. तर तो म्हणाला—

' ऋण काढून मी जसा सण करायचा नाहीं, तसा ऋण काढून मी निरर्थक प्रवासहि करायचा नाहीं. काकांना अर्धांग झालाय् आणि अर्धांग हा कधींच बरा न होणारा विकार आहे. म्हातारपणीं तर तो हमखासच बरा होत नाहीं. काका आज ना उद्यां त्यांतच खलास होणार; मग काय करायचंय् आधीं जाऊन ? पुनः जावं लागणारच ' असं त्याचं म्हणणं ! इश्श, मला नाहीं बाई आवडलं हें तातूचं. "

" हें नाहीं आवडलं तर सोडून दे. पण तात्याचं तुला आवडलेलं एखादं सत्कृत्य सांगशील का मला ? '

माझ्या या प्रश्नाचें उत्तर देण्याचें काम मुळींच सोपें नव्हतें. तात्याचें सत्कृत्य शोधण्यासाठीं तिला खूप खूप डोकें शिणवावें लागलें असतें. पण त्या भानगडींत न पडतां ती मूळ मुद्याला बगल देऊन म्हणाली—

" करायचंय काय मला तुमच्याशीं वाद घालून ? आणि मीं तातूला ' बरं ' म्हटलं, कीं मस्तक पिकतं तुमचं. तुमच्या मनांतून तो कायमचा उतरलाय्, तेव्हां तो तुम्हांला सदान्कदा वाईट दिसायचा. "

तात्या आमच्या घरांतूनच नव्हे, तर गांवांतूनहि गेला, तरी अशा रीतीनें आमच्या घरीं चर्चाविषय होऊन तो प्रकट होई. त्या चर्चेनें मला थोडा फार संतापहि होई.

तात्या दूर गेल्यामुळें मला सुटल्यासारखें वाटलें, तरी मालीचें कसें होणार ही चिंता मला अस्वस्थ केल्याशिवाय राहीना. आतां तिची अवस्था अधि-

कच बिकट होणार हें मला उघड दिसत होतें. आतां ती नुसती पत्नी म्हणून परत येणार नव्हती, तर माता होऊन ती तात्याच्या घरीं शिरणार होती. नवऱ्याचा रूक्ष व प्रेमशून्य सहवास आणि त्याच्या तात्रेदारींतला जाच सोसायचा तिला आतां सराव झाला होता व यापुढेंहि ती तो कसातरी सोशील असा मला धीर वाटत होता. पण आपल्या बालकाची हेळसांड तिला अगदीं दुःसह होईल. प्रेमाच्या बाबतींत नवऱ्याकडून होणारी उपासमार आपल्या बालकाचें लालनपालन करतांना स्त्री विसरूं शकते. नवऱ्याच्या छळानें हैराण झालेलें मन आपल्या लेकराच्या हसऱ्या मुखाचा मुका घेऊन ती शांत व संतुष्ट करूं शकते. पण एवढी तरी सत्ता मालीला तात्याच्या घरीं मिळूं शकेल काय अशी माझें मन शंका घेई आणि त्या शंकेला आशादायक उत्तर न सुचल्यामुळें माझें मन बेचैन होऊन जाई.

पण एवढ्यावर थोडेंच भागणार होतें ? यापेक्षांहि कठोर असा प्रहार तात्या आमच्या मनावर करणार होता !

तात्याला जाऊन दोन एक महिने झाले असतील. एके दिवशीं अनोळखी हस्ताक्षराचें पत्र माझ्या हातीं आलें. व्यवसायधंद्यामुळें ज्यांचा माझा परिचय झाला होता, त्या भानुदास भालेरावांचें पत्र होतें तें. तात्या हा आमच्या घरोब्यांतला इसम असल्याचें त्यांना कसें कळलें कुणास ठाऊक; त्याच्याबद्दल त्यांनीं माहिती विचारली होती—

" येथील बँकेंत कामास असलेले श्रीयुत तात्याराव डिग्रजकर हे आपल्या घरोब्यांतील व पूर्ण परिचित आहेत असें मला समजतें. ते कसे काय इसम आहेत, त्यांच्यावर एखाद्या कामीं विश्वास टाकल्यास ते त्याचा दुरुपयोग करणार नाहींत ना याबद्दल मला आपलें मत पाहिजे आहे. "

या पत्रास काय उत्तर द्यावें हें मला समजेना. तात्याशीं कसलाहि संबंध ठेवूं नका असें भालेरावांना लिहून टाकावें असें एकदां माझ्या मनांत आलें. पण तसें लिहिलें तर आपण त्याचें निष्कारण नुकसान केल्यासारखें होईल अशी भीति मला वाटूं लागली. भानुदास भालेराव हे पातळपुरांतले एक वजनदार नागरिक आहेत हें मला ऐकून ठाऊक होतें. अर्थात् बँकेच्या स्थानिक कारभाऱ्यांवरहि त्यांचें थोडेंफार वजन असणार. या वजनाचा

तात्याच्या बढतीस उपयोग होणार असेल तर तो मीं कां होऊं देऊं नये ? माझ्याशीं तात्याचें वर्तन तिरस्करणीय झालें असेल, पण तेवढ्यावरून तो सर्वांशींच तसा वागेल असा सिद्धांत मीं कां म्हणून ठरवावा ? मला न आवडणारीं कांहीं माणसें इतरांना प्रिय असल्याचें मी पाहतोंच कीं नाहीं ? तात्याचें तसेंच नसेल कशावरून ? इतरांशीं तो भलेपणानें वागेल, त्यांचा लोभ आणि विश्वास संपादनहि करील; मग माझी वैयक्तिक नापसंती जग-जाहीर करून त्याच्या कल्याणाला मी विरोध कां करावा ?

मग काय, तात्या सज्जन आणि विश्वासू माणूस आहे असा निर्वाळा मीं देउन टाकूं ? तसा मी दिला व माझ्या शब्दांवर विसंबून भालेरावांनीं एखादी जोखीम त्याच्यावर सोपविली तर काय होईल ? आपल्या जन्मजात द्रव्य-लोभानें त्यानें त्यांना गोता दिला तर त्याचें खापर ते माझ्या माथींच फोडणार नाहींत का ? अशा स्थितींत आपली अब्रू संभाळण्यासाठीं दोन-पांच हजार भरण्याचा प्रसंग आला तर तेवढी कुवत आहे का आपली ? छे, हजारांचा आंकडासुद्धां आमच्यासारख्यांना भारी मग काय बरें करावें ?

अशा शंकाकुशंकांच्या भोंवऱ्यांत गिरक्या घेत राहिल्यामुळें माझ्या मनाला कसलातरी ताण पडला असला पाहिजे हें तिनें ओळखलें. आणि ती म्हणाली—

" कसला विचार चाललाय् एवढा ? साहेबानं कांहीं घोंटाळा केलाय् कीं काय ? "

तिची ही पृच्छा मला त्या वेळीं उपकारक वाटली. पत्नीला पतीचें सचीव-पद कवींनीं दिलें आहे तें कांहीं गैर नाहीं. अडीअडचणीच्या वेळीं पत्नीचा सल्ला पतीला मार्गदर्शक होतो असा अनुभव मीं कित्येकदां घेतलेला आहे. आणि या वेळींहि ती मला पडलेलें कोडें सोडविण्याच्या कामीं कांहींतरी मदत करील या हेतूनें मी तिला सर्व हकीगत सांगून विचारलें—

" मग भालेरावाला मीं काय उत्तर द्यावं असं तुला वाटतं ? "

तिलाहि माझ्यासारखाच पेच पडला. पैशाच्या बाबतींत तात्याच्या सच्चेपणाचा तिला भरंवसा वाटेना. तरी पण आपल्यावर कसलीहि जोखीम न येतां तात्याला जेवढा चांगुलपणा देतां येईल तेवढा द्यावा आणि त्याचें कांहीं कल्याण होणार असेल तर होऊं द्यावें असें तिचें मत पडलें.

बराच वेळ डोकें खाजवून आणि दोन-तीन मसुदे बाद करून मीं अखेर भालेरावाला लिहिलें—

" श्रीयुत तात्या डिग्रजकर हे माझ्या घरोब्यांतील आहेत ही गोष्ट खोटी नाहीं. आणि घरोब्यांतील माणसाची मीं शिफारस केली तर ती आपणांस कितीशी विश्वसनीय वाटेल याची मला शंका वाटते. म्हणून मीं तात्यांच्या चांगुलपणाबद्दल माझें असें कांहींच न लिहितां कोणालाहि उघड दिसणाऱ्या गोष्टी आपणांस कळवितों. श्रीयुत तात्या हे गेलीं दोन-तीन वर्षें माझ्या शेजारींच राहत होते व ते उधळे नसून मितव्ययी आहेत असें दिसून आलें आहे. त्यांना व्यसन वगैरे कांहीं नाहीं व कोणाच्या कज्जा-खटल्यांत ते लक्ष घालीत नाहींत. आपण बरें व आपलें घर बरें अशी त्यांची वृत्ति दिसते.

" ज्या अर्थी त्यांची इथून बढतीवर बदली झाली आहे, त्या अर्थी ते आपलें काम हुषारीनें व व्यवस्थितपणें करीत असले पाहिजेत हें आपणांसहि कळून येण्यासारखें आहे.

" श्रीयुत तात्यांविषयीं आपण माझें मत कोणत्या दृष्टीनें विचारलें आहे हें मला नक्की अजमावतां येत नाहीं. तरी पण मला सांगावेसें वाटतें कीं आपण त्यांच्यावर कांहीं पैशाची जबाबदारी टाकणार असाल, तर ती बेतानेंच टाकावी. असें लिहिण्याचें कारण एवढेंच, कीं आपल्या व्यवहारांत जर कांतां खोट बसली, तर ती भरून काढण्यास त्यांची घरची स्थिति म्हणण्यासारखी खंबीर नसावी असें मला वाटतें. ते हातावर पोट भरणारे आहेत व वडिलार्जित शेतीवाडी थोडीच असून समाईक आहे. अशा स्थितींत आर्थिक व्यवहार किती मोठा करावयाचा हें आपलें आपण ठरविलेलें बरें."

मीं हें पत्र फार दूरदृष्टीनें लिहिलें असें मला वाटलें. तें तिच्याहि पसंतीस उतरलें आणि माझ्या व्यवहारकुशलतेबद्दल मीं माझी पाठ थोपटून घेतली! पण माझ्या या पत्रानेंच एवढा घोटाळा केला, कीं आतां त्या मूर्खपणाबद्दल आपलेच कान उपटून आपल्याच थोबाडींत मारून घ्याव्या अशी माझी मलाच चीड आली.

" तात्या हा मनुष्य नसून नरराक्षस आहे व त्याला आपल्या सावलीला उभें राहूं देणेंसुद्धां धोक्याचें आहे " असें स्पष्ट लिहिलें असतें तर ही दुर्धर आपत्ति आमच्यावर कां ओढवली असती? हा सारा प्रकार कळल्यावर

मालीची अवस्था किती शोचनीय होईल, 'यांचा फायदा पाहतांना, दादा, माझी दुर्दशा तुम्हांला कशी हो दिसली नाहीं?' असा सवाल त्या पोरीनें केला तर मी काय जाब देऊं? 'तूं आपल्या मित्राचें ऋण छान फेडलेंस' असा मैराळकाकांनीं मला वाक्प्रहार केला, तर मला तोंड आहे का बोलायला? इतरेजनांनीं देखील 'तात्याच्या कटांतला साथीदार' म्हणून माझ्याकडे बोट दाखवण्यास सुरुवात केली, तर शरमेनें खालीं मान घालून बसण्यापेक्षां मला काय करतां येणें शक्य आहे? हा सारा समजुतीचा घोटाळा आहे असें मीं किती जीव तोडून सांगितलें, तर कोण विश्वास ठेवायला बसला आहे त्यावर?

बसल्या ठिकाणीं घर अंगावर कोसळावें तशी माझी अवस्था झाली त्या दिवशीं. रविवारची सुटी असल्यानें मी घरींच होतों. तीहि आरामखुर्चीवर मासिक वाचीत पडली होती. त्या दिवशीं फारा दिवसांनीं माझ्या मेहुण्यांचें पत्र आलें होतें आणि त्यांनीं आपल्या कित्येक दिवस चाललेल्या खटल्याचा आपल्या वतीनें निकाल झाल्याचें मला कळविलें होतें. तिनें लावलेल्या गुलाबाला पहिली कळी आली होती, आणि आमचा प्रेमळ व बोलका मित्र दामुअण्णा पंगतीला असल्यानें आमचें जेवणहि खूप मजेंत झालें होतें. संध्याकाळीं सिनेमाला जायचा बेतहि आम्हीं मुक्रर करून ठेवला होता. आणि एकंदर सुटी मजेंत जाणार या खुषींत आम्हीं होतों. इतक्यांत दरवाजांत टांगा उभा राहिल्यासारखा वाटला. कोण आलें तें पाहण्यासाठीं आम्हीं खोलींतून सोप्यावर आलों. एक वयस्क विधवा आणि एक तरुणी घरांत येत होत्या.

आम्हांला पाहतांच माझें नांव घेऊन म्हातारीनें विचारलें, "हे गृहस्थ याच वाड्यांत राहतात ना?"

"होय, मीच तो. या आंत." मीं उत्तर दिलें.

दोघीहि आंत आल्या. मीं तिला खूण केली. तिनें दोघींना आंत चलण्याची सूचना देतांच त्या तिच्यामागोमाग घरांत गेल्या. त्या कोण आणि कशाकरतां आल्या आहेत या उत्कंठेनें मी माझ्या खोलींत वाट पहात बसलों. पांच एक मिनिटांत ती आली आणि तिनें मलाहि आंत चलण्यास सांगितलें. तिच्या चर्येकडे पाहतांच माझ्या छातींत धस्स झालें. आतां कोणती भयंकर गोष्ट

ऐकावी लागणार या भीतीनें मी थरथरत्या पायांनींच तिच्या मागोमाग गेलों.

मी आंत जातांच वृद्धा आपल्या कन्येस म्हणाली— " नमस्कार कर नमूताई दादासाहेबांना. "

त्या मुलीनें मला वाकून नमस्कार केला. मला एकंदर प्रकारांत भिण्याचें कारण कोठेंच दिसेना. मग तिची चर्या अशी भयचकित कां झाली होती? आणि मी माजघरांत येतांच तिनें मागीलदारीं कां पळ काढला? मी अधिकच गोंधळलों.

" आपण दोघं लग्नाला आलां असतां तर छान झालं असतं. पण अलीकडल्या माणसांचीं विचित्र मतं. लग्नाला आपण कोणालाहि बोलावणार नाहीं, आणि कसलाहि समारंभ अन् थाटमाट करायचा नाहीं असं निक्षून सांगितलं जावईबुवांनीं. म्हणून नुसत्या होमावर लगीन उरकावं लागलं. जावईबुवा सकाळच्या गाडीनं आले, दुपारीं लगीन झालं अन् संध्याकाळीं घेऊनसुद्धां गेले बायकोला. महिनाभर तिकडे राहून परत आलीय् नमी आतां. आपली त्यांची अजूनहि भेट झाली नाहीं म्हणे? तेव्हां म्हटलं आपल्या मेहेरबानीमुळं आम्हांला चांगलं स्थळ मिळालंय्, तर येऊं दे एकदा मुलगी आपल्या दोघांच्या पायां पडून, म्हणून आलें मी हिला घेऊन मुद्दाम. शिवाय आमचा भानुदादाहि म्हणाला—"

" म्हणजे. भानुदास भालेराव! पातळपूरचे? " म्हातारीस मध्येंच थांबवून मीं विचारलें. त्यावर बाईची कथा पुढें चालू झाली—

" होय, तेच. भानुदास हे माझे मामेभाऊ. माझी ही नमी झाल्यावर वरीस उलटायच्या आंतच माझं हें असं झालं. तेव्हांपासून आमचा जमीनजुमला आणि थोडीशी सावसावकारी आहे तिची व्यवस्था भानुदादाच पाहतोय्. आमच्या बासनगांवसारख्या खेड्यांत कुठली शाळा? त्यामुळं नमींचं शिक्षण नाहीं झालं. लिहावाचायला येतंय् नुसतं; पण हिच्या पत्रिकेंतला मंगळ आणि इंग्रजी येत नाहीं यामुळं जमतां जमेना लगीन. भानुदादानं गलीं तीन वर्सं नागपूरपासून बेळगांवपर्यंत किती वाऱ्या केल्या असतील हिला घेऊन तें त्याचं त्याला माहीत! शेवटीं आपण दिलं त्याला मिळवून हें तात्यासाहेबांचं स्थळ—"

म्हातारीच्या तोंडचें हें वाक्य ऐकतांच माझी कशी अवस्था झाली तें मीं वर सांगितलेंच आणि भानुदास भालेरावांच्या संदिग्ध पत्रास गेलेलें माझें संदिग्ध उत्तर किती अनर्थकारी झालें हें मला कळून चुकलें. पण आतां हळहळण्यावांचून मला काय करतां येत होतें? त्या वेळीं माझी चूक मनांत डाचत असली तरी दुसराहि प्रश्न मला पडला, तो म्हणजे तात्या स्वतः या पुनर्लग्नाला कसा तयार झाला? तो प्रकार काढून घेण्यासाठीं मीं विचारलें—

" पण आई, तुम्हांला हें तात्यांचं स्थळ सापडलं कसं आणि तुम्ही त्यांची पूर्वींची सगळी माहिती कशी मिळविली ? "

म्हातारबाई सांगूं लागल्या—

" भानूदादाला वरचेवर बँकेंत जावं लागतं. तिथं नवीन आलेले तात्यासाहेब त्याला आढळले. चौकशी करतांना त्याला कळलं, कीं ते एकटेच आहेत. मंडळी वगैरे कुणी नसून खानावळींत जेवतात. मग भानूदादानं काढलं बोलणं. तात्यासाहेब पाताळपूरला यायच्या आधीं इथं होते आणि ते आपल्या घरोब्यांतले आहेत असं सांगितलं त्यांनीं. तेव्हां लिहिलं त्यानं आपल्याला पत्र. आपलंहि उत्तर आलं. त्यावरून कळलं, कीं घरचे गरीब असले तरी तात्यासाहेब सरळमार्गी आहेत. असेनात गरीब, नमूच्या नशीबानं तिला रग्गड आहे. नुसतं बसून खाल्लं, तरी सात डुया पुरेल. भानूदादानं मला विचारलं, तेव्हां मीं म्हटलं, जमवून टाक. त्यानं मग विचारलं तात्यासाहेबांना— "

" आणि त्यानं रुकार दिला ? "

" तर ! त्याशिवाय का लगीन होईल ? "

आमचें हें बोलणें चाललें आहे तोंच अंगणांत तारवाल्याची आरोळी माझ्या कानांवर आली. बाहेर जातांच तो पाकीट माझ्यापुढें करून म्हणाला,

" खुशाली काढा साहेब ! "

सही करून देऊन मीं तार घेतली; लखोटा फोडून ती वाचली. माझ्या हृदयांत कोणीतरी खंजीर खुपसत आहे असें मला वाटलें. मालीची सुखरूप सुटका होऊन तिला पुत्रप्राप्ति झाल्याची आनंदवार्ता मैराळकाकांनीं मला एक्स्प्रेस तारेनं कळविली होती. पण आनंदवार्तेतला आनंद उपभोगण्याऐवजीं तिनें आधींचें दुःख द्विगुणित, दशगुणित व्हावें असें या वेळीं झालें होतें! मन

शोकानें व्याकुळ झालें असतांना कुणी तरी पेढे वाटायला यावें असें मला वाटलें त्या वेळीं. त्या स्थितींतहि तारवाल्याला खुशालीचा रुपया मीं दिला आणि उद्विग्न मनानें माझ्या खोलींत जाऊन कपाळाला हात लावून बसलों.

हातांत तारेचा कागद आणि मुद्रेवर उदासीनता या गोष्टी तिची घाबरगुंडी उडायला पुरेशा होत्या. तिनें अधीरतेनें विचारलें, "कुणाची तार! काय झालं?"

"माली बाळंत झाली. मुलगा झाला." मीं रुद्ध स्वरानें उत्तर दिलें. इतर वेळीं ही वार्ता ऐकून ती आनंदानें नाचली असती नुसती! पण आज? माझ्यापेक्षांहि अधिक केविलवाणी चर्या झाली तिची!

पाहुण्या बाईहि बुचकळ्यांत पडल्या हा प्रकार पाहून. मुलगा झाल्याची तार येते व त्यानें हर्ष होण्याऐवजीं उद्वेगच वाटतो हा प्रकार त्यांना चमत्कारिक वाटत होता. त्यांनीं आपलें आश्चर्य बोलूनहि दाखविलें. अप्रिय गोष्ट उघड करून त्यांच्या समाधानाचा भंग करायचें माझ्या अगदीं जिवावर आलें होतें आणि त्यांतून आपली सुटका एखाद्या मार्गानें होऊं शकेल का हें मी मनाशीं शोधीत होतों. पण मला सुटकेचा एकहि मार्ग दिसेना व तो दिसणें शक्यहि नव्हतें. शेवटीं नशिबीं आलें त्यास मुकाट्यानें तोंड दिलें पाहिजे व हें घोंगडें अधिक भिजत न ठेवतां काय तो सोक्षमोक्ष तडकाफडकीं करून टाकलेला बरा असें ठरवून मी म्हणालों—

"आई, या वयांत आणि अशा वेळीं तुमच्यावर ओढवलेल्या दुर्दैवाची जाणीव करून द्यायचा माझ्यावर प्रसंग आला आहे. तुमच्या लेकीला चांगला नवरा मिळाला हें तुमचं समाधान खरं नाहीं. तुम्ही मायलेकी खरोखरी एका गळेकापू माणसाच्या तावडींत सापडला आहां. तुमचा जावई तात्या हा एक बायको असलेला गृहस्थ असून तिलाच मुलगा झाल्याची आतांची तार आहे."

"अहो, पण तुम्हीच त्याच्या सज्जनपणाचं सर्टिफिकीट पाठवलंत ना भानुदादाकडे?" असें म्हणून म्हातारी मटकन् खालीं बसली आणि दुःखभरांत तोंडाला येईल तें बोलून ताडताड कपाळ बडवूं लागली. बिचारी नमूहि त्या आकस्मिक आघातानें हतबुद्ध झाली होती. त्या वेळच्या तिच्या दृष्टींत विकलता असली तरी ती मला अतिशय प्रखर वाटली. ती जेव्हां जेव्हां

माझ्याकडे पाही तेव्हां तेव्हां तापलेली सळईच माझ्या मस्तकांत घुसत आहे असा मला भास होई.

म्हातारीचें सांतवन करतांना मी अगदीं मेटाकुटीस आलों. माझ्या व भानुदासांच्या अर्धवट लिहिण्याचा हा परिणाम असल्यानें माझ्याबरोबर तिनें त्यांच्यावरहि ताशेरा उडविला. मला कोणी विनाकारण अपशब्द बोलले तर त्याचा तिथल्या तिथें समाचार घेतल्यावांचून मी सोडीत नाहीं. पण माझा हा कडकपणा या वेळीं अगदीं मलूल झाला होता. म्हातारीचें वाक्ताडन मी मुकाट्यानें सहन करीत होतों.

रात्रीच्या गाडीनेंच म्हातारी परत जायला निघाली. तेव्हां तिची आणखी एकदा समजूत घालण्याचा मीं प्रयत्न केला. मी म्हणालों— " आई, तुमच्या आणि तुमच्या मुलीच्या दुर्दैवामुळें असो, आमच्या चुकीमुळें असो किंवा तात्याच्या कारस्थानामुळें असो, होऊं नये ती गोष्ट झाली आहे. तीच आतां कमी त्रासदायक कशी होईल हें आपण पाहिलं पाहिजे. तात्याच्या दोन्ही बायका सुखांत राहाव्या यासाठीं मी शक्य ती खटपट करीन. तात्याचे कान उपटून त्यालाहि तुमच्या मुलीला नीट प्रकारें वागवायला लावीन."

" पण मी बसलेंय् आतां त्या मेल्या राक्षसाच्या तोंडीं माझी पोर ढकलायला. येऊं दे माझ्यापुढं आपला नवरेपणा गाजवायला, मग दाखवतें माझा तडाखा कसा आहे तो. बारान् बारा वर्सं खेडेगांवांत काढलींत मीं. गुंडापरीस गुंडांना दाद नाहीं दिली या म्हातारीनं, नि या भागूबाईला भीक घालेंतय् मी ? " हें आणि असेंच आपल्याशीं पुटपुटत म्हातारी टांग्यांत बसली.

ती निघून गेल्यावर हताश स्वरांत ती म्हणाली—" दुर्दैव काय काय वाढून ठेवील याचा नेम नसतो ग बाई ! "

" दुर्दैव आणि तात्याहि. त्याच्या अधमपणाचं प्रायश्चित्त कोणाला कसं भोगावं लागेल हें ब्रह्मदेवाच्या बापालाहि कळायचं नाहीं ! " मीं म्हटलें आणि कुठें जातों हें न सांगतांच घराबाहेर पडलों.

---

# पत्ररूपदर्शन

प्रथम पत्नी हयात असतांना, एवढेंच नव्हे, तर तिच्यासह संसार सुसूत्र-पणें चालला असतांना, तात्यानें दुसरें लग्न करावें ही गोष्ट अत्यंत संतापजनक होती. माली ही मला मुलीसारखी वाटते आणि तिच्या उरावर सवत आल्यामुळें तिच्या जन्माचा खेळखंडोबा होणार या भीतीमुळेंच मी तात्यावर चिडलों असें नाहीं. तर निरपराध आणि सद्‌गुणी पत्नीचा सभ्य म्हणून मिरवणाऱ्या गृहस्थानें असा अपमान करावा याचा मला मनस्वी राग आला होता. आणि त्या रागाच्या भरांत मीं मनाशीं ठरवून टाकलें होतें कीं, याउपर तात्याला मालीचें दर्शनहि होऊं द्यायचें नाहीं. नवऱ्यानें बायकोची अवहेलना आरंभिली, तरी बापानें लेकीची किंवा भावानें बहिणीची ती कां होऊं द्यावी?

तात्या स्वत:च्या सांसारिक विषयांत कुचकामीं आहे, ही गोष्ट मला अनेक प्रकारें समजून आली होती. पण त्याच्या या पुनर्लग्नानें तो सामाजिक दृष्ट्याहि अधम प्रवृत्तीचा आहे हें सिद्ध झालें होतें. तो मंद बुद्धीचा आहे असा झालेला माझा गैरसमजहि या गोष्टीनें दूर झाला होता व तो एक हुशार कपट-कारस्थानी आहे असें मला कळून चुकलें होतें. लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन आपला स्वार्थ साधण्याइतकें उलटें काळीज त्याला आहे आणि अशा नरराक्षसाशीं अत:पर कसलाहि संबंध ठेवायचा नाहीं हें मीं ठरवून टाकलें.

तिलाहि तात्याचा तिटकारा आला तरी पण त्याचे कांहीं चुकत असल्यास सुधारावें आणि सुदैवानें तो सुधारलाच तर त्याच्याशीं सहानुभूतीनें वागावें इतका लवचिकपणा अद्यापिहि तिच्या मनांत जीव धरून होता. म्हणूनच तिनें त्याला पुनर्लग्नाबद्दल निषेधाचें कां होईना पण पत्र लिहिलें होतें आणि त्या अपकृत्याचा जाबहि विचारला होता. आपल्या पापाचें समर्थन त्याला करतां येणार नाहीं हें एक आणि उत्तर पाठविण्यास आणा दीड आण्याची पदरास चाट बसेल हें दुसरें, अशा दुहेरी कारणामुळें तात्याचें पत्र येण्याची शक्यता मला तरी वाटत नव्हती.

परंतु बँकेंतील एका शिपायानें एक पत्र आणून दिलें. पातळपूरचा एक माणूस इथल्या कामासाठीं आला होता व त्याच्या हातीं पत्र पाठवून तात्यानें टपालखर्चाची बचत केली होती. पत्र अर्थात् तिच्या नांवावरच आलें होतें. त्यानें औपचारिक नमस्कार–चमत्कारानंतर लिहिलें होतें—

" तुम्हीं माझ्यावर असा गहजब कां करावा हें मला समजत नाहीं! मी दुसरी बायको केली म्हणून पहिल्या बायकोला टाकणार आहे असें तुम्हीं कशावरून म्हणतां? त्या भीतीनेंच तुम्हांला माझें दुसरें लग्न नकोसें वाटत असेल, तर मी तुम्हांला सांगतों कीं माझा तसा विचार नाहीं. मी पूर्वीप्रमाणेंच पुढेंहि पहिली बायको संभाळीन.

" एक बायको असतांना दुसरी करण्याची आवश्यकताच काय हा तुमचा प्रश्न मला अगदीं वेडेपणाचा वाटतो. एक घर असतांना स्वस्त अगर फुकट मिळत असूनहि दुसरें घर घेऊं नये असें म्हणण्यासारखेंच हें आहे. माणसानें मिळेल तसतशी जिंदगीची जोड केलीच पाहिजे.

" मीं फसवून दुसरी बायको मिळविली हा तुमचा आरोपहि मला मान्य नाहीं. माझ्या बायको नंबर २ च्या मामांनीं विचारलेल्या सर्व प्रश्नांचीं उत्तरें मीं दिलीं आहेत आणि त्यांत खोटें कांहींच नव्हतें. 'माझें पहिलें लग्न झालें आहे काय?' असें त्यांनीं विचारलेंच नाहीं. मग तें झालें असल्याचें मी बळेंच कां सांगूं? हुशार लोक दुसऱ्याला फसवून आपलें हित साधतात मग आपण होऊन फसणाऱ्या माणसांपासून माझा फायदा होत असतांना मीं ती संधि कां दवडावी?

" दोन बायकांचा नवरा सुखी होत नाहीं ही तुम्हीं दाखवलेली भीति

मला मुळींच वाटत नाहीं. बायकोला अवास्तव मोठेपणा देणाऱ्या मूर्ख न
ऱ्यांना तसा अनुभव येत असेलहि. पण मी बायकोचा फाजील बडेजाव मा
विणारा माणूस नाहीं, बायको ही नवऱ्याची चाकरी करणारी बाई अ
हिशोबानेंच मी तिच्याकडे पाहतों. ती चाकरी योग्य प्रकारें बजावीत अ
पर्यंत माझ्या बायकांना माझा कसलाच त्रास होणार नाहीं. शिवाय एक
दोघी झाल्यामुळें एकटीलाच करावें लागणारें माझें सर्व काम दोघी अ
अर्धं करतील. म्हणून दोघींनाहि काम हलकें झाल्याचें समाधान या माझ
योजनेनें मिळण्यासारखें आहे. "

तात्याचें पत्र पुढें न वाचतांच मीं तिच्याकडे भिरकावलें. त्याच्या अ
नुघतेचा अधिक पडताळा घेण्याची माझी इच्छा नव्हती. पण तो मला दु
रेच दिवशीं भानुदास भालेरावांच्या पत्रानें आला. आमच्या संदिग्ध प
व्यवहारानें ही आपत्ति ओढवल्यामुळें त्यांच्या मनांत कांहीं किल्मिष उत
झालें असल्यास तें दूर व्हावें म्हणून मीं होऊन भानुदासांना पत्र लिहि
त्यांचें उत्तर आलें, त्यांत मजविषयीं त्यांचा कसलाहि गैरसमज नसल्य
त्यांनीं मला लिहिलें होतें; त्यामुळें माझा जीव खालीं पडला. त्यांनीं ' हे 
दैवाचे खेळ असून हरीची इच्छा असेल तसें घडतें ' अशी आपल्या मना
समजूत घातली होती व आपण तात्याच्या बावळटपणास कसें फसलों याब
लिहिलें होतें—

" नेहमीं गंभीर दिसणारी तात्यांची मुद्रा, कुणाशींहि लघळपणा न क
ण्याची त्यांची वृत्ति या उघड दिसून येणाऱ्या गोष्टींवरून त्यांच्या साळसू
पणाबद्दल माझा विश्वास इतका बळकट झाला कीं, कोणीं ' तात्या म्हण
एक पाताळयंत्री वल्ली आहे ' असें सांगितलें असतें तर मीं त्याला मूर्खांत
काढलें असतें.

" तात्यांच्या आणखी एका गोष्टीनें मी पुरा फसलों. येथें श्रीपुंडल
महाराज नांवाचे एक वारकरी संप्रदायाचे इसम आहेत. त्यांच्या निवा
स्थानाला ' ज्ञानमठ ' म्हणतात. तेथें पुंडलिकमहाराज प्रत्यहीं ज्ञानेश्वरी
प्रवचन सांगतात. त्यांचें प्रवचन सनातनी छापाचें असून अलीकड
सुधारणांची ते बरीच टिंगल करतात म्हणे. मी स्वतः या ज्ञानमठांत -
जात नाहीं आणि पुंडलीक महाराजांचें प्रवचनहि मीं कधीं ऐकलें नाह

मालीसारख्याच सर्व मुली आज्ञाधारक व सोशीक असतील अशी समजूत झाल्यामुळेंच तात्या दुसऱ्या लग्नालाहि निर्भयपणें तयार झाला असावा. पण गायी एकंदरींत गरीब असल्या तरी एखादी कडक प्रकृतीचीहि असते व आपल्या अकारण वाटेस जाणारावर तीं शिंगें रोखते. नमूचा प्रकार यांपैकीं आहे असा तात्यामहाशयांना लवकरच अनुभव येऊं लागला. ऐपत असूनहि कंगाल जिणें कंठण्यास मालीप्रमाणें नमू तयार नव्हती. नटवेपणा अथवा चैन तिला करायची नव्हती; पण दहाजणांसारखीच आपलीहि राहणी असली पाहिजे, असा तिचा आग्रह होता. तात्याला ही उधळपट्टी मानवण्याजोगी नव्हती. आणि त्यानें नमूवर डोळेहि वटारले. पण नमू त्यानें भेदरली नाहीं. "तुझ्या आईकडून पैसे आण आणि मग चालव श्रीमंती चोचले" या यजमानांच्या गुरकावणीसहि नमूनें निर्भयपणें उत्तर दिलें, "लग्नाआधीं पोसलंच आहे मला आईनं आणि लग्न झालं नसतं तर अझूनहि पोसलं असतं. पण आणलंत मला दावं लावून इकडे, मग वरी ती करील माझ्यापायीं खर्च ! बायको हवी तर खर्चहि करायला हवा. बायको म्हणजे कांहीं चिंध्या–चिखलाची बाहुली नव्हे. बाहुली बसेल कपाटांत न खातां न पितां. पण चालतीबोलती आणि राबती बायको पोटभर जेवणार नि अंगभर धडूत पांघरणार. पैसा सरेल म्हणून घाबरं होणाऱ्यांनीं बाशिंग बांधण्यापूर्वींच विचार करायला हवा होता."

सवालासरशीं जबाब येऊं लागल्यामुळें तात्यामहाराज मनांतून हादरून गेले. तात्याचें काळीज उलटें असलें तरी समोरासमोर सामना देण्याइतकी धिटाई त्यांत नव्हती. तसा तो भ्याडच आहे. चरफडेल नुसता आणि बोटें मोडीत गप्प बसेल.

नमू नुसती बोलून थांबणारी नव्हती. बोलल्याप्रमाणें करणारी, करवून घेणारी होती. तात्याकडे केलेली पैशाची मागणी तो मनावर घेत नाहींसें दिसतांच तिनें वाण्याकडून, कापडवाल्याकडून आणि भांडींवाल्याकडून पाहिजे तेवढा माल खरेदी करून आणला आणि पहिल्या तारखेस तिघांचीं मिळून साडेबासष्ट रुपयांचीं बिलें येतांच तात्या झीट येऊन पडायच्या बेताला आला !

वस्त्रपात्र आणि अन्नसामुग्री एवढ्यानेंच नमूच्या संसाररचनेची तृप्ति झाली नाहीं. तिनें दिनूबाळासाठीं लोकरीची चड्डी–बंडी आणि जरीची टोपी घेतली. त्याच्या पायांत वाळे, कानांत डूल करून घातले. लेकुरवाळी म्हणून मालीच्या

खाण्यापिण्यावर आणि वस्त्रप्रावरणांवर ती दक्षतापूर्वक नजर ठेवूं लागली आणि ती ' नको नको ' म्हणत असतांहि तिच्या भातावर लिंबाएवढा तुपाचा गोळा घालूं लागली. मालीनें एका पत्रांत तिला लिहिलें-" माझं नि नमूताईचं प्रेम पाहिलं असतं तर ' सवत उरावरि नित्य नांदणें याहुनि मृत्यु बरा' असं ग्रामकवींनीं दडपून दिलं नसतं. सवतीचा जाच तर मला नाहींच, उलट नमूताईच्या ममतेला कधींकधीं जो महापूर येतो, तोच मला असह्य वाटतो."

मालीच्या या पत्रानें आम्हांला केवढा पण आनंद वाटला ! जगण्याची आशा सोडलेलें मायेचें माणूस खडखडीत बरें व्हावें म्हणजे जें समाधान वाटेल आणि जसा हर्ष होईल तशाच समाधानानें आणि हर्षानें आमच्या वृत्ति बहरून गेल्या. ' आमची माली आतां आनंदांत आहे ' असें ती शेजारपाजाऱ्यांना अभिमानानें सांगूं लागली !

फाजील उधळपट्टीच्या भयानें तात्या ठराविक पैसे नमूच्या हातीं दरमहाच्या दरमहा देऊं लागला. खर्चाच्या एका बाबतींतच तात्याला नमूनें नमविलें असें नसून नित्याच्या आचारांतहि नमूनें घालून दिलेल्या नियमाप्रमाणें चालणें तात्याला भाग पडलें होतें. मुक्ताबाईच्या घरीं, एकच नव्हे तर दोन बायका येऊन घर चालू झालें तरी, तात्याची खेप चालूच होती आणि प्रसंगीं तेथें प्रहर—प्रहरभर त्याचा तळ पडे. नमूला त्याच्या उशीराचें कारण कळल्यावर तिनें आडपडद्यानें त्याची कानउघाडणी केली. पण शब्दाच्या मारानें सगळेच ताळ्यावर येत नाहींत. तात्यालाहि बायकोचा इशारा फारसा महत्त्वाचा वाटला नाहीं. त्याचा मुक्ताबाईच्या घरीं जाण्याचा नाद सुटला नाहीं. तें पाहून नमूनें अधिक जालीम उपाय योजला. तात्या मुक्तागृहांत गप्पा छाटीत बसला आहे अशी वेळ साधून एके दिवशीं ती स्वत: तिथें गेली, आणि तिनें आपल्या नवऱ्याबरोबर मुक्ताबाईचीहि खरपूस खरड काढली. त्या दिवसापासून तात्या वेळच्या वेळीं घरीं येऊं लागला. बँकेंतून येतांना तो पुंडलीक महाराजांच्या दर्शनास जाई आणि तेथें होईल तेवढ्या गाठीभेटीवरच मुक्तातात्यांना संतुष्ट राहावें लागे. पण तें भाग्यहि नमूनें त्यांना फार काळ लाभूं दिलें नाहीं. तिला त्यांच्या मठीय गाठीभेटीची कुणकुण लागतांच, ती त्या वेळीं तेथें उपस्थित होऊं लागली. आणि ती आपल्या पाळतीवर आहे असें कळतांच तात्यांना तो मार्गहि सोडावा लागला.

खोडकर खोंडावरचा राग मालक गरीब बैलावर काढीत असतो. याच न्यायानें नमूच्या दांडगेपणाला भ्यालेला आणि संतापलेला तात्या मालीवर उट्टं काढण्याचा प्रयत्न करूं लागला. भांडीं घासायला आणि धुणीं धुवायला घरांत मोलकरीण येऊं लागलेली दिसतांच तात्या मालीवर खेकसून म्हणाला—

" तुमच्यासारख्या भिकारड्यांना कशाला पाहिजेत हे चोचले ! दोन भांडीं घासलीं आणि चार चिरगुटं धुतलीं तर मरायला नाहीं व्हायचं. "

तात्या मालीला एकटी पाहून हें बोलला असला तरी पलीकडच्याच खोलींत असलेल्या नमूला तें ऐकूं गेलें आणि तिनें पुढें येऊन तात्याला खडसावलें—

" आम्ही भिकारड्या असलों तरी तुमच्यासारख्या पगारदार मातब-राच्या बायका आहों. तुमच्या पदरीं पडल्यामुळं का होईना, पण आम्हांला श्रीमंती आली आहे आणि ती आम्ही भोगणारच. कामं करून आम्हांला मरायला व्हायचं नाहीं हें खरं; आणि झालं मरायला तरी तुमचं थोडंच नुकसान व्हायचंय ? आमच्यासारख्या दहा पोरी मिळवाल तुम्ही ! पण त्यासाठीं आमच्या मरण्याची वाट कशाला बघायला हवी य् तुम्हांला ? आम्हीं असतांनाहि आणतां येतीलच कीं नव्या बायका. होऊन जाऊं दे कीं मग ! कलियुगांत अष्टनायिकांचा नवरा तरी बघायला मिळेल जगाला. आमची कांऽऽहीं हरकत नाहीं. दोघी बशाच चौघी—आणि चौघी तशाच आठजणी. गळयांत गळा घालून रडायला तितक्या सोबतिणी मिळाल्या म्हणून आनं-दच वाटेल आम्हांला. "

कुठलें बोलणें कुठें नेऊन नमूनें अशी सरबत्ती सुरू केली कीं ती पुरती ऐकायला तात्या तिथें राहत नसे. माली तिला म्हणे,

" किती बोलतेस नमूताई ! बोलून चालून आपण बायका ! ठेवतील तसं राहायचं; आणि आपण तणतणलों तरी माणसाचा जलमस्वभाव का बदलणार आहे ? "

" पण मी आपण होऊन का बोलायला जातें बाई ? आपल्यावर विना-कारण आग पाखडली तरी मूग गिळून स्वस्थ बसायचं माझ्या हातून नाहीं बाई व्हायचं. आम्ही खेडयांत राहणारीं माणसं. मार खाऊन मुळूमुळू रडत बसायची सवय नाहीं आम्हांला. दुसऱ्यानं एक थप्पड दिली तर दोन लगावल्याशिवाय चैन नाहीं पडायचं आम्हांला. आम्हीं बायका पुरुषांच्या

ताबेदार हें कळतंय कीं मला. म्हणून त्यांचा वाटेल तो छळवाद कशासाठीं सोसून घ्यायचा? आणि आम्हीं गुप्प–गुमान तो सोसून घेतला, तर नांवनांव वाढत जाईल त्यांची अेररावी. गोगलगायीसारखं वाटेल तसं पायखालीं तुडवून कशासाठीं घ्यायचं? जास्ती बळ नसेल आम्हांला, पण गांधीलमाशी-इतपत डंख करायला तरी येईलच सुखासुखीं आमचं नांव काढलं तर असा कांहीं प्रसाद मिळतो हें समजून आल्याशिवाय ताळ्यावर नाहीं येणार हे. जत्मस्वभाव बदलत नाहीं म्हणतां तें खरं असेल. पण आपल्या बाणे-दारपणामुळं तो जास्ती वाईट तरी होणार नाहीं. मी म्हणतें हें सुद्धां रग्गड झालं आपल्याला.”

मालीकडून कळलेला नमूचा हा वेदांत मला मनापासून आवडला. शिक्षणाचा संस्कार तिला फारसा नव्हता, पण तिच्या या वैगुण्याचें वाईट वाटण्याऐवजीं शिक्षणजन्य मनोदौर्बल्यापासून ती बचावली आहे आणि तिच्या ठिकाणीं आपल्या मनुष्यपणाचा अभिमान जागृत राहिला आहे याचें मला समाधान वाटलें. आणि मालीच्या अंगीं अशी धिटाई येईल तर काय बहार होईल, असा विचारहि माझ्या डोक्यांत आल्यावांचून राहिला नाहीं.

मालीच्या संसाराला आलेली अवकळा नमूच्या चतुराईमुळें दूर झाली आणि तिचें घर — नवऱ्याच्या प्रेमाची एक बाब सोडल्यास इतर गोष्टींत– सुखसमृद्धिपूर्ण झालें याबद्दल माझा अंतरात्मा प्रसन्न होऊन गेला. तिला तर नमू म्हणजे अगदीं नमुनेदार मुलगी वाटूं लागली आणि माली तिच्या मनांत थोडीबहुत मागेंच पडल्यासारखी झाली.

तात्याच्या घरीं पाणी प्यायचें नाहीं, फार काय त्याचें मुखावलोकनहि करावयाचें नाहीं ही प्रतिज्ञा मला नमूमुळेंच विसरावी लागली. परवां नमूचें तिला आग्रहाचें निमंत्रण आलें. नमूसाठीं म्हणून मालीनें लिहिलें होतें—

“चि. सौ नमूताईनं येत्या शुद्ध अष्टमीस म्हणजे उद्यांच्या पुढच्या बुधवारीं चि. दिनूबाळाचं जाऊळ उतरण्याचा समारंभ करण्याचं ठरविलं आहे व तिनं ज्या ज्या गोष्टी करायच्या योजल्या आहेत, त्यावरून समारंभ बराच मोठा होणार असं दिसतं. निदान पन्नास–साठ बायकांचीं नांवं तिच्या यादींत आत्तांत दाखल झालीं आहेत. अद्यापि आठदहा दिवस अवकाश आहे. तोंपर्यंत आणखी किती नांवांची त्यांत भर पडते कोण जाणे!

" या समारंभास तुम्ही आणि ती. दादांनींसुद्धां आलं पाहिजे असं नमूताईंचं सांगणं आहे. तुम्ही कांहींतरी सबब सांगून नाहीं आलां, तर आपण तुम्ही येईपर्यंत अन्न-सत्याग्रह करूं असं तिचं म्हणणं आहे. तिनं ती. गं. आईनाहि बोलावलं आहे आणि त्या येणार असल्याचा निरोपहि आला आहे. म्हणून तुम्ही दोघंहि कांहींहि करा, पण याच.

" या एकंदर प्रकाराबद्दल इकडचं पित्त बरंच खवळलं आहे. पण, पण— पाहालच तुम्ही सारं समक्ष. "

नमूचा प्रेमळ आग्रह तर प्रभावी झालाच; पण मालीनें अर्धवट सोडलेलें 'सारें कांहीं' समक्ष पाहण्याची उत्कंठाहि प्रबळ झाली. तात्याच्या घरीं जायचें तर तात्याचें बोलावणं यायला पाहिजे ही गोष्टहि मीं मनांत येऊं दिली नाहीं. आणि जाऊळ-उष्टावणासारख्या बायकी अनावश्यक गोष्टींत वेळेचा व पैशाचा अपव्यय करणें वेडेपणाचें आहे हें माझें ठाम मतहि आठवत असून मीं विसरायचें ठरविलें होतें. मुलांच्या कौतुकांत माणूस किती वाहून जातो याचा मला छान अनुभव आला त्या वेळीं !

पातळपुरास आम्ही गेलों. आमचा टांगा दारांत उभा राहिला तेव्हां तात्या घरींच होता; पण त्यानें मुका नमस्कार करण्यापेक्षां आतिथ्याचें कसलेंच चिन्ह प्रकट केलें नाहीं. मालीनें आणि नमूनें आम्हां उभयतांना वाकून नमस्कार केले. आम्हीं त्यांना आशीर्वाद दिले. ती अंतर्गृहांत गेली, मी सोप्यावर बसलों. तात्या जवळ बसला थोडा वेळ, पण कांहींतरी आठवल्यासारखें करून उठून गेला. पण तो 'कांहीं जरुरीचें काम आहे' असें सांगून घराबाहेर गेला होता! या त्याच्या बेपर्वाईमुळें उगीच आलों असें मला वाटलें. पण थोड्याच वेळांत चहा-फराळाचें घेऊन नमू आणि तिच्यामागून दिनूला घेऊन माली माझ्यापुढें हजर झाली. तीहि आईना घेऊन आली. अनोळखी पुरुषमाणसापुढें येण्याचा त्या जुन्या वळणाच्या बाईस संकोच वाटला थोडा; पण पोरींच्या आग्रहापुढें तिचें तरी काय चालणार ?

चहा पितांना आमचें किती किती बोलणें झालें ! किंवा आम्हीं खूपखूप एकलें असें म्हणणेंच बरोबर होईल. कारण बोलण्याची बाजू नमूनेंच पतकरली होती. एखादा प्रश्न विचारायचें काम तिनें पतकरलें होतें आणि आम्ही बाकीची मंडळी नुसतें हसण्याचें काम करीत होतों. मालूताईनें

आपल्याला वाचायला कसें शिकविलें, तिच्या शिकवणीप्रमाणें आपण लोंकरीचा स्वेटर कसा विणला, द्रिष्ट काढायला लागलें म्हणजे दिनुबाळ कसा खदखदून हंसायला लागतो, रांगत फरफटत तो कसा घरभर वावरत असतो, परवां तो जिन्याच्या तीन पायऱ्या कसा चढून गेला, आणि मांजराची शेपटी ओढल्यामुळें त्या मेल्यानें बाळाला कसें ओचकारलें इत्यादि किती गोष्टी नमूनें सांगितल्या तें लक्षांत राहणें कठीणच झालें. 'पाणी तापवायला गरम झरा घेतलाय, कपडे ठेवायला आरशाचं कपाट घेतलंय' येथपासून प्रारंभ करून दिनुबाळासाठीं घेतलेल्या घागऱ्या लावलेल्या खुळखुळ्यापर्यंतचा सर्व वस्तुसंग्रह तिनें आम्हांला ऐकविला. परसांत एक किरडूं निघालें तर मालूताई किती घाबरली आणि आपण तें काठीच्या एकाच रपाट्यांत कसें मारून टाकलें इत्यादि गोष्टीहि आम्हांला ऐकायला मिळाल्या. नमूचा हा गोष्टीवेल्हाळपणा आम्हांला चमत्कारिक वाटेल या शंकेमुळेंच कीं काय, माली तिला म्हणाली—

"ताई नि दादा चार दिवस राहणार आहेत नमूताई. तुझा सगळा सांठा संपवूं नकोस एकाच बैठकींत. उद्यांला राहूं देत कीं कांहीं गोष्टी!"

नमू या सूचनेवर मनमोकळेपणानें हंसली. तिचें बोलणेंहि थंडावलें. पण किती वेळ? माझ्या कपांत आणखी थोडा चहा घालीपर्यंतच. पुनः तिचें कथन चालू झालें. आतां आपण कोणकोणतीं वर्तमानपत्रें नि मासिकें घेतों इथून सुरू झालेला विषय स्त्री मासिकांतल्या स्वयंपाकाच्या पानावर आला, आणि आतां त्यांतला खिमा नि बिर्याणी बाहेर पडणार इतक्यांत—

'मेलें कि रे म्हारा!' असें म्हणून मालीनें मुलाच्या पाठींत एक धपाटा घातला, आणि मग त्यानें फोडलेली किंचाळीहि कानांवर आली.

गाळणें नि किटली नमूच्या हातांतून निसटलीं आणि चहा चहूंकडे हिंदकळला पण तिचें तिकडे अवधान राहिलें नाहीं. ताडकन उठून तिनें मालीच्या हातून दिनूला ओढून घेतलें व त्याला छातीशीं धरून 'उगा हं! उगा हं!' करीत मालीकडे क्रोधकटाक्ष फेकीत म्हटलें, "तुमचं हें सदाचंच आहे नाहीं तरी. खेळतां खेळतां बोट चावलं तर इतकं धपकायला कशाला हवं? इश्श!"

माली दिनूची आई, पण त्याचा कळवळा नमूला! मला तें दृश्य अत्यंत हृदयंगम वाटलें. सापत्नभाव म्हणून आपण ज्याचा तिटकारा करतों, त्या

सापत्नभावांतच द्वेषाच्या ज्वाळाऐवजीं प्रीतीच्या फुलवेली दिसाव्यात, ही गोष्ट विस्मयजनक आणि आल्हादकारक कां होऊं नये ? नमूच्या वृत्तींतून ओथंबणारें तें वात्सल्य पाहून मला वाटलें कीं स्त्री ही माता म्हणून निर्माण झाली आहे आणि तिच्या अंतर्यामीं प्रेमाचे अमृतकुंभ भरलेले आहेत. दुसऱ्याचें असलें तरी लेकरूं दिसतांच तिचें हृदय उचंबळून आलें पाहिजे, येतेंहि. पण मत्सर-वैमनस्याच्या आहारीं गेलेल्या कांहीं हतभागिनी या आनंदास आंचवतात. निरपराध लेकराशीं वैर धरून त्याच्याबरोबर आपणहि दुःखी होतात ! नमू तशी हतभागिनी नाहीं. ती प्रेममूर्ति आहे. आनंद भोगण्यासाठीं, आनंद वाढविण्यासाठीं तिचा अवतार आहे आणि नशीब मालीचें, म्हणून अशी दुर्मिळ सहभागिनी तिला लाभली आहे.

एखादें गोजिरवाणें रानपाखरूं चिवचिंव करीत या झाडावरून त्या झाडावर उडत बागडत असावें असें आम्हांस नमूकडे पाहून वाटलें. आनंद आणि हौस यांचा प्रीति-संगम तिच्या हरएक शब्दांत, हरएक हालचालींत दिसून येई. तात्याविषयीं चकारशब्दहि तिच्या बोलण्यांत निघायचा नाहीं! बायकांच्या सुखाला नवरा हा अनावश्यक प्राणी आहे असेंच तिच्या वर्तनांतून दिसे. तिला पति असला तरी पतिसुख नाहीं, ही गोष्ट कुणालाहि कळण्यासारखी होती. तरी पण नमूची चर्या कधीं कष्टी, उदासीन झाल्याचें मला दिसलें नाहीं. तिनें आपल्या मनांतल्या वेदना मारून टाकल्या असल्या तरी आम्हा इतरेजनांना तिच्याबद्दल उद्वेग वाटेच वाटे. सहज बोलतां बोलतां तिनें मला म्हटलें, " आपण आगींत होरपळून दुसऱ्याला सांवली द्यायची हें छान साधलंय पोरीला. पण मला राग येतो त्या देवाचा. दुसऱ्याला सुखी करणाऱ्याला तो दुःखाचे चटके देतो, ते कां ? "

चार दिवस आनंदांत घालवून आम्हीं परत फिरण्याचा बेत करूं लागलों. त्या मुक्कामांत भानुदास भालेरावांचा परिचय वृद्धिंगत करण्याची संधि मला मिळाली. त्यांनीं नमूच्या आणि तिच्या आईच्या कांहीं योजनाहि मला कळवल्या. काशाक्कांचा जीव आपल्या एकुलत्या एक, आणि त्यांत अधम वृत्तीच्या माणसाच्या तावडींत सांपडलेल्या लेकीकडे ओढावा हें साहजिकच होतें. आपल्या सर्वस्वाचा, फार काय आपल्या प्राणाचा मोबदला द्यावा

लागला तरी हरकत नाहीं, पण आपली लेक सुखांत रहावी एवढीच त्या माउलीची तळमळ होती.

पण नमूला आतां आईच्या संपन्नतेचें छत्र नकोसें वाटत होतें. तिनें एखादा चांगलासा मुलगा निवडून त्याला दत्तक घ्यावें आणि आपल्या वडिलांचें घर पुढें चालवावें असा हट्ट तिनें आईपाशीं व मामांपाशीं धरला होता यांत तिची पितृकुलावरील भक्ति उत्कट आहे, कीं तिची निःस्वार्थी वृत्तीच तीव्र आहे हें कोणी सांगायचें ? मला तर तिच्या ठिकाणीं हे दोनहि गुण दिसत होते व तिच्या मनाच्या श्रीमंतीचें मला कौतुक वाटत होतें. पण पुरुषापेक्षां बायका अधिक चिकित्सक असतात. मीं वरील हकीगत तिला सांगितली तेव्हां ती म्हणाली,

"असं करण्यांत तात्याला चांगलं तोंडघशीं पाडायचा नमीचा बेत दिसतोय मला. आपल्या आईच्या डबोल्यावर नजर ठेवून तात्यानं आपल्याशीं लग्न केलंय, हें ती चाणाक्ष पोरटी ओळखल्याशिवाय का राहील ? पण अशा माणसाचे— मग प्रत्यक्ष नवरा का असेना तो— त्याचे डाव त्याच्यावर उलटविण्याची ईर्षाहि तिला वाटणारच."

तिचें हें विधान अगदीं पोंचट आहे असें मला म्हणवेना.

नमू-मालीचें गोड प्रेम पुनः पुन्हा आठवीत आम्ही आपलें मन रंजवूं लागलों. काशाकांनीं मुलगा निवडला असून दत्तक-विधानाचा विधि महिन्या-दोन महिन्यांत होणार असल्याचें भानुदासांकडून कळलें. आपल्या सासूला दत्तक घ्यायला सांगण्यांत भानुदासांइतकाच मीहि दोषी आहे असा तात्याचा समज असून, तो आम्हां दोघांस शिव्याशाप मोजतो आहे असेंहि त्यांनीं लिहिलें. पण मला त्याचें कांहींच वाटलें नाहीं. 'तुझ्या आईला दत्तक घेऊं देऊं नको, तिनं दत्तक घेतला तर मी तुला घराबाहेर काढीन' अशा धमक्या त्यानें नमूला देऊन पाहिल्या, पण ती त्यांना भीक घालण्याइतकी थोडीच लेचीपेची होती ! आपल्या एक शब्दाला तिचे दोन शब्द परत येतात हें दिसतांच तात्यानें तिचा नाद सोडला आणि तो मालीच्या राशीला लागला. मालीनें नमूचें मन वळवावें आणि नमूनें आपली वडिलार्जित शेतीभाती नि साव-सावकारी दत्तकाच्या घशांत जाऊं देऊं नये असा लकडा लावून, 'तूं हें केलं नाहींस तर तुझा तरी जीव घेईन, नाहींतर मी तरी अफू खाईन' अशी

धमकीहि त्यानें दिली. पण माली आतां अशा छळवादास सरावलेली होती आणि तात्यानें कांहीं केलें तरी नमू आपल्यास सावरून धरील असा विश्वास तिला वाटत होता.

मालीला छळूनहि कार्यभाग होण्याची आशा दिसेना तेव्हां कायद्याची तरी मदत मिळाल्यास पाहावी म्हणून तात्याची स्वारी वकिलाकडे धावली. वकिलांनीं त्याला ‘या बाबतींत कांहींहि करतां येणार नाहीं’ असें सांगितलें. अपयशाच्या मनस्तापाबरोबर फीसाठीं झालेल्या द्रव्यहानीच्या वेदनाहि तात्याच्या नशिबीं आल्या !

तात्याला होत असलेला त्रास कळल्यावर सहानुभूतीऐवजीं मला समाधानच वाटलें होतें.

आपल्या सासूबाईवर तात्यानें शेवटीं निर्वाणीचें अस्त्र सोडलें. त्यांनीं दत्तक तर घ्यायचा नाहींच, पण आपल्या एकुण एक जिंदगीचें बक्षिसपत्र आठ दिवसांच्या आंत आपल्या नांवें करून दिलें पाहिजे; तसें न दिल्यास आपण त्यांच्या दारांत बसून प्राणान्तिक अन्नसत्याग्रह करूं असें त्यानें म्हातारीस पत्र लिहिलें.

पण तात्याचें तें अघोर तपाचरण पाहायला म्हातारी जिवन्त कुठें होती ? जांवयाच्या दंशानें विव्हल होण्याऐवजीं सर्पदंशानें तिचा अंत झाला होता ! ज्या दिवशीं तात्याचें पत्र टपालांत पडलें त्याच दिवशीं !

दुसरें दिवशीं दुपारीं एका ग्रामस्थानें येऊन आईच्या निधनाची वार्ता नमूस सांगितली. स्वतःच्या मनोभंगास तुच्छतेनें हसणारी, अमानुष नवऱ्याला बाणेदारपणानें ठणकावणारी, आणि सवतीच्या ठिकाणीं भगिनीचें मनोहारी नातें निर्माण करणारी नमू त्या मातृहानीनें अगदीं विकल होऊन गेली. जिनें आपली वैधव्यव्यथा आंतल्या आंत दडपून कायावाचामनानें आपलें जीवन आनंदमय करण्याचा प्रयत्न केला, त्या आईला आपल्या मनोव्यथांनीं कष्टी करूं नये या जाणिवेनेंच अंतर्याम पेटलें असून नमू मुद्रेवरची प्रसन्नता ढळूं देत नव्हती. मला एक आई आणि आईला एकटी मी असें नमूला वाटत असलें पाहिजे. मायलेकींची ती जोडी फुटून ‘आतां मी एकटी राहिलें, निराधार झालें’ या जाणिवेनें तिच्या अंतःकरणाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडून गेल्या. नमूची सदैव हंसरी नाचरी वृत्ति पाहून ती उपजल्याबरोबर

तरी रडली असेल का असें वाटायचें. प्राणिसृष्टीपासून माणसाला वेगळें काढण्यासाठीं निसर्गानें त्याला हंसण्याची कला दिली आणि ती कला नमूनें सगळीच्या सगळी उपटून आणली, त्यामुळेंच तिच्या जोडीदाराला — तात्याला—रडवा चेहरा करून बसायची पाळी आली असा कोटिक्रमहि तिनें एकदां माझ्यापाशीं केला होता. पण तीच नमू मातृनिधनाच्या दैवी आघाता-सरशीं धाय मोकलून रडूं लागली. कोण सान्त्वन करणार तिचें ? येऊन जाऊन माली. पण तिचें तरी मन कुठें होतें ठिकाणावर ? काशाक्काबद्दल मालीलाहि नमूइतकेंच प्रेम वाटूं लागलें होतें. जें आठ-पंधरा दिवसांचें सान्निध्य त्यांना लाधलें होतें, तेवढ्यांत म्हातारीनें तिच्यावर ममतेचा नुसता वर्षाव केला होता. आणि पोरपणीं मेलेली आई थोरपणीं नवा अवतार घेऊन आली अशी धन्यता मालीलाहि वाटत होती. म्हणून जितक्या विक-लतेनें नमू टाहो फोडीत होती, तितक्याच विकलतेनें तिला पोटाशीं धरून मालीहि अश्रु गाळीत होती.

तात्या रोजच्यासारखा घरीं आला. त्याला झाला प्रकार कळला. त्या शोक-विव्हल मुलींचें सान्त्वन करण्याइतकी माणुसकी तात्याच्या ठिकाणीं नव्हती. आणि ती घटना त्याच्या आनंदाचीच असल्यानें तिच्याबद्दल दुसऱ्यांना झालेला शोक त्याला मूर्खपणाचाहि वाटला असेल. त्यानें बायकांना ' आतां पुरें करा. आरडाओरडीनं म्हातारी कांहीं परत नाहीं येत ' असें दरडावलें आणि पुन: कोट-टोपी चढवून तो घराबाहेर पडला. मुक्ताबाईकडे निर्वेधपणें जायला त्याला आज छान संधि मिळाली होती.

दत्तकाचें गंडांतर टळलें म्हणून तात्याला आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. लोकांना अविश्वास वाटूं नये म्हणून तात्यानें म्हातारीचें क्रिया-कर्मान्तर यथासांग आणि सढळ हातानें केलें. म्हातारीच्या जिंदगीचा वारसा आतां साहजिकच नमूकडे आला होता व 'घरांतील सगळी चीजवस्त गोळा करून पाताळपुरला नेऊं म्हणजे फुकट वाताहात होणार नाहीं, ' अशी व्यवहारदक्ष सूचनाहि तात्यानें नमूला केली. पण नमूनें ती मनावर घेतली नाहीं. भानुदासमामांच्या मदतीनें आणि सल्ल्यानें तिनें घराची, कागद-

पत्रांची आवराआवर केली, जमीनजुमल्याच्या कर्त्यांनाहि अवश्य त्या सूचना दिल्या.

या सान्या व्यवस्थेत तात्याचें बोट कुठेंच शिरकेना. त्यानें होऊन कांहीं लुडबूड केली तर नमू त्यास तिथल्या तिथें चूप बसवी. तात्याला सासुरवाडीहून हात हलवीतच परत यावें लागलें.

नमूला आंजारून गोंजारून तरी साधतें का हें तात्यानें पाहिलें. पण तरीहि त्याची डाळ शिजेना. उलट 'या शेताचा खंड मी अमक्याला देऊन टाकणार, त्या मळ्याच्या फाळ्यांतून मी शाळा बांधून देणार,' असे नमूचे बेत तात्याच्या कानांवर आदळूं लागले, आणि नमू ही बोलल्याप्रमाणें करणारी मुलगी असल्यानें तर घरीं आलेली लक्ष्मी पळ काढणार या भयानें तात्याच्या हृदयाच्या ठिकऱ्या उडूं लागल्या.

पातळपुरला परत आल्यावर नमूला ताप आला. आईच्या मृत्यूमुळें मनाला बसलेला धक्का आणि मालमत्तेच्या आवराआवरीची यातायात यामुळेंच तिचें अंग मोडून आलें. पण आजच्याहून उद्यां आणि उद्यांपेक्षां परवां असा तिचा ताप वाढत चालला. पांचसहा दिवसांनीं तर तिच्या डोळ्यांवर झापड आल्यासारखें वाटूं लागलें व ती एखादा शब्द विचूक बोलतें असेंहि दिसलें. मग मात्र माली घाबरली. आपण देत असलेल्या सुंठ-दालचिनीच्या काढ्यानें आवरणारें हें दुखणें नव्हे हें तिनें ओळखलें आणि भानुमामांना बोलवून आणण्याची तिनें तात्याला सूचना केली. डॉक्टर वगैरे बोलावण्याचें औदार्य तात्याच्या ठिकाणीं नाहीं आणि भानुमामाच जरूर ती उपाययोजना करतील अशी मालीची समजूत असल्यामुळें तिनें ही सूचना केली होती. पण या सूचनेसरशीं तात्या चिडून म्हणाला, 'काय काम आहे त्या चोराचं इथं ! मी कांहीं मेलों नाहीं अजून.'

माली गप्प बसली, नवग्रहाचें स्तोत्र म्हणून अंगारा लावणें, शिवलीलामृताचा अकरावा अध्याय वाचणें आणि मारुतीला दर शनिवारीं एकशेंआठ प्रदक्षिणा घालण्याचा नवस मागून घेणें हे स्वाधीनचे उपाय तेवढे ती करीत होती.

नमूच्या रोग निवारणार्थ तात्या कमालीची आस्था दाखवीत आहे असें मालीला दिसून आलें. तिला नवल वाटलें आणि आनंदहि वाटला. सकाळीं

कोणा डॉक्टरना बोलाव, तर दुपारीं एखादा वैद्य घेऊन ये असें त्याचें चाललें होतें. डॉक्टरनीं इंजेक्शनें दिलीं पाहिजेत म्हणतांच तात्यानें तीं देण्याबद्दल दहाची नोट डॉक्टरच्या हातीं दिली. वैद्यांनीं भस्मगुटिका देतों म्हणतांच तात्यानें दुसरी नोट त्यांच्या हातीं ठेवली. चार दिवसांत तीन डॉक्टर व दोन वैद्य आले व तात्यानें साठ-पाऊणशें रुपये त्यांना वाटले हें पाहून माली चकित होऊन गेली.

तेरावे दिवशीं नमूचा ताप जास्तच वाढला व तिची शुद्धि उडून गेली. माली भीतीनें चूर झाली. त्याच रात्रीं मुक्ताबाईची स्वारी आली. 'रोज जाग्रणं करून तूं आजारी पडशील आणखी. म्हणून सोडवणूक म्हणून यांना बोलवलंय मी. आज तूं निवान्तपणं झोप' असे तात्याचे कनवाळु शब्द ऐकतांच मालीचें पोट भरून आल्यासारखें झालें. पण मुक्ताबाईसारखी बाई आपल्या घरीं वस्तीला यावी ही गोष्ट तिला भीतिप्रद वाटली.

"लोकाला कशाला त्रास? मला नाहीं कांहीं वाटत जागायचं" असें माली म्हणाली, पण तात्यानें दरडावलें—

"सांगतो तें ऐक मुकाट्यानं.आज या खोलीकडे फिरकायचं नाहींस तूं."

मन नमूकडे आणि देह दुसरीकडे अशा स्थितींत परस्वाधीन माली तळमळत पडली होती. मध्यरात्रीनंतर थोड्या वेळानें 'गेली हो आम्हांला सोडून' असा तात्याचा आक्रोश तिच्या कानांवर आला आणि ती दचकून उठून नमूच्या खोलीकडे धावली.

नमू खरोखरच मेली होती. आणि तात्या गळा काढून रडत असून मुक्ताबाई त्याचें सान्त्वन करीत होती!

मालीनें नमूच्या अंगावर घालून घेतलें आणि शेजारपाजाऱ्यांना तिच्याबरोबर तात्यालाहि बाजूस सारून नमूचा जड देह उचलावा लागला.

"माझी नमू मेली कीं मारली हो!" अशी मालीची आरोळी ऐकून एक शेजारी डॉक्टर-तपासणीची भाषा बोलूं लागले. पण इतरांनीं शोक-भरांत उच्चारलेल्या शब्दांचा अक्षरशः अर्थ घ्यायचा नसतो असें त्यांचें समाधान केलें.

नमूच्या निधनाची ही सारी हकीगत भानुदासांनीं मला कळविली आणि शेवटीं म्हटलें—

' नमू आम्हींच कृतान्ताच्या हातीं दिली नाहीं का ? '

चारच दिवसांनीं तिला तात्याचें पत्र आलें. त्यानें लिहिलें होतें—

" बासनगांवच्या इस्टेटीची किंमत गेला बाजार चाळीस हजारांची भरेल. देव देणार झाला म्हणजे दादामामांचें कांहीं चालत नाहीं, नाहीं का ? "

# मालीचें आत्मनिवेदन

मालीच्या अभागी आयुष्यावर काव्य लिहिण्याची एखाद्या कवीस इच्छा झाली, तर तो त्याला अवसेच्या रात्रीची उपमा देईल. आणि तात्याच्या दुष्कृत्याचे कृष्णमेघ भरतीस घालून तो आपल्या उपमेची भेसूरता वृद्धिंगत करील. त्या कवीची ही उपमा अगदीं यथायोग्य नाहीं असें कोण म्हणूं शकेल ?

मालीच्या अंधकारमय जीवनांत तेजाची थोडीशी चमक दाखवणारी आणि सुखाची आशा उत्पन्न करणारी एक चांदणी नमूच्या रूपानें दिसली; पण जशी अवचित दिसली, तशीच ती अवचितपणें दिसेनाशी झाली. संपूर्ण निराशा दुःसह असली, तरी तिला तोंड देण्याचें धैर्य व सामर्थ्य सरावानें माणसाला येतें. पण आशाकिरण दिसूं लागून तो लुप्त झाल्यावर त्याचा सगळा खंबीरपणा कोसळून पडतो आणि त्याची अवस्था मोठी केविलवाणी होऊन जाते.

नमूच्या निधनानें मालीच्या अंत:करणावर असाच जोरकस आघात केला ! तात्याबरोबर दिवस काढण्यांत सुखाची आशाच नाहीं हें कठोर सत्य त्या पोरीला केव्हांच समजून चुकलें होतें आणि नशिबीं येईल त्याला तोंड देण्याची तिच्या मनाची तयारीहि झाली होती. अशा स्थितींतच तिच्या जीवनांत नमूचा प्रवेश झाला. तिची भूमिका वास्तविक वैरिणीची; पण कांहीं गोष्टींत नागसापाचा रत्नहार झाल्याचा अद्भूत चमत्कार सांगतात, त्याचा प्रत्यक्ष अनुभव मालीला

नमूच्या बाबतींत आला. वैरीण खरी, पण ती मालीची जिवाभावाची मैत्रीण ठरली. मैत्रिणसुद्धां थोडी दूरची होईल. नमू बहीण झाली मालीची. वयानें आणि नात्यानेंहि लहान म्हणून ती मालीच्या अर्ध्या वचनांत राही. पण तात्याच्या छळापासून तिचा बचाव करण्यासाठीं वडील बहिणीसारखी तिची काळजीहि घेई. आपल्या सुखासाठीं नमू करीत असलेली जिवाचा आटापिटा पाहून मालीचा ऊर भरून येई. पण तिला मोठ्यांत मोठें समाधान वाटे तें नमूच्या दिनूवरील प्रेमाचें. अनोळखी माणसाला तर नमूच दिनूची आई वाटे. निरुपाय म्हणून स्तनपानापुरता तो मालीच्या वांट्यास येई. दिनूच्या बाकीच्या सगळ्या संगोपनाची जोखीम नमूनें स्वखुषीनें स्वीकारली होती.

" मालीनं आतांपावतर सोसलेल्या हालअपेष्टांची देवाला कींव आली आणि म्हणूनच तिला ही नमू लाभली " असें मागें केव्हां तरी ती म्हणाली होती व त्या वेळीं मीं तें मुकाट्यानें ऐकूनहि घेतलें होतें; पण आज मालीच्या संबंधांत कुणी देवाचें नांव काढलें तर तें मी मुळींसुद्धां ऐकून घेणार नाहीं. त्यांतल्या त्यांत देव दयाळू आहे व तो करतो तें कल्याणकारकच असतें असा श्रद्धाळू वेदान्त मला या वेळीं कोणी सांगितला तर त्याला नमू व मालीचीं उदाहरणें दाखवून मी विचारीन, ' सृष्टीच्या सुख–दुःखाची कारवाई जर तुझ्या देवाच्या अंगीं असेल आणि तुझा देव न्यायी व दयाळू असेल, तर या दोन अश्राप पोरींच्या जन्माची वाताहत तो कां करतो आहे ? तुझा देव निरपराध माणसांना छळण्याइतका दुष्ट असला तरी पाहिजे, नाहींतर सज्जनांना छळणाऱ्या दुष्टाहून दुर्बळ तरी असला पाहिजे. '

मालीचा विचारच आतां मनांत येऊं द्यायचा नाहीं असें आम्ही ठरवूं लागलों. पण ही गोष्ट वाटते तशी सोपी नाहीं याचा अनुभव आम्हांला येत होता. मालीच्या जन्माचे आणखी कोणकोणते धिंडवडे तात्या करणार हा प्रश्न, या ना त्या निमित्तानें आमच्या मनांत उत्पन्न होतच होता. एखादी चांगलीशी मुलगी नटूनसजून चाललेली दिसली तरी तिनें म्हणावें, ' माली असा थाट करील तर किती सुरेख दिसेल !' आणि यानंतर मालीच्या वांट्यास आलेल्या नष्टचर्याच्या कल्पनेनें तिच्या डोळ्यांतून अश्रु ठिबकावेत. आमच्या शेजारीं वसंतराव आणि वत्सला हें एक तरुण जोडपें राहायला आलें. वसंत-

राव शाळामास्तर असल्यानें त्यांची प्राप्ति बेतांचीच होती हें निराळें सांगायला नको. पण पतिपत्नीचें सुख पैशावर अवलंबून नसतें हें वसंत-वत्सला उत्तम प्रकारें पटवून देत असत. बघावें तेव्हां त्यांची चर्या आनंदानें फुललेली असायची. त्यांच्याकडे पाहतांच तिच्या तोंडून उद्गार निघायचे, ' मालीला असा नवरा मिळाला असता तर किती छान झालं असतं ! '

तात्याबद्दल आतां तिच्या मनांतहि फारसें अगत्य दिसेनासें झालें. आणि तिच्याकडून त्या अप्रिय विषयाचा प्रस्ताव होईनासा झाल्यामुळें माझ्या डोक्यास स्वस्थता मिळूं लागली. पण ही स्वस्थता फार काळ अनुभवण्याचें माझ्या नशिबीं नव्हतें. पातळपूरच्या कोर्टातील एका दाव्यांत साक्षीला जाण्याचा माझ्यावर प्रसंग आला. माझ्या ऑफिसांतील कांहीं कागदपत्रें हजर करावयाचीं होतीं आणि त्या कामासाठीं ऑफिसमधील दुसऱ्या कोणाची तरी नेमणूक करावी असें मीं सुचविलेंहि; पण तीं कागदपत्रें माझ्या हातचीं आणि माझ्याच कामाचीं असल्यामुळें वरिष्ठांनीं माझी सूचना मान्य केली नाहीं, आणि माझें पातळपूरला जाणें अपरिहार्य झालें.

मी तारखेदिवशीं पाताळपूरला गेलों व भानुदासांकडे उतरलों. तात्याचें दर्शनहि शक्य तों टाळावें हा माझा हेतु, पण पाऊस चुकवण्यासाठीं आडोश्याला जावें आणि तेथंच विंचू डसावा तशी माझी अवस्था झाली. मी भानुदासांच्या घरीं जाऊन कपडे उतरून हातपाय धुतों तोंच तात्याराव तेथें उपस्थित झाले ! मला पाहिल्यावर केव्हां आलां, कां आलां, आमचे-कडील सर्व ठीक आहे ना, इत्यादि चौकशी ते करतील, आपल्याकडे उतरा-यला येण्याऐवजीं भानुदासांकडे उतरल्याबद्दल ते आपली नापसंती दर्शवतील व उतरायला नाहीं तर नाहीं, पण चहाला तरी चलण्याचा आग्रह करतील असें मला वाटलें; पण माझ्या या साऱ्या कल्पना फोल ठरल्या. प्रथम-दर्शनाचा नुसता नमस्कार त्यांनीं केला आणि मला प्रश्न विचारला तो, ' भानुदास कुठें आहेत ' हा !

मला उत्तर देण्याचें कारण पडलें नाहीं. कारण भानुदासच आंतून सोप्या-वर आले व त्यांनीं तात्याला विचारलें, " का येणं केलं तात्यासाहेब ? "

" भांडीं मागायला आलोंय् मी. " तात्यानें सांगितलें.

" कसलीं भांडीं ? "

9623

" सासूबाईचं चांदीचं ताट, गडवा आणि वाट्या तुमच्याकडे आहेत."

" नाहींत."

" आहेत. तुमच्या हातचा लेख आहे तसा. तुम्हीं आपल्या मुलाच्या मुंजीच्या वेळीं काशाक्कांच्याकडून हीं भांडीं मागून आणलीं आहेत."

" आणलीं असलीं तर ज्या वेळच्या त्या वेळीं परत केलीं असतील; आतां माझ्याकडे तिचं कांहीं नाहीं."

" भांडीं पोंचल्याबद्दल त्यांची पावती आहे का ?"

" या बाबतींत तुम्हांला कांहीं सांगण्याची माझी इच्छा नाहीं."

" मला कोर्टकचेरीची पाळी तुम्ही विनाकारण कां आणतां ?"

" मी तुमच्यावर कसलीच पाळी आणीत नाहीं; त्रास देण्यासाठींसुद्धां तुमच्याशीं संबंध येऊं नये असं मला वाटतं. अधमाला अधम होऊन प्रायश्चित्त द्यावं असं व्यवहारी लोक म्हणतात. पण मला तितकं घट्ट मन नाहीं. तसं असतं तर नमूच्या खुनाच्या वेळींच मीं तुमचं पाप बाहेर काढलं असतं !"

हें बिंग फुटतांच तात्याचा चेहरा काळाठिक्कर पडला.

हा आरोप खोटा असता किंवा तो खरा असला तरी आपल्यावर शाबीद होण्याची शक्यता नाहीं अशी खात्री असती, तर भानुदासांवर अब्रुनुकसानीची फिर्याद ठोकण्याची धमकी तात्यानें दिली असती; पण पाप भित्रें असतें आणि मनुष्य कितीहि उफराट्या काळजाचा असला तरी आपल्या पापामुळें त्याला लाचार व्हावें लागतें हें तात्याच्या काळवंडलेल्या चर्येवरून स्पष्ट दिसत होतें !

त्याच वेळीं भानुदासांची मुलगी चहा घेऊन आली. भानुदासांनीं माझ्यापुढें कप ठेवला तसा तात्यापुढेंहि ठेवला. ऐकलेल्या एकंदर प्रकारावरून चहाची माझी तलफच मरून गेली होती. पण त्या स्थितींतहि तात्यानें आपला कप रिकामा केला !

तात्या मग मुकाट्यानें निघून गेला.

" पाजीपणाचा अर्क आहे नुसता !" तो गेल्यावर भानुदास उद्गारले.

" पण त्याची गय करून तुम्हीं त्याच्या पाजीपणाला प्रोत्साहनच दिलं नाहीं काय ? त्या वेळच्या त्या वेळींच—"

" होय. जेव्हांच्या तेव्हां प्रायश्चित्त दिलं असतं तर बरं झालं असतं असं आतां वाटतंय. पण आम्हांला माणसाचं मन दिलंय देवानं. दुष्टाला शासन करतांनाहि आम्हांला कळवळा येतो त्याचा. नमी मेली – नव्हे तिला मारली—अशी पक्की खात्रीपटूनसुद्धां तात्याला फासावर चढवण्याचं धैर्य मला झालं नाहीं. आपली पोर गेली ती गेली. दुसरे जीव घेऊन तरी ती परत मिळणार आहे थोडीच ? अशी मनाची समजूत घालून मी गप्प बसलों. शिवाय ' एकानं गाय मारली म्हणून दुसऱ्यानं वासरूं मारूं नये ' असा रडका उपदेश आमच्या रोमरोमांत लहानपणापासून भिनलेला. त्यामुळंहि आमचीं मनं दुष्टांना दंड करण्याइतकीं खंबीर राहिलेलीं नाहींत. आम्हांला यापुढं थोडा तरी कणखर वेदान्त शिकला पाहिजे. गाईसाठीं वासरूं मारायचं नाहीं हें ठीक आहे; पण गाय मारणाऱ्या वाघाला मारलंच पाहिजे. नाहीं मारलं तरच पाप, अशी शिकवण मिळत गेली पाहिजे लोकांना. आमच्या आतांपर्यंतच्या पिळपिळितपणामुळं गाई तेवढ्या मरायच्या तितक्या मरतात; आणि वाघ शिरसलामत राहून दुसऱ्या गाई खायला अधिकच बळकट होतात. "

तात्याची गय करण्यांत आपली एक प्रकारें चूक झाली असें भानुदासांना वाटूं लागलें होतें हें त्यांच्या वरील उद्‌गारांवरून मला कळून आलें. त्यांनीं भलत्याच ठिकाणीं दाखवलेल्या दयाबुद्धीला हंसण्याचें वा चिमटे घेण्याचें आतां मला अवघड वाटूं लागलें आणि भानुदासांना बरें वाटावें म्हणून मी म्हणालों—

" मरूं दे तो चांडाळ, कोळसा किती उगाळला तरी काळाच. दुसऱ्या गोष्टी बोला कांहीं तरी. तात्याची आठवण सुद्धां होऊं द्यायची नाहीं अशी तयारी केली पाहिजे आपण आपल्या मनाची. "

" अहो, पण तुमच्या या तयारीचा काय उपयोग होणार ? तुम्ही त्याला विसरायला बघतां आहां खरं, पण नव्या नव्या विक्रमांनीं तो तुम्हाला अविस्मरणीय होऊन बसतो आहे त्याची काय वाट ? "

" आणखी कसले दिवे लावलेत कीं काय या बहाद्दरानं ?"

" दिवे नाहींत पण कोलत्या लावून भाजून काढतोय भल्याभल्यांना. "

"म्हणजे केलंय तरी काय त्यानं ?" मीं अधीरतेनें विचारलें.

"सांगेन सावकाश सर्व कांहीं. असं घाईत नाहीं जमायचं तें." असें म्हणून भानुदासांनीं माझी उत्कंठा अधिकच वाढवली.

मी माझ्या कामांतून एक–दीडच्या सुमाराला मोकळा झालों. परत जायची गाडी संध्याकाळीं होती आणि त्या गाडीला तरी भानुदास मला सोडतील असा विश्वास नव्हता. मिळालेल्या या फुरसतीचा उपयोग कसा करायचा याचा मला विचार पडला होता. मालीला भेटावें म्हणून माझें मन ओढ घेत होतें, पण तिला भेटण्याची मला भीतिहि वाटत होती. नमूच्या आठवणी काढून ती शोक-विव्हल होईल, मला पाहतांच तिच्या अंतर्यामींच्या अनेकविध व्यथा ताज्या होऊन त्या तिच्या डोळ्यांवाटे बाहेर पडूं लागतील अशा शंकांनीं मी घाबरून गेलों होतों. माणूस मोठा धीट प्राणी आहे म्हणतात. निजलेल्या वाघाला दगड मारून डिवचावें व त्याची चाल अंगावर घेऊन नंतर त्याला जमीनदोस्त करावें, असले हिंमतवान या माणसांच्या जातींत पैदा होतात ! फणा उभारून फूत्कार करणाऱ्या कृतान्तरूप भुजंगाची मानगूट चिमटींत पकडून आपल्या धारिष्टानें जगाला चकित करण्याचें सामर्थ्यहि या माणसाच्या जातींतच आहे. पण जिचें दुःख हलकें करण्याची शक्ति आपल्या ठिकाणीं नाहीं अशा मालीसारख्या निरपराध मुलींच्या दुःखव्याकूळ चेहऱ्याकडे निश्चलतेनें पाहण्याइतकी धिटाई माणसाच्या हृदयांत असूं शकेल काय ! आपल्यावरून जग ओळखायचें झालें तर मी म्हणेन ' ही गोष्ट अशक्य आहे ! ' मालीच्या भेटीसाठींहि तात्याच्या बिऱ्हाडीं पाऊल घालायचें नाहीं असें मी घरांतून निघतांनाच ठरविलें होतें. आणि मी तिला न भेटतां परत गेलों असतों, तरी माझ्यावर दुसऱ्या कोणाचा आक्षेप येण्याचा संभव नव्हता. मी येऊनहि भेटलों नाहीं तर मालीला मात्र वाईट वाटेल आणि तात्यानें आपणांस प्रत्यक्ष पाहिलें असल्यानें मी येथें आल्याचें तिला समजल्यावांचून राहणार नाहीं ही गोष्ट उघड होती. पण बाहेरच्या गोष्टी तात्या आपल्या बायकोला सांगेलच असेंहि मला वाटत नव्हतें. हुकूम सोडण्यापुरता आणि शिव्या ऐकवण्यासाठींच बायकोशीं भाषा व्यवहार करायचा ही तात्याची आचारपद्धतीहि मला ठाऊक होती. म्हणून आपलें आगमन मालीला कळणार नाहीं आणि आपण न भेटतां

परत गेलेलेंहि तिला समजणार नाहीं अशी मनाची समजूत घालून मीं स्वस्थ बसायचें ठरविलें होतें.

पण जें मी टाळीत होतों, तेंच माझ्यापुढें दत्त म्हणून उभें राहिलें !

चहा घेऊन येणाऱ्या भानुदासांच्या मुलीमागून दुसरी एक स्त्री येतांना मला दिसली. स्त्रियांशीं सलगी करणें मला जमत नाहीं. त्या बाबतींतला माझा भिडस्तपणा आजच्या प्रागतिक मंडळींनीं हसण्यासारखाच ठरेल. माझ्या या स्वभावविशेषामुळें येणाऱ्या स्त्रीकडे मीं निरखून पाहिलें नाहीं. मुलीनें आणलेला चहाचा पेला घेत मीं म्हटलें, "भानुदास केव्हां येतात ग परत घरीं ?"

"येतील आणखी तासाभरानं." त्या मुलीनें उत्तर दिलें व हसून म्हणाली, "कंटाळा आला वाटतं एकटं बसून ? पण या आल्या आहेत तुम्हांला भेटायला. आतां जाईल वेळ बाबा येईपर्यंत."

मग मीं त्या स्त्रीकडे पाहिलें. माझा डोळ्यांवर विश्वास बसेना ! ती स्त्री म्हणजे माली होती ! तिचा तो अवतार पाहून माझ्या तोंडून उद्गार निघाले, "कोण ! माले, तूं का ही !"

मालीनें कांहींच उत्तर दिलें नाहीं. ती नुसती हसली आणि तिनें मला वाकून नमस्कार केला.

मुलीनें नमस्कार केल्यावर तिला तोंडभर आशीर्वाद देण्यांत वडील माणसांना केवढा आनंद वाटतो ? पण त्या वेळीं माझ्या तोंडून शब्दहि निघाला नाहीं ! विस्मय, विषाद, आणि भीति अशा विविध भावनांनीं माझें सगळें शब्दसामर्थ्य नष्ट झालें होतें. आणि कां होऊं नये ? माली मला प्रथम दिसली तेव्हां उमलत्या गुलाबकळीसारखा टवटवीतपणा मीं पाहिला होता आणि प्रथमदर्शनींच मालीचें तें गोजिरवाणें रूप माझ्या अंतःकरणावर इतकें पक्कें ठसून राहिलें होतें, कीं अन्य रूपांतली तिची मूर्ति माझ्या मनोमंदिरांत कधींहि येऊं शकत नव्हती ! तात्याच्या सान्निध्यांत तिच्या वांट्यास येणारे हालवनवास प्रखर होते आणि त्यामुळें तिच्यावर थोडी फार म्लानता आलीहि होती. परंतु त्या म्लानतेंत आतांच्याइतकी भेसुरता खचित नव्हती. आणि आठ-दहा महिन्यांमागें नमूबरोबर तिला पाहतांना तिच्या

चर्येवर पहिलें पाणी चमकल्याचाहि मला भास झाला होता. त्या वेळीं ती मला म्हणालीहि होती कीं, ' काटेरी रानांत सुद्धां जाईजाई फुलतातच नाहीं का ? ' तिच्या त्या उपमेंतली जुई तर जळूनच गेली होती आणि जाईची नुसती करप माझ्यापुढें उभी राहून मला भिववीत होती !

मालीच्या काळ्याभोर आणि विपुल केशसंभाराचा आंबाडा बांधतांना ' माले , माझीसुद्धां दृष्ट होईल बाई तुझ्या या केसांना ' असें तिनें कौतुकानें म्हटलेलें मीं कितीदा तरी ऐकलें होतें; पण आज तिचा बुचडा पोफळाहून अधिक मोठा दिसत नव्हता ! तिचे पाणीदार डोळे आज निस्तेज दिसत होते आणि त्यांच्याभोंवतीं काळीं–कुट्ट वलयें पसरलीं होतीं. तिची फिकट चर्या पाहून ती नुकतीच जिवावरच्या दुखण्यांतून उठली असावी असा समज झाला असता ! तिच्या हातांतल्या बांगड्या ओघळून पडतील अशा तिच्या हातांच्या काड्या झाल्या होत्या आणि याच वेगानें झिजत गेल्यास मालीचा जीवन-प्रकाश महिन्या दोन महिन्यांपेक्षां अधिक काळ टिकूं शकणार नाहीं अशी भीति वाटत होती !

" चहा निवून चाललाय ना दादा ! " मालीनें मला विचाराच्या त्या तंद्रींतून सावध केलें.

" चहा निवतो म्हणून काळजी करतेस ! पण जीवनदीप विझूं पाहतोय त्याची—" मी बोलून गेलों.

मालीनें माझ्या बोलण्याचा आशय ओळखला आणि ती पुनः मघां-सारखेंच हसली. किती भेसूर होतें तें तिचें हास्य ! आजवर मीं पाहिलेल्या तिच्या हास्यांत आणि आतांच्या या हास्यांत प्रेमगीत आणि शोकगीत इतकें अंतर होतें.

" तुमचा आशीर्वाद खरा होईल का हो दादा ! " मालीनें हताश स्वरांत विचारलें.

" माझा कसला आशीर्वाद म्हणती आहेस तूं ? " मीं विचारलें.

" जीवनाचा दिवा विझायचा—आत्तां म्हणालात तोच. "

मी चपापलों ! काय बोलून गेलों मी ! मला पश्चात्ताप वाटूं लागला. मालीच्या मनांत आणखी कितीतरी बोलायचें आहे, पण भावनांच्या खळ-बळीमुळें तिची वाचाशक्ति दुर्बल झाली आहे हें मला स्पष्ट दिसत होतें. तिच्या

त्या मनोवेदना मला माझ्या अंतर्यामीच्या वेदनांहून अधिक दुःसह झाल्या आणि तिचें सान्त्वन करण्यासाठीं मी तिचा हात हातांत धरून शेजारच्या खुर्चीवर बसवीत म्हटलें—

" दिनूला नाहीं ग आणलास ? झोपलाय होय ? "

आग विझविण्यासाठीं पाणी म्हणून ओतावें आणि तेंच पेट्रोल ठरून भडका उडावा तसें माझ्या त्या विषयान्तरानें झालें. दिनूच्या नामोच्चारासरशीं मालीमधली 'आई' जागृत झाली आणि तिची वंचना दुःसह होऊन तिनें हंबरडा फोडला—

" दादा, दिनूबाळ आतां माझा नाहीं हो राहिला." स्त्री सगळे आघात सहन करील; पण अपत्यहानीच्या नुसत्या कल्पनेनेंहि तिच्या हृदयाचा चक्काचूर होऊन जाईल. याच आघातानें माली विव्हल होऊन गेली होती व तिचें दुःख आवरून तिला शांत करायला मला बरेच प्रयास पडले.

दुःखावेग कह्यांत आल्यावर मालीला मी एकेक प्रश्न विचारूं लागलों. तेव्हां ती म्हणाली—

" दादा, आतां मला तुम्हीं प्रश्न विचारूं नका. तुमचा एकेक प्रश्न ऐकला कीं माझ्या अंतर्यामीं पेटलेल्या आगीवर एकेक फुंकर घातल्यागत होतं. त्यापेक्षां मीच तुम्हाला सारं कांहीं सांगतें. माझ्या मनांत तुंबून राहिलेलं दुःख मोकळं करण्यानं मला थोडं हायसं वाटेल खरं, पण तें ऐकल्यावर तुमच्या हृदयाला वेदना होतील हेंहि मला कळतं, आणि म्हणूनच तुम्हांला कांहीं सांगायचं नाहीं असा बेत करून मी आलें होतें.

" दादा, तुम्ही नि वैनी माझ्यावर माया काय म्हणून हो करतां ? बाकी सगळीं करताहेत तसा माझा तिटकारा आणि छळ तुम्हींहि केला असतात तर किती छान झालं असतं ! मग तुम्हांला माझ्या कर्मांची कहाणी सांगण्याचा प्रसंग माझ्यावर ओढवला नसता; आणि तुमच्या प्रेमळ मनाला दुःखाचे चटके देण्याचं पाप माझ्या नशीबीं आलं नसतं. दादा, मायेचीं माणसं माणसाला मिळावीं म्हणतात, पण मला वाटतं, तीं दैववानालाच मिळावीं. माझ्यासारख्या जन्मोजन्मींचीं पापं फेडायला आलेल्या बयेला मायेचं माणूस मुळीं सुद्धां असतां कामा नये. कारण आपल्या दुःखानं त्यालाहि दुःखी

करण्याचं नवं पाप तिला करावं लागतं. मग सांगूंच का तुम्हांला माझी या वर्षांतली कर्मकहाणी ?

"हा कसला हो दादा तुमचा आग्रह ? माझ्यासाठीं तुमचा जीव ओढतो आणि माझ्या सुखासाठीं तुम्हां दोघांच्या अंतर्यामीं तळमळ लागून राहिली आहे हें मला कळतं. माझी चाललेली दुर्दशा समजावून घेऊन माझ्या सुटकेची कांहींतरी तोड काढावी या उद्देशानंच तुम्ही मला हा आग्रह करतांहां हेंहि मीं ओळखलं आहे. पण दादा हा तुमचा उद्देश कधींच सफल होणार नाहीं. मला पकडून ठेवणारा चिमटा असा लिटपिटका नाहीं, कीं तुमच्यासारखा एखादा माणूस त्याची पकड ढिली करील आणि माझी मुक्तता करील. दादा राक्षसी पंजांत तुमची माली सापडलेली आहे.

"नमू नशिबाची म्हणून ती या पंजांतून निसटली. तिच्याबरोबरच माझ्या सगळ्या आशा–आकांक्षाहि जळून खाक झाल्या. नमू कशी मेली हें मला सांगतां यायचं नाहीं दादा. अजूनसुद्धां माझ्या कुंकवाचा देव टिकवून धरण्याचा लोभ मला आहेच. आणखी दादा, मी दिनूची आई झालेय आतां. आपले वडील गुन्हेगार होते हा कलंक त्याला दुःसह होईल. हा त्याचा पुढला ताप वांचवण्यासाठीं मला सारीं पापं छपवून ठेवलींच पाहिजेत.

"दादा, नमू—माझी बहीण ज्या दिवशीं गेली, त्याच दिवशीं एक दावेदारीण माझ्या घरांत घुसली आहे. ऐकलं असेलच तुम्हीं तिचं ? होय, तीच मुक्ताबाई माझ्या यजमानांची देह आणि गृहस्वामिनी झाली आहे. कुरूपताहि सुरूपतेवर विजय मिळवते आणि वडील बायकोहि लहान पुरुषाला भुरळ पाडते, या गोष्टीवर सहजासहजीं विश्वास नाहीं बसायचा कुणाचा. तुम्हीसुद्धां म्हणाल एखाद वेळ मी मत्सरामुळं मुक्ताबाईवर भलताच आळ घेतें म्हणून. म्हणा म्हणायचं असलं तर.

"लोकांत सांगायला यांचं नि मुक्ताबाईचं नातं बंधुभगिनीचं आहे. मठबंधु आणि मठभगिनी आहेत तीं. आणि कांहीं शंकेखोर सोडल्यास भोळ्या लोकांना हेंच नातं खरं वाटतं. माझ्या दिनूचे वडील प्रेम करण्याइतके रसिक नाहींत हें मीं काय सांगायला हवंय तुम्हांला दादा ? पण

मुक्ताबाईसारख्या सवाई वडील बाईवर ते पूर्ण फिदा झालेत खरं! मग याला तुम्ही रसिकता म्हणा, कीं आणखी कांहीं म्हणा!"

"मी कशालाच कांहीं म्हणत नाहीं आणि माले, तात्याचे पराक्रम अधिक ऐकण्याची माझी इच्छाहि नाहीं. आतां मी तुलाच एक गोष्ट सांगणार आहे. तूं हें घर सोड आणि चल माझ्याबरोबर— या नरकवासांत कां खितपत पडतेस?"

माली पुनः एकदां तेंच उदासवाणें हास्य हसली. मी पुढें म्हणालों—

"कां हसलीस? खुळेपणाचा वाटतो तुला माझा विचार?"

"दादा, तुम्हांला माझ्याहून कायदा अधिक कळत असेल. आपल्या हिंदुस्थानांत म्हणे बायको ही नवऱ्याची मत्ता आहे. त्याला ती हवी आहे तोंपर्यंत तिला तो आपल्या मुठींतून सोडणार नाही."

"पण तात्याला तूं कुठं हवी आहेस? उलट, तूं स्वखुषीनं गेलीस तर संतोष वाटेल त्याला त्याच्या स्वैरविहारांतला एक अडथळा दूर झाला म्हणून. आणि खऱ्या आनंदाची गोष्ट म्हणजे त्याचा खर्च वांचला."

"साहजिक आहे तुम्हांला असं वाटणं. पण एकांगी विचार होतोय हा तुमचा. सरळ चालीला व्यत्यय येतो म्हणून काट्यांचा तिटकारा येईल आणि ते काढून टाकवेसे वाटतीलहि. पण काट्यांचा दुसरा उपयोगहि असतो दादा; आणि त्यासाठीं ते जतन करून ठेवावेहि लागतात. छानदारसं कुंपण होतं काट्यांचं आणि त्याच्याआड आपलं रान सुरक्षित राखतां येतं. मी या कुंपणासारखी उपयोगी पडतेय यांना, म्हणून यांना हवी आहे. लग्नाची आणि लेकुरवाळी बायको घरीं नांदत असतांना तिच्यादेखत तिचा नवरा दुसऱ्या बाईशीं भलतासलता संबंध ठेवूं शकणार नाहीं अशी सामान्य माणसांची समजूत असते, निदान मुक्ताबाईला तशी घालतां येते. यासाठीं माझ्याशीं तिचा कसलाहि हेवादावा नाहीं, मी जणूं काय तिची पाठची बहीणच, आणि माझा संसार अगदीं आनंदांत चाललाय असा थाट तिला दाखवावा लागतो. मला जेवायला काय मिळतं हें विचारूं नका आणि तें कुणी विचारीत नाहीं, कुणाला दिसत नाहीं. पण माझा बाहेरचा देखावा बघा कसा सोज्ज्वळ आहे तो! हीं माझीं लुगडीं, माझ्या कानांतल्या

या कुड्या, हातांतले हे तासाचे बिलवर—तुमच्या वैनींचा तरी काय जास्त थाट असतो यापरीस ? बळी द्यायच्या बकऱ्याला फुलमाळांनीं सजवतात ना, तसं वाटतं हें सारं मला. आणि हीं पातळ नेसतांना अन् हे दागिने घालतांना माझ्या अंगाला निखारे डसताहेत असं वाटतं. ".

इतका वेळ आवरून धरलेला दुःखावेग पुनः उन्मळून बाहेर आला. माली ओक्साबोक्शीं रडूं लागली. आतां मीं तिचें सांत्वन केलें नाहीं. या वेळीं मीं तिचें सांत्वन करायचें म्हणजे एका बुडत्यानें दुसऱ्या बुडत्याला वांचवायची धडपड करण्यापैकींच होतें. मालीचे होत असलेले ते धिंडवडे ऐकून माझें मन इतकें खळबळून गेलें होतें, कीं मला कसलीच शुद्ध उरली नव्हती. माली माझ्यापुढें मुसमुसून रडत होती आणि एखाद्या भूतबाधा झालेल्या माणसासारख्या निश्चल नजरेनें मी तिच्याकडे पहात होतों! माझी ही निश्चलता मालीच्या पुढील हताश उद्गारांनीं भंग पावली—

" दादा, माझ्या घरांतली माझी मालकी दुसरीनं हिरावली याचं मला वाईट वाटत नाहीं. कारण ती मालकी मिळालीच नव्हती मला कधीं. त्याप्रमाणं आम्हा नवरा-बायकोच्या प्रेमांत या बयानं बिब्बा घातला याचीहि चीड येत नाहीं मला. कारण आमच्यामधें प्रेमाचे पाट थोडेच वहात होते ? पण माझा आईपणा—तो माझा एकटीचा— माझा हक्काचा नाहीं का हो? तो माझा मला यांनीं मनमुराद उपभोगूं कां हो देऊं नये ? दादा, माझा दिनू मला नुसता दिसतो. पण त्याला बोट लावायचा सुद्धां मला हक्क नाहीं. प्यायपुरता तरी मी त्याला मांडीवर घेईन, त्याच्या अंगावरून पोटभर हात फिरवीन, तर त्याला बळेंच तोडलं आहे. मुक्ताबाई त्याला दूध पाजते, भात भरवते, अंगडंटोपडं करून कडेखांद्यावरून मिरवते. दादा लेकरूं माझं, पण त्याला घटकाभर कुशींत घेऊन पडेन म्हटलं तर तेवढीहि सत्ता मला ठेवली नाहीं हो त्या बयेनं. पोराला काय, लावील त्याचा लळा लागतो. दिनू मुक्ताबाईलाच खिळून असतो. त्याचं सर्व कांहीं तिच्याकडून होत असल्यावर कशासाठीं धाव घेईल तो माझ्याकडे ? आणि कधीं कधीं मला असंहि वाटतं दादा, बाप तसा बेटा निपजतो त्या न्यायानं या पोरट्याच्या मनांत माझ्याबद्दल वैरबुद्धिच निर्माण झाली असेल का ? त्याला माझी ओढ लागूं नये एवढाच त्या बयेचा प्रयत्न नसतो, तर त्यानं मला हिणवण्या-खिजवण्याचे खेळहि ती

शिकवते त्याला. त्यानं मला म्हारीण म्हणावं, त्यानं मला वेडवावं, माझ्या-वर त्यानं चूळ फुंकावी असे घाणेरडे चाळे ती त्या दीड-दोन वर्षांच्या लेकरा-कडून करून घेते अन् त्यानं ते केले म्हणजे फिदिफिदी हसते. त्याचे वडीलहि त्या वेळीं हसतात, एरव्हीं कधीं चेहऱ्यावरील सुरकती नाहीं मोडली तरी! दादा, खरं सांगू तुम्हांला, दिनूच्या त्या खोड्या अपमानकारक असल्या तरीहि मला आल्हादकारक वाटतात. कारण त्या निमित्तानं. तरी माझं बाळ माझ्या थोडं जवळ येतं. आईचं मन कोडगं असतं नाहीं, दादा?"

"पण पोराची नि तुझी ताटातूट करतात तरी कशासाठीं तीं? काय फायदा आहे त्यांत त्यांचा?"

"कितीतरी मोठा फायदा आहे. माझं पोर माझ्याऐवजीं तिलाच बिल-गतं यावरून मी वेंधळी आहे, मुलाचं संगोपन करतां येत नाहीं आणि मी पोराचे कष्ट करायला उत्सुकच नाहीं असं गांवभर सांगत सुटायला मिळतं तिला. आणि आपल्या धर्मबंधूच्या मुलासाठीं आपण या घरांत ठाणं दिलंय ही एक सबबहि उपयोगी पडते. मी पोराला घेऊन कुठंतरी निघून जाईन आणि तशी गेलें तर त्यांच्या दुष्कृत्याला वाचा फुटेल, म्हणूनहि माझं मूल त्यांनीं आपल्या कबजांत घेतलं असेल. इतर सगळे पाश तोडायला मी एखादे वेळीं तयार होईन पण मुलाचा पाश इतका नाजुक अन् बळकट आहे, कीं तो तोडायची आईची छातीच होणार नाहीं. ही गोष्ट त्यांनीं ओळखली आहे आणि मला इथंच जखडून ठेवणारा हा पाश त्यांनीं आपल्या हातांत घट्ट धरून ठेवला आहे! आहे ना यांत त्यांचा फायदा?"

दुष्टांचीं कपट-कारस्थानें किती सूक्ष्म असतात याचा विस्मय करीत मी नुसता ऐकत बसलों होतों. अमळशानें माली उठली. तिनें मला नमस्कार केला आणि म्हटलें—

"येतें मी आतां. नाहीं तर संशय घेतील कांहीं तरी!"

माली दाराबाहेर गेली, पण पुनः परत येऊन म्हणाली—

"आणि हें बघा दादा, वैनींना यांतलं एक अक्षर देखील सांगू नका. भारी वाईट वाटेल त्यांना आणि तुम्हीसुद्धां माझ्यासाठीं लावून घेऊं नका

मनाला. जगांत कांहीं सगळींच माणसं भाग्यवंत असत नाहींत. तुमच्या मालीसारख्या मुलीहि असतात थोड्या. येतें हं—"

माली गेली, पण माझ्या कानांत तिचे शब्द घुमत होते—

'मालीसारख्या मुली असतात' आणि मग दुसरा ध्वनि उमटे, 'आणि तात्या मुक्तासारख्या वेताळ-हडळीहि असतात!'

# पाप कोणाचें? आणि प्रायश्चित्त कोणाला?

कॅन्सर नांवाच्या एका विकाराचें लक्षण असें सांगतात, कीं त्यानें प्राण्याच्या शरीरांत एकदां शिरकाव केला कीं तो त्यास पुरतें नाहींसें करीपर्यंत सोडीत नाहीं. सृष्टींतील अनेक गूढ शक्ति माणसाच्या बुद्धीनें आपल्या अंकित केल्या. त्या शक्तींना हवें तसें राबविण्याची करामतहि त्यानें करून दाखविली. त्यानें पृथ्वीचें पोट पोखरून त्यांतली बहुविध संपत्ति बाहेर काढली. गांवच्या ओढ्याइतकाच माणसानें समुद्र सुलंघ्य केला; उत्तर ध्रुवावरून दक्षिण ध्रुवावरच्या बंधूंशीं तो कानगोष्टी करूं लागला; आणि आपल्या भराऱ्यांनीं त्यानें गगनहि ठेंगणें करून सोडलें! प्राणसंहारक आणि दुर्जय म्हणून मानले गेलेले रोग त्यानें जिंकले, परंतु त्याला कॅन्सर अद्यापि तरी अजिंक्यच राहिला आहे!

माणसाच्या बुद्धिसामर्थ्याला उपहासानें हसणारा कॅन्सरचा दुसराहि एक जोडीदार आहे. तो म्हणजे दुर्जन. त्याचाहि ज्याच्याशीं संबंध येतो त्याला तो अखेरपर्यंत सोडीत नाहीं. या ना त्या निमित्तानें तो आपलें अस्तित्व पटवून देतच असतो. तुम्ही त्याला विचारूं नका, फार काय त्याच्या भयानें तुम्ही त्याच्यापासून दूर राहा, तो तुम्हांला आपला प्रभाव दाखवीलच दाखवील. माणसानें आपल्या बुद्धिसामर्थ्यानें समाजशासनाचें शास्त्र निर्मिलें आणि जगाचें स्वास्थ्य साधलें, असा दिमाख तो प्रसंगोपात दाखवतो. समाजस्वास्थ्य बिघडवणाऱ्या अत्याचारींना दंडून वठणीवर आणावयाच्या कांहीं योजना त्यानें

केल्या आहेतहि. पण या दंडयोजनांना पुरून उरणारे कांहीं इरसाल दुर्जन जगांत आहेत. ते आपलें दुर्जनत्व एकतर उमगूंच देत नाहींत; आणि दिलें तरी इतक्या सावधगिरीनें, कीं त्यांना दुर्जन म्हणण्याची तुमची छातीच होणार नाहीं! अर्थातच अशा महाभागांचें उच्चाटन करून समाजाला खरें स्वास्थ्य मिळवून देण्याचें सामर्थ्य तुमच्या अंगांत नाहीं. त्यांच्या दुष्कृत्याला खीळ घालायला तुम्ही अगदीं असमर्थ आहां!

तात्याचेंच उदाहरण घ्या. त्याचें सारें चरित्र तुम्ही पाहिलें आहे. तो आतांपर्यंत अगदीं सरळ आणि शुद्ध मार्गानेंच चालला आहे असें तुम्हांस वाटतें काय? दुसऱ्याचें जीवन आणि धन या विषयांत तो अगदीं निरपराध आहे असें तुमच्यानें म्हणवतें? त्याच्या जगाचा परिघ फारसा मोठा नाहीं, त्याच्या स्वतःपलिकडे त्याच्या जगाची कक्षा फारशी जात नाहीं. अर्थात् तेवढ्या चिमुकल्या घेरांत माणसेंहि फारशीं नाहींत. पण जीं थोडीशीं आहेत तीं तरी या विशाल विश्वाचींच वाटेकरी आहेत ना? या विश्वांतलें वास्तव्य आनंदमय करण्याचा त्यांना निसर्गसिद्ध हक्क आहे ना? मग त्या माणसांना तो हक्क तात्या उपभोगूं देतो आहे काय? नाहीं ना? मग त्याला अत्याचारी म्हणून शासनसंस्था दंडीत कां नाहीं?

याचें उत्तर स्पष्ट आहे. ती शासनसंस्था दुबळी आहे. तिनें आपल्या-भोंवतीं घालून घेतलेल्या शब्दमर्यादेबाहेर ती जाऊं शकत नाहीं. दंडविधानां-तील शब्दांची कोंडी तिला फोडतां येत नाहीं, आणि त्या विधानांतल्या मोजक्या शब्दांच्या कुंपणावरून अलगद उडी मारणाऱ्या अत्याचाऱ्यास अटकाव कर-ण्याची कुवत तिला नाहीं. दुष्ट कृतीपेक्षां दुष्ट हेतूच खरा निंद्य आणि दंड-नीय; पण हेतूकडे शासनसंस्था दुर्लक्ष करते, तिला करावें लागतें आणि म्हणूनच तात्या उजळ माथ्यानें जगांत वावरतो.

हे विचार माझ्या मनांत आज उद्भवण्यास तात्याच कारणीभूत झाला होता! त्याला विसरून जाण्याचा माझा प्रयत्न अयशस्वी झाला होता. मीं त्याचा विचार मनांत येऊं नये म्हणून त्याची कसलीहि चौकशी करायची नाहीं असें ठरविलें. मालीबद्दल मनाला हुरहुर लागे, पण त्यासाठींहि तात्या-कडे कसली चौकशी करायची नाहीं हा नियम मी मन घट्ट करून आज वर्ष-भर पाळत आलों होतों. माली ही आमच्यापुरती मेली अशी क्रूर शिकवण

आम्ही आमच्या मनाला देत होतों. पण तात्याला आमच्या जीवनांतून पार करण्याचा खटाटोप तो सफल होऊं देत नव्हता. यासाठींच प्रारंभीं त्याला कॅन्सरच्या जोडीस मीं बसवलें.

तात्याची आज मला कळलेली हकीगत त्याच्या चारित्र्यांतील अमानुषता अधिक भडक करून दाखवीत होती. ज्यामुळें जगाचे व्यवहार सुसूत्रपणें चालतात तो विश्वास तात्याला पूर्णपणें पारखा आहे आणि आपल्या स्वार्थापुढें त्याला प्रत्यक्ष भावाचा गळा कापण्यांतहि दिक्कत वाटणारी नाहीं, ही गोष्ट त्यानें आज दाखवली होती. त्याच्यावर लोभ करणाऱ्या, त्याला अधिक कमाईच्या उच्च जागेवर चढविणाऱ्या व्यवस्थापकांस—आपल्या उपकारकर्त्यास—त्यानें चांगलाच हात दाखविला होता!

बॅंकेला तीन दिवसांची सलग सुटी पडली. सुटीच्या पहिल्याच दिवशीं एका बड्या स्थानिक असामीची रेल्वे रिसीट टपालांतून आली. मुंबईहून रवाना झालेल्या यंत्रसामुग्रीची ती रेल्वेरिसीट असून बॅंकेंतून ती ताबडतोब सोडवून घेणें शेठजींना भाग होतें. सुटी संपेपर्यंत वाट पाहिल्यास कामाचा खोळंबा तर होणारच, पण रेल्वेचें डिंबेरजहि भरावें लागणार असा दुहेरी तोटा होता. शेटजींनीं ही अडचण बॅंकेच्या मॅनेजरना सांगितली आणि लोकांची जास्तींत जास्त सोय करण्याचें त्यांचें धोरण असल्यामुळें पट्टीप्रमाणें पैसे घेऊन त्यांनीं त्याच दिवशीं रेल्वेरिसीटचा बटवडा केला. दहा-अकरा हजारांची रक्कम घरीं संभाळण्यापेक्षां बॅंकेच्या तिजोरींत ती सुरक्षित ठेवावी असें त्यांना वाटलें आणि त्यांनीं कॅशिअरला बोलावणें पाठविलें.

सुटी असल्यावर नोकर मंडळी घरीं थोडीच बसून राहणार! कॅशिअर घरीं नव्हते, अकाउंटंट परगांवीं गेल्याचें समजलें आणि आतां हें काम कोणावर सोपवावें या फिकीरींत मॅनेजरसाहेब पडले. योगायोगानें त्यांना तात्या दिसला आणि त्यांनीं रेल्वेरिसीटबाबतचा पत्रव्यवहार आणि शेटजींकडून आलेली रक्कम त्याच्याकडे देऊन त्यांची कसकशी व्यवस्था करावयाची त्या सूचना केल्या. सर्व काम व्यवस्थितपणें पार पडल्याच्या समाधानानें व्यवस्थापक आपल्या सुटीचा उपभोग घेऊं लागले.

सुटी संपण्यापूर्वींच कांहीं तांतडीच्या कामासाठीं त्यांना परगांवीं जावें लागलें आणि तिकडून त्यांना आठ-दहा दिवस परत येतां आलें नाहीं.

त्या रेल्वेरिसीटच्या प्रकरणांत कांहीं भानगड झाली असेल अशी त्यांना शंकासुद्धां आली नव्हती. फार काय, नेहमींच्या गोष्टींतलीच ती एक गोष्ट आणि नेहमींच्या कार्यपद्धतीप्रमाणेंच ती झालेली असेल अशा विश्वासानें ते निश्चिंत होते.

मॅनेजरसाहेब फिरतीवर असलेल्या मुदतींत तात्या कांहीं खाजगी कामासाठीं म्हणून महिन्याच्या रजेवर गेला.

साधारणपणें पंधरवडा गेला आणि यंत्रसामुग्री पाठवणाऱ्या कंपनीचें, रेल्वेरिसीटचा बटवडा झाला कीं नाहीं आणि झाला असल्यास रकमेचा चेक कां नाहीं, अशी पृच्छा करणारें पत्र आलें. आणि तदनुसार तपास करतांना मॅनेजरसाहेबांचे डोळे पांढरे व्हायची वेळ आली. रेल्वेरिसीटची नोंद आवकबुकांत नाहीं, अर्थात् तिचा बटवडा घेतल्याची शेठजींची सहीहि नाहीं! पैसेहि जमा नाहींत. दहा-अकरा हजारांचा डल्ला आपल्यास बसला ही गोष्ट त्यांना समजून चुकली आणि त्याबद्दल आतां चुरमुरे खात बसणें एवढाच मार्ग शिल्लक असल्याचें त्यांना कळून आलें.

झाल्या गोष्टीचा गवगवा करावा तर प्रकरण त्यांच्याच अंगशीं शेकलें असतें. रिसीट घेऊन शेठजींनीं यंत्रसामुग्री सोडवून घेतल्यानें ती आपल्याकडे आलीच नाहीं असें म्हणण्याची सोय नव्हती. रिसीट आली पण ती बॅंकेंतल्या दुसऱ्या कोणाच्या ताब्यांत होती, व त्यानें तिचा बटवडा केला म्हणावें, तर हा घोटाळा सुटींत झाला होता; व सुटींतलें टपाल मॅनेजरच्या बंगल्यावर परभारें जातें आणि सुटीनंतर ऑफिस उघडल्यावर त्याची विल्हेवाट लागते, ही नित्याची पद्धति त्यांना अमान्य करतां येण्यासारखी नव्हती. शेठजींनीं रिसीट गफलतीनें पळवली किंवा पैसे मागून भरण्याचें वचन दिलें म्हणून आपण विश्वासानें ती त्यांना दिली असें सांगून आपलें मरण त्यांच्यावर ढकलण्याची धडपडहि त्यांच्याच अंगलट येणारी होती. एक तर ते तितक्या उलट्या काळजाचे नव्हते व दुसरी गोष्ट म्हणजे शेठजींनीं पैसे मोजून दिले तेव्हां गांवचे कांहीं सद्गृहस्थ तेथें उपस्थित होते. तात्याची दगलबाजी पोलिसकडे न्यावी तर त्यांनीं विचारलें असतें 'सुटी असून हा खासगी व्यवहार केलातच कां? आणि तात्याकडे पैसे दिल्याबद्दल पुरावा काय? शिवाय हिशेब व नगदी खात्यांतले लोक सोडून तात्यासारख्या पत्रव्यवहार-

शाखेच्या माणसाकडे तुम्हीं एवढी मोठी जोखीम सोपवणें स्वाभाविक तरी कसें होईल ? ' या आणि अशाच शंकांनीं व्यवस्थापकांच्या डोळ्यांपुढें निराशेचा काळाकुट्ट अंधार उभा राहिला !

मॅनेजरना आणखी एक भीति वाटली ती ही, कीं जर करतां हें प्रकरण आपल्या भिंतींच्या बाहेर पडलें तर अफरातफरीचा आळ आपल्यावर घेतला जाईल आणि पुढें खरा गुन्हेगार पकडला जाऊन आपण निर्दोषी ठरूं असें गृहीत धरलें, तरी सकृद्दर्शनीं आपणच पकडलें जाऊन आपली नाचक्की होईल. त्या मानधान गृहस्थास एवढी नाचक्कीहि मरणाहून भीतिप्रद वाटली आणि त्यानें सर्वस्व भरीस घालून तें प्रकरण आंतल्या आंत संपवून टाकलें.

तात्यानें तें अवदान पचवून ढेकर दिला ! त्याच्या विश्वासघातकीपणाबद्दल बॅंकेच्या आवारापुरती झाली थोडीशी कुजबूज, पण बाहेरच्या साऱ्या जगांत तात्या अगदीं सीधा आणि शहाजोग राहिला ! रजा संपल्यावर तो हजर होईल आणि त्यानें विस्मरणानें पैसे जमा करायचे राहिले असल्यास ते भरून घेतां येतील हा एक आशातंतु मॅनेजरच्या मनांत अजून जीव धरून होता. तात्याचा आजपर्यंतचा प्रॉव्हिडंट फंड, बोनस अशी कांहीं पुंजी बॅंकेंत असल्यानें तिच्यांतून आपली थोडीफार भरपाई होईल ही आशाहि त्यांच्या डोळ्यांपुढें होती. पण तात्यानें थोड्याच अवधींत हे दोन्ही बुडबुडे फोडून टाकले !

त्याची रजा संपायच्या आदल्या दिवशींच त्याचा राजीनामा दाखल झाला आणि तोहि अज्ञात ठिकाणाहून. लखोट्यावरील शिक्का त्याचा ठावठिकाणा सांगेल म्हणावें तर तो लखोटा आगगाडीच्या टपालच्या डब्यांत येऊन पडल्याचें दिसून आलें ! त्याच्या राजीनाम्यानंतर त्याच्याकडील येण्यादेण्याचा आढावा काढण्यांत आला, तेव्हां समजून आलें कीं त्याच्या प्रॉव्हिडंट फंडाची, बोनसची वगैरे जेवढी शिल्लक आहे, त्यांत त्याच्या चार महिन्यांच्या पगाराची भरती घालून होईल एवढें कर्ज, त्यानें महिना दोन महिन्यां-मागेंच बॅंकेकडून घेतलें आहे व त्याला त्याचे दोघे जोडीदार कारकून जामीन राहिले आहेत ! थोडक्यांत सांगायचें म्हणजे तात्याची एक कपर्दिकाहि त्याच्या राजीनाम्यानें गमावलेली नव्हती. आणि मॅनेजरसाहेबांप्रमाणें आपल्या गरीब कारकून—बंधूंना थोडीशी चाट देऊन ‘ जामिन कोणा होऊं नये ’ ही बालपणची शिकवण त्यानें प्रौढपणीं दिली होती !

तात्याचा शोध करायला आलेल्या वरीलपैकीं एका पोळलेल्या कारकुनाकडून मला वरील हकीगत कळली आणि मीं प्रथम सांगितल्याप्रमाणें आम्ही विसरूं पाहत असलेल्या तात्यानें आपल्या अस्तित्वाची जाणीव आम्हांला करून दिली. तात्या पातळपूर सोडून गेला व तो कोठें गेला तेंहि अज्ञात आहे या माहितीनें मला एक प्रकारें समाधानच वाटलें. त्याच्या अज्ञातवासामुळें त्याच्या गाठीभेटीचें भय टळलें ही गोष्टहि मला बरीच वाटली.

या उलाढालींत तात्यानें दहा-पंधरा हजारांचा डल्ला मारला असला, तरी तो व्यवहार एकंदरीनें नुकसानीचाच ठरणारा होता. पाऊणशें रुपये कायम पगारावर पाणी सोडण्यास तो उचित ठरला नसता. आतांच्या लुटीवर त्यास हक्काच्या न्याय्य मिळकतीइतकें व्याज मिळूं शकलें नसतें. कमी किफायतशीर सौदा करून तात्यानें तोंड छपवून बसण्याची शिक्षा स्वतःलाच स्वतःच्या हातानें करून घेतली असें आम्हांला वाटलें.

कवडीसाठीं कसाबकरणी करणाऱ्या तात्यानें असें अल्पसंतुष्ट होणें ही गोष्ट मला कांहीं केल्या साहजिक वाटेना. तात्याला आपल्या पापाचरणाचा वीट आला आणि त्यानें पोटापुरती तरतूद झाल्यावर पापनिवृत्त होण्याचा संकल्प केला असेल, असा एक विचार क्षणभर माझ्या मनांतून चमकून गेला. सेवानिवृत्त होण्याइतक्या वयापर्यंत आपण जगूंच याचा काय नेम ? त्यापेक्षां मिळेल तेवढें आजच्या आज पदरांत पाडून घ्यावें आणि तेवढ्या पाण्यावर निघेल तेवढें लोणी काढीत बसावें असा हिशेबहि त्यानें बांधणें शक्य होतें. नको नको म्हणत असतांहि तात्याविषयींचे असे अनेक विचार माझ्या डोक्यांत धुडगूस घालूं लागले !

महिना पंधरा दिवसांत या विचारांचा वेग मंदावला आणि डोक्यास होणारा त्रास कमी झाला ! आमचा जीवनक्रम शांतपणें चालूं झाला होता.

आमच्या गांवच्या हायस्कूलमधील माझ्या सलगींतले एक शिक्षक एके दिवशीं मजकडे गप्पा मारायला आले होते. माझ्या बैठकींत पडलेल्या वर्तमानपत्राच्या ताज्या अंकाकडे त्यांची दृष्टि गेली आणि तें हातीं घेऊन अर्धं मिनिटहि झालें नसेल इतक्यांत तें त्यांनीं फेकून दिलें ! त्या वेळीं त्यांच्या चर्येवरील त्रासिक भाव पाहून मीं विचारलें—

" काय झालं हो मास्तर ? "

" काय व्हायचंय ? गाढवाला गूळ चारून गाईला उपाशी ठेवण्याचा आमचा मूर्खपणा नेहमींचाच आहे. "

मास्तरांनीं आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ त्या वर्तमानपत्रांतील एका फोटोकडे व त्या खालच्या मजकुराकडे माझें लक्ष वेधलें. एका संस्थानच्या राजपुत्राचा तो फोटो होता व ते राजपुत्र शिक्षणासाठीं विलायतेस गेल्याचें तें बातमीपत्र होतें. तें वाचून मीं विचारलें—

" मग यांत विशेष काय आहे ? "

" विशेष नाहीं, नेहमींचीच गोष्ट आहे ही. असल्या नालायक पोरांच्या पायीं पैशाची अशी उधळपट्टी होते आणि खऱ्या होतकरू मुलांना शिक्षणाला पैसा नसल्यामुळें शाळेला अवेळीं रामराम ठोकावा लागतो. "

असें म्हणून आपण त्या संस्थानांत पूर्वीं किती दिवस होतों व त्या राजपुत्राच्या मठ्ठपणाचा आपणास प्रत्यक्षानुभव कसा आला आहे, याच्या कित्येक गोष्टी त्यांनीं सांगितल्या. श्रीमंत सरकार नाराज होतील आणि त्यांच्या नाराजीमुळें आपल्या नोकरीस धोका येईल या भीतीनें या दगडोबांना दरसाल पास करण्याची दक्षता हेडमास्तर घेत असेल, तरी युनिव्हर्सिटीच्या परीक्षेंत त्यांचें कांहीं चालेंल नाहीं; व एक नव्हे, दोन नव्हे, तब्बल तीन वाऱ्या करूनहि हे राजपुत्र प्रवेश परीक्षेंतून पार पडूं शकले नव्हते ! आणि पडणार तरी कसे ? अलेक्झांड्रिया हें एक बंदर आहे हें यांना माहित नव्हतें ! ती इंग्लंडची राणी आहे असें त्यांनीं उत्तर लिहिलें होतें. आणि हिंदुस्थानांत धान्य कोठें अधिक होतें या प्रश्नास 'वाड्यांतली कोठी' असें उत्तर त्यांनीं दिलें होतें ! अशा बुद्धिशून्य पोरापायीं पैसा पाण्यांत टाकण्यापेक्षां मधु मालशासारख्या बुद्धिवान् मुलाला फी पुस्तकांपुरते पैसे दिले तरी तेवढे सार्थकीं लागतील. या एका राजपुत्रासाठीं खर्च होणाऱ्या पैशांत दहा मधूंचें शिक्षण होईल. पण मधूच्या बुद्धीवर निखारे पडताहेत आणि त्याला पंडित होण्याऐवजीं खानावळींतलीं उष्टींखरकटीं काढावीं लागताहेत ! असें म्हणून मास्तरांनीं एक जड निःश्वास सोडला.

मास्तरांना मधूबद्दल वाटत असलेली हळहळ मला मोठी तीव्र वाटली.

आणि तो कोण कुठला हें समजून घ्यावेंसें वाटलें. मास्तरांनीं त्याच्याबद्दल सांगितलेली हकीगत ऐकून त्याची बुद्धिमत्ता खरोखर उत्तेजनार्ह आहे असें मला वाटलें आणि त्याच्या नशिबीं येणाऱ्या विद्याविहीनतेचा मला विषाद वाटल्यावांचून राहिला नाहीं ! मधूला मदत करून त्याला उत्कर्षाची संधि मिळवून द्यावी असा विचारहि माझ्या मनांत आला. पण त्याचबरोबर वाटलें, कीं या एका मधूला मीं प्रवेश परीक्षेपर्यंतचें शिक्षण मिळवून दिलें तरी तेवढ्यानें खरा प्रश्न सुटणार आहे का ? आपल्या या हिंदुस्थानांत हा एकटाच का मधु शिक्षणाला मुकला आहे ? कांहीं थोड्या लोकांनीं संपत्तीची मालकी पटकावली असून इतर कोट्यवधि लोक जीवितांतील सामान्य सुखसोयींनाहि महाग झाले आहेत आणि त्यांचे अगणित मधू अनुकूलतेच्या अभावीं आपल्या जन्मसिद्ध गुणांची नासाडी होतांना पाहताहेत ! त्यांच्यांतलाच मीहि एक. काय मदत करणार मी त्यांना ?

पण माझे हे विचार मास्तरांना पटले नाहींत. त्यांचें म्हणणें असें–उपाशी लोकांच्या गर्दींत एखाद्याला आपली भूक भागवून चतकोर भाकरी दुसऱ्यास देतां आली तर त्यानें ती द्यावी. लाख माणसें तडफडत असलीं, तरी एकाच्या पोटांतली आग शमवितां आली तर शमवावी. एकाचें पोट भरलें तर तोच कांहीं धडपड करील आणि दुसऱ्या क्षुधितांच्या भुकेला कांहीं तरी उपाय करील.

आमची बरीच भवति न भवति होऊन मधू मालशाला येथें आणावें आणि मीं त्याची फी, पुस्तकें आणि कपडेलत्ते पुरवावे व मास्तरांनीं त्याच्या पोटाची सोय लावावी असें ठरलें. चार-सहा दिवसांत मधू आमच्या गांवीं येऊन दाखल झाला व मास्तरांनीं आपल्या हायस्कुलांत त्याला दाखल करूनहि घेतलें.

मधूला आम्ही करीत असलेली मदत म्हणजे सत्पात्रीं दान आहे हें आम्हांस लवकरच पटलें. त्याची हुशारी, नीटनेटकेपणा, गोड बोलणें आणि नम्र वृत्ति इत्यादि गुण कोणावरहि छाप पाडतील असेच होते. या गुणांमुळें तो सर्वांना हवाहवासा वाटे. या मुलास वळण लावणारीं मातापितरें थोर विचाराचीं असलीं पाहिजेत आणि निर्धन असलीं तरी त्यांची आचारा-विचारसंपत्ति बहुमोल असली पाहिजे असेंहि आम्हांस वाटल्यावांचून राहिलें नाहीं, आणि याची प्रचीति आम्हांस लवकरच आली.

एके दिवशीं एक गरीब स्त्री आमच्या घरीं आली. तिच्या गरिबीखालून तिची कुलीनता आणि सात्त्विकताहि प्रकट होत होती. कालचक्राच्या फेऱ्यांत सापडल्यामुळेंच तिच्यावर ही दारिद्र्याची अवकळा आली आहे, हें ओळखण्यास वेळ लागत नव्हता. दिल्ली–आग्र्यांतले मोगल बादशहांचे राजमहाल आज भकास आणि उदासवाणे वाटत असले, तरी आपल्या पूर्ववैभवाची जाणीवहि करून देतात तशीच त्या स्त्रीची आतांची गरीबी तिच्या गतकालीन सुस्थितीची जाणीव करून देत होती आणि तिचा तोंडावळा ती मधूची आई असावी असा भास उत्पन्न करीत होता.

आणि हा केवळ भास नसून वस्तुस्थितिच होती! ती स्त्री म्हणजे शालिनीबाई–मधूची आई होती. मधूला भेटायला आणि त्याच्या आश्रयदात्यांविषयीं वाटणारी कृतज्ञता व्यक्त करायला बिचारी येथें धावून आली होती.

शालिनीबाई घाईघाईनें परत जाणार होत्या, पण तिचा आग्रह त्यांच्यानें मोडवेना. त्या दोन दिवस आमच्याकडे राहिल्या. त्यांची जीवनकथा समजून घेण्याची उत्कंठा तिला त्यांच्याकडून तृप्त करून घ्यायची होतीच, पण त्या माउलीला तिच्या लेकराचा सहवास दोन दिवस अधिक मिळवून द्यावा हा तिचा हेतु सर्वांत प्रबळ होता. कारण "मधु, येऊं ना आतां मी?" असें म्हणतांना शालिनीबाईंना आलेला गहिंवर काल तिनें पाहिला होता आणि त्या वेळीं त्या मायलेकरांच्या डोळ्यांतून ओघळलेले अश्रु पाहून तिचें हृदय व्याकुळ होऊन गेलें होतें. म्हणूनच तिनें शालिनीबाईंचा बेत बदलावयास लावून तो दोन दिवस लांबणीवर टाकला होता.

रात्रीचीं जेवणें उरकल्यावर मधू अभ्यासाला लागला आणि मी वाचनालयांतून आणलेल्या पुस्तकांचा समाचार घेत पडलों. ती आणि शालिनीबाई परसांत तुळशीकट्ट्यावर गोष्टी बोलत बसल्या आणि त्यांतच शालिनीबाईंनीं आपली कर्मकथा सांगितली. तिचा प्रारंभ करतांना त्या म्हणाल्या–

"पाप केलं म्हणजे त्याचं प्रायश्चित्त म्हणून दुःख भोगावं लागतं असं म्हणतात तें अगदीं अगदीं खरं नव्हे. आमच्या यांनीं आणि मीं कांहीं म्हटल्या कांहीं पाप केलं नाहीं. तुळशीपाशीं बसून सांगतेय हें मी. 'देवमामलेदार होऊन गेले, तेच देवमास्तर होऊन आलेत पोस्टांत' असं बरोबरीची मंडळी म्हणायची यांना. कामांत कधीं चूक व्हायची नाहीं आणि बरोबरीच्या

माणसांचं कुणाचं कांहीं नडलं तर धावून जायला व्हायचं. इकडच्या या चांगुलपणाचं फळहि मिळालं. साहेबानं यांची शिफारस करून इन्स्पेक्टराची जागा दिली यांना. एकदम पन्नास–साठ रुपये पगार वाढला. ”

त्यानंतर मधूचें बालपण, त्याची मुंज इत्यादि गोष्टींनी भरलेल्या पांचसात वर्षांच्या काळाचें वर्णन करून, शालिनीबाई आपल्या वैधव्याच्या टप्प्यावर आल्या आणि त्यांचा शोक अनावर होऊन त्या कांहीं वेळ खूप रडल्या. ती साश्रु नयनांनीं त्यांचें सांत्वन करीत होती. सहानुभूतीच्या शब्दांनीं शांत होण्याऐवजीं पत्नीच्या हृदयांत पतिनिधनामुळें पेटलेली आग अधिकच भडकते हें शालिनीबाईनीं त्या वेळीं दाखविलें.

“ जिवंत असेपर्यंत तर त्यांनीं आमचं रक्षण केलंच, पण पुढंहि मधूला आणि मला कांहीं कमी पडणार नाहीं इतकी तरतूद त्यांनीं करून ठेवली होती. जगण्याची आशा नाहीं असं वाटतांच माझा हात हातांत घेऊन म्हणायचं झालं, ‘ काय आहे तें तुला ठाऊकच आहे. पुरवून खाल्लंत तर कमी पडायचं नाहीं. मधूला जप, तो शिकेल तेवढं शिकव. त्याच्या शिक्षणापुढं पैशाची पर्वा करूं नको. तो खर्च झालेल्या पैशांचं सार्थक करील आणि तुझेमाझे पांग फेडील.’ मरतेवेळीं एक मधु आठवत होता त्यांना.”

ही करुणकथा सांगतांना शालिनीबाईच्या शोकाला फिरून एकदां पूर आला आणि त्याच दुःखव्याकुल स्थितींत त्या म्हणाल्या, “ पण माझ्यावर सोपवलेली जबाबदारी मला नीट पार पाडतां आली नाहीं. गळेकापू माणसावर विश्वास टाकला आणि सर्वस्वाला मुकलें. मधूच्या हातांत भिकेची झोळी या —या चांडाळणीनं दिली. ”

शालिनीबाईना आलेली स्वतःची चीड अंमळ शांत झाल्यावर त्या सांगू लागल्याः—

“ ताई, आम्हां बायकांना पुरतं शिक्षण मिळत नाहीं, पैशा-अडक्यांचे व्यवहार कसे करायचे याची माहिती आम्हांला दिली जात नाहीं; आणि घराबाहेरच्या जगांत वावरण्याची आम्हांला बंदी असल्यामुळं माणसाची पारख आम्हांला करतां येत नाहीं. त्यामुळं बाहेरच्या देखाव्यावरून आम्ही चोराला साव समजतों आणि त्याच्या हातून आपला गळा कापून घेतो. माझं

तसंच झालं ताई. कुठं तरी राहायचं म्हणून माझ्या मावसबहिणीच्या गांवीं गेलें राह्यला. तिचे यजमान एक गरीब भिक्षुक. एका देवळांत त्यांना पूजा आहे. माझ्याजवळ यांच्या विम्याचे आणि फंडाचे मिळून पांचसाडेपांच हजार रुपये होते. ते कुठंतरी व्याजीं लावावे आणि त्या व्याजांतून मधूचा नि माझा निर्वाह करावा असा विचार मीं भटजींना कळवला. त्यांना तरी या सावकारी विषयाची काय माहिती ? त्यांनीं आपल्या देवळांत रोज पुराणाला येणाऱ्या एका माहितगार गृहस्थाला सल्ला विचारला. तो म्हणाला—

' अलीकडे माणसं खट्याळ झालीं आहेत. कर्ज मिळेपर्यंत गोड बोलतात आणि आपलं काम झाल्यावर लगेच उलटतात. कज्जे-खटलीं खेळून पैसे वसूल करायचे झाले, तरी कायद्याचीं कुलंगडीं निघून येणं वसूल होईपर्यंत मारामार होते. आणि वसूल झालं तरी त्यांतलं बरंचसं वकील खाऊन टाकतात. त्यांत बाईमाणसाला असल्या उसाभरी भारी कठीण होतात. म्हणून बाईनीं आपला ऐवज बँकेंत ठेवावा आणि वेळच्या वेळीं बिनतक्रार व्याज घ्यावं हेंच सोयीचं होईल. बँकेंत पैसे जमा करून व्याज आणून द्यायचं काम आपण आनंदानं करू. '

" मला त्यांचा हा सल्ला पटला आणि न पटण्यासारखं यांत होतं तरी काय ? एके दिवशीं कचेरीस जातांना ते कांहीं छापील कागद घेऊन आले. बँकेंत पैसे भरण्याचा तो अर्ज आहे असं सांगून त्यावर त्यांनीं माझी सही घेतली. मी पांच हजारांच्या नोटा त्यांच्या स्वाधीन केल्या.

" संध्याकाळीं त्यांनीं निळसर पुठ्ठ्याचं एक पासबुक आणून दिलं. त्यांत बँकेंत जमा केलेल्या पांच हजार रुपयांचा आंकडा त्यांनीं दाखवला. सर्व गोष्टी किती सहज आणि बिनदगदगीनं झाल्या याचं आम्हांला समाधान वाटलं.

" पांच-सहा महिन्यांनंतर त्यांनीं दुसऱ्या एका कागदावर माझी सही घेतली आणि पंचाहत्तर रुपये व्याज म्हणून दिलं. बँकेंत पैसे ठेवले म्हणजे किती सुरळीतपणें व्याज मिळतं याचा मला आनंद वाटला. पण पाऊणशें रुपयांत सहा महिने काढणं थोडं कठीणच होणार अशी काळजीहि वाटली. ' आपले दागिने विकून दीड-दोन हजार रुपये येतील. तेहि बँकेंत ठेवले तर व्याज

गस्त येईल आणि तेवढ्यांत आम्हां मायलेकरांचं छान चालेल ' अशी तोड ांनीं सुचविली व ती मला पटली. माझ्या दागिन्यांचे एकवीसशें रुपये भरे. त्यांतले दोन हजार मीं बँकेंत भरले. त्यांनीं संध्याकाळीं भत्ताक आणून दिलं त्यांतला सात हजारांचा आंकडा त्यांनीं मला दाखवला.

"पुढं एक दिवस बँकेंत कांहीं भानगड झाल्याची कुजबूज कानीं आली. त्या गृहस्थांना बोलावून आणायला मधूला सांगितलं. तो त्यांच्या घरीं गेला तों त्यांच्या दाराला कुलूप! त्यांच्या कचेरींत जाऊन विचारलं तेव्हां कळलं कीं ते इथून पळून गेले!

"मग मात्र मी घाबरलें. मी कुठं बाहेर पडायची नाहीं फारशी. पण त्या दिवशीं पासबुक घेऊन बँकेंत गेलें. तें पासबुक खरं नव्हतं. त्याच्यावर बँकेचा शिक्का नाहीं, नंबर नाहीं आणि कोणाची सहीहि नाहीं! तिथल्या माणसांनीं 'त्यानं तुम्हांला सपशेल लुबाडलं आहे' असं सांगितलं. त्या कपटी माणसानं ही फसवणूक इतकी बेमालूम केली कीं, तिचं बँकेंतल्या सर्व माणसांना नवल वाटलं. कोरं पासबुक त्यानं केव्हां कसं पळवलं आणि त्यांतल्या नोंदी कुणाकडून लिहविल्या याचा त्यांना उमज पडेना आणि त्या कपट-कारस्था-नाशीं त्याचा संबंध असल्याचा कसलाच पुरावा त्यांना मिळेना.

"कांहीं असलं तरी मी सर्वस्व गमावून बसलें. माझ्याजवळ दिडकीहि नाहीं. मधूला पोटाशीं धरून त्या दिवशीं मी किती रडलें; पण माझ्या रडण्यानं गेलेले पैसे थोडेच परत येणार होते?"

"कोणत्या गांवीं घडली ही गोष्ट?" तिनें अधीरतेनें विचारलें.

"पातळपूरला." शालिनीबाई म्हणाल्या.

"पातळपूरला!" ती उद्गारली "तुम्हांला असं लुबाडणाऱ्या माण-साचं नांव तात्या—?"

"नांव सुद्धां ऐकायला नको त्या राक्षसाचं!" शालिनीबाई दोन्ही हात कानांवर ठेवून म्हणाल्या.

* * *

शालिनीबाईची ही शोककथा मला तिच्याकडून कळली तेव्हां त्या मायलेकरांची कींव वाटण्याऐवजीं तात्याच्या गळेकापूपणाचा संतापच मला अधिक असह्य झाला. मधूला मी देत असलेला आश्रय हा माझा परोपका नसून, तात्याच्या नीचपणाचें प्रायश्चित्त मी भोगतों आहे कीं काय अ सवाल माझें मन मला फिरफिरून विचारूं लागलें.

आणि त्यानंतर जेव्हां जेव्हां मधु माझ्यापुढें येई तेव्हां तेव्हां तात्या विक्राळ हास्य करीत ‘ मला विसरायला बघतोस नाहीं का ? पण मी तुझी पाठ कधींच सोडणार नाहीं ’ असें मला बजावीत असल्याचा भास होऊं लागला !

---

# तात्यांचें महाराजपद

“ येतांना एक मनि-ऑर्डरचा कागद आणायचा. ” मी बाहेर निघालेला पाहून ती म्हणाली.

“ मनि-ऑर्डर करणार आहेस तूं ? ती कुणाला ? स्त्री मासिकाची वर्गणी तर गेल्याच महिन्याला पाठविली आहेस ! ” मीं उत्तर दिलें.

“ पण दुसरी वर्गणी पाठवावयाची आहे मला. ”

तिची ही दुसरी वर्गणी कसली याचा मला अंदाज येईना म्हणून मी थोडा बुचकळ्यांत पडलों. तें पाहून ती म्हणाली—

“ माझ्या वर्गणीचं इतकं कोडं नकोय पडायला. आणि ओझंहि नकोय वाटायला. मी वर्गणी पाठवणार आहे ती तुमच्याकडून पैसे मागून-घेऊन नाहीं पाठवणार. माझ्या ओवाळणीच्या पैशांतून देणार आहे,” मी ती. ”

“ अग पण ती कुणाला द्यायची आहे तें कळूं दे कीं ! ”

“ होय कीं ! तें सांगायचंच विसरलें मी ! किनई, एका गरीब माणसानं ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं धरलेल्या एका अनाथ ब्राह्मण मुलीला सोडवून आणलंय. तिच्या पालनपोषणासाठीं मदत पाठवावी म्हणून त्या गृहस्थानें ‘ संस्कृति ’ पत्रांत जाहीर मागणी केलीय. त्यासाठींच पांच रुपये पाठविणार आहे मी.”

"पण या गरीब माणसाला दुसऱ्या गरीबाच्या पालनाचा उपद्व्याप हवाच कशाला? गाईच्या नांवावर लोकांच्या पैशावर डल्ला मारणारे 'गाईला मदत करा' वाले असतात त्यांतलाच हा माणूस दिसतोय!"

माझी ही शंका अथवा टीका तिला मानवली नाही. नेहमींसारखी तिनें माझी हजेरी घेतली. 'मला कुणाचें चांगलें दिसतच नाहीं; नसत्या शंका काढून पैसा खर्च करायचें टाळतों, परोपकारी लोक मला स्वार्थी दिसतात, शाळांना आणि दुसऱ्या संस्थांना मी माझ्या शक्तीप्रमाणें मदत देत असलों तरी, त्यांत देवधर्माचें नांव नसतें आणि देवळांचे जीर्णोद्धार अथवा यज्ञयागासारखीं धर्मकार्यं म्हटलीं, कीं दिडकी द्यायलासुद्धां माझी तयारी नसते' इत्यादि इत्यादि तडाखे तिनें मला लगावले. तिचे हे असले आरोप माझ्या मनवळणीं पडलें असल्यानें मला त्यांचें विशेष कांहींच वाटलें नाहीं.

मी बाहेरून येतांना मनि-ऑर्डर फॉर्म आणले. ते लिहायचें काम माझ्या-वरच आलें. तिनें आपला आपण फॉर्म भरला, पण पत्त्याच्या ठिकाणीं रुपयांचा आंकडा आणि रुपयांच्या ठिकाणीं माणसाचें नांव पडलें होतें. ती चूक सुधारण्यासाठीं मी दुसरा तक्ता लिहिला, तेव्हां मला कळलें, कीं तिची ही देणगी पश्चिम खानदेश जिल्ह्यांतील चाचडीच्या हिंदुत्वाभिमानी चांग-देवस्वामीकडे जात आहे.

'संस्कृति' पत्रांतला तिच्यावर प्रभाव पाडणारा मजकूर तरी काय आहे याची जिज्ञासा जागृत होऊन मी तो वाचला आणि मला कळलें—

नजीकच्या एका खेड्यांतील ग्रामजोशी आणि त्यांची बायको महामारीच्या विकारानें आकस्मिकपणें मरण पावली आणि त्यांची दहा-बारा वर्षांची एकुलती एक मुलगी निराधार झाली. त्या गांवीं दुसरें ब्राह्मणाचें घर म्हणजे कुळकर्ण्यांचें. पण जोशीबुवांशीं त्यांचें जुनें वैमनस्य असल्यानें ते त्यांच्या मुलीची जोखीम पत्करण्यास तयार होईनात. इतर गांवकरी ब्राह्मणाची मुलगी बाटवण्याच्या पापास धजनात. या संधीचा फायदा खिस्ती मिशनरींनीं घेतला आणि एक मिशनरीबाई त्या मुलीला आपल्या आश्रमांत घेऊन आली. ही वार्ता कळतांच चाचडीचे चांगदेवस्वामी धावून आले आणि त्यांनीं त्या ब्राह्मणकन्येला मिशनऱ्यांच्या आक्रमणापासून सोडविलें.

यला

दाढी-कफनी आणि भस्माच्या पट्ट्यांशिवाय भांडवलहि लागत नाहीं फार. इकडच्या भिल्ल आणि कुणबी लोकांत तर असल्या बुवामहाराजांना छान भाव येतो. म्हणून तर बुवा-महाराज झालेत ते. संत-संतिणीभोंवतीं भक्तांचा गराडा पडायला वेळ लागला नाहीं. पूजा व्हायला लागलीय आतां."

" मग माले, महाराजांच्या बरोबर महाराणीलाहि मिळत असेलच कीं कांहीं मान ? मग ग काय बिघडलं तुझं ?" त्या स्थितींतहि तिची थट्टा करण्याचा मोह तिला आवरला नाहीं. पण त्या थट्टेनें मालीला अधिकच विषण्ण केलें. ती म्हणाली—

" पण यांच्या महाराजपणाला महाराणी वावडी आहे वैनी ! संसारी महाराजापेक्षां बालब्रह्मचारी महाराजाला भाव अधिक हें ओळखण्याइतकी अक्कल त्यांना खचित आहे. आणि म्हणून तर माझा बायकोपणा त्यांनीं हिरावून घेतला. मी त्यांच्या मठींतली नुसती सेवेकरीण ठरलें. मी कुणाशीं अवाक्षर बोललें तर माझी जीभ कापली जाईल अशी मला ताकीद मिळाली. मीं तो छळ—छळ कसला जिवंत मरण—मुर्दाडपणें सोसलं. पण पुढच्या यमयातना मला दुःसह झाल्या आणि म्हणून सगळे मायापाश तोडून वाट फुटेल तिकडे चालायला लागलें."

" तात्यामहाराजांचा मठ आहे तरी कुठं ?" मीं विचारलें.

" तापी-तीरावर, चाचडीला. आणि आतां ते तात्यामहाराज नाहीं राहिले. चांगदेवस्वामी झालेत ते !"

" काय ! चांगदेवस्वामी म्हणजे तात्याच ? आणि योगेश्वरीदेवी म्हणजे—"

" मुक्ताबाई." मालीनें वाक्य पुरें केलें. " दिन्या दत्तमहाराज झालाय आणि तो म्हणे चांगदेवस्वामीला तपश्चर्येच्या वेळीं हिमालयांत सापडलाय."

मीं तिच्याकडे पाहिलें तेव्हां तिची चर्या किती पण ओशाळलेली दिसली !

" पण होय ग माले, ख्रिस्त्यांच्या तावडींतून एका अनाथ मुलीला सोडवून आणलं ते चांगदेवस्वामी—"

"—आणि मी म्हणतें ते चांगदेवस्वामी एकच दादा."

" मग त्या मुलीचं काय झालं ?"

" व्हायचं काय ! वाघाच्या जाळींत शिरलेल्या मेंढराचं दुसरं काय होतं ! "

" म्हणजे नमूसारखा तिचाहि निकाल लावला कीं काय तात्यानं ? " तिनें अधिरतेनें विचारलें.

" जवळ जवळ तसंच. फार मोठं रामायण आहे तें. किमानपक्षीं पांच-सहा हजारांचा लग्गा मारला सगुणेच्या नांवावर. "

" त्यांतले पांच रुपये तुझ्या वैनीसाहेबांचे आहेत पोरी ! "

" छान ! झाडून टाकायला बघतां नाहीं का ? " मालीनें हसून टाळी वाजवली.

मालीचें तें हंसणें ' अति झालें नि हसूं आलें ' म्हणतात त्यापैकीं होतें !

# तात्या चांगदेव कीं—?

शेजारच्या एका घरीं आम्हांस दंपती-भोजनाचें निमंत्रण आलें. लग्न होऊन पंधरा वर्षें उलटल्यानंतर त्यांचा कोणता तरी एक नवस फळाला आला आणि त्यांना पुत्रलाभ झाला. त्या नवसाच्या सांगतेप्रीत्यर्थ हें दंपती-भोजन आहे असें कळलें तेव्हां माली उद्गारली—

" पोरांसाठीं माणसं इतकीं कां कासावीस होतात हो वैनी ? निपुत्रिक राहण्यासारखं भाग्य नाहीं. पोरं पोटीं यायचीं आणि तीं असून नसल्यागत व्हायचीं, त्यापरीस वांझपणा हजारपट बरा. "

मालीचे हे उद्गार ऐकून तिनें खेदपूर्ण असा एक निःश्वास सोडला, आणि ती स्वस्थ बसली. नाहीं तरी कोण काय बोलूं शकलें असतें यावर ! वंचनेच्या चटक्यांनीं कासावीस झालेल्या मातेच्या हृदयांतून ते शब्द उमटलेले होते. आणि समजुतीच्या अथवा सहानुभूतीच्या शब्दांनीं त्या हृदयाची आग शांत होण्यासारखी नव्हती. पुत्रप्राप्ति हें महत्तम वरदान ज्या मातृमनाला वाटावें, त्यानेंच पोर होणें हा कठोर शाप समजून वांझपणांतच आनंद मानावा ही गोष्ट सकृद्दर्शनीं अस्वाभाविक आणि म्हणूनच अशक्य वाटेल; पण मालीच्या जन्माला गेलेल्या मातेला तें अस्वाभाविक नाहीं, अशक्यहि नाहीं.

मालीपुरतेंच सांगायचें तर मी निःसंकोचपणें सांगेन, कीं मालीच्या

अंतर्यामीं स्त्रीसहज अशा सर्व कोमल भावना उत्कट आहेत. कन्या-रूपानें लडिवाळ लीला करून तिनें आपल्या पितृगृहांत आल्हाद निर्माण केला, आपल्या लाघवी आणि गोड स्वभावानें तिनें माझ्यासारख्या वास्तविक दूरस्थाला जवळचा--अगदीं स्वकीय बनवलें; तात्यासारखा अरसिक आणि हृदयशून्य जोडीदार नशिबीं आला असतांहि त्याच्या गृहिणीची भूमिका तिनें चातुर्यानें, धिटाईनें आणि छळाला तोंड देऊन पार पाडली; आणि दिन्याच्या आईची तिची हक्काची गादी हिरावून घेतली गेली नसती तर तिनें समाजाला भूषण वाटण्याजोगा एक सत्पुत्र निर्माण केला असता. परंतु तिच्या स्त्रीत्वाचा आणि मातृत्वाचा विकास होऊं देण्याऐवजीं दुर्दैवानें चांडाळाच्या तावडींत देऊन तिच्या सर्व कोमल भावना जाळून-पोळून टाकल्या होत्या आणि म्हणूनच त्या मातृमुखांतून उद्गार निघत होते—

"आई होण्यापेक्षां वांझ राहाणंच उत्तम!"

मालीला तुम्ही आतां चांगली ओळखतां. मग हे उद्गार तिनेंच काढले असतील यावर विश्वास बसतो तुमचा? नाहीं—नाहीं, त्या मालीचे हे उद्गार नव्हेत. तात्याच्या नवरेपणाच्या वरवंट्याखालीं चेचल्या-ठेचलेल्या नि वैतागलेल्या स्त्रीचे हे उद्गार होते!

मालीची प्रकृति आतां पुष्कळशी ताळ्यावर आली होती. डॉक्टरच्या तापमापक नळींत तिच्या अंगांतला ताप दिसत नव्हता. तिच्या हृदयाची विकृति त्याच्या रबरी नळ्यांतून त्याच्या कानांत शिरत नव्हती. परंतु तिच्या पोटीं असह्य दाह होत होता, आणि तिचें काळीज एकसारखें तुटत होतें हें तिच्या चर्येवरून कुणाच्याहि नजरेस येण्यासारखें होतें. तिच्या भोक्तृत्वाची भयाणता तिला अहोरात्र भेडसावीत होती.

वैतागाच्या भरांत ती वांझपणाचे गोडवे गात असली तरी, तिच्या अंतर्यामीं मातृत्वाची जाणीव जागृत होती. आपल्या लेकराची आठवण काढून डोळ्यांतून पाणी काढलें नाहीं असा तिचा एकहि दिवस गेला नाहीं. लोकांच्या नाटकी मायेला फसून तें पोर तिला बिलगत नसलें, तरी तिची जिवंत ममता त्याला बळेंबळें कवटाळीत होती. त्याला मांडीवर घेऊन थोपटण्याचें, अंगाई गीत गाऊन त्याला निजवण्याचें, न्हाऊं-माखूं घालून आणि

कडे खांद्यावर घेऊन त्याला मिरविण्याचें सुख तिला लाभत नसलें तरी मनां-तल्या मनांत ती निरनिराळ्या स्वरूपांत त्याचें दर्शन घेतच होती आणि इळइळतहि होती.

तात्याची ती धर्मपत्नी म्हणजे घरधनीण होती आणि ती मोलाची जागा हिरावून घेऊन त्यानें तिच्यावर बटीकपणा लादला होता. तिच्या जन्मांची त्यानें केलेली ही अवहेलनाहि माली घट्ट मन करून सोशीत होती; तीं एकाच कारणाकरतां. तें कारण म्हणजे दिनूपासून दूर होणें तिच्या अपत्य-वात्सल्याला मानवत नव्हतें. स्त्रीचे प्रेमबंध कुसुमासारखे कोमल असले, तरी आपल्या प्रेमविषयाला जखडून ठेवण्याइतके बलशाली असतात हें खरेंच. मालीच्या मातृहृदयांतहि हे प्रेमबंध बलवान् होते आणि म्हणूनच इतर दु:सह यातनांची क्षिति न बाळगतां ती आपल्या बालकाला दूर सारूं शकत नव्हती.

पण हेंहि भक्कम बंधन तिला तोडून टाकावें लागलेंच ! कां बरें ?

पतिप्रेम, अपत्यप्रेम आणि आत्मप्रेम या सर्वांहूनहि स्त्रीला अधिक मोलाचें वाटणारें दुसरें एक प्रेम आहे. तें म्हणजे शीलाचें प्रेम. स्त्री त्या शीलासाठीं कोणत्याहि प्रीतिविषयाचा त्याग करील. फार काय, प्राण देईल पण शील खराब होऊं देणार नाहीं. आणि जेव्हां तात्याच्या सान्निध्यांत आपल्या शीलाला धोका आहे, असें मालीला दिसून आलें तेव्हां मागेंपुढें न पाहतां माली पति-पुत्रांचा त्याग करून घराबाहेर पडली !

तात्याची बुवागिरी भरभराटीला येऊं लागल्यावर त्याच्याभोंवतीं अनेक-विध लोकांचा घोळका जमूं लागला. अतृप्त वासनांची तृप्ति करून घेण्यास बुवाच्या मठाइतकें दुसरें योग्य स्थळ क्वचित्‌च मिळूं शकेल. भोळेखुळे लोक इच्छापूर्तीसाठीं जमतात आणि त्यांच्या भोळेपणावर आपला तळीराम गार करूं पाहणारे ठगेहि तेथें गोळा होतात. दुसऱ्याच्या भाविकतेचा स्वत:च्या सुखासाठीं कसा उपयोग करून घ्यायचा याचा वस्तुपाठ बुवाच देत असतो आणि त्या गुरुमंत्रावर ते ठगे त्या कलेंत निष्णात होतात. लोकांच्या दुर्वर्तनाकडे दुर्लक्ष केलें नाहीं, तर आपलीं पापें झाकलीं जाणार नाहींत हें बुवाजी ओळखून असतात. चोरी पचविण्यासाठीं पोलिसाची मूठ दाबावी आणि आपली मूठ चांगल्या प्रकारें दाबली जाते या आमिषामुळें

१४३

चोराच्या चोरीकडे पोलिसानें कानाडोळा करावा अशांतलीच ही देवाण-घेवाण असते. इतर बुवांप्रमाणें चांगदेवस्वामींच्या-तात्याच्या मठांतहि असाच सावळा गोंधळ चालू होता.

तात्या-मुक्तांचा प्रेमसंबंध जुनाच होता. परस्परांच्या वयरूपावरून तो ओंगळ असला तरी, अधमांच्या जगांत मंगळ-अमंगळाला विधिनिषेध थोडाच असतो ! तात्या-मुक्तांच्या या अश्लील प्रीतिव्यवहारास या नव्या भूमींत नवे अंकुर फुटूं लागले. तात्याची नजर नव्या भक्तिणीकडे वळूं लागली आणि मुक्ताबाईहि मठागत भक्तांपैकीं ढिल्या भक्तांशीं सलगी करूं लागल्या. दोघांनाहि एकमेकांचे चाळे दिसत होते, आणि त्याबद्दल तीं दोघें मनांतून चडफडतहि होतीं. पण भांडण उकरून काढल्यास आपलें बेंड फुटेल अन् छान चालू झालेल्या धंद्यांत बिघाड होईल या भयानें तीं चूपचाप राहिलीं होतीं.

वाघाचें पिलूं उपजत दूर नेलें आणि त्याला दूध-भाकरीवर वाढवलें तर तें गाईइतकेंच निरुपद्रवी बनतें. पण त्याला एकदां रक्तमांसाची चव कळली, कीं त्याचा वाघपणा जागृत होऊन तो सावजावर झडप घालूं लागतो असें म्हणतात. माणसाचेंहि तसेंच होतें. बुवाच्या मठांत शिरणारीं माणसें सुरवातीस माणसेंच असतात, पण त्यांच्यांतला पशु किंवा राक्षस तिथें जागृत होतो, त्यांना तेथें दुष्कृत्याची चटक लावली जाते. आणि एकदां चटावल्यावर तीं वाटेल तसलीं अघोर कर्में करण्याइतकीं निःसंग बनतात.

मुक्ताबाईच्या लोभांत पडलेल्या एका दुरात्म्यानें निरनिराळ्या बायांना भ्रष्टविलें. त्या नराधमाचा सावजें पकडून आणण्यांत हातखंडा होता; आणि चांगदेवस्वामींच्या मठाचा तो एक आधारस्तंभ होऊन राहिल्यानें त्याच्या इतर चाळयांबाबतींत डोळयांवर कातडें ओढून स्वस्थ बसण्यांतच तात्या-मुक्तांचें हित होतें. महंताचें भय नसल्यावर मठांत वाटेल तसा धिंगाणा तो न घालील तरच नवल ! मालीकडेहि त्या चांडाळाची पापी नजर वळली. बोलूनचालून ती सेवेकरीण म्हणून गणली गेलेली. आणि मठांत आलेली भक्तीण ही दिसायला कितीहि सात्त्विक असली तरी आपल्या जाळयांत ती अडकली पाहिजे अशी त्यानें स्वतःची ठाम समजूत करून घेतलेली, त्यामुळेंच त्यानें मालीशीं लघळपणा करायला सुरवात केली.

मालीनें प्रथम त्याच्या चेष्टांकडे दुर्लक्ष केलें; तो अतिप्रसंग करूं लागतांच त्याचा तीव्र शब्दांनीं तिनें निषेधहि केला. पण शाब्दिक निषेधाला भिण्या-इतका नरमपणा अधमाच्या ठिकाणीं कोठून असणार? तो अधिकाधिक बेताल-लच होऊं लागला. तात्याशीं उघड बोलण्याचीहि मुभा मालीला नव्हती. आणि नवरा म्हणून त्याच्याशीं बोलण्यांत तिलाहि स्वारस्य वाटत नसल्यानें, तो अबोला तिला इष्टापत्तीसारखाच वाटत होता. पण नवरा म्हणजे रक्षणकर्ता असतो स्त्रीचा. ती जबाबदारी तरी तात्या पार पाडील या आशेनें आपल्या शीलावर येऊं पाहणाऱ्या संकटाची वार्ता त्याच्या कानांवर घालण्याचें तिनें ठरविलें; आणि एके दिवशीं संधि साधून मालीनें आपल्या अब्रूवर दरोडा पडतो आहे असें त्याच्यापुढें गाऱ्हाणें घातलें.

आपल्या बायकोवर अतिक्रमण होतें याहून चीड आणणारी गोष्ट नवऱ्याला कोणती असूं शकेल? पण तात्याच्या अंगीं नवरेपणा तर राहोच, पण मनुष्य-पणाहि उरलेला नव्हता. त्या अतिप्रसंगीं नराधमाचें पारिपत्य करण्याची गोष्ट दूरच राहिली, उलट दुसऱ्यावर खोटे आळ घेण्याच्या आरोपाबद्दल आणि आपलें स्वास्थ्य बिघडविल्याबद्दल त्यानें मालीलाच दोष दिला! प्रत्यक्ष पुरा-व्यानें खात्री पटविण्याचा कुयोगहि लवकरच जुळून आला. तात्या-मुक्तांच्या छाव्या–पातळें धुऊन सोवळयांत वाळत घालण्याचें नित्यकर्म करीत असतां, चोरून मागून येऊन त्यानें मालीच्या खांद्यावर हात ठेवला. आणि योगा-योग असा कीं आपल्या अनुष्ठानाचें सोंग वठविण्याच्या तयारीनें तात्या त्याच वेळीं तिथें दाखल झाला! आपल्या बायकोच्या अंगावर परपुरुषाचा हात त्यानें प्रत्यक्ष पाहिला!

"आतां तरी झाली खात्री! पाहावतं तुम्हांला हें?" भयभीत आणि संतप्त झालेली माली तात्याला म्हणाली.

"सहज लागला असेल हात येतां–जातां. त्यांत इतकं ऊर बडवण्यासारखं काय झालं?" तात्यामहाराज म्हणाले.

तात्याचा हा निलाजरा शेळपटपणा मालीला असह्य झाला. आतां तिच्यां-तली शीलधन आणि शूर स्त्री उसळून उठली.

"लाज नाहीं वाटत तुम्हांला असले दुबळे शब्द उच्चारायला? कशाला झालांत पुरुष? आणि बायको संभाळायची कुवत नव्हती तर लग्न—"

" थोबाड फोड रंगनाथ या बेमुर्वतखोर रांडेचं ! " आपलें बिंग बाहेर पडणार या भयानें तात्या ओरडला आणि तिचा सूड उगवण्याचा हा परवाना मिळतांच तो नर–राक्षस हात उगारून तिच्या अंगावर धावला.

पण आतां माली पहिल्यासारखी अश्राप अबला राहिली नव्हती. वाघीण बनली होती त्या वेळीं ती. धुर्णी वाळत घालण्याची हातांत असलेली काठीच तिनें त्या अत्याचाऱ्याच्या डोकींत घातली आणि तो तिरीमिरी येऊन पडतांच त्याला सावरण्यासाठीं धावणाऱ्या तात्यासहि आपल्या त्वेषाचा प्रसाद देऊन ती जी बाहेर पडली, ती पुनः त्या नरकांत परत आलीच नाहीं. लज्जारक्षणापुरतीं दोन लुगडीं तेवढीं तिनें घेतलीं. तात्यानें थाटलेल्या त्या विलासमंदिरांतून शेंपन्नास रुपयांचा ऐवज लांबवून महिना–पंधरा दिवसांची आणि आमच्या घरापर्यंतच्या वाटखर्चाची तरतूद तिला करतां आली नसती असें नाहीं. पण तिला त्या पाप्याच्या पैशाचा संपर्कहि नको असें वाटलें म्हणा, किंवा त्या वेळीं तिची सारी विचारशक्तीच नष्ट झाली होती म्हणा, ती अक्षरशः अंगावरच्या वस्त्रानिशीं घराबाहेर पडली !

आपणांस कुठें जायचें, काय करायचें याची उमकाच तिला राहिली नव्हती. वावटळींत सापडलेल्या पाचोळ्यासारखी तिची अवस्था झाली होती. पाय नेतील तिकडे ती चालली होती. झुरळासारख्या साध्या प्राण्याला बुझणारी आणि वाऱ्याच्या साध्या सळसळीला भिणारी तिची स्त्रीसहजभीरुता त्या वेळीं कुठें गेली कुणास ठाऊक ! ती बेडरपणें जमीन तुडवीत चालली होती ! आपला पाठलाग होईल आणि आपल्याला परत पकडून नेतील म्हणून शक्य तों आडरस्त्यानें आणि अंधारांतून तिचा प्रवास चालू होता. तिची सत्त्वपरीक्षा पाहण्यासाठींच कीं काय पण त्या थंडींच्या दिवसांत पावसाळी वातावरण निर्माण झालें होतें ! सोसाट्याचा वारा आणि पावसाच्या सरीवर सरी तिला झोडपून काढीत होत्या !

निसरडीपर्यंतची मजल मालीनें कशीबशी संपवली. आणि तिला बसकण घेणें भागच पडलें. उपास, थकवा आणि निसर्गाच्या आघातामुळें तिच्या शरीरावर झालेला परिणाम, यामुळें माली तिथें निपचित पडली आणि तिच्या आयुष्याची दोरी बळकट होती म्हणूनच तिची–आमची भेट होऊन तिला औषधोपचार करतां आले.

मालीची ही सर्व हकीकत ऐकून घेतल्यावर ती संतापानें म्हणाली— " आणखी एकदां रजा घ्या आणि चाचडीला जाऊन त्या मेल्याचं चांगलं कांडात् काढा. त्याच्या महाराजपणाचा पापुद्रा फाडून टाकून त्याच्या आंतला राक्षस उघडा करा. त्याच्याबरोबर त्या अवदसेचीहि करा फजिती. वाटलं तर पोलीस घेऊन जा बरोबर. त्या मेल्यांना तुरुंगांत गाडण्यासारखे गुन्हे आहेतच त्यांचे. आणि त्यांची खोड मोडल्यावर दिन्याला या घेऊन इकडे. राहतील मायलेकरं सुखांत. "

"नको दादा, त्यांना प्रायश्चित्त देण्याकरितां सुद्धां त्यांच्या आजूबाजूस फिरकूं नका. त्यांच्या दुष्टपणाचीं जाळीं फार दूरवर पसरलेलीं आहेत. तुम्हांला कल्पनाहि नाहीं यायची त्यांची. चांगदेवस्वामींच्या मठांत भिल्लासारखे धाडसी आणि पोलिसासारखे उलट्या काळजाचे लोक गोळा होतात. आणि त्यांच्या सहकार्यानं कसल्याहि अघोर गोष्टी घडून बेपत्ताहि होतात. मंगलदास नांवाचा एक सज्जन सावकार तिथं बघतां बघतां नाहींसा झाला. "

" तो कसा ! " मीं आश्चर्यानें विचारलें; आणि मालीनें तात्या-चरित्रां-तला एक नवाच अध्याय आम्हांला ऐकविला तो असा—

चांगदेव आणि योगेश्वरीदेवीच्या भगवद्भक्तीचा बोलबाला झाला आणि त्यांच्या वाचासिद्धीचीहि प्रसिद्धि झाली. अशा दैवी मंडळींच्या दर्शनाचा लाभ घेण्याची उत्कंठा भाविक लोकांना लागावी हें साहजिकच होतें. मंगलदास नांवाचे वयस्क गुजराती गृहस्थ आपल्या पत्नीसह तीर्थयात्रेला निघाले होते. चांगदेवस्वामींची भगतमंडळी त्यांना प्रवासांत भेटली आणि त्यांनीं चाचडीस जाऊन सत्पुरुषदर्शन घेण्याचा शेटजींना आग्रह केला. मंगलदासांनीं तो आग्रह मनावर घेतला नाहीं तरी कपिलाबाईना चाचडीची ओढ लागल्यावांचून राहिली नाहीं. आणि त्यांनीं शेवटीं आपलें म्हणणें खरें करून घेतलें.

मंगलदास आणि कपिलाबाई यांच्याविषयींची माहिती त्यांच्या आग-मनाआधींच चाचडीस येऊन थडकली होती. अशा गोष्टींत बुवांचे हस्तक मोठे वाकबगार असतात. मंगलदासजींच्या पहिल्या भेटींतच चांगदेस्वामींनीं प्रश्न केला—

"अहमदाबादच्या गिरणींत बसवणार आहां ती नवी यंत्रसामुग्री आली का अमेरिकेंतून ?"

या प्रश्नानें शेठजी चकित होऊन गेले. आपण अहमदाबादेहून आलों हें स्वामींना कसें कळलें, आणि आपली तिथें गिरण आहे याचें तरी ज्ञान त्यांना कसें असावें ! नुसत्या गिरणीचेंच नव्हे तर आपण मागविलेल्या यंत्र-सामुग्रीचेंहि त्यांना ज्ञान आहे आणि योगसामर्थ्यावांचून ही गोष्ट होणें नाहीं असें त्यांचें मन त्यांना सांगू लागलें. मंगलदासचा मासा धूळ–भेटींतच तात्याच्या गळाला लागला !

आणि तितक्याच चपलतेनें योगेश्वरीदेवींनीं कपिलाबाईचीहि शिकार केली. देवींनीं बाईस विचारलें—

"तुमच्या मृदुलाबेनच्या मुलाचं नांव कान्तिलाल ठेवलंत ना ? छोकरा मोठा भाग्यशाली होणार आहे तो. नवकोट नारायण होणार तो खचित !"

योगेश्वरीदेवीचें अन्तर्ज्ञान आणि भविष्यकथन यांनीं कपिलादेवी पुरेपूर भारली गेली आणि चाचडीचें एक दिवसाचें वास्तव्य तीन दिवस लांबवून अन्नसंतर्पण, महापूजा, गुरुदक्षिणा यांच्यापायीं आपल्या पतीला शें–पांचशें रुपये खर्च करावयासहि लावलें तिनें. धर्मशाळेसाठीं हजार दोन हजारांचा गंडा त्यांना घालावा असा तात्या–मुक्तांचा डाव होता, पण त्या वेळीं तो साधला नाहीं. अधिक घासाघीस केली तर आपल्या विरक्त वृत्तीला ती शोभून दिसणार नाहीं हें ओळखून स्वस्थ राहण्याचें त्यांनीं ठरविलें. पण तात्या अंतर्यामीं असंतुष्ट होता आणि अधमांची असंतुष्टता हें सज्जनांवरील गण्डान्तर असतें.

तात्याची असंतुष्टता मंगलदास-कपिलाबाईंना भोंवलीच ! त्यांचा आशीर्वाद आणि प्रसादाचा नारळ घेऊन हें जोडपें मार्गास लागलें. चाचडीपासून स्टेशनपर्यंतचा प्रवास बैलगाडीचा आणि उण्या-पुऱ्या २० मैलांचा. प्रयाणास मुहूर्त तिसरे प्रहरापर्यंत निघूं शकला नाहीं आणि त्याआधीं चांगदेवस्वामींचा आणि योगेश्वरीदेवीचा निरोपाचा नारळहि मिळूं शकला नाहीं. मंगलदासांना चाचडी सोडायला तीन साडेतीन झाले, आणि सातपुड्याच्या पायथ्याशीं येईपर्यंत अंधार पडला. तिथल्या भिल्ल वस्तींत रात्र काढून सकाळीं पुढें जाण्यावांचून दुसरा उपाय राहिला नाहीं. आणि आश्चर्य

हें कीं, त्या धनिक दंपतीचें पुनः कोणास दर्शनहि झालें नाहीं! कुणी म्हणतात भिल्लांनीं रात्रीं त्यांना लुटलें, कुणी म्हणतात त्यांना त्यांनीं सदेह समाधि दिली! चार दिवसांनीं कपिलाबाईच्या गळ्यांत होता तसला मोत्यांचा सर आणि मंगलदास पांघरत होते तसली शाल मालीनें मठांत पाहिली आणि सहकुटुंब दर्शनास आलेल्या पोलीस इन्स्पेक्टरना गुरुप्रसाद म्हणून ते जिन्नस देण्यांत आले!

हे असले चमत्कार पाहिलेले असल्यामुळें माली कोणत्याहि कारणासाठीं मला तिकडे जाऊं देत नव्हती. तिला न कळत मी तिकडे जाईन आणि नसतें संकट स्वतःवर ओढवून घेईन या भयानें ती मला म्हणाली—

"दादा, हातावर हात मारून शप्पत द्या मला मी तिकडं फिरकणार नाहीं अशी. येऊन जाऊन माझ्या सुखासाठींच ना तुमची सारी खटपट? पण दादा, माझी सुखाची आशाच मरून गेलीय आतां. माझ्या संसारसुखाची विसकटलेली घडी पुनः जशीच्या तशी बसवणं माणसालाच काय, पण ब्रह्म-देवालाहि अशक्य आहे. येऊन जाऊन पोरासाठीं जीव ओढतो. वाटतं, आलंय पोटाला तर ध्यावं जवळ आणि फिरवावा हात पाठीवर! आलीच कधीं दैवाला दया, तर येईल तोहि योग! आणि नसलंच माझ्या नशिबांत तर तुमच्या हाताला तरी थोडंच यश यायला बसलंय?"

असें म्हणून मालीनें तिच्या खांद्यावर मान टेकली आणि त्यासरशीं तिनेंहि मालीच्या पाठीवर हात फिरविला. त्या वेळीं शब्दांना अवकाशच राहिला नव्हता. शब्दोच्चारावांचूनहि मालीच्या हृदयवेदना प्रकट होत्या आणि त्यांची आग शमवण्यासारखे शब्द तिलाहि सुचत नव्हते. माली हुंदक्यांनीं आपली असाह्यता निवेदित होती आणि वत्सल हस्तस्पर्शानें ती बिचारीचें सान्त्वन करूं पाहत होती.

मला तें दृश्य बघवत नव्हतें आणि बघितल्यावांचून राहवतहि नव्हतें. आम्ही तिघें एकमेकांकडे पाहण्यास भीत होतों. दुसऱ्याच्या सहानुभूतीच्या दृष्टीनें आपलें दुःख उचंबळून येईल अशी तिघांनाहि भीति वाटत होती.

किती तरी वेळ याच स्थितींत गेला. शेवटीं ती स्तब्धता दुःसह होऊन ती म्हणाली—

" किती मनाला लावून घेतेस मालूताई ? पापाविना प्रायश्चित्त मिळतंय तुला. पण ही चूक आज ना उद्यां देवाला उमगेल आणि करील तो तुझ्या छळवादाची भरपाई. "

" भरपाई करायच्याऐवजीं मिळालेलीं सुखंहि हिरावून घेतोय् तो देव. नाहीं तर सगुणी कां गेली असती दूर ? "

आपल्या दुःखांतून मालीचें मन बाहेर काढण्यास सगुणेची गोष्ट निघाली याचें मला समाधान वाटलें आणि मीं म्हटलें—

" हो खरंच. सांग बघूं माले, तें सगुणा–आख्यान काय आहे तें ? "

" काय आख्यान असायचंय दादा ? राक्षसांच्या गोष्टींत यज्ञयागाचा विध्वंस, तपश्चर्येला विरोध आणि दुर्बल जीवांचा छळ हेंच असायचं. पुराणांतल्या या राक्षसांचा दांडगावा मोडायला देवाचे अवतार होते. पण आतांच्या राक्षसांचा पुंडावा तेवढा चालतो आणि त्यांना शासन करणारे देव बसलेत दडून. "

अशी प्रस्तावना करून मालीनें सगुणाख्यानास प्रारंभ केला —" मागें ' संस्कृति ' पत्रांत प्रसिद्ध झालेली हकीगत अर्धी खरी आहे. सगूचे आई-बाप आकस्मिकपणें वारले आणि ती उघडी पडली ही गोष्ट खोटी नाहीं. मात्र ती अगदीं निराधार होती हें मात्र खरं नव्हे. तिचा बाप गरीब असला, तरी अगदीं कंगाल नव्हता. थोडीशी शेतीवाडी आणि कांहीं किडुक मिडूक त्याच्यापाशीं होतं. तें विकून हजार बाराशें रुपये आले होते आणि ते कोर्ट ऑफ वार्ड्सकडे मुलीच्या नांवावर जमा होते.

" पण एवढ्या पुंजीवर त्या पोरीच्या जन्माची सोय थोडीच लागणार होती ? लोकांच्या औदार्यावर थोडा तरी भार घालणं अवश्यहि होतं. म्हणून एखाद्या अनाथालयास ती मुलगी आणि तिचा ऐवज देऊन टाकण्याचा बेत अधिकाऱ्यांनीं योजला आणि वरिष्ठांची मान्यता मिळवण्यासाठीं प्रकरण रवाना झालं.

" एका भगतगणाकडून तात्याला ही वार्ता कळली. त्या मुलीस आपल्या ताब्यांत घेण्यास एका मिशननं मान्यताहि दिली होती. अशा संधीस योगेश्वरीदेवी आणि चांगदेवस्वामी सगुणेला संभाळण्याचं आणि शिकवून संवरून तिचं लग्न करून देण्याचंहि मान्य करून आलीं. विधर्मीयांपेक्षां

स्वधर्मी पालक बरे असं अधिकाऱ्यांना वाटलं आणि मुलगी यांच्या स्वाधीन करण्यांतहि आली. खर्चाचं योग्य कारण दाखवल्यावर जरूरीप्रमाणं शिलकेंतले पैसे दिले जातील व तिच्या अन्नवस्त्रासाठीं व्याज यांना मिळेल असं सरकारांत ठरलं. ”

“ पण माले, आपलीं बायकापोरं उपाशी मेलीं तरी ज्याच्या हृदयाला पाझर फुटायचा नाहीं, त्या तात्याला ही अनोळखी आणि भिकारड्या पोरीची दया आली तरी कशी ? ”

“ पण दया आली म्हणून त्यांनीं ही गोष्ट केली असं तुम्ही कशावरून म्हणतांय् वैनी ! त्यांनीं आपल्या फायद्यासाठीं हा सौदा केला. बायको करायची ती फायद्यासाठीं, सुखी संसारासाठीं नव्हे. मूल संभाळावयाचं तें सुद्धां अपत्यप्रेमासाठीं नसून दत्तावताराचा बाजार मांडायसाठीं. ही ज्यांची नीति, त्यांची भूतदयासुद्धां स्वार्थसाधनासाठींच असणार आणि सगूला संभाळायला आणण्यांत यांनीं आपला स्वार्थ भरपूर साधून घेतला. वर्तमानपत्रांना कांहीं तरी खाद्य हवंच असतं. आपल्या पक्षाच्या धोरणाशीं जुळता विषय आला, कीं त्यांत फार खोल न शिरतां वरवरच्या माहितीवर भडक लेख लिहिण्यांत आपण फार मोटी लोकसेवा करतों असं त्यांना वाटतं. ‘ संस्कृति ’ पत्र हिंदुसभावादी, अनाथ हिंदु मुलगी आणि तिच्याबद्दल मिशनची मान्यता—एवढ्या भांडवलावर संपादकांनीं तो लेख लिहिला. मिशनऱ्यांचा काळेपणा उठून दिसण्यासाठीं त्यांना चांगदेव-योगेश्वरीचा स्वच्छपणा समजावून दाखवावाच लागला. त्यांनीं ती साहाय्याची मागणी केली तिचा परिणाम छान झाला. कुणी पैसे पाठवले, कांहींनीं साडी-चोळी पाठविली. फीसाठीं, पुस्तकांसाठीं, अशा बहुविध कारणांसाठीं मठांत देणग्यांचा पाऊस पडूं लागला.

“ देणग्यांची आवक मंदावतेशी वाटल्यास चांगदेवस्वामी ‘संस्कृति’च्या संपादकांकडे गाऱ्हाणें गात; आणि ते लगेच नवा लेख खरडून भाविकांच्या दयाबुद्धीला चालना देत. चांगदेवस्वामींनीं संपादकांना इतकें भारून ठेवलें होतें, कीं त्यांची कोणतीहि अडचण वेशीवर टांगण्यास ‘संस्कृति’ पत्र सदैव सज्ज होतें. ‘ संस्कृति ’ कारांना निरनिराळ्या निमित्तांनीं चाचडीस आणवून, त्यांना प्रसाद, महावस्त्रादिक देऊन, त्यांच्या पत्नीला व मुलीला लुगडीं-

साड्या नेसवून स्वामींनीं आणि योगेश्वरीदेवींनीं संपादकांना मिंधं करून ठेवलं होतं आणि म्हणूनच ' संस्कृति ' पत्र चांगदेवस्वामींच्या सेवेशीं सदैव सज्ज होतं.

" दादा, सगुणा मठांत आली तेव्हां तिच्याबद्दल मला भीति वाटली, तसा आनंदहि वाटला. आनंद येवढ्यासाठींच, कीं तिची वेणी–फणी करायची आणि तिला न्हाऊं–माखू घालण्याची संधि मला मिळूं लागली. सगुणा कुणाचाहि—यांच्यासारखीं माणसं वगळून—जीव जडावा अशीच मुलगी होती. सदा हसतमुख आणि लाघवी. तिला जवळ घेतांना मला वाटायचं बरं का वहिनी, पोटच्या पोराचं सुख मला लाभत नाहीं, त्याची भरपाई करण्यासाठींच देवानं ही पोरटी मला आणून दिली. सगुणा मठांत आली आणि ती माझ्याशीं अगदीं मनमोकळेपणानं बोलूं लागली तेव्हां मला कित्ती कित्ती हर्ष झाला म्हणतां! आतांशा देवाच्या दयाळूपणावरचा माझा विश्वास पार उडाला होता आणि मी त्याचं नांवच टाकलं होतं. पण सगुणेच्या भेटीदिवशीं मी देवाचे आभार मानले आणि त्या दिवशीं मीं देवाला नमस्कार करून मनांतल्या मनांत म्हटलं, ' देवा, ही मुलगी तरी वागूं दे माझ्याशीं ममतेनं. ' "

स्त्री-हृदयांतील मातृभावना किती उत्कट असतात! स्वतःच्या अपत्यानें त्यांची तृप्ति झाली नाहीं, तर भेटेल त्या बालकावर प्रेमवृष्टि करून त्या आपलें समाधान करून घेण्याचा कसा प्रयत्न करतात, हें मालीच्या वरील उद्गारांवरून मला समजून आलें. मीं विचारलें—

" मग पुढं काय झालं माले? "

" काय व्हायचं? सगुणेचा सहवासहि मला दीड-दोन वर्षांहून अधिक काळ लाभला नाहीं. "

" म्हणजे! काय झालं तिचं? "

" मला तरी काय ठाऊक काय झालं तें! जशी ती अवचित मठांत आली तशीच एके दिवशीं ती अवचित अदृश्य झाली! "

" अग पण तूं चौकशी नयेस कां करूं? "

"पुनः पुन्हा माझ्या क्षुद्रपणाची जाणीव कशाला करून देतांय् वैनी!" माली त्वेषानें आणि उद्वेगानें उत्तरली, "मला त्या मठांत तोंड उघडायलाहि

परवानगी नव्हती हें सांगितलं नाहीं का मीं तुम्हांला ! आणि समजा, मीं आज्ञाभंग करून कांहीं विचारलं असतं तर मला उत्तर मिळालं असतं का सरळ! मालकाची बायको म्हणून मान मिळायचं राहिलं बाजूलाच, पण साधं माणूस म्हणून माझी गणना करायला तयार नाहींत ते ! एके दिवशीं दर्शनाला आलेल्या माणसांत एक बाई कुठंतरी पाहिल्यासारखी वाटली म्हणून ‘ ती कोण, कुठली ’ हें विचारलं मीं मुक्ताबाईला. तिनं मला माहिती तर सांगितली नाहींच, पण एक एक डोळा एवढाला केला माझ्या चौकसपणाबद्दल ! एवढ्यावरच भागलं असं नका समजू वैनी तुम्ही. मी आल्या-गेल्याकडे पाहतें ती वाईट हेतूनंच पाहत असलें पाहिजे अशी कागाळी केली तिनं. आणि माझ्या परमेश्वरांनीं मला समोर बोलावून ताकीद दिली ‘ पुनः जर करतां असं कांहीं दिसलं तर डोळे काढून टाकीन. ’ वैनी तुमची माली दोन्ही डोळ्यांनीं अजून धड राहिलीय हें तिचं नशीब. ”

माली बोलतां बोलतां थांबली, मनांत ठेवलेला अपमान जनांत सांगण्या-सारखी कठोर आपत्ति नाहीं. ही आपत्ति आज पोरीवर आली होती. कां येऊं नये मग तिचा गळा दाटून ?

“ तात्याच्या तावडींतून सगुणा सुटली हें भाग्यच म्हणायचं पोरीचं ! नमी-मालीसारखे तिचे धिंडवडे नाहीं केलेन् तिचे. हो, घ्या काय केले असतेन् तर ? ”

कांहींतरी बोलायचें म्हणून मी बोललों. आणि आतां हा विषय अधिक लांबवल्यास मालीचा मनस्ताप वाढेल या भयानें मी ती बैठक संपवून दुसऱ्या उद्योगास निघून गेलों.

पण मालीचें दैवच खडतर ! तिचा मनस्ताप चुकवण्याचा माझा प्रयत्न यशस्वी झाला नाहीं. घराबाहेर पडून मी पांच-पन्नास पावलें गेलों नाहीं, इतक्यांत समोरून येणारा एक टांगा माझ्यापुढें उभा राहिला. टांगेवाला माझ्या ओळखीचा होता. तो म्हणाला—

“ दादासाब, आपल्याकडे पावणं आल्यात ह्ये. ” आणि टांग्यांतील गृहस्थांकडे वळून तो म्हणाला, “ येच्याकडंच उतरायचं हाय आपल्याला. ऱ्ये म्होरं पिवळ्या माडीचं घर दिसतंया, तितंच. ”

ते गृहस्थ खालीं उतरले. नमस्कारांची देवघेव झाली. ते म्हणाले—

" वऱ्हाडांतून आलोंय मी. माझं नांव कांचनराव इनामदार. उमरावतीचे नाना जोशी यांनीं पत्र दिलंय आपल्याला. " त्यांनीं माझा स्नेही नाना यांचें पत्र मला दिलें. तें ओझरतें पाहून मीं म्हटलें—

" चला ना घरीं ? बरं झालं, नानांच्या निमित्तानं आपली भेट झाली. नाहींतर आपला आमचा संबंध कशानं यायला बसलाय ? "

असें स्वागत करून मी त्या गृहस्थांसह घराकडे वळलों. टांगा मागून येत होता. टांग्यांतील मुलीवरून मी अंदाज केला, कीं ही वरसंशोधनाची मोहीम असून वधूपक्षाचा तळ आमच्या घरीं पडणार आहे. वधू-प्रदर्शनासाठीं आपणांस कांहीं ठिकाणीं मिरवावें लागणार आहे आणि कांहीं नवरदेवांना त्यांच्या मित्रपरिवारासह चहा–शिऱ्याचा नैवेद्यहि दाखवावा लागणार आहे.

आम्ही टांगेवाल्यास सामान आंत आणायची सूचना देऊन त्या मुलीसह घरांत गेलों. माझा आवाज ऐकून मी इतक्या लवकर परत कसा आलों या आश्चर्यानें माली व ती दोघीहि बाहेर आल्या. माझ्याबरोबर अनोळखी पाहुणे असलेले पाहून ती सोप्यावरून माजघरच्या दारांत जाऊन उभी राहिली. माली माहेरवाशीण. तिला इतकें भिण्याची आवश्यकता नव्हती. ती तिथेंच उभी राहिली आणि बरोबरच्या मुलीकडे दृष्टि जातांच ती उद्गारली—

" अगबाई ! तूं सगुणा ! ! "

त्या मुलीनेंहि तो ओळखीचा आवाज ओळखला आणि तिला माली दिसतांच—

" तुम्ही ! तुम्ही कशा इथं ! तुम्ही मेलां असं सांगितलं मला मांगदेवस्वामीनं आणि त्या राक्षसणीनं " असें म्हणून ती मालीला जाऊन बिलगली.

" किती किती आनंद झाला मला तुम्हांला बघून " असें म्हणून तिनें मालीच्या खांद्यावर मान टेकली आणि तिच्या डोळ्यांतून अश्रुप्रवाह सुरू झाला.

सगुणा आणि मालीचा तो प्रीतिसंगम मला मोठा हृदयंगम वाटला आणि तो पाहून माझ्याहि डोळ्यांत अश्रु उभे राहिले. त्या वेळचे माझे अश्रु हे आनंदाश्रु होते.

पाहुण्यांना चहापाणी दिलें आणि त्यांचें चहाप्राशन चालू असतां आमचें बोलणेंहि सुरू झालें. बोलण्याचें काम पाहुणेच करीत असल्यामुळें ' होय का? ' ' वा! ' ' हो ' असल्या शब्दांपलीकडे मला जावें लागत नव्हतें.

" नवस फेडायला आणि कुळाचार पाळायला अशा दुहेरी कारणासाठीं आलोंय इकडे. इथून जवळच बाळिंद्रगड आहे, त्यावर खजूराई नांवाची देवी आहे. लग्नकार्य झाल्यावर तिचं दर्शन घ्यायचा रिवाज आहे आमच्या घरीं. " अशी सुरुवात त्यांनीं केली.

मला वाटत होतें ते दुसऱ्या कोणाच्या तरी लग्नाबद्दल सांगताहेत. पण लवकरच खरा प्रकार कळून चुकला. त्या महाभागांनीं स्वतःचेंच तिसरें लग्न करून घेतलें होतें आणि तेंहि आपली नात शोभेल अशा सगुणेशीं !

मला चीड आली त्या माणसाची. वाटलें कीं त्याची मानगूट धरावी आणि चांगले धक्के देऊन त्याला घराबाहेर हाकलून द्यावें.

पण मी शिष्ट समजला जात होतों ना ? आणि स्वतःहि तसेंच समजत होतों. म्हणून तो आडमुठेपणा मला करतां आला नाहीं. अपराध्याला शासन करण्याच्या कामीं आमचा हा शिष्टपणा किती नेभळट होतो ! त्याहून रान-गटच बरे नाहींत का? पाप दिसायची फुरसत, प्रायश्चित्त द्यायला सज्ज झालाच त्यांचा हात ! मी माझ्या त्या दुबळ्या शिष्टपणाला धिक्कारीत त्या बुड्ढ्या नवर-देवांची स्वयंवरकथा ऐकूं लागलों—

घरीं खूप पैसा आहे. दोन बायका मुलावांचून मेल्या. आतां वय झालें, नवी बायको तरी कशी मिळणार ? पुनर्विवाहाचें पाप कांहीं आपल्या हातून व्हायचें नाहीं. तेव्हां एखादा पोरगा दत्तक घ्यावा कीं काय असा विचार यायला लागला डोकींत. हा विचार चालू असतांच चाचडीला जाऊन चांग-देवस्वामींचें दर्शन घ्यायचा योग आला. त्याला पाहतांच महाराज म्हणाले,

" लग्नाची अक्षत द्यायला आलां वाटतं ? "

हे गृहस्थ उत्तरले, " आतां कशाचं लग्न महाराज ? कोण मुलगी देईल आतां मला ? "

" मिळविणाऱ्याला मिळतं. फुकटांत मिळण्याची वाट पाहत बसेल तो फसेल. " चांगदेव म्हणाले.

" पैशाचा प्रश्न नाहीं महाराज. " या गृहस्थांचें आश्वासन.

" तुम्हांला धर्मपत्नी मिळेल " स्वामींचा आशीर्वाद. " आणि दत्तक मुलापेक्षां औरस मुलाचीच योग्यता अधिक " असा वेदान्त !

योगेश्वरीदेवींनीं तर दर्शन होतांच म्हटलें—" तुमची बायको गौरीहर पूजायला बसलीय बरं का ! "

या साक्षात्कारानें आपणास केवढा तरी धीर आला. वर्ष सहा महिन्यांत आपली बायको आपल्या पायानें चालत आली. महाराजांच्या मठांत कांहीं दिवस जवळ बाळगून महाराजांनीं तिची परीक्षा केली. योगेश्वरीदेवींनींहि तिचीं पूर्वीचीं पापें नाहींशीं केलीं आपल्या योगबळानें. आणि एके दिवशीं ध्यानीं–मनीं नसतां महाराज आपल्यापुढें दत्त ! त्यांनीं हें कन्यादान आपल्या हातीं दिलें ! आणि वर्षाच्या आंत बारशासाठीं येऊं असा आशीर्वाद देऊन निघून गेले. या गुरुकृपेबद्दल पांच हजार रुपये दिले त्यांना योगमंदिर बांधायसाठीं आणि बायकोच्या नावें सरकारांत असलेले पैसेहि त्यांनाच टाकले देऊन. इत्यादि हकीकत ऐकून त्या अजागळ श्रीमंताच्या मूर्खपणाबरोबर तात्याचा हलकटपणाहि मला कळून चुकला.

मालीच्या कुशींत तोंड खुपसून सगुणा मांगदेवस्वामीला लाखोली वहात होती !

' हा चांगदेव नव्हे, मांगदेव आहे मांगदेव ! ' हे तिचे उद्गार माझ्याप्रमाणें तिच्या पतिदेवाच्याहि कानांवर आले तेव्हां ते तिला दटावू लागले—

" गुरुमाऊलीला अपशब्द बोललेलं खपायचं नाहीं मला. "

डिवचलेल्या नागिणीसारखें फुस्कारून सगुणा उद्गारली—

' तुम्ही बसा त्या माउलीची जपमाळ घेऊन. तुम्हांला पावलीय ती. माझा गळा कापलाय त्या चांडाळानं. मी शब्दाचाच नव्हे, तर खेटराचाहि चोप देईन त्याला संधि आली तर. '

सगुणापति थंड पडले तो अवतार पाहून.

' उद्यां सकाळीं निघायचं इथून. ' त्यांनीं अमळशानें सूचना केली.

"महिनाभर मुळींच निघायची नाहीं मी इथून. मग आहेच सारा जन्म तुमच्या घरीं रडत बसायचं."

मालीसाठीं सगुणा आणि सगुणेसाठीं तिचे यजमान यांना घरीं ठेवून घेण्यांत मला एक प्रकारें समाधान वाटत असलें तरी एक प्रकारें फजीती झाल्यासारखेंहि वाटत होतें. कोणत्या का निमित्तानें होईना, तात्या आपल्यावर हल्ला चढवतो आहे आणि आपण त्याच्या अतिक्रमणापुढें मुकाट्यानें मान वाकवतों आहे असा मला भास होत होता !

# तात्याचा त्याग-मालीचा लाभ

मी आतांपर्यंत तात्याच्या वाटेस गेलों नव्हतों, तें केवळ मालीच्या विरोधामुळेंच गेलों नव्हतों असें नव्हे. तर त्याला खोड्यांत अडकवण्याच्या कामीं मला यश येण्याची आशा नव्हती म्हणून. येऊन जाऊन माझ्यासारख्यांचें शस्त्र म्हणजे कायदा. पण त्या शस्त्राचा प्रहार तात्याला घायाळ करूं शकणार नाहीं असें मला दिसून आलें होतें. ठकबाजी, वेषान्तर, नामपालट, लूट, घातपात इत्यादि त्याचीं ब्रदकर्में आम्हांला कळून आलेलीं असलीं तरी कायद्याच्या कुंपणांत तीं अडकूं शकत नव्हतीं! त्यानें आपणांस गंडवलें आहे अशी फिर्याद त्याच्याविरुद्ध नोंदली गेली नव्हती; नामपालट आणि वेषान्तर या गोष्टींनीं लोकांस फसवून त्यांना लुबाडण्याचाच त्याचा हेतु आहे हें सिद्ध कशावरून करायचें? महंतदीक्षा घेतल्यावर तदनुरूप नवें नामाभिधान सर्वच घेतात, तसें तात्या-मुक्तांनीं घेतलें यांत गुन्हा काय झाला? अज्ञान मुलीचें उतारवयाच्या नवऱ्याशीं त्यानें लग्न लावून दिलें, ही गोष्ट लोकांत निंद्य ठरेल कदाचित्! पण, तो कायद्याच्या दृष्टीनें गुन्हा कोठें होऊं शकतो? मुलामुलीचें लग्न अमुक वयाच्या आंत होतां कामा नये असें कायदा दटावतो, पण वधूवरांच्या वयांत रास्त अंतर किती असलें पाहिजे ही अत्यावश्यक गोष्ट त्याच्या हिशेबांत येत नाहीं! त्यामुळें चौदा वर्षें उलटलेली छोकरी चौऱ्यांयशी वर्षांच्या बुड्ढ्याची बायको होऊं

शकते किंवा पन्नाशीच्या घरांत गेलेली आजीबाई वीस वर्षांचा छोकरा नवरा म्हणून स्वीकारूं शकते. त्यांना कायदा विरोध तर करीत नाहींच; पण त्यांच्या विवाहावर मान्यतेचा शिक्का मारण्याइतका निलाजरेपणा त्याच्या ठिकाणीं असतो! सगुणा आणि कांचनरावांच्या विवाहाविरुद्ध तक्रार करण्याला जागाच नव्हती; आणि जरी ती केली असती, तरी तात्यानें सांगितलें असतें, ' या निराधार आणि निर्धन पोरीस असा लक्षाधीश नवरा मिळवून देण्यांत मीं तिचें कल्याण साधलें आहे. ' रुपये, आणे, पैच्या हिशेबानेंच आयुष्यांतील सुख:दुखें मोजायचीं झालीं तर तात्याचा हा कोटिक्रम बिनतोडच होता!

तात्याला कांहीं ना कांहीं तरी प्रायश्चित्त दिलें पाहिजे असें मला वाटत होतें आणि त्या बाबतीत मीं माझ्या कांहीं माहितगार मित्रांचें मत विचारलें, तेव्हां मला वरील प्रकारचीं निरुत्साहकारक उत्तरें मिळालीं! मग मी ' लेकाच्या पापांचा घडा भरेल, तेव्हां बसेल आपोआप थप्पड ' अशा दुबळ्या वेदान्तानें मनाची समजूत घातली आणि स्वस्थ बसलों.

नाहीं म्हणायला दिनूचा ताबा मिळविण्याच्या बाबतींत आलें तर यश येईल अशी थोडीशी आशा माझ्या वकील मित्रांनीं मला दाखवली होती. त्याच्यावर लादण्यांत आलेल्या दत्तावताराचा आरोप हा खोटा आहे आणि त्या अवतार-कल्पनेनें तात्या त्याच्या शिक्षणाकडे आणि विकासाकडे लक्ष देत नाहीं. या सबबीवर त्याची आई व खरी हिंतचिंतक म्हणून माली त्याचा ताबा मागूं शकेल, एवढेंच नव्हे तर स्वतःच्या चरितार्थाचा आणि मुलाच्या पालनपोषणाचा खर्चहि त्याच्याकडून मिळवूं शकेल असा सल्ला मला मिळाला होता.

मी ही गोष्ट मालीला सांगितली तेव्हां तिलाहि ती पटली. तात्याविषयीं प्रेम वा आदरभाव यांचें नांवसुद्धां तिच्या मनांत उरलें नव्हतें आणि त्याची वादी म्हणून कोर्टांत जाण्याची तिला दिक्कत वाटत नव्हती. आपलें लेकरूं कोणत्याहि मार्गानें आपल्या स्वाधीन झालें तरी तिला पाहिजे होतें.

पण वकिलांच्या विद्वत्तेला आणि आईच्या भावनेला न दिसणाऱ्या अडचणी एका साध्यासुध्या स्त्रीला–तिला–दिसल्या! ती म्हणाली—

" तुम्ही म्हणतांय तें सारं खरं पण तुम्ही तात्यावर जे आरोप करणार आहां ते तो तुमच्यावरच उलटवणार नाहीं कशावरून? त्याच्या भलेपणा-

विरुद्ध तुम्हीं ओरड केली तर तोहि गप्प बसेल होय ! माली ही वाईट चालीची बाई आहे, तिच्या दुर्वर्तनामुळं आपण तिला हाकलून लावली आहे, आणि म्हणूनच ती आपल्या चांगुलपणाविरुद्ध खोटे आळ घेते आहे असं तो म्हणेल. मालीची वाईट वागणूक सिद्ध करायला तो आपल्या भगतगणांतले शेंकडोंशें साक्षीदार उभे करूं शकेल. तिचीं दुष्कृत्यं आपण डोळयांनी पाहिलीं असं ते शपथेवर सांगतील. त्याचप्रमाणें तिला आपलं वर्तन सुधारण्याबद्दल तात्यामहाराजांनीं परोपरीनं उपदेश केल्याचा निर्वाळाहि ते देतील. खटल्याचा निकाल काय लागायचा तो लागेल. पण त्याआधीं मालीच्या अब्रूचे हे धिंडवडे—"

"पुरे, पुरे वैनी, मला मुलगा नको, पोटगी नको, कांहीं म्हटल्या कांहीं नको त्यांच्यापासून." आपल्या बेअब्रूला भ्यालेली माली उद्‌गारली. आणि अशा रीतीनें तोहि विचार मला माझ्या डोकींतून काढून टाकावा लागला !

अशा प्रकारें सर्वस्वीं असमर्थ बनून मनांतल्या मनांत चरफडत आम्ही दिवस कंठीत होतों. दुःखांचा विसर पाडण्यासाठीं मालीला दुसऱ्या कोणत्यातरी विषयांत गुंतवावें असा विचार माझ्या डोक्यांत घोळूं लागला. तिला नर्सिंगसारख्या एखाद्या विषयाचें शिक्षण द्यावें असें मला वाटलें आणि त्याला तिचेंहि अनुमोदन मिळालें. पण मालीपुढें तो मांडण्याची मला भीति वाटत होती. मला ती जड वाटूं लागल्यामुळें तिचें लफडें गळयांतून काढण्यासाठींच माझा तो प्रयत्न असेल अशी शंका तिला आली असती. आणि तसें झालें असतें तर त्यांत मालीचा दोषहि नव्हता. एकसारख्या ठोकरा खाणारा जीव असा बुझरा होतोच. दुसऱ्याच्या सद्धेतूकडे साशंक नजरेनें पाहण्याची त्याची वृत्तीच बनून जाते.

मालीचे आजोबा मैराळकाका असते तर त्यांनीं तिची कांहींतरी व्यवस्था केली असती. पण तो मायेचा आधारहि मालीला राहिला नव्हता. तिच्या उरावर सवत आलेली पाहून म्हाताऱ्यानें जी हाय खाल्ली, त्यांतच बिचाऱ्याची अवतारसमाप्ति होऊन गेली होती. त्यांचे चिरंजीव म्हणजे मालीचे एक काका होते, आणि त्यांचें मालीवर प्रेमहि होतें. परंतु त्यांची पत्नी मालीला बरें पाहणारी नव्हती. आपण, आपला नवरा आणि आपलीं मुलें, यांव्यतिरिक्त इतरांसाठीं पैसा खर्च करणें किंवा त्यांच्यासाठीं दगदग करणें तिला रुचत

नव्हतें. आणि घरीं तिचाच वरचष्मा असल्यामुळें माली आपल्या माहेरीं जाऊन सुखी होईल, हीहि शक्यता नव्हती.

मला मालीच्या अन्नवस्त्राचें ओझें वाटत होतें असा प्रकार मुळींच नव्हता. फार काय, तिच्या शिक्षणाप्रीत्यर्थ करावा लागणारा खर्चेहि मी विनात्रास करूं शकलों असतों. प्रश्न खर्चाचा मुळींच नव्हता, तर तो विषय तिच्यापुढें कुणी व कसा काढायचा हा होता.

पण एके दिवशीं ही अडचण आपोआप दूर झाली. मालीनेंच तो विषय काढला ! एकच गोष्ट अनेकांच्या मनांत एकदम येते कधीं कधीं, तसें हें झालें असेल काय ? किंवा आपलें भवितव्य तिलाहि दिसत असल्यामुळें आपल्या पायांवर उभें राहायसाठीं तिनें हा मार्ग आखला असेल ? कोण जाणे ! एके दिवशीं ती म्हणाली—

" हिंगण्याला अनाथ बायकांच्या शिक्षणाची सोय करतात म्हणे दादा ? तिकडे जावं असं वाटायला लागलंय मला. "

मालीची ती पृच्छा मला इष्ट वाटण्यासारखीच होती. पण त्या वेळीं ती ऐकतांच माझ्या काळजांत चर्रर झालें ! तिच्या आवाजांतील कंप, आणि 'अनाथ' हा शब्द उच्चारतांना तिच्या चर्येवर उमटलेला उद्वेग मला दुःखद वाटला ! आणि 'फुकट सोय करतात म्हणे' असें विचारतांना झालेली तिची लाचारी तर कमालीची कारुण्यपूर्ण होती !

मी बोलत नाहींसें पाहून माली पुनः म्हणाली—

" घरणीला भार होऊन अशी किती दिवस राहूं मी ? त्यापरीस— "

तिच्या या शब्दांनीं तर मी अधिकच विव्हळ झालों. 'धरणीला भार' या म्हणींतला 'खापला काळ' हा पूर्वार्ध तिनें सावधगिरीनें वगळला होता हें माझ्या तेव्हांच लक्षांत आलें आणि तिच्या शहाणपणाचें मला त्या वेळींहि कौतुक वाटलें. मी म्हणालों—

" मालूताई, तूं या गोष्टींत लक्ष घालूं नको. मी योग्य दिसेल आणि अवश्य असेल तें सर्व कांहीं करीन. मला आहे ना तुझी काळजी ? "

" हो, त्यासाठीं तर जगतेंय् मी आतां. काळजीनं करपणं आणि काळजीनं करपवणं एवढंच केलं मीं जन्माला येऊन. "

तेल संपत आलेल्या पणतीचा उघडा दिवा श्वासोच्छ्वासाच्या हद्दऱ्यानेंहि लटपटू लागावा तशी मालीच्या मनाची अवस्था झाली होती. ज्या आशेच्या तेलावर जीवन-ज्योत जीव धरून राहते, ती आशा तिच्यापुरती तरी संपुष्टांत आलेली होती. आणि बोलण्यांत अहेतुकपणें उच्चारल्या गेलेल्या साध्या शब्दांचा प्रहारहि तिला सोसवत नव्हता ! मी ' काळजी ' हा शब्द कुठल्या-कुठें बोलून गेलों असें मला होऊन गेलें ! तिला काय बोलावें हेंच मला सुचेना. मला पडलेल्या अडचणींतून तिनें माझी मुक्तता केली. ती म्हणाली—

" हें ग काय तुझं माले ! ज्याचं त्याचं मनाला लावून घ्यायचं आणि रडण्याला निमित्त करायचं म्हणजे काय ! तुझ्या जन्माचे तीन तेरा केलेत तुझ्या नवऱ्यानं, पण आतां रडून होणार आहे का कांहीं सुधारणा ! विवेक नको का करायला थोडा तरी ? मी तर म्हणतें सुटलीस त्या कसायाच्या तावडींतनं याबद्दल आनंद मानायला हवास तूं. टिपं गाळायची तालीम आतांपर्यंत रगड केलीस. आतां हसायखेळायचं प्रॅक्टिस कर जरासं. हिंडावं, फिरावं, वाचावं, गाणं म्हणावं आणि झालं गेलं विसरून जावं ! हो, नाहीं तर काय ? तुझ्या हातून व्हायचं नाहीं म्हणा तें—मुलखाची अजागळ आहेस तू. मीच धरतें आतां तुला चरकावर. पहिली माली मेली अन् आज नवी माली जन्माला आली असं समजायचं आजपासून, आणि आतां आनंदांत राहायला लागायचं. कुठं सिनेमा-नाटकाला चल म्हटलं तर ' नाहीं ' म्हणायचीस आजपत्तर. मी यापुढं मुळींच ऐकायची नाहीं तें. आजच जायचं सिनेमाला. "

मालीला अशी ताकीद देऊन ती माझ्याकडे वळली आणि तिनें मला आज्ञा केली—

" आज क्लबाबिबांत नाहीं जायचं. हपिसांतनं सरळ घरीं या. साडे-सहाच्या खेळाला जायचं. येतांनाच तिकिटं काढून आणा वाटलं तर. "

बायकांना भीरु आणि अबला कां म्हणतात कुणास ठाऊक ! मला तरी तें खरें वाटत नाहीं. माझी पत्नी म्हणून मी तिची तारीफ करतों असें नव्हे, पण तिचा खंबीरपणा पाहून मी कधीं कधीं थक्क होऊन जातों ! आतांचेंच पाहा, माली आपल्या हृदयवेदनांनीं जितकी व्याकुल होऊन गेली होती, तितकीच तिच्या दुर्दशेनें तीहि व्यथित झाली होती. सारखीं टिपें गाळीत

बसण्याबद्दल ती मालीचा निषेध करीत असली तरी, असा एकहि दिवस जात नव्हता, कीं त्या दिवशीं तिचे डोळे मालीसाटीं एकदां तरी ओले झाले नाहींत. पण स्वतःचें अंतःकरण विदीर्ण होत असतांहि ती खंबीरपणाचें अवसान आणून मालीला खंबीरपणाचे पाठ देत होती! मलासुद्धां हें जमत नव्हतें. मालीची दुःखजर्जर चर्या पाहिली कीं माझी सर्व शक्ति गळून गेल्यासारखें होई; आणि तिची समजूत घालणें दूरच, पण स्वतःला सावरून धरतां धरतां माझी त्रेधा उडून जाई! म्हणूनच तिचा या वेळचा खंबीरपणा मला कौतुकास्पद वाटला.

मी ऑफिसांत काम करीत असलों तरी त्या दिवशीं माझें मन निराळ्याच वातावरणांत वावरत होतें. आम्ही मालीला घेऊन सिनेमाला गेलों आहों, सिनेमांतील हास्यकारक देखाव्यांशीं तद्रूप होऊन माली पोटभर हसते आहे, तिच्या उद्विग्नतेचा पाडाव करून प्रकट झालेलें तें हास्य पाहतांना आम्हांला हरवलेला सुखाचा ठेवा परत गवसल्याची कृतार्थता वाटते आहे! मी मालीसह मुंबईला गेलों आहे. माझ्या सुपरिचित डॉ. आनंदकरांच्या ओळखीनें परिचारिकांच्या शाळेंत मीं मालीला घातलें आहे. त्या नव्या आयुष्यांत ती पूर्णपणें रमली असून आपलें काम उत्कृष्ट करते आहे. तिचे प्राध्यापक डॉक्टर तिची वाहवा करताहेत! एवढ्यावरच माझें मन थांबायला तयार नव्हतें. माली परिचारिकेची उच्चतम परीक्षा पास झाली असून, एका मोठ्या रुग्णालयांतील परिचारिकांचें अधिपत्य तिला मिळालें आहे, तिच्या सेनेंतील सेविका तिला आदरानें अभिवादन करीत आहेत, तिच्या शुश्रूषेनें व्याधिमुक्त झालेले रुग्ण तिच्याविषयीं कृतज्ञता व्यक्त करीत आहेत, तिची आदर्श कामगारी पाहून संतुष्ट झालेले अधिकारी डॉक्टर तिला बढती देत आहेत, आणि कृतकृत्य झालेली माली मला म्हणते आहे, "दादा, मी आज आनंदाच्या शिखरावर जाऊन बसलें आहे!"

पण माझें हें मनोराज्य किती वेळ टिकलें? घटकाभरसुद्धां नाहीं!

माझ्या एका सहकाऱ्यानें त्या आनंद समाधीचा भंग केला; आणि मला एक वेगळीच काळजी भेडसावूं लागली!

एका ताज्या दैनिकाचा अंक फडफड करीत माझे सहकारी ओरडले—
"पाहिलेत कां हे मठांतले घोटाळे दादा!"

“ कुठला मठ ? आणि घोटाळे कसले ? ” मीं विचारलें.

“ वाचून पहा हें. खर्डेघाशीनं आलेला कंटाळा पार उडून जाईल तुमचा ! ” असें म्हणून त्यांनीं तें पत्र माझ्या हातीं दिलें आणि वरिष्ठांच्या नजरेस न येईल इतक्या सावधगिरीनें मी ती हकीगत वाचूं लागलों. मठ आणि बुवाचें नांव निघालें, कीं माझ्या डोळ्यांपुढें तात्या आणि मुक्ताबाई उभीं राहत होतीं. आणि त्यांचेंच एखादें गौडबंगाल मला वाचावें लागणार कीं काय या शंकेनें मीं तें पत्र हातीं घेतलें होतें. दुर्दैवानें माझी ती शंका खरी ठरली ! त्या पत्रांतील बातमी पुढीलप्रमाणें होती :—

‘ तापी-तीरावर चाचडी या निसर्गरमणीय ठिकाणीं चांगदेवस्वामी व योगेश्वरीदेवी नांवाचीं बहीणभावंडें तपश्चर्येसाठीं म्हणून गेलीं कांहीं वर्षें वास्तव्य करून होतीं. एकान्तवास व तपश्चर्येसाठीं आलेल्या या परमार्थी माणसांनीं अल्पावधींत तेथें मठाचा मोठाच प्रपंच उभारला होता ! भजनपूजनाचें, जत्रा-उत्सवाचें निमित्त करून चांगदेवस्वामी भोळ्या भाविकांचा मेळावा भरवीत आणि त्यावर खूपशी कमाई करून घेत. माहीतगार मंडळींचा अंदाज खरा असेल तर, चार-पांच वर्षांच्या अल्पावधींत त्यांनीं लाख दोन लाखांची तरी कमाई केली असली पाहिजे. त्यांच्यापाशीं असलेले दत्तावतार बालस्वामी हेहि त्यांच्या प्राप्तीचें चांगलें साधन होतें. चांगदेवस्वामी आणि योगेश्वरीदेवी यांची राहणी दिसायला विरक्त होती व त्यांच्या ठिकाणीं छानछोकीचा वासहि येत नसला तरी, त्यांच्या समाधीच्या गुहेंत बरींच रहस्यें दडलेलीं असत असा कित्येकांना दाट संशय येतो.

‘ही टोळी एकाएकीं अंतर्धान पावली ती अशा कांहीं रहस्यामुळेंच, असेंहि लोक म्हणूं लागले आहेत ! योगेश्वरीदेवी तीर्थयात्रेसाठीं म्हणून तीनचार महिन्यापूर्वींच चाचडीहून गेली असून, काल चांगदेवस्वामी आणि दत्तावतार बालस्वामीहि एकाएकीं अदृश्य झाले आहेत ! त्यांच्या समाधिमंदिरांतील कृष्णाजिनें, जपमाला, भस्माचीं मडकीं वगैरे वस्तु जशाच्या तशा आहेत. त्यांच्या खास देव्हाऱ्यांतील सुवर्ण मूर्ति आणि तिजवरील अलंकार तेवढे नाहींसे झाले असून शाळिग्राम, बाण,

गणपति, बालकृष्ण आदिकरून देव जागच्या जागीं आहेत. गुरुचरित्र, भागवत वगैरे स्वामींच्या नित्यवाचनाच्या कांहीं पोथ्याहि हलवलेल्या नाहींत. ‘ येथील उपाधि आपल्या तपश्चर्येस बाध आणतात म्हणून आपण परमेश्वरास गाऱ्हाणें घातलें आणि सूर्योदयापूर्वीं दुसऱ्या तपोभूमींत निघून जाण्याचा दृष्टान्त झाल्यामुळें आपण बालस्वामीसह अदृश्य होत आहों, आपला कोणी तपास करूं नये. चांचडीच्या या मठाची मालकी आपण या निवेदनपत्रान्वयें आपले प्रिय शिष्य रंगनाथ यांना दिली असून त्यांनीं आपल्या इच्छेप्रमाणें त्याची व्यवस्था लावावी. भगवंताची आज्ञा झाल्यास आपण येथें पुनः प्रकट होऊन भक्तांना दर्शन देऊं ’ अशा आशयाचें स्वामींनीं स्वतः लिहिलेलें पत्र त्यांच्या समाधिमंदिरांत सापडलेलें आहे !

‘ स्वामी अंतर्धान पावण्यापूर्वीं दोनच दिवस मठांत सेवेसाठीं राहिलेली एक तरुण विधवा मठ सोडून गेली असल्याचें समजतें. या दोन्हीं घटनांचा कांहीं तरी संबंध असावा असा कांहीं लोक तर्क करीत आहेत. ’

ही वार्ता वाचून मला विस्मय मुळींच वाटला नाहीं. तात्यानें सुरू केलेलें हें महंतगिरीचें नाटक असेंच केव्हां तरी अद्भुत रीतीनें संपणार आणि त्यामुळें कांहीं माणसांना रडत बसावें लागणार हें भविष्य मीं कधींच वर्तविलें होतें. म्हणून त्याच्या अंतर्धान पावण्याचें मला आश्चर्य वाटलें नाहीं. तरी पण काळजीची एक नवी तलवार आपल्या डोकीवर लटकूं लागलेली मला दिसूं लागली आणि त्या जाणीवेनें माझे हातपाय गळून गेले !

दिनूची आणि मालीची ताटातूट झालेली असली तरी, त्याच्याबद्दलची तिची आशा सर्वस्वीं नष्ट झालेली नव्हती. अगदींच राहवेनासें झालें तर दुरून तरी त्याला पाहतां येईल, स्वतःला तें दर्शनसुख लाभलें नाहीं, तरी लोकांच्या तोंडून त्याचें कुशल वर्तमान ऐकण्याचा तरी सुयोग येऊं शकेल असें तिला वाटे. पण तिचा हा आशातंतुहि या नव्या आघातानें तुटून जाणार होता. मालीला ती वार्ता मी कोणत्या तोंडानें सांगूं हाच एक विचार मला सतावून सोडूं लागला. कामाकडे माझें लक्षच लागेना. डोकें दुखल्याचें निमित्त सांगून मी घरीं जायला निघालों.

ऑफिसच्या बाहेर पडल्यावर घराकडे वळलेले माझे पाय घुटमळूं लागले. मालीला दु:खाचा विरंगुळा पाडण्याचा बेत ठरवून मी आज घरांतून बाहेर पडलों. पण घरीं जाऊन तिचें दु:ख अधिक प्रखर करण्याचा प्रसंग माझ्यावर गुदरलेला होता. घरीं येणाऱ्या पुरुषाकडे बायका-मुलें कांहीं तरी आशेनें पहात असतात. तो रोज कांहीं नवें घरीं आणतो असें नव्हे आणि तसें त्यानें आणले पाहिजे अशी त्यांची अपेक्षाहि नसते. नवीं नवीं सुख-साधनें आणून देऊन त्यानें आपल्या चैनीची तृप्ती केली पाहिजे असा हव्यास त्यांना नसतो. तर आपल्या घरकुलाचा धनी—ज्याच्या जिवावर आपण आनंदांत दिवस काढतों तो—प्रसन्न मनानें घरीं आलेला दिसावा एवढीच उत्कंठा त्यांच्या अंतर्यामीं असते. त्याचें हसतमुख पाहिलें, त्याच्या तोंडून एखादा विनोदाचा शब्द ऐकला कीं साऱ्या दिवसाच्या तपश्चर्येचें साफल्य झाल्यानें समाधान त्यांना वाटतें.

पण आज माझ्या चर्येवर ती प्रसन्नता त्यांना दिसली असती काय? विनोदशब्दांनीं त्यांच्या अंत:करणाला गुदगुल्या करण्याचें सामर्थ्य आज माझ्या ठिकाणीं होतें काय? नव्हतें, मुळींसुद्धां नव्हतें—आणि म्हणूनच घरीं जाण्याची कल्पना मला भीतिप्रद वाटत होती. पण शरीराची हालचाल मेंदूच्या हुकमतीखालीं होते ही गोष्ट नेहमींच कांहीं खरी असत नाहीं. सवयीनें त्या हालचाली न कळत सुद्धां ठराविक प्रकारें होतच असतात. देऊळ दिसतांच हात जोडले जातात त्या वेळीं माणसाच्या मनाचा तसा कांहीं हुकूम सुट-लेला नसतो. त्याचप्रमाणें कामावरून सुटलेल्या माणसास त्याचें मन घरीं जाण्याची आज्ञा करीत नाहीं. त्याचे पाय त्याला आपोआपच घरीं नेतात. मी तसाच माझ्या बिऱ्हाडीं येऊन दाखल झालों

मालीला ती अशुभ वार्ता स्वत: सांगण्याऐवजीं तिच्यावर तें काम सोप-वून मोकळें व्हावें असें मीं मनाशीं ठरवलें. ती त्या वेळीं कांहीं शिवणटिपण करीत घरींच असेल अशी मीं मनांत आशा बाळगली होती. पण आजच ती घरीं नसायला आणि नको ती माली नेमकी पुढें यायला गाठ पडली.

“ आज लवकरसे आलां दादा? ”

“ आलों झालं. ती कुठं आहे ? ”

"गव्हले करायला गेल्यात वाटतं वासंतीबाईकडे. तुम्ही यायच्या आंत येईन म्हणाल्या जातांना. मी करतें चहा. खायला हवंय का कांहीं ?"

"नको, अन् चहासुद्धां नाहीं केलास तरी चालेल."

"कां हो ! बरं नाहीं वाटत् तुम्हांला दादा ! काय होतंय ?"

"व्हायला काय झालं ? वेडी कुठली ! चहा आतांच न करतां ती आल्यावर केलास तरी चालेल असा माझा म्हणण्याचा अर्थ आहे."

अशी तिची समजूत घालून मीं माझ्या खोलींत गेलों. कपडे उतरले, हात पाय धुतले, आणि कॉटवर स्वस्थ पडलों. मी कांहीं होत नसल्याचें कितीहि सोंग केलें तरी तें मालीला फसवूं शकलें नाहीं. माझी होत असलेली हालचाल ही रोजच्याहून वेगळी आहे, त्यांत रोजचा खुलेपणा नसून माझ्या मनावर कसलें तरी दडपण पडलें आहे हें तिनें ताडलें आणि मी कॉटवर डोळे मिटून पडलेला पाहून तर तिची खात्रीच झाली त्याबद्दल. मिनिट दोन मिनिटें जातात न जातात तोंच माली माझ्या पायथ्याशीं येऊन उभी राहिली आणि भीतिमिश्रित स्वरानें तिनें मला हाक मारली—

"दादा !"

"कोण माले ! काय ग ?" मीं डोळे उघडून विचारलें.

"तुम्हांला कांहींतरी होतंय दादा. खरंच होतंय. काय होतंय ? सांगा ना ?"

"वेड लागलंय तुला माले ! कशावरून ठरवलंस तूं मला कांहीं व्हायला लागलंय असं ?"

"मग तुम्ही पडलां कां असे डोळे मिटून ! आधीं तुम्ही कचेरींतून मधेंच घरीं आलांय्. रोज घरीं आल्यावर कुठं पडतां असे ? हातपाय धुतल्यावर सारखी शतपावली चालू असत तुमची. चहा होईपर्यंत बसायला वैनींनीं पाट पुढं केला तर चेष्टा करतां त्यांची, सहा तास फळीवर बसायची सजा भोगून आल्यावर पुनः तसलीच फळी दिल्याबद्दल. हिंडून हातपाय मोकळे करायची तुमची रोजची सवय आजच कां बदलली ? आणि फिरण्याऐवजीं साधं बसणं सुद्धां त्रासाचं कसं वाटलं तुम्हांला ? दादा, सांगाना काय होतंय तें ? डोकं दुखतंय, कीं थंडी वाजतेय ?"

" माले, कसं सांगितलं म्हणजे खात्री पटेल तुझी? खरंच ग मला कांहीं होत नाहीं. मी पडून राहिलों म्हणूनच ना तुझं तर्कट ? हा बघ मी उठलों. आणि शतपावलीऐवजीं दौड ठोकतों वाटलं तर. मग तरी पडेल का तुझी समजूत ? "

पण माझ्या या उत्तरानें मालीची शंका दूर होण्याऐवजीं अधिकच दुणावली. मी करतों आहे तें निव्वळ नाटक आहे हें तिनें ओळखलें. माझ्या अंगीं शारीरिक थकवा नसून मानसिक अस्वस्थता आहे हेंहि तिच्या लक्षांत आलें. आणि आमच्या मनावर ताण पाडण्यास आपल्याव्यतिरिक्त अन्य विषयच असूं शकणार नाहीं अशी तिची ठाम समजूत असल्यानें ती म्हणाली,

" दादा, एक मागणं मागायचंय तुमच्याकडे. मागूं ? "

" मग त्याला असा उसनेपणा कशाला हवा? सांग काय पाहिजे तुला?"

" मी जातें इथून. "

" तोच विचार चाललाय आमचा. हिंगण्याला जायचं म्हणतेस ना तूं ? पण त्यापेक्षां तुला नर्सिंग कोर्ससाठीं मुंबईला पाठवायचा बेत आहे माझा. "

" तें नाहीं मी म्हणत—मी जाणार म्हणतें ती तुम्हां दोघांना ठाऊक होणार नाहीं अशा ठिकाणीं. मी नाहींशी झालें म्हणून एकदांच वाईट वाटेल तुम्हांला पण तुमचा कायमचा हृद्रोग तरी दूर होईल. मी डोळ्यांपुढं आहे तोंपर्यंत तुमचीं मनं अशीं कष्टी होणार. आणि दादा, बघवत नाहीं हो मला हें. माझ्या दुःखाला मुर्दाड व्हायला लागलेय मी आतां. पण तुम्हां दोघांच्या चर्येवर चिंतेची एक रेषा उमटलेली दिसली, तुमच्या मुखांतून एक दुःखोद्गार निघाला किंवा काळजीनं भारावलेला तुमचा एक निःश्वास माझ्या कानांवर आला, कीं माझ्या काळजांत करवत घातल्यागत होतं."

माली मुसमुसून रडूं लागली. तिचें सांत्वन कसें करावें हें मला समजेना. आणि माझ्यांत तें सामर्थ्यहि राहिलें नव्हतें. तिच्या शब्दाशब्दांतून प्रत्ययास येणारें आमच्याविषयींचें ममत्व पाहून मला गहिंवर आला होता. अश्रु मागें परतवतां परतवतां मला पुरें वाट झाली होती. माली पुढें म्हणाली—

" म्हणून म्हणतें दादा, मला दूर जाऊं द्या. तुमच्या सुखाच्या संसारांतून ही दळभद्री धिंडका दूर गेली म्हणजे आनंदांत राहाल तुम्ही तरी. "

" एक अक्षरसुद्धां बोलूं नको अधिक. मायेचीं माणसं दूर गेलीं म्हणजे त्यांना विसरायला होतं होय ! मग तूं स्वतःच पोरासाठीं कां इळइळते आहेस आज वर्षभर ? आणि आतां तर— "

मी भलतेंच बोलून गेलों ही चूक उमगून बोलणें तेवढ्यावरच थांबवलें आणि जीभ चावली. पण माझी ती तिरपीट मालीच्या नजरेंतून सुटली नाहीं. ती घाबरून म्हणाली—

" आतां तर म्हणजे ! आणखी काय झालंय आतां ? "

आतां सांगितल्याशिवाय सुटका कुठें होती ? मीं वर्तमानपत्र तिच्या हातीं देऊन म्हटलें— " पाहा वाचून तात्यामहाराजांनीं काय दिवे पाजळलेत ते. "

या वार्ताप्रहाराचा परिणाम व्हावयाचा तोच झाला. पुत्रभेटीची मालीची आशा दुरावली आणि तिला जवळ जवळ वेड लागायचेंच तेवढें बाकी उरलें. तिला मुंबईस पाठवण्याचा विचार आतां लांबणीवर टाकणें इष्ट नाहीं असें दिसून आलें व त्यासाठीं मीं रजेचा अर्जहि देऊन टाकला.

आमचा निघण्याचा दिवस निश्चित झाला. अवश्य तें सामान तिनें तयार करून दिलें आणि मुंबईसारख्या शहरांत कसें वागावें व कोणती सावधगिरी घ्यावी याच्या सुचतील तशा सूचनाहि दिल्या. एकीकडे हात बांधाबांध करीत होते व एकीकडे तोंड मालीला पाठ देण्यांत गुंतलेलें होतें. लेक सासरीं निघाल्यावर आई जसा उपदेशावर उपदेश तिला करीत राहते तशीच तिची तऱ्हा चालू होती.

" हें ग काय ? " ती ट्रंकेंत भरीत असलेल्या एका शिशीकडे बोट दाखवून मीं विचारलें.

" मोरावळा आहे तो. " —ती.

" मोरावळा ! तो कशाला ? " —मी.

" भारीच बाई करतात वैनी ! " —माली.

" दिवसांतनं दहादां कपाळशूळ उठतो बाईसाहेबांचा ! त्या डब्बींत सूतशेखराची मात्रा आहे. घेत जा मोरावळ्याच्या पाकांत उगाळून अधून मधून. "—ती.

" माली दवाखान्यांत राहायची आहे. तिथं एकाहून एक मोठे डॉक्टर आहेत. ते देतील कीं तिच्या कपाळदुखीवर औषध ! "—मी.

" जळलं मेलं डॉक्टरांचं औषध. कोयनेल नाहीं तर मॅग्निशिया. डोकं थांबायच्याऐवजीं जास्तीच भडकायचं त्यानं. आमचं औषध तसं नाहीं. गुंडुकाका वैद्यांच्याकडून मुद्दाम आणवून पाठवलीय आईनं ही मात्रा. गुंडुकाका वैद्य म्हणजे असे तसे नव्हते बरं का माले ! डॉक्टरांनीं हात टेकलेले हजारों रोगी बरे करून सोडलेत त्यांनीं ! "—ती.

" पण त्यांची बायको म्हणे नुकतीच मेली बाळंतरोग होऊन ! हीच सांगत होती बरं का माले. बायको नकोच असेल म्हणून मरूं दिली असेल त्यांनीं. नाहींतर डॉक्टरांचे बाप असे गुंडुकाका वैद्यराज–" मी.

" पुरे करा आतां. यवढंसं कांहीं सांगायला गेलं, कीं टांगायला न्यायची खोडच आहे तुम्हांला ! "–ती.

अशा प्रकारें हसतखेळत मालीच्या प्रयाणाची तयारी चालू होती. तिला प्रसन्न ठेवण्याचा आमचा आटोकाट प्रयत्न चालला होता. नव्या व्रताची दीक्षा घेण्यापूर्वीं त्याची आकर्षकता व उपयुक्तता तिला पटविण्यासाठीं, परिचारिकेची सामाजिक श्रेष्ठता या विषयावर आम्हीं मधून मधून तिला व्याख्यान देत होतों. दयेची देवी म्हणून जिचा गौरव होतो त्या फ्लॉरेन्स नाइटिंगेलची गोष्टहि मीं एकदा तिला सांगितली. तेव्हां ती म्हणाली, " माले, तूं सवाई नाइटिंगेल हो. दुःखीकष्टी जीवांची सेवा फुकट नाहीं जायची मुळींच ! "

सर्व तयारी होऊन आम्ही स्टेशनला जाणाऱ्या टांग्याची वाट पाहत राहिलों होतों. इतक्यांत टपालवाल्यानें एक कार्ड आणून दिलें. तें वाचून पाहतांच मी उद्‌गारलों — " हें काय झालं आणिक ! "

माली आणि ती त्या उद्‌गारांसरशीं चमकल्या आणि एकदमच ओरडल्या " काय आहे तें कळूं दे तरी ! "

मालीच्या काकांचें तें पत्र आलें होतें. तात्यारावांनीं एका माणसाबरोबर पत्र व दिनू त्यांच्याकडे पाठवला होता. माली तिथें आहे अशी त्यांची समजूत होती म्हणून दिनूची रवानगी तिकडे झाली होती ! मालीचा पत्ता

अद्यापि काकांनाहि नव्हता आणि तो विचारण्यासाठींच त्यांनीं घाईघाईनें हें पत्र लिहिलें होतें.

मुलगा परत आपल्या हातीं येणार या गोष्टीचा आनंद मालीस क्षणभरसुद्धां अनुभवितां येण्यासारखा नव्हता. कारण यकृतविकारानें त्याची प्रकृति चिन्ताजनक असल्याची भीतिप्रद वार्ता त्याच पत्रांत होती!

ती वाचतांच माली मटकन् खालीं बसली व गरगर डोळे फिरवूं लागली. डोकीवर पाणी मारून तिला सावध करावें लागलें. आणि धीराच्या शब्दांनीं तिच्या मनास बळकटी आणावी लागली. मुंबईस निघालेले आम्ही देवगांवचीं तिकिटें काढून गाडींत बसलों. तेथें पोचेंपर्यंत मालीनें हजारदां विचारलें असेल—

"दादा, दिनूबाळ मला भेटेल का हो? यकृताचं दुखणं बरं होतं ना?"

तिला आशावर्धक उत्तरें देत आम्हीं देवगांव गाठलें. मालीनें दारांतून धावच घेतली नुसती! आणि अंथरुणावर कण्हत पडलेल्या पोरास उचलून मांडीवर घेऊन तिनें त्याच्या तोंडावर हात फिरवीत म्हटलें, "दिना, माझा राजा, उघड ना डोळे! बघ तरी कोण आलंय् तें!"

पुत्रदर्शनाचा आनंद त्या स्थितींतहि तिला होत होता! आणि त्याबरोबरच त्याच्या जीविताच्या अनिश्चिततेची भीति तिच्या श्वास-निःश्वासांतून उमटत होती. कारण तिच्या सर्व हाका विफल होत होत्या. दिनू डोळे उघडून आईकडे पाहत नव्हता.

त्याच्या औषधोपचाराची काकांनीं काय व्यवस्था केली आहे अशी मीं चौकशी केली. त्यांनीं गांवच्या एकुलत्या एक वैद्याला दाखवून त्याचा काढा उद्यांच्या रविवारपासून सुरू करायचा बेत असल्याचें सांगितलें. पण इतका खर्च आणि इतकी दगदग करणेंहि जीवावर येत असल्याचें सौ. काकूंच्या उद्गारावरून दिसलें.

"आधीं पोरांचीं दुखणीं, त्यांत इतकीं विकोपाला गेलेलीं. काय औषध चालणार त्यावर? औषधापेक्षां अंगाऱ्याधुपाऱ्याचाच गुण येईल आला तर"

सौ. काकूंच्या शब्दांत नुसती निर्दयता नसून मूर्खपणाहि पुरेपूर भरलेला होता. हे शब्द तिनें माझ्या घरांत उच्चारले असते तर परस्त्री म्हणून भीडभाड

न धरतां तिला कान धरून बाहेर काढलें असतें. पण या वेळीं ती मालकीण आणि मी पाहुणा होतों. काकांचा मैंदपणा आणि काकूचा निर्दयपणा मला विसरून जाणें भाग होतें.

" इथं डॉक्टर आहे का कुणी ? " मीं विचारलें.

" इथं नाहींत ; पण तीन कोसांवर खिस्त्यांचा दवाखाना आहे तिथल्या डाक्टरांना बोलावतात कुणीकुणी. " काकांनीं माहिती दिली. मी ताबडतोब उठलों, टांग्याची चौकशी केली पण तो तेथें मिळू शकला नाहीं. एका माणसाची मनधरणी करून मीं त्याची सायकल घेतली आणि वाट विचारत विचारत तास दीड तासांत मिशन हॉस्पिटल गांठलें. डॉक्टरांची भेट घेऊन त्यांना मुलाच्या प्रकृतिमानाची स्थूल कल्पना दिली आणि त्वरित करावयाच्या सर्व उपचारांसह त्यांच्याच गाडींतून मी देवगांवला आलों.

डॉक्टरनीं दिनूची प्रकृति पाहिली आणि स्टोव्हवर पाणी उकळण्यास सांगितलें. सुई शिजत टाकून त्यांनीं औषधाची शिशी आणि पिचकारी सिद्ध केली. ती पूर्व तयारी चालू असतां मीं विचारलें–

" What do you think of the case, Doctor ? "

" We doctors never give up hope. "

" That's true. But, I want to know the fate of the boy. Can you cure him ? "

" None below, but God above. Don't fear. Let us try to the last. Miracles happen in human life. "

डॉक्टरांच्या या उद्गारांत फलाकांक्षा न धरतां कर्म करीत राहण्याचा वेदान्त भरलेला होता. पण त्यानें माझें त्या वेळीं समाधान झालें नाहीं. चिन्ताहि कमी झाली नाहीं.

डॉक्टरांनीं इंजेक्शन दिलें. बाटलींतहि औषध तयार करून दिलें आणि तें केव्हां कसें द्यायचें त्या सूचना देऊन ते निघून गेले. " काय म्हणत होते दादा, डॉक्टर ? " या मालीच्या प्रश्नास " भ्यायचं कांहीं कारण नाहीं. आठ दिवसांच्या आंत मुलाला बरा करतों असं म्हणाले ते. " असें मीं दडपून सांगितलें.

मालीनें डॉक्टर गेलेल्या दिशेकडे तोंड करून नमस्कार केला.

त्याच वेळीं मागील दारीं चाललेला काकूसाहेबांचा तडफडाट आमच्या कानीं आला. किरिस्तांवाला घरांत आणून आम्हीं चोहींकडे विटाळ काल-वल्याबद्दल त्यांनीं गहजब चालवला होता!

त्या घरीं अधिक राहणें त्यांना तर नाहींच, पण आपणांसहि सुखावह होणार नाहीं असें वाटल्यावरून दुसरे दिवशीं मी पुनः हॉस्पिटलमधें गेलों आणि तिथेंच राहण्याची व्यवस्था करून डॉक्टरांच्या गाडींतून मीं माली-दिनूला आणवलें.

डॉक्टरांची देखरेख आणि हुकमी औषधयोजना यामुळें दिनूच्या प्रकृतींत सुधारणा दिसूं लागली मालीची रुग्णसेवाहि अप्रतिम होती! बालकाच्या लालनपालनाची हौस तिला पुरवून घेतां आली नव्हती, ती अपुरी हौस आजारी मुलाची उस्तवारी करतांना ती पुरवून घेते आहे असें वाटे. त्यांतील तिची तल्लीनता पाहून मनाला मोठी मौज वाटे. जिवंत काव्य होतें तें.

आतां दिनू पुष्कळच बरा झाला होता. अजून त्याला हिंडायफिरायची ताकद आली नव्हती. तो अंथरुणावर पडल्यापडल्या आईशीं हसे, बोले, खेळे. त्याला झोप लागल्यावर माली नुसत्या हातानें त्याची दृष्ट काढी आणि भुईवर बोट घासून त्याचा अंगारा त्याला लावी. मीं तिला विचारलें, "इथं कुणाची दृष्ट लागणार आहे त्याला माले?"

"माझी" मालीनें उत्तर दिलें. "माझ्याच दृष्टीचं भय वाटतं दादा."

मीं तो विषय तिथेंच संपविला.

असाच एके दिवशीं मी दिनूच्या उशागती वाचीत बसलों होतों. माली कुठें बाहेर गेली होती. इतक्यांत रुग्णवेषांतील एक स्त्री तिथें आली आणि झोपलेल्या दिनूकडं पाहत राहिली. माझं लक्ष तिच्याकडे जातांच मीं विचारलें—

"बाई कोण पाहिजे तुम्हांला?"

"हेंच लेकरूं बघायला आलें होतें. पाहिलं, आनंद झाला, जातें आतां."

ती जायला परत फिरली इतक्यांत माली आली. दोघींची दृष्टादृष्ट होतांच

माली दचकली— "तुम्ही! तुम्ही कां आला इथं! अजून पुरा नाहीं झाला का छळवाद?"

"भिऊं नको मालूताई. या मुक्ताबाईचा सारा विषारीपणा मरून गेला आहे."

ती चालती झाली.

"मुक्ताबाई! तात्याची मुक्ताबाई ती हीच?"

"होय हो, तीच ही." माली उद्गारली.

मुक्ताबाई इथं कशी याचा उलगडा त्या वेळीं कोण करूं शकत होतें?

# समाप्ति कीं पुनरारंभ ?

चोरांचीसुद्धां कांहीं तरी नीति असते म्हणतात. ज्याच्या घरीं कोणत्याहि निमित्तानें एकदा निमक खाल्लें त्याच्या घरीं चोर कधीं चोरी करायचा नाहीं. आणि एकदा आणाभाका होऊन माणूस टोळींत आला, कीं त्याच्याशीं त्याच्या हातून प्रतारणा व्हायची नाहीं. पण तात्यासारख्या संभावित डाकूंना एवढाहि सच्चेपणा माहीत नसतो ही गोष्ट मुक्ताबाईच्या कबुलीजबाबावरून मला समजून आली.

मुक्ताबाईची ती अवचित भेट, तिचा तो रुग्णवेष आणि तिचे ते प्रेमार्द्र उद्गार, यांविषयीं आम्हांस आश्चर्य तर वाटत होतेंच; पण तें तात्याचें कांहीं कारस्थान तर नसेल ना अशी शंकाहि आमच्या मनाला भेडसावीत होती. विशेषतः मुक्ताबाईच्या दर्शनापासून माली अगदीं बेचैन होऊन गेली होती. तात्यानें आपल्या पाठलागासाठींच तिला पाठवलें असलें पाहिजे आणि आतां ज्या अर्थी आपण तिला दिसलों आहों, त्या अर्थी ती आपणास पुनः आपल्या चिमट्यांत धरील अशी धास्ती मालीनें घेतली होती. ‘मी जवळ असेपर्यंत तात्या-मुक्ताचा बाप आला तरी त्याला तुला उपद्रव देऊं देणार नाहीं’ असा मीं तिला कितीहि धीर दिला तरी मालीची भीति नष्ट होईना. ती म्हणाली—

“ तुम्हांला त्यांच्या उलट्या काळजाची कल्पना यायची नाहीं दादा. एक वेळ ते पुरवले, पण ही चांडाळीण नको. नमूच्या मरणापासूनच्या एकेक गोष्टी आठवल्या, कीं ऊर धडधडायला लागतं आणि अंगाला घाम सुटतो. आपल्याला त्रास देईल त्याच्याशीं दुष्टावा करावा हें स्वाभाविक होईल एखाद वेळ, पण सुखासुखी एखाद्याचा घातपात करायचा याला काय म्हणायचं ? राक्षसकरणीच नव्हे का ही ? दादा, मुक्ताबाई ही अशीच राक्षशीण आहे. हिचा कुणी हेवा-दावा करायला नको, कीं हिला कुणी त्रास द्यायला नको. हिला तो बरा वाटला नाहीं कीं, लागलीच ही त्याच्या राशीला. तुम्हांला सांगितलं तर खरंसुद्धां वाटायचं नाहीं दादा, पण सांगतें. चाचडीच्या मठांत राधा नांवाची एक बाई दूध घालायला यायची. होती माझ्याएवढीच आणि दिसायला म्हणाल तर राजाच्या राजवाड्यांतसुद्धां उठून दिसण्यासारखं रूप होतं तिचं. एकदा यांनीं म्हटलं बाई तसं. काय विंचू डसले मुक्ताबाईच्या मनाला कुणास ठाऊक ? पण त्या दिवसापासून हिनं तिला मठांत यायची बंदी केली. नवरा आजारी असल्यानं संसाराचा सारा भार आपल्यावर आहे, आपल्याला दोन पैसे मिळतात त्यांत असा मोडता घालूं नका, अशी किती मनधरणी केली राधानं हिची; पण हिची ताकीद सुटली ती वज्रलेप ! मठांत येतां आलं नाहीं तरी बाहेरून बाहेरून ती मठांतल्या मंडळींना दूध पुरवी. पण तिचा हा चोरटा व्यापार या बयाला कळला आणि त्याच दिवशीं रात्रीं राधाची म्हैस बांधल्या जागीं मरून पडली ! ज्ञानेश्वराच्या योगसामर्थ्यानं रेडा बोलला याचं जितकं आश्चर्य वाटतं त्यापेक्षांहि योगेश्वरीच्या शापानं म्हैस मेल्याच्या या चमत्काराचं मठांतल्या कांहीं खुळचटांना अधिक आश्चर्य वाटलं ! पण खरा प्रकार होता तो वेगळाच ! या मुक्तीनं विष घातलेली भाकरी चारून राधाच्या अन्नदात्रीला कायमची मुक्ति दिली होती ! भल्या-बुऱ्याचा विचार न करतां गुरुमाउलीनं सांगितलं तें मुकाट्यानं करणारीं माणसं मठांत असतातच ! ”

मालीनें मुक्ताबाईच्या अघोर करणीच्या ज्या गोष्टी सांगितल्या त्यांवरून तिच्यासारखी गरीब पोर तर घाबरेलच, पण मीसुद्धां मनांतून चरकल्यावांचून राहिलों नाहीं. मघां जशी ती अवचित आमच्या खोलींत शिरली तशी ती पुन्हा न शिरेल कशावरून ? आणि तिच्या पहिल्या भेटीच्या वेळीं मीं पहारा

करीत असल्यामुळें तिला वेडेंवाकडें कांहीं करतां आलें नाहीं तरी मी चोवीस घंटे साठ घटका तसा पहारा थोडाच करूं शकणार ? मी दूर गेलेला पाहून ती पुन: खोलींत शिरली आणि त्या मायलेकरांना कांहीं केलें तर ? असे विचार माझ्या मनांतहि येऊं लागले.

विषाची परीक्षा बघायला नको म्हणून आपण ताबडतोब येथून निघून घरीं जावें, आणि डॉक्टर सांगतील व देतील तीं औषधें घरीं दिनूला द्यावीं अशी मालीनें मला सूचना केली. आतां कोठें दिनूला गुण येऊं लागला होता व आणखी महिना पंधरा दिवस हेच उपचार चालू राहिले तर पोरगा पुरता बरा होईल असें मला स्पष्ट दिसत होतें म्हणून मालीची ती सूचना मला पटली नाहीं. तरीपण मुक्ताबाईचा उपसर्ग आपणांस पुन: न व्हावा यासाठीं शक्य ती सावधगिरी घेणें भागच होतें. म्हणून तिचा ठावठिकाणा काढण्यासाठीं मी खोलीबाहेर पडलों. जातांना दारास आंतून कडी लावून घेण्यास आणि मी हाक मारीपर्यंत कोणासहि दार न उघडण्यास मीं मालीला बजावून ठेवलें.

मुक्ताबाईच्या खाणाखुणांवरून मी कोणाची चौकशी करतों आहे हें डॉक्टरांच्या लक्षांत येण्यास फार वेळ लागला नाहीं. पण माझ्या प्रश्नांचीं उत्तरें देण्याऐवजीं ते मजकडे विस्मित नजरेनें पाहूं लागले. ‘ त्या बाईशीं तुमचा परिचय आहे ! ’ असें म्हणतांना डॉक्टराचे डोळे विस्फारलेले पाहून मी मनांतून चपापलों. अशा स्त्रीशीं परिचय असणें हें माझ्या सभ्यपणास विसंगत आहे असा भाव त्यांच्या त्या दृष्टींत मला स्पष्ट दिसत होता व मजविषयीं त्यांचा कसला गैरसमज होऊं नये म्हणून मीं म्हटलें—

“ त्या बाईची आणि माझी तोंडओळखहि नाहीं. ती थोड्या वेळापूर्वीं आमच्या खोलींत डोकावून गेली आणि तिच्या एकंदर हालचालीवरून मला ती थोडी चमत्कारिक बाई वाटली म्हणून मी तिची चौकशी करतों आहे. ती इथं कशी ? आणि कुठून आली आहे ? कशानं आजारी आहे ती ? ”

“ या गोष्टींपैकीं पहिला भाग मलाहि माहीत नाहीं. दवाखान्यांत आलेला एक पेशंट एवढीच तिची मला माहिती आहे. आणि पेशंट म्हणून तिची मीं जी परीक्षा केली आहे, तिची परिस्फुटता मला तुमच्या-

सारख्यापुढें करतां यायची नाहीं. माझ्या व्यावसायिक शिस्तीविरुद्ध होईल तें. ”

“ बरोबर आहे. आणि मीहि आपणांस त्या गोष्टीबद्दल भीड घालीत नाहीं. पण आपण मला त्या बाईस भेटायची परवानगी देऊं शकाल का ? ”

“ तिला मीं तासापूर्वीच डिस्चार्ज दिला. ती आतां दवाखान्यांत नाहीं. ”

माझी उत्सुकता तृप्त होण्याऐवजीं अधिकच प्रज्वलित होऊन मी माझ्या खोलींत परत आलों. मुक्ताबाईच्या त्या हकीगतीनें माली अधिकच हैराण झाली. ‘ दादा, आतां ताबडतोब चला इथून ’ असा तिचा लकडा सुरू झाला ! दिनूला दवाखान्यांतून हलवणें कितपत शक्य आहे आणि येथून आमच्या गांवापर्यंतच्या प्रवासाची दगदग त्याला सोसेल का, इत्यादि गोष्टीं-बद्दल डॉक्टरांचें मत विचारण्यासाठीं मी पुन्हा त्यांच्याकडे गेलों.

पण दिनूला घरीं घेऊन जाण्याबद्दल डॉक्टरांची संमति मिळाली नाहीं. त्याला आणखी दोन-तीन आठवडे तरी येथेंच आपल्या नजरेखालीं ठेवलें पाहिजे असें त्यांनीं बजावलें. मुक्ताबाईच्या धास्तीनें आपण येथून हलण्याची घाई करीत आहोंत हें त्यांना सांगायचीहि सोय नव्हती. आमची ती शंका त्यांना वेडेपणाची वाटली असती व त्यांनीं आपला दवाखाना अत्याचा-ऱ्यास खुला आहे कीं काय असा उलट मलाच सवाल केला असता. त्यांना अधिक कांहीं न बोलतां मालीची समजूत कशी घालावी याचा उपाय योजीत मी खोलीकडे परत आलों.

मी आलेला पाहतांच दारांत बसलेला पोलिस उभा राहिला व सलाम करून म्हणाला—

“ मालतीबाई डिगरजकर इथंच राहतात ना ? ”

“ होय. कां ? ” मीं भीत भीतच विचारलें. पोलिस आणि तो मालीची चौकशी करतो ही गोष्ट मला खरोखरच भीतिप्रद वाटली ! आणखी कसलें लफडें निर्माण झालें हें मला समजेना. माझी तिरपीट उडवणारा दुसरा सवाल पोलिसनें केला—

“ त्यांच्या व्यवस्थेला इथं एक गृहस्थ आले आहेत ते आपणच ? ”

“ होय, पण काम काय आहे तुमचं ? ”

माझ्या घाबरगुंडीचें त्यालाहि हसूं आल्यासारखें वाटलें. पण तें दिसूं न देतां शिपाई म्हणाला —

" तुम्हां दोघांनाहि बोलावून आणायला सांगितलंय साहेबांनीं. "

त्याच्या एकेका सांगण्यानें भीति दूर होण्याऐवजीं वाढायलाच लागली. पण आल्या प्रसंगाला तोंड द्यायचें, कीं त्याला कांहीं तरी युक्तीनें बगल द्यायची याचा विचार करण्यावांचून गत्यंतर नव्हतें. आम्ही दवाखान्यांतले रहिवासी असल्यानें डॉक्टरांच्या मागें दडून हा पोलिसी ससेमिरा चुकवतां येईल असा उपाय मला सुचला व पोलिसास कांहींच जबाब न देतां मीं म्हटलें —

" चला, डॉक्टरसाहेब काय म्हणताहेत तें पाहूं ! "

मी व पोलिस डॉक्टरांच्याकडे गेलों. आम्हांला पाहतांच ते म्हणाले, " आलं का इतक्यांत बोलावणं ? मघाशींच चिठी आली होती मला इन्स्पेक्टरांची; सांगायचं विसरलों मी. "

नदींत पोहायला पडावें आणि कंजाळांत अडकावें तशी माझी अवस्था झाली. पाय मोकळे करण्यासाठीं हात घालावें तों हातहि अडकून बसावे आणि गटांगळी खावी ! पोलिसी आमंत्रणाचा उलगडा करून घ्यावा आणि शक्य तर त्यांच्या मदतीनें कोलदांडा काढून टाकावा या आशेनें मी डॉक्टरांकडे गेलों, पण त्यांनीं मला पाठीशीं घालण्याऐवजीं मला त्याच संकटाची इशारत दिली ! मीं विचारलें—

" पण हें काय प्रकरण आहे डॉक्टर ? "

" देव जाणे ! आलंय बोलावणं, तेव्हां जायचं एवढंच आपलं काम. "

" भलताच त्रास आला म्हणायचा नशिबाला ! "

" त्रास कसला आलाय ? आमचे इन्स्पेक्टर हे भले गृहस्थ आहेत. विनाकारण दुसऱ्याला उपद्रव द्यायचे नाहींत ते. आणि आपण सरळ असल्यावर कोणी असला तरी काय करणार आहे आपलं ! जा तुम्ही खुशाल. "

" पण डॉक्टर, आम्ही दोघं कशीं जाऊं शकणार ? मुलाजवळ कोण ? "

" त्याची नका काळजी करूं; तुम्ही येईपर्यंत आमची एखादी नर्स घेईल त्याची काळजी. "

डॉक्टरनीं इतकी व्यवस्था केल्यावर आम्हांला टाळाटाळी करतां येणेंच

शक्य नव्हतें. नर्सला 'क्षणभरसुद्धां मुलापासून दूर होऊं नका, खोलींत कुणालाहि पाऊल घालूं देऊं नका' इत्यादि सूचना देऊन मी पोलिस-बरोबर मालीला घेऊन चावडीवर गेलों इन्स्पेक्टरांचा तळ तेथें पडला होता. त्यांनीं आमच्या सद्गृहस्थाला उचित असें स्वागत केलें तेव्हां माझा जीव भांड्यांत पडला. डॉक्टरांनीं त्यांच्या सज्जनपणाबद्दल दिलेली ग्वाही अनाठायीं नव्हती असा मला अनुभव आला आणि पोलिसखात्यांतसुद्धां माणुसकीला पारखीं न झालेलीं माणसें असतात असें मला दिसून आलें.

"मला वाईट वाटतं आपणाला तसदी पडल्याबद्दल." अशी प्रस्तावना करून "मी आपणाला फार वेळ तिष्ठत ठेवीत नाहीं, कारण मालतीबाईंचा सारा जीव मुलाकडे असणार हें मी जाणतों" असें आश्वासनहि दिलें त्यांनीं. आणि मग "आण रे बाईला इकडे" असा शिपायाला हुकूम केला.

सलाम करून शिपाई गेला आणि एक-दोन मिनिटांतच मुक्ताबाईला घेऊन परत आला.

"बाई, बसा तिथं." इन्स्पेक्टरांच्या हुकुमानें मुक्ताबाई आमच्यासमोर बसली. तिच्या चर्येवर फजिती आणि बेडरपणा यांचें चमत्कारिक मिश्रण दिसत होतें.

"यांना कां आणलंय इथं ?" माली उद्गारली.

"तेंच सांगणार आहेत त्या." इन्स्पेक्टर हसून म्हणाले.

"भिऊं नको मालूताई" आवंढा गिळून मुक्ताबाई बोलूं लागली—"मी माझ्या पापांची आतां कबुली दणार आहे. सायबांच्या एकट्याच्यापुढें मी माझ्या पापांचा झाडा दिला असतां आणि तेवढ्यानं त्यांचं कामहि झालं असतं; पण सरकारच्या कायद्यापेक्षां मालूताई, मीं तुझे फार फार अपराध केले आहेत आणि म्हणून तुझ्यापुढंहि ते कबूल करावे असं मला वाटलं. आयती इथं आली आहेस तूं आणि तुझे दादासाहेबहि आहेत बरोबर. तुम्हांला माझा कबुलीजबाब ऐकायला आणण्याबद्दल मींच विनंति केली साहेबांना. त्यांनीं ती मान्य केली; फार उपकार झाले माझ्यावर. मी आतां जें सांगणार आहे मालुताई, तें तुझी क्षमा मागण्याकरितां तर खरंच; पण ती क्षमा मी माझी सुटका होण्यासाठीं मागत नाहीं. मनाच्या नुसत्या समाधानासाठीं.

"साहेब, मी मालूताईला सर्व कांहीं सांगतें आहे. त्यांतलं आपल्याला हवं असेल तें आपण लिहून घ्या. मला कोणी कांहीं प्रश्न विचारूं नका. प्रश्न विचारला तर तेवढ्याचं उत्तर देण्यांत मला जें कांहीं सांगायचं आहे त्यांतलं कांहीं राहून जाण्याचा संभव आहे. आणि तसं कांहीं राहिलं तर मला एक-सारखी मळमळ वाटत राहील.

" मालूताई, माझा तुझ्या घरांत कधीं प्रवेश झाला, तें तुला ठाऊक आहे; पण तो कसा झाला हें माहीत नाहीं. तसंच, मी कोण, कुठली हेंहि तुला कळायला मार्ग नाहीं. मी मूळची इथलीच—म्हणजे या भागांतली. माझं माहेर इकडे. मी गरीबाची मुलगी होतें. अकराबारा वर्षांची असेन मी. त्या वेळीं आमच्या घरीं ताशे-वाजंत्रीं वाजलीं, लाडू-पोळ्या झाल्या आणि मला नवीं नवीं लुगडीं नेसायला आणि गोट-पाटल्या घालायला मिळाल्या. माझं लगीन झालं म्हणे त्या वेळीं.

" पुढं मी नव्या गांवीं आणि मोठ्या वाड्यांत राहायला गेलें. ज्यांनीं मला तिथं नेलं, ते माझ्या बाबांपेक्षांहि मोठे आणि अंगानं अघळपघळ होते. ते माझे यजमान आहेत असं मला कळलं. घरीं गेल्यावर ते मला जवळ बसायला बोलवायचे. माझ्या अंगावर हात फिरवायला लागायचे, आणिक पापा घ्यायचे. पण त्यांचे तसले चाळे मला आवडायचे नाहींत आणि मी त्यांच्याजवळ सुद्धां जाईनाशी झालें. त्यांनीं कावून-कदरून, माराचा धाक दाखवून पाहिलं पण मीं त्यांना दाद दिली नाहीं. ' दोन हजार रुपये भरून त्यांनीं मला बाबांपासून विकत घेतलं होतं ' असं कळलं मला त्या वेळीं.

" मी जसजशी मोठी होऊं लागलें तसतसा एकेक प्रकार मला उमगला आणि माझ्या नवऱ्याविषयींचा माझा तिटकारा वाढला. तिटकाऱ्याबरोबर त्याची मला भीतीहि वाटू लागली. त्याच्या तावडींतून आपणाला कसं निसटतां येईल ही एकच विवंचना मला रात्रंदिवस लागून राहिली होती. पण मी आपोआप सुटलें. माझा नवरा अर्धांगाचे एक-दोन झटके आले आणि मेला.

" मला माझं वाटोळं झालं असं वाटलंच नाहीं त्या वेळीं. माझ्या नवऱ्याचीं मुलं-मुली जशीं आनंदांत राहत होतीं, तशीच मीहि राहत होतें. चार-सहा वर्षं अशीं गेलीं. तोंपर्यंत मी वयांत आलें, आणि माझ्या जिण्यांत कसलं

तरी एक वैगुण्य आहे असं मला वाटूं लागलं. तें वैगुण्य कोणतं हें मला उमगलं, पण तें भरून काढणं अशक्य आहे हेंहि मीं ओळखलं. मला थोडं वाईट वाटायचं त्याचं, पण त्यासाठीं मी अगदीं कासावीस झालें होतें असं मात्र नाहीं. सुखाची गोडी लागलेली असली आणि मग तें मिळेनासं झालं म्हणजे हैराण होतं माणूस. न चाखलेल्या सुखासाठीं होत नाहीं तसं. मला तें सुख मुळींच माहीत नव्हतं आणि म्हणून माझे दिवस सरळ चालले होते.

" पुढं आमच्या घराची मुखत्यारी माझ्या सावत्र मुलाच्या हातीं आली आणि त्याला माझी अडगळ वाटायला लागली. त्यानं मला चार भांडींकुंडीं दिलीं आणि वेगळं बिऱ्हाड करायला सांगितलं. वर्षाचे दोनशें रुपये पोटगी ठरली. एकट्या बाईच्या निर्वाहाला हे पैसे खूप झाले नाहीं का ? मीं आतां-पर्यंत भोगलेल्या श्रीमंतीच्या मानानं थोडेच होते हे पैसे. पण स्वतंत्रपणें राहा-यला मिळतं आणि दहा माणसांच्या घरांत नाहीं म्हटलं तरी थोडी कामाची तसदी पडणार, ती चुकली. त्याचा मला आनंद वाटला आणि मी आमच्याच एका जुन्या घरांत वेगळं बिऱ्हाड करून राहायला लागलें.

" दोन वेळां भात उकडून खायचा यापेक्षां काम कांहींच नाहीं. रिकामा वेळ खूप. माझ्या घरीं आळींतल्या रिकामटेकड्या बायकांच्या गप्पांचा अड्डा जमायला वेळ लागला नाहीं. अशीच एके दिवशीं कुणाबरोबरशीं एक पातळ-पूरची बाई आली. तिनं त्या गांवचं, तिथल्या पुंडलिकमहाराजांचं आणि त्यांच्या प्रवचनाचं असं कांहीं वर्णनं केलं, कीं ज्याचं नांव तें ! आजच्या काळांतल्या नास्तिक लोकांत आस्तिकपणा उत्पन्न करण्यासाठीं ज्ञानेश्वरच पुंड-लिकमहाराजांचा अवतार घेऊन आले आहेत, आणि त्यांचं ज्ञानेश्वरीवरलं प्रवचन म्हणजे प्रत्यक्ष अमृत, असं त्या बाईनं वर्णन केलं. तिथल्या आरत्या-धुपारत्या, आणि पूजा–प्रसादाचं सुद्धां असं वर्णन केलं तिनं, कीं तो सोहळा पाहिला नाहीं तोंवर जिणं व्यर्थ वाटूं लागलं मला.

" मला नको म्हणणारं होतं कोण ? त्याच म्हातारीबरोबर मी पातळ-पूरला गेलें आणि त्याच दिवशीं पुंडलिकमहाराजांचं दर्शन घडलं. म्हातारीनं सांगितल्याप्रमाणं होता खराच तिथला थाट. मला वाटलं गांवीं जाऊन तरी काय करायचंय मला ? राहावं इथंच. पुंडलिकमहाराजांच्या तोंडून परमार्थ

तरी ऐकायला मिळेल, जल्माचं तेवढंच सार्थक होईल. पोटगीचे पैसे आणून पातळपूरलाच राहिलें मी म्हातारीच्या शेजारीं.

"पुंडलिकमहाराजांच्या प्रवचनाला पुष्कळ लोक यायचे. म्हातारे, मध्यम वयाचे आणि तरुणसुद्धां. माझ्यासारख्या दिसायला नि सांगायला म्हाताऱ्या, पण जातीच्या तरण्या बायकाहि बऱ्याचशा असत त्या घोळक्यांत. जमलेलीं माणसं सगळींच कांहीं प्रवचन ऐकायला येत नाहींत, प्रवचनापेक्षां त्यांचं दुसरीकडेच कुठं तरी लक्ष असतं आणि त्यांचे कांहींतरीं चमत्कारिक चाळे चाललेले असतात असं मला दिसून आलं. ज्यांचीं स्वत:च्या घरांत गाठभेट होऊं शकत नाहीं अशीं माणसं तिथं जमून आपल्या मैत्रीला बळकटी आणतात हेंहि मीं पाहिलं तिथं.

"दादा! तुमच्यासारखे सुधारक म्हणवणारे लोक बुवा आणि त्यांचे मठ यांवर टीका करतात. तिथं घाणेरड्या गोष्टी चालतात अशी निंदा करतात त्यांची; पण माणसं घाणेरड्या गोष्टीला तयारच कां होतात याचा विचार करीत नाहीं कुणी. सुखासुखी कोण तयार होईल हो घाणेरडं काम करायला? स्वाभाविक वासना तृप्त करून घेण्याचा सरळ मार्ग मिळेनासा होतो तेव्हांच माणूस आडमार्गांत शिरून आपली भूक शमविण्याचा प्रयत्न करतो. पुरुषाबद्दल निर्वाळा नाहीं देत मी. पण बायकांपुरतं मी खचित सांगतें, त्यांना सरळ रस्त्यावर तुम्ही येऊंच देत नाहीं म्हणून त्या आडरानांत शिरतात. माझंच पाहा. मला कळत नव्हतं तेव्हांच लग्नाची आणि वैधव्याची दीक्षा मला मिळाली. पण लोकांनीं माझ्यावर तसा छाप मारला म्हणून माझ्यांतल्या वासना कशा नाहींशा होणार? पहिलीं कांहीं वर्षं मीं त्या आवरून धरल्या. नीतीसाठीं नव्हे, भीतीसाठीं. मठांतल्या दुसऱ्या कांहीं मुलींची झालेली दुर्दशा मला ऐकून ठाऊक होती म्हणून दचकत होतें मी.

"तात्याचं दर्शन मला घडलं. एकटेपणाची मला सतावीत असलेली आग कुणाच्या तरी संगतीनं मीं कां शमवूं नये असे विचार माझ्या मनांत आतांशा पुष्कळदा यायचे. ते अनिवार झाले म्हणजे तसं करून मोकळं व्हायचं असा निश्चयहि करायची मी; पण त्याची अंमलबजावणी मात्र माझ्याच्यानं किती तरी दिवस झाली नाहीं. आज मीं मनांत येईल तें त्या क्षणीं करून मोकळी होण्याइतकी बेडर बनलें असलें, तरी त्या वेळीं

कमालीची मित्री होतें. माझ्याकडून चढाई व्हायची गोष्ट दूरच, पण आपण होऊन आलेल्या कित्येक सुसंधि मीं दवडल्या. विद्वान् म्हणून प्रतिष्ठा पावलेले, श्रीमंतीनं चमकणारे आणि सात्त्विक वर्तनानं लोकांना भुरळ पाडणारे ज्ञानेश्वरीभक्त मला हटकीत होते आणि मी त्यांच्या हाकेला त्या वेळीं ओ दिली असती तर माझी अशी दुर्दशा झाली नसती. कारण ते लोक अद्यापि शिष्ट म्हणूनच लेखले जात आहेत आणि त्यांचा लोभ संपादन केलेल्या माझ्या जातीच्या कांहीं बायका सोवळ्या म्हणूनच समाजांत वावरतात हें मी पाहतें आहे.

" पण माझ्या नशिबांत या राजमान्य सुखाचा लाभ नव्हता. माझा फाजील मित्रपणा आणि फाजील शंकेखोरपणा मला नडला. आणि आंबे टाकून मीं तात्याचं कवंडळ पतकरलं. तात्यामधें मीं सुखापेक्षां सोय पाहिली. तात्या माझ्यापेक्षां वयानं थोडा लहान आणि दिसायचाहि तसाच. त्याप्रमाणं त्याचं वागणं चंगीभंगीपणाचं नाहीं. त्याचं रूपहि असंतसंच असल्यानं असल्या पुरुषावर एखादी बाई भाळेल असा संशय लोकांनीं घेतला नसता. लोकांच्या डोळ्यांवर न येतां जेवढं सुख मिळेल तेवढं मिळवावं हा माझा बेत आणि म्हणूनच मी तात्याला मनानं वरलं. बंधु म्हणून त्याला बोलावलं आणि नवरा म्हणून त्याच्या बरोबर रमलें. माझ्या या निवडीला जग हसेल मालूताई, पण उपासमार झालेल्या माणसाला सारासार विचार आणि चोखंदळपणा राहतच नाहीं.

" सहवासानं माणसाची परीक्षा होते. मलाहि तात्याचं खरं स्वरूप लवकरच कळून आलं. दिसायला गाईचा गरीबपणा त्याच्या चर्येवर दिसला तरी त्याच्या काळजांत वाघाचा क्रूरपणा भरलेला आहे हेंहि मला कळलं. मी त्याला एकदोनदां बोललें. पण तो वेगळाच वेदान्त मला पढवूं लागला. माणसानं आपलं हित प्रथम पाहिलं पाहिजे. आपला माणूस म्हणून एखाद्याची गय करायची आणि होत असलेला फायदा गमवायचा हा शुद्ध मूर्खपणा आहे, ज्याच्याजवळ पैसा आहे त्याला जगांत मान आहे म्हणून माणसानं वाटेल तें करावं पण पैसा मिळवावा, पैशासाठीं कांहीं माणसांचा कपाळमोक्ष करावा लागला, तरी पैसा मिळाल्यावर कांहीं माणसांचं कल्याणहि करतां येईल. हीं तात्याचीं मुक्ताफळं मी नेहमीं ऐकूं लागलें.

" प्रारंभीं मीं तात्याला जिंकलं असा एक प्रकारचा विजयानंद मला वाटत होता, पण थोड्याच दिवसांत मला त्यानं सर्वस्वीं अंकित करून ठेवलं आहे असा मला उमज पडूं लागला. कसाहि असला तरी तात्याला चिकटून राहणंच मला भाग पडलं होतं आणि तोहि मला लाथाडूं शकत नव्हता. माझ्याकडे त्याला फुकटांत खायला मिळत होतं आणि त्यापेक्षांहि माझ्या स्त्री-धनाचे म्हणून माझ्याजवळ तीनचार हजारांचे दागिने आहेत ही गोष्ट त्याला माहीत झाली होती. कोणत्याहि कारणामुळं असो आम्ही एकमेकांना जखडून ठेवलं होतं. घसरगुंडीला लागलेला माणूस खोलखोल कोसळत जातो, तशींच आम्ही दोघें अनीतीच्या खड्डयांत चाललों होतों. एक दुष्कर्म करून निढावल्यावर दुसरं करायला मन कचरत नव्हतं आणि दुसरं छपवायाकरतां तिसरं पाप पदरांत बांधून घ्यावं लागत होतं.

" मालूताई, या पुढला इतिहास तूं प्रत्यक्ष पाहिला आहेस. हा इतिहास म्हणजे तात्याच्या आणि माझ्या अमानुषतेचा इतिहास जसा आहे तसा तुझ्या सत्यानाशाचाहि आहे, म्हणून मी तो पुन: सांगत बसत नाहीं.. मी तुला आधींच इतकं दुःख दिलं आहे, कीं त्याची आठवण ताजी करून तुझ्या अंतःकरणाच्या अधिक चिंध्या करायला लाज वाटतेय मला. म्हणून त्यांतली तुला माहीत असलेलीं आमचीं पापं न सांगतां तुला अजूनहि न उमगलेलीं आमचीं कारस्थानं तेवढीं सांगतें. ऐक.

" आम्ही पातळपूर सोडून गेलों तें तात्यानं बँकेंत मारलेल्या डल्ल्याचा गवगवा होईल आणि त्यामुळं तो कसल्या तरी खोड्यांत अडकेल या भयानं आम्ही फरारी झालों असा तुझा समज असेल; पण तो सगळाच्या सगळा खरा नाहीं. दुसऱ्या एका कारणासाठीं आम्हांला थोडे दिवस लोकांच्या दृष्टिआड होणं भाग होतं. तें कारण म्हणजे मला दिवस गेले होते. पंढरपुरांत मी मागं राहिलें आणि तात्या तुला घेऊन खानदेशांत गेला हें ठाऊक आहेच तुला.

" मी मोकळी झाल्यावर पुनः तात्याला येऊन मिळालें. तात्यानं आतांपर्यंत गोळा केलेलं डबोलं आम्हांला बसून खायला पुरेसं होतं. पण कमाई न करतां राहणं तात्याच्या स्वभावाला कसं मानवावं ! त्यापायींच तो चांगदेव आणि मी योगेश्वरी झालें. आम्हीं बुवागिरी सुरू केली किंवा

खुळचट लोकांनींच ती आमच्या गळयांत बांधली. आपण कुठल्याशा एका गांवीं धर्मशाळेंत उतरलों होतों. त्याच वेळीं पंढरीच्या यात्रेला चाललेल्या वारकऱ्यांचा एक तांडा तिथं उतरला होता. त्यांतल्या एका माणसाचा पोटशूळ एकाएकीं उठला आणि तो तळमळूं लागला. आठवत असेल तुला. आशेला आलेली त्याची बायको कांहीं उपाय करण्याबद्दल ज्याच्या त्याच्यापुढें तोंड वेंगाडत होती. तात्यानं तिला चकविण्यासाठीं म्हणून डोळे मिटून मंत्र घातल्याचं नाटक केलं आणि योगायोग असा, कीं घटकाभरांत त्या बिचाऱ्याचं पोट दुखायचं थांबलं! कांहींच न करतां चांगुलपणा तात्याच्या पदरांत पडला आणि त्या वारकऱ्यांनीं तो कोणी तरी दैवी शक्ति असलेला महात्मा असला पाहिजे अशा श्रद्धेनं तात्याच्या पायांवर मस्तक ठेवलं. साधुगिरी हा किफायतशीर धंदा आहे याची तात्याला जाणीव झाली आणि आम्हीं चाचडीला तळ ठोकून तो धंदा जोरांत चालवला.

" बुवागिरीचं तंत्र आम्हांला अनुभवानं समजलं. बुवागिरी किफायतीची करून देणारे मदतनीसहि आम्हांला मिळाले आणि आम्ही त्या यशानं उन्मत्त होऊन गेलों. मालुताई, सगुणेची तुला माहीत नसलेली एक गोष्ट सांगून मग मी माझ्या पुढील इतिहासाकडे वळेंत.

" सगुणा आम्हीं पाळायला आणली ती धर्मप्रेमामुळं आणि भूतदयेनं नव्हे. आमच्या मठांत कांचनराव इनामदार आला आणि तो लग्नाला उल्लू बनलेला श्रीमंत आहे ही गोष्ट कळून आली. त्याला नवरी मिळवून देऊन आपली तुंबडी भरावी एवढ्यासाठींच आम्हीं तो खटाटोप केला. मालूताई, अशा अनेक दुष्कर्मांनीं आम्हीं पैशाचे ढीग रचले!

" आमची विषयवासना तृप्त होण्याऐवजीं अधिकाधिक बळावतच चालली होती आणि तुला बोलायची चोरी असली तरी बघायला बंदी थोडीच होती? माहीत आहे तुला सारं कांहीं. तुला माहीत नाहींत ते माझे गर्भपात. मालूताई, आज मी ज्याच्यापायीं या साहेबांच्या कैचींत सापडलें आहे तें माझं चौथं बाळंतपण आहे. मी मधून मधून यात्रेला जायची ती यात्रा हीच होती. या यात्रेची जागा आणि ही यात्रा सांग करणारी माझी मदतनीस मंडळी ठरलेली असल्यानं, दोनतीन दिवसांहून अधिक त्रास सोसावा लागत नसे मला. योगेश्वरीच्या देवीपणाला बाध न आणतां गुपचूपपणें ही

निस्तरणी करायची असे. सराईत चोर भरबाजारांत खिसे कातरतो पण कुणाच्या नजरेस येत नाहीं तसंच हें. मी आतां या कामांत चांगली तरबेज झालेंय. पैसे असल्यावर अशक्य काय आहे जगांत ?

" मालूताई, आज तरी माझं हें पाप कसं उघडकीला आलं असं वाटत असेल नाहीं तुला ! पण तूं आपलं डोकं थोडंसं चालवलंस तर याचं उत्तर सुचेल तुला आपोआप. मी तात्याला आतांशा नकोशी झालें होतें हें हेरलं असशीलच तूं. आणि आपणाला नकोशी वाटणारी गोष्ट वाटेंतून दूर सारण्यांत तात्या तरबेज आहे हेंहि माहीत आहे तुला. मीहि कांहीं कमी नाहीं म्हणा — त्याला माझ्या कर्तबगारीची चुणूक दाखवण्याचा माझाहि चालला होता विचार. पण त्यानंच चलाखी केली आणि मी अशी यांच्या हातीं सापडलें. आमच्या या कृत्याची जागा आणि उपाय अगदीं गुप्त होते. मी, तात्या आणि एक मदतनीसबाई यांच्यावांचून कुणाला थांग पत्ता नव्हता याचा. पोलिसांना हा पत्ता कळला तो तात्यावांचून दुसऱ्या कोणाकडून कळणं शक्य नाहीं. कारण माझ्याइतकीच माझी मदतनीसबाईहि गुन्हेगार असल्यामुळं ती पोलिसांत वर्दी देईल ही शक्यता नाहीं. पोलिसांना म्हणे निनांवी पत्र आलं. पण तें तात्यानंच पाठवलं असलं पाहिजे हें अगदीं स्पष्ट आहे माझ्यापुरतं तरी.

" मालूताई, तूं म्हणशील तात्याचं नि माझं आतां तितकंसं सख्य नसलं तरी आज कित्येक दिवसांचं दोघांचं प्रेम होतंच. त्यामुळं तो माझा असा गळा कापील अशी शक्यता नाहीं पण हा नुसता भ्रम आहे तुझा. तुमच्यासारख्या सरळमार्गी म्हणजेच भित्र्या माणसांना ज्या गोष्टी अशक्य वाटतात त्या तात्यासारख्या उलट्या काळजाच्या माणसाला शक्य—अगदीं चुटकीसरशीं करण्याइतक्या सोप्या वाटतात. आणि हें बघ मालूताई, सापाशीं खेळणारा माणूस जसा केव्हां तरी साप चावूनच मरतो, तसा तात्यासारख्या नरराक्षसाशीं सलगी करणारा प्राणी त्याच्याच हातानं ठार व्हायचा हें ठरलेलं असतं. मला हें फार उशीरा कळलं ग ! थोडं आधीं कळलं असतं तर ! पण कळणार कसं ? मी तरी कुठं होतें शुद्धीवर आतांपर्यंत ?

" मी आतां पूर्णपणें कैचींत सापडलें आहे. साहेबांनीं मला मुद्देमालासकट

पकडलं आहे आणि दवाखान्यांतसुद्धां माझा गर्भपात सिद्ध आला आहे. पण याची मला लाज वाटत नाहीं नि वाईटहि वाटत नाहीं. मी आतांपर्यंत जें जिणं जगत होतें, त्यापरीस जन्माचा तुरुंगवास पुष्कळ बरा असं वाटायला लागलंय मला. माझी आतां एकच इच्छा राहिलीय. ती म्हणजे तात्याचा तात्यापणा उघडा करून माझ्याप्रमाणेंच त्यालाहि जगांतून उठवावयाची. मी आतां तुरुंगाच्या भिंतींआड गाडली जाईन आणि तिथून जिवंतपणीं बाहेर येईन कीं नाहीं याची वानवाच आहे. म्हणून तुझ्यावर आणि दादासाहेबांवर सोपवतेंय हें काम मी मालूताई. "

मुक्ताबाई एवढें बोलून थांबली आणि आमच्या आश्वासनाच्या आशेनें आमच्याकडे पाहूं लागली. तिच्या चर्येवर सूडाची भावना स्पष्टपणें दृग्गोचर होत होती.

इन्स्पेक्टरसाहेबांना मुक्ताबाईच्या या मागणीचें हसूं आलें. ते म्हणाले—

" तुम्हांला आपल्याशीं दगलबाजी करून तोंडघशीं पाडणाऱ्या माणसाचा राग यावा, आणि त्याचा सूड उगवावा अशी इच्छा होणं साहजिक आहे मुक्ताबाई. पण त्या कामीं या मंडळींची मदत तुम्हांला कशी होणार? नवऱ्याविरुद्ध बायकोला चिथावणं मला वेडेपणाचं वाटतं. इतर एखादी बाई झालीहि असती अशा गोष्टीला तयार. पण या मालतीबाईच्या हातून ती गोष्ट कालत्रयीं होणार नाहीं. चर्याच सांगतीय यांची ! "

आपली चूक लक्षांत आल्यावर होतो तसा मुक्ताबाईचा चेहरा झाला आणि आपल्या उद्देशाची विफलता पटून तीव्र निराशेनें तिच्यावर आपला अंमल बसवला. ती दुःखानें जड झालेल्या स्वरांत म्हणाली—

" चुकलें खरी मी मालूताई. माणुसकीला मुकलेल्या माझ्यासारखीलाच ही गोष्ट साधण्यासारखी आहे. तुझ्यासारख्या सरळ मनाच्या स्त्रीला नवऱ्यावर उलटणं जुळायचं नाहीं; आणि जुळायची नाहीं ती गोष्ट करायच्या भरीस मी तुला घालीतहि नाहीं. दुसरीच एक भिक्षा मागतें मी तुझ्याजवळ ती घाल मला. नाहीं म्हणू नको. "

मुक्ताबाईना हुंदका आला. तिचें आतांपर्यंत ऐकलेलें अघोर आचरण आणि आतांची तिची कारुण्यपूर्ण लाचारी यांचा मेळ कसा घालायचा हेंच मला समजेना. मुक्ताबाई मालीजवळ येऊन तिचा हात आपल्या हातांत घेऊन म्हणाली.

" मालूताई, तुला दिनू हा एकटाच मुलगा नाहीं. आणखी एक मुलगा आहे तुला. अशी चपापू नको. माझ्या पोटीं आलेला दिनूच्या बापाचा एक मुलगा या जगांत आहे. मी माझ्या राक्षसी सुखाच्या कैफामुळें माझ्या आई-पणाला जागलें नाहीं. माझं लेकरूं मी आतांपर्यंत भाडोत्री माणसांकडून जगवलं. धर्मार्थ बालकालयांत 'अनाथ पोर' म्हणून वाढतंय तें. मी पैसे देतें त्याच्यासाठीं पण त्याला आई म्हणून कुरवाळण्याचं सुख मला कधींच लाधलं नाहीं. माझ्या रंगेल आयुष्यांत एखादा क्षण असा येई, कीं त्या वेळीं हा सारा पसारा लाथाडून त्याच्याकडे जावं आणि आईच्या सुखाला पारख्या झालेल्या त्या बापुडवाण्या लेकराला त्याची आई भेटवावी असं वाटायचं. पण एकदाहि घडलं नाहीं तें. माझा तो आईपणा आज जिवंत झाला आहे; पण आतां काय उपयोग आहे त्याचा? म्हणूनच तुझ्या रूपानं ती आई त्याला द्यावी असं म्हणतेंय मी. मग करशील का ही विनंति मान्य? तुला मी परोपरीनं छळलं आहे आणि त्यासाठीं तूं मला लाथेनं बाजूला सारलंस तरी कुणी दोष देणार नाहीं तुला. पण मालूताई, तूं माझा राग त्या अश्राप लेकरावर काढूं नको. लेकरासाठीं आईचा आत्मा कसा व्याकुळ होतो याचा अनुभव तुला आहे. आतां अधिक बोलवत नाहीं ग माझ्याच्यानं? माझ्या अज्ञाताला—माझ्या पिल्लाचं नांव आहे तें—संभा-ळण्याचं वचन दे मला म्हणजे यापुढचं कसलंहि भोक्तृत्व भोगायला मी मन घट्ट करीन. मग काय उत्तर देणार मालूताई तूं मला? "

मुक्ताबाईचा शोकावेग अनावर झाला. माली वास्तविक तिची वैरीण पण तें वैर कुठच्या कुठेंच पळालें! अगदीं मायेच्या माणसासारखाच मालीनें मुक्ताबाईला आपल्या हाताचा विळखा घातला आणि दुसऱ्या हातांत आपला पदर धरून ती मुक्ताबाईचे अश्रु टिपूं लागली! आईची हाक आईला ऐकूं गेली होती आणि त्या सहसंवेदनेंतून वात्सल्याचा मंगल वर्षाव होत होता! गद्गद स्वरांत माली म्हणाली—

" मुक्ताबाई, तुम्ही आम्ही एकाच नशिबाच्या वाटेकरणी आहों. मी माझ्या हातून होईल तें करीन. "

आम्ही आमच्या खोलीवर आलों. येतांना कुणीच कुणाशीं बोललों नाहीं. तात्याच्या अंत:करणांतील अघोरता आणखी कोणकोणतीं भयानक दृश्यें

आपणास दाखवणार आहे याच विचारांत मी गर्क झालों होतों आणि माली अज्ञाताच्या जबाबदारीची शक्याशक्यता अजमावीत होती. दिनूचें सर्व ठीक आहे हें पाहिल्यावर ती म्हणाली —

" अज्ञातासाठीं काय करतां येईल आपल्याला दादा ? "

मला मालीनें त्या विषयांत अधिक लक्ष घालूं नये असें वाटत होतें मी म्हणालों, " तूं ही गोष्ट मनांतून काढून कां टाकीत नाहींस ? ' माझं झालं थोडं आणि तुझं घोडं पुढं ' अशांतली गत होतीय तुझी ! तात्या आणि मुक्ताबाई यांच्या पापाचे खूप चटके सोसलेस तूं. आणखी या नव्या पापाचे—"

" पण यांत त्या पोराचा काय दोष आहे दादा ? "

मालीच्या उत्तरानें मला कळून चुकलें कीं, अज्ञाताचा विषय सहजासहजीं तिच्या डोक्यांतून दूर होण्यासारखा नाहीं. आणि त्यामुळें मला भीति वाटूं लागली, तात्या एक नवेंच जोखीम आपल्या डोकीवर लादतो कीं काय ?

दवाखान्यांतलें आमचें वास्तव्य आतां एक-दोन दिवसांत संपणार म्हणून मी तिथली आवराआवर करायला लागलों. डॉक्टरांची फी, औषधाचें बिल, नोकर-मंडळींची खुशाली इत्यादि गोष्टींसाठीं दीडशेंहून अधिक खर्च झाला आणि हा खर्च माझ्या ऐपतीपेक्षां थोडा जडच असला, तरी मला त्याची क्षिति वाटली नाहीं. दिनू मिळाला, एकट्या तात्याच्या तावडींतूनच नव्हे, तर मृत्यूच्या तावडींतून त्याची सुटका करून आपण त्यास मालीच्या हातीं दिलें ही कृतार्थता मला पैशापेक्षां किती तरी बहुमोल वाटत होती. आणि आमची ही यशस्वी सफर पुरी करून आम्ही रविवारीं सकाळीं घरीं येतों असें पत्र तिला लिहितांना माझा हात थरथरत होता ! आनंदानें, हर्षानें थरथरत होता !

पण माझा हा हर्ष किती वेळ टिकला ?

ज्या दिवशीं मीं हें पत्र लिहिलें त्याच्या दुसऱ्याच दिवशीं तिचें घाईघाईनें लिहिलेलें कार्ड माझ्या हातीं पडलें. तिनें लिहिलें होतें —

" लवकर या एखादा दिवस. तात्याचें पत्र आलें आहे आणि तो आदितवारीं येतोय. "

पत्र वाचून मी मालीकडे आणि मालीनें माझ्याकडे पाहिलें. पुढें आणखी काय वाढून ठेवलें आहे ही धास्ती आमच्या मनांत धिंगाणा घालीत होती !

मालीच्या नष्टचर्याची समाप्ति होती, कीं पुनरारंभ !

# निजधामगमन

अमक्याला तमक्याचा समंध दिसला आणि त्याच्या दर्शनानें तो घाबरून आजारीहि पडला, अशा गोष्टी पुष्कळदा माझ्या कानांवर येतात आणि त्या लोकभ्रमाची मला मौज वाटते. जी गोष्ट असंभाव्य आहे, तिच्या ठिकाणींहि माणसाचें मन हादरून सोडण्याची ताकद असते हें या समंधकथांवरून मला दिसतें, आणि मनोबलाचा मानवाचा नक्षा उतरविण्यास किती क्षुल्लक गोष्टीहि पुरतात हें समजून येऊन आश्चर्याबरोबर विषादहि वाटतो !

मृत मनुष्य समंधरूपानें पुनः प्रकट होईल ही गोष्ट विचारी माणसाला शक्य कोटींतील वाटणार नाहीं असा माझा तरी समज आहे. पण जिवंत माणसाच भूत माणसाच्या मानगुटीवर बसून त्याला बैचेन करून सोडतें याचा मला त्या दिवशीं खासा अनुभव आला. जिवंत माणसाचें अदृश्य भूत मृत माणसाच्या समंधापेक्षांहि दुःसह असलें पाहिजे याबद्दल मला शंका उरली नाहीं; कारण अनुभव आला मला त्या दिवशीं तसा.

ताल्या येणार असें तिचें पत्र आल्यापासून त्याचाच एक विषय माझें मन व्यापून बसला. मीं ठरविलेल्या वेळीं घरीं जाण्यास निघालों. या प्रवासाच्या पंधरा-वीस तासांतच नव्हे, तर प्रवासाआधींच्या दीड-दोन दिवसांत ताल्यावांचून दुसरा एकहि विचार माझ्या डोक्यांत उत्पन्न होऊं

शकला नाहीं. मालीचें मनहि तात्यामय झालें होतें. तो कशासाठीं येणार असेल ? कृतकर्मांचा पश्चात्ताप मुक्ताबाईप्रमाणें त्यालाहि झाला असेल काय? बायको-मुलाविषयीं त्याच्या हृदयांत प्रेमाचा पाझर फुटून तें प्रेमामृत त्यांना पाजण्यासाठींच त्यानें ही धाव घेतली असेल काय ? पापी आणि दयाशून्य माणसाच्या आयुष्यांतहि असा एखादा क्षण येतो कीं, त्या क्षणीं त्याला उपरति होते आणि त्याच्या आयुष्यक्रमाची दिशा जादूची कांडी फिरल्या-प्रमाणें बदलते. कट्टर सुधारक आणि नास्तिक म्हणून असलेले एक थोर गृहस्थ उतारवयांत हरिभक्त बनले आणि टाळ-पताका घेऊन पंढरीची वारी करूं लागले असें सांगतात. तसेंच तात्याचें झालें असेल काय ? राक्षसकोटींतून तात्या माणसांत आला असेल काय? असे एक ना अनेक प्रश्न मालीनें मला केले.

तिच्या त्या प्रश्नांची मला खरोखर मोठी मौज वाटली. मनुष्य शंकेखोर असतो, तसा आशावादीहि असतो ही गोष्ट मालीनें मला पटवली. माझ्या मनांत तात्याचें पुनरागमन हें भयसूचक असावें अशी शंका धिंगाणा घालीत होती. जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाहीं हा जगानें अनुभवानें ठरविलेला सिद्धांत आहे. मग स्वभावदुष्ट तात्याचा हृदयपालट होऊन तो सात्विक वृत्तीचा बनेल अशी आशा मला मुळींसुद्धां वाटत नव्हती. उलट जगाला गोते चारून कंटाळा आल्यामुळें स्वकीयांना छळण्याचा आनंद उपभोगण्याच्या लालसेनेंच त्याचें हें आगमन होत असलें पाहिजे असें माझें मन मला भेडसावीत होतें !

एकीकडे माझी साशंकता आणि दुसरीकडे मालीचा आशावाद या द्वंद्वांत माझी पुरती तिरपीट उडून गेली होती ! स्वत:ला वाटत होतें तें मालीला स्पष्ट सांगावें तर तिच्या आशेचे मनोरे कोसळून पडले असते, आणि तसे पडले असते तर निराशेच्या अंधारांत बापडी अगदीं कासावीस होऊन गेली असती. मालीनें आतांपर्यंत सोसलेला छळ आठवला कीं तिला अधिक कष्टी करणें मला महत्पाप वाटे आणि म्हणूनच आशेच्या रमणीय वातावरणांतून तिला बाहेर खेचण्याला माझें मन धजत नव्हतें.

तथापि मालीचा आशावाद बळावूं देणेंहि मला इष्ट वाटेना. सुधारेलल तात्या भेटेल, त्याच्या पुनर्मीलनानें आपण धन्य होऊं, आपल्या जन्माच्या

आतांपर्यंत झालेल्या वैराण वाळवंटांत आतां सुखाचा फुलबाग फुलेल, आपणां उभयतांच्या प्रणयभावनांना आतां बहर येईल, दिनू लडिवाळपणें बापाच्या गळ्यास मिठी मारील आणि तोहि आपल्या लाडक्या लेकाचा प्रेमभरानें पापा घेईल, तो देखावा किती हृदयंगम दिसेल अशा बहुविध आशातंतूंचा गोफ गुंफण्यांत रमणारें मालीचें मन सत्यसृष्टींतली भेसूरता पाहण्याची पाळी आल्यावर कमालीचें उदास होईल आणि आधींच संपुष्टांत आलेलें त्याचें सामर्थ्य लयाला जाऊन माली वेडीपिशी होऊन जाईल. म्हणूनच तिला सावधगिरीची सूचना देण्याचें फिरफिरून माझ्या मनांत येत होतें. आशेनंतरची निराशा हृदयविदारक असते; निरिच्छ मनाला निराशेची आग झोंबत नाहीं.

आशा धरल्यानंतर कपाळी आलेल्या निराशेचा प्रहार किती विदारक असतो याचीं मीं पाहिलेलीं कांहीं उदाहरणें मला आठवूं लागलीं. त्यापैकीं एका हताश विधवेचें आणि तिच्या मुलाचें चित्र जसेंच्या तसें माझ्या डोळ्यांपुढें दिसूं लागलें. पतीच्या अकालीं निधनानंतर अठराविश्वे दारिद्र्याशीं झगडत बिचारीनें एकुलत्या एक मुलाला वाढवलें. मुलगाहि हुषार आणि सद्वर्तनी निघाला परीक्षा देऊन तो मिळविता होईल आणि बारा वर्षें काढलेल्या कष्टांचे पांग फिटतील या आशेवर ती माउली जगली होती आणि आपल्या सुखासाठीं स्वतःच्या जिवाकडे न पाहणाऱ्या आपल्या आईचे उपकार तो कर्तव्यतत्पर मुलगाहि विसरत नव्हता. वृद्धपणीं आपली आई सुखांत राहावी ही एकच त्याची इच्छा होती; आणि परीक्षा होतांच मिळवूं लागण्याचा त्याचा निश्चय झालेला होता. पण दोघांच्याहि या इच्छा निष्ठुर दैवानें मातीस मिळवल्या. परीक्षेच्या ऐन वेळीं बिचाऱ्याचे डोळे आल्याचें निमित्त झालें आणि पुढें तो कायमचाच आंधळा बनला. आपल्या अंधपणाचा त्याला वाटला असेल त्याहून शतपट विषाद आपण आतां आईला सुखी करूं शकत नाहीं या गोष्टीचा वाटला. आणि त्या विषादाच्या भरांत त्यानें गळफास लावून घेतला ! आशाभंग आणि सर्वस्वनाश यामुळें वेडी झालेली ती वृद्ध स्त्री "माझ्या बाळला हजार रुपये पगार झाला ! माझ्या बाळच्या मोटारींतून मी आतां यात्रेला जाणार, बाळ आतां दिवाण झाला." याचगोष्टी बडबडत किती दिवस तरी आमच्या गांवीं एका देवळांत बसलेली असे !

मालीच्या वाट्यालाहि असा आशाभंग आला तर ? छे, मला कल्पनाहि करवेना ती !

आगगाडींत शक्य ती खटपट करून मी खिडकीजवळची जागा पटकावतों. पुण्या-मुंबईस जातां येतां तर तास तास अगोदर जाऊन मी खिडकी पकडतों. माझ्या या उतावीळपणाला इतर लोक हसतात. गाडी सुटायपूर्वी एखादें मिनिट स्टेशनवर जायचें, प्रसंगीं सुटलेल्या गाडीच्या दाराला लोंबकळत आंत घुसायचें ही ज्यांची फॅशन होऊन बसलेली, त्या पुणें-मुंबईकरांना माझें गाडीसाठीं तासभर अगोदर जाणें हा चेष्टेचा विषय न झाला तरच नवल. पण माझ्या त्या घाईचा गाडी साधणें एवढाच उद्देश नसून गाडींत खिडकीशीं जागा पटकावण्यासाठीं माझा तो अट्टाहास असतो हें त्यांना कसें कळणार ? आणि अशीच जागा मिळवण्याचा तरी माझा एवढा अट्टाहास कां ? ही धडपड एवढ्यासाठीं कीं धावत्या गाडीच्या खिडकींतून दिसणाऱ्या सृष्टिशोभेचें भरपूर दर्शन घ्यावें ही मला मनस्वी हौस आहे. खंडाळ्याच्या घाटांत एकीकडे उत्तुंग गिरीशिखरें तर दुसरीकडे खोलखोल दऱ्या अवलोकितांना मी देहभान विसरून जातों. पुणें-लोणावळ्याच्या टापूंतलीं हिरवीं पिवळीं शेतेंहि मला हृदयंगम वाटतात व इतर कोणत्याहि प्रदेशांतील कुणबी शेतकरी आणि त्यांची गुरेंवासरें पाहून माझ्या मनाला आनंद वाटत असतो.

पण आज माझा सृष्टिसौंदर्याचा हव्यास कुठें पळून गेला होता कुणास ठाऊक ! आजच्या साऱ्या प्रवासांत मीं कांहीं म्हटल्या कांहीं पाहिलें नाहीं ! आज मला विनासायास खिडकीची जागा मिळाली होती आणि सवयीप्रमाणें मीं खिडकीबाहेर नजरहि लावली होती; पण मला त्या विशाल आणि फुललेल्या सृष्टींतलें कांहींहि दिसत नव्हतें ! मला दिसत होतें तें एकच आणि तें म्हणजे तात्या.

एकदा तो चांगदेवाच्या महंतवेषांत माझ्यापुढें येई, तर एकदा एखाद्या लक्षाधीशाच्या श्रीमंती ऐटीनें मिरवतांना दिसे. कधीं कारकुनाच्या बावळट आणि कंगाल स्वरूपांतहि तो माझ्या मनश्चक्षूंपुढून धावत जाई ! आतांपर्यंत दिलेल्या त्रासाबद्दल क्षमायाचना करणारा तात्याहि क्वचित् दिसे आणि क्वचित् एखादे वेळीं मालीशीं प्रेमळपणें हसतबोलत असलेला तात्या पाहिल्याचाहि मला भास होई. पण फिरफिरून मला दिसे तो तात्या निगरगट्ट,

बेशरम आणि बेमुर्वतखोर असाच दिसे. त्याच्या त्या दर्शनानें मला दचकल्यासारखें होई आणि मग मी थोडा सावध होऊन मनाशीं म्हणे—

" वेडा तर नाहीं मी ! कुठं तात्या आणि कुठं मी ! "

या अनुभवावरूनच मला वाटलें " मृत माणसांचे समंध असतील नाहीं तर नसतील; पण तात्यासारखीं जिवंत माणसें समंध होऊन अशीं राशीला लागतात खरीं ! "

मी घरीं आलों. तिनें मालीवरून भाकरीचा तुकडा उतरून टाकला आणि तिच्या हातून दिनूला जवळ जवळ ओढूनच घेतलें. तिला झालेला परमानंद तिच्या गळ्या-डोळ्यांतून उत्तम प्रकारें उमटत होता; पण तिच्या मनावरील भीतीचा अंमलहि दडून राहिला नाहीं. दिनूच्या तोंडावरून हात फिरवीत ती म्हणाली—

" आतां तरी राहणार आहांत का राजेश्री धडपणें आईजवळ ? "

" पत्र आलंय ना वैनी ? " मालीनें चुळबुळत विचारलें.

" पत्र आलंय आणि तात्याहि येईल यायचा असला तर. " या तिच्या उत्तरांत तात्याच्या आगमनाबद्दलची उत्कंठा तर दिसली नाहींच, पण त्या-विषयींची अप्रियताच प्रकट होत होती !

त्या तिच्या शब्दांनीं माली गोरीमोरी झाल्यासारखें मला वाटलें. तिची मला कींव आली आणि एक प्रकारें बरेंहि वाटलें. मालीच्या आशावादावर असें परभारें विरजण पडून निराशेला तोंड देण्याची ही पूर्वतयारी मला एकाअर्थीं इष्टच वाटत होती.

" आतां येऊन कोणते दिवे लावणार आहे बापडा कुणाला ठाऊक ! " ती म्हणाली—आणि माली भ्याली आहे अशा समजुतीनें तिला धीर देऊं लागली. " आतां त्याची डाळ मुळींसुद्धां शिजूं देणार नाहीं मी बरं का माले. तो येऊन तुला कांहीं धाकदपटशा द्यायला लागला तर चक्क सांगीन ' आलास तसा चालता हो. माली तुझी कुणी नव्हे आणि तूं तिचा कुणी नव्हेस. येऊन जाऊन तिच्या पोटापाण्याची व्यवस्था करणार नाहीं हेंच सांगणार ना तूं ? नको करूं. ज्यानं चोंच दिली तो चाऱ्याची तरतूद करील कांहींतरी ' आणि या उप्परहि नवरेपणाच्या गुमीनं तो तुला हाकलून

न्यायला उठला, तर कोर्टाचा हुकूम आणल्याशिवाय तुझं नखसुद्धां दिसूं द्यायची नाहीं मी. ”

तिचें हें बोलणें मला किती सुंदर वाटलें ! तथापि पहिल्याच दणक्यानें मालीच्या मनोरथाचा चक्काचूर होऊं नये म्हणून मीं म्हटलें, “अग पण सगळं तूंच काय बोलून टाकते आहेस अदमासानं ? पत्राप्रमाणं तात्या आला तर येऊं दे, त्याचा उद्देश कळूं दे, मग बघतां येईल कीं काय करायचं अन् काय नाहीं करायचं तें. ”

एवढ्यानें त्या विषयाला कलाटणी मिळाली आणि दिनूच्या आजारी-पणाकडे त्यांचें बोलणें झुकलें. देवगांवांत काका-काकूंनीं दाखवलेली आस्था, डॉक्टर आणण्यासाठीं मीं केलेली धडपड, आमचें मिशन दवाखान्यांतलें स्थलान्तर, डॉक्टरांचे उपचार, नर्सनीं दाखवलेली कळकळ इत्यादि गोष्टींचें वर्णन झाल्यावर मालीनें मुक्ताबाईचें दर्शन झाल्याचें सांगतांच ती दचकून उद्गारली —

“ अगबाई ! ती महामाया ग कशी कोसळली तिथं ! ”

मग मालीनें जसें घडलें तसें मुक्ताख्यान तिला ऐकवलें तेव्हां तिला खासें प्रायश्चित्त मिळाल्याबद्दल प्रथम तिला समाधान वाटलें. तरी पण तात्यानें केलेल्या तिच्या विश्वासघाताबद्दल ती हळहळल्यावांचून राहिली नाहीं ! आपल्या सत्यानाशास कारणीभूत झालेल्या दावेदारणीविषयीं मालीच्या अंतःकरणांत उत्पन्न झालेली अनुकंपा पाहून जसा मी चकित झालों होतों, तसाच जिचें नांव घेतांच तिच्या अंगाचा तिळपापड झाला तिच्या दुर्दशेनेंहि तिचें अंत:करण व्याकुळ झाल्याचें पाहून मी चकित झालों आणि मीं मनाशीं म्हटलें, “ विधात्यानं स्त्रीहृदय दयाप्रेमाच्या मिश्रणानं तर घडवलं नाहीं ? ”

प्रवासाचा शीण घालवण्यासाठीं मी विसांवा घेण्यासाठीं पडलों. तात्याचा समंध अद्यापि मला सतावीतच होता. झोप लागावी म्हणून केलेले माझे सर्व उपाय विफल होत होते आणि मला वाटूं लागलें “ येणार येणार म्हणून बुझविण्याऐवजीं तात्या येऊन एकदा काय तो सोक्षमोक्ष कां करून टाकीत नाहीं ? ”

माझ्या मनांतली ही हाक तात्याला जणूं ऐकूं गेली आणि तो आमच्या घरीं येऊन दाखल झाला. दारावरील थाप ऐकून तिनें दार उघडलें आणि

डोकीवर वळकटी घेतलेला एक हमाल आणि त्याच्यामागें तात्या असा देखावा तिच्या दृष्टीस पडला

"बरं आहे ना ताई?"

असा तिचा परामर्श घेत तात्यानें दोन दिडक्या हमालाच्या हातावर ठेवल्या. त्या मुशाहिऱ्यावर तो संतुष्ट कसा होणार? स्टेशनपासून उणापुरा मैलभर एवढा भक्कम बोजा वाहून आणण्याची अर्धा आणा ही मजुरी खरो-खरीच अपुरी होती. मीं त्याच्या श्रमाबद्दल दोन आणे आनंदानें दिले असते. पण 'एक पै नाहीं जास्ती देणार. वाटल्यास घे नाहीं तर चालता हो' असा त्या श्रमिकाला तात्यानें रोकडा जबाब दिला!

त्यानें प्रथम रामराम करून आदबीनें, पोटावर चापटी मारून अजीजीनें अशा क्रमानें अधिक मजुरीची मागणी केली. तिला दाद मिळत नाहींसें पाहून नेहमीं सर्रास मिळणारा चवलीचा दरहि सांगितला. 'पण ठेवलीय चवली तुझ्या बापानं?' अशी तात्यानें त्याची हेटाळणी केली आणि कोट काढावयास आरंभ केला. हमालासारख्यासुद्धां स्वाभिमान असतोच. आपल्या मेहनतीच्या मानानें तुच्छ वाटणारा मोबदला घेणें त्याला कमी-पणाचें वाटतें. तात्याच्या या हमालानेंहि त्या दोन दिडक्या तात्यापुढें भिरकावल्या आणि संतापानें म्हटलें, "घ्या हीहि तुमची दौलत परत. होऊं दे तुमच्या तरी पोराबाळांची धन. गरीबाच्या पोटावर मारणाऱ्याला बघून घेईलच कीं देव आज नाहीं उद्यां!"

पण गरीबाचा तळतळाट गरीबालाच भोंवतो. तात्याला त्याची बाधा कधींच होत नाहीं, हें त्या बिचाऱ्याला काय ठाऊक? तात्यासारखे नरमणि गरीबांच्या तळतळाटानें अधिकाधिक गबरच होत जातात हा जगाचा न्याय त्या बापड्याला अद्यापि कळायचा होता! हमाल शिव्या मोजीत निघून गेल्यावर तात्यानें त्या दोन दिडक्या उचलून खिशांत घातल्या आणि 'भारी माजुरी झालींत आतांशा हीं भिकारडीं' असा शेरा मारून जवळचें तांब्याभांडें उचललें आणि पाणी पिऊन तोंडावरून ओला हात फिरविला.

तात्या आला हें मला कळलें, पण उठून त्याला सामोरें जावें असें मला वाटेना. यांत मी गृहस्थाश्रमाच्या कर्तव्यापासून च्युत होतों आहे

अशी शंकासुद्धां मला आली नाहीं. उलट तात्या हा अट्टल दुरात्मा आहे हें समजून आलें असूनहि मी त्याला माझ्या घरांत पाऊल टाकूं देतों हीच माझी चूक होत आहे असें मला वाटलें. पण अपराधास जिथल्या तिथें फटकारण्याचा ताठरपणा माझ्या अंगीं कुठें होता? शिष्टाचाराच्या भारदस्त नांवाखालीं आम्ही आमचा शेळपटपणा छपवून ठेवीत असतों आणि त्याचा फायदा घेऊन तात्यासारखे कावेबाज हवा तसा धिंगाणा घालतात! हा त्यांचा विजय कीं आमच्या जंटलमनपणाचें आम्हांला मिळणारें प्रायश्चित्त?

कांहीं म्हणा, मी तें अनुभवीत होतों खरा! मला तात्याचा तिच्याशीं चाललेला संवाद ऐकूं येत होता--

" फार दिवस झाले भेटून. मुद्दाम आलों. ठीक आहे ना सगळं? "

" आहे कीं. जें जें होतंय् तें ठीकच म्हणायचं! "

" म्हणजे! कांहीं झालीय् कीं काय भानगड? दादा बरे आहेत ना? कीं त्यांच्या नोकरींत कांहीं झालाय घोटाळा? "

" इकडची नोकरी कांहीं बँकेंत नाहीं घोटाळा व्हायला. आणि यांच्या स्वाधीन चिठ्ठीचपाटीशिवाय हजारों रुपये करतील असे मॅनेजरहि नाहींत यांचे. पण तें जाऊं दे. आलास कुठून? असतोस कुठं? "

" असतों तिकडे माळव्यांत. जिथं पोटाला मिळेल तो आमचा देश."

" पण इतके दिवस हें करून अजून पोट भरलं नाहीं का तुझं? "

" पोट भरलं तरी टिकून राहतं थोडंच? रोज ताजी आहुति द्यायला पाहिजे त्याला. "

" दे बाबा! पण माळव्यांतनं इकडे कां आली स्वारी तें कळूं दे कीं?"

" ही माहेरीं गेलीय दिनूला घेऊन आणि त्याला बरं नाहीं असं पत्र आलं तिचं. म्हणून म्हटलं पाहून यावं अन् असलं बरं तर त्यांना घेऊन जावं बरोबर. "

" असं! " ती हसून उद्गारली. आम्ही त्याच्या इतिहासाविषयीं अज्ञानांत आहों अशा समजुतीनें तात्या बोलत होता आणि त्याची तिला मौज वाटत होती!

आंतून बाहेर आलेल्या मालीनें तात्याचा हा भ्रम दूर केला. ती येथें असेल अशी त्याची कल्पनाच नव्हती. पण ज्या अर्थी ती येथें आहे त्या-अर्थी आपलें सर्व कर्मकांड आम्हा मंडळींना कळून चुकलें आहे ही गोष्ट तात्यानें ताडली. तरी पण बुझल्या-गांगरल्याचें न दर्शवतां तो म्हणाला,

" ही कधीं आलीय इकडे! अन् दिन्याला घेऊन आलीय, कीं देव-गांवलाच ठेवलंय त्याला?"

" दोघंहि मायलेकरं इथं आलींत आणि आजच." असें म्हणून तिनें कसलाहि आडपडदा न ठेवतां तात्याची लब्बाडी त्याच्या पदरांत बांधली. त्याचें एकेक दुष्कर्म त्याला सुनावून त्याबद्दल ती त्याचा निषेध करूं लागली. तात्यानें सारें बोलणें स्वस्थ चित्तानें ऐकून घेतलें व मुरदाडपणें हसून म्हटलें—

" हें पाहा ताई, जगांत चाललेली ही सारी धडपड सुखानं जगतां कसं येईल याबद्दल चाललेली आहे. कमींत कमी तसदी आणि जास्तींत जास्त लाभ हीच ज्याची त्याची दृष्टि असते. ज्याला जें साधेल तें तो करतो. चांगलं आणि वाईट या नुसत्या समजुती आहेत. गुलामगिरी हा शुद्ध नरक आहे, अशी निंदा करून माणसं नोकऱ्या पतकरतातच! खरंखोटंहि तसंच. तें लोकाला बुझवायपुरतं ठीक असतं; पण स्वतःच्या फायद्याच्या वेळीं त्याचा हटकून विसर पडतो. चुगल्या आणि तोंडपुजेपणा करून सज्जन म्हणव-णारेहि रावसाहेब, रावबहादुर व्हायला कमी करीत नाहींत. आणि लोक चांगलं-वाईट ठरवतात तें फळावरून. फसलं तें निंद्य आणि साधलं तें उत्तम ठरतं जगांत. भावांचे खून पाडून मिळवलेली अवरंगजेबाची बाद-शाही मुकाट्यानं मान्य करतं जग. खर्डेघाशींत कंगाल जिणं कंठत राहा-ण्याऐवजीं नाना सोंगं करून मी आज लक्षाधीश झालोंय. माझ्या या श्रीमंतीचा धिक्कार करण्याऐवजीं तिला उद्यां जगाची मान्यता मिळेल याबद्दल मला तिळभरसुद्धां शंका वाटत नाहीं."

तात्याचा हा वेदान्त कोणाहि सरळमार्गी माणसाला पटणें शक्य नव्हतें. मला तर तो पटण्याऐवजीं तिरस्करणीय वाटला आणि त्याच्या मनांतील माणुसकी जागृत झाली आहे कीं काय ही क्षणभर आलेली कल्पना खोटीच नव्हे, तर वेडेपणाची आहे असें मला कळून चुकलें.

तात्याची व माझी भेट झाली. आणि नमस्काराची देवघेव होऊन औपचारिक प्रश्नोत्तरेंहि झालीं. त्याच्यासंबंधीं अधिक खोलांत शिरायला माझें मनच घेत नव्हतें. मी घरांत असून नसल्यासारखा वागत होतों. ही पीडा घरांतून जाऊन मनमोकळेपणानें हसायबोलायला कधीं मिळेल असें मला झालें होतें.

दोन-तीन दिवस असेच गेले. तिच्याशीं तात्याचें खूप बोलणें होत होतें. आपण आतांपर्यंत केलेल्या गोष्टींत कांहीं वावगें आहे असा ओशाळेपणा त्याच्या बोलण्या-चालण्यांत मुळींसुद्धां दिसत नव्हता. तरी पण यापुढें असले उपद्व्याप करीत राहण्यापेक्षां कुठें तरी स्थायिक होऊन दहाजणांसारखा संसार करण्याचा त्याचा विचारहि त्यानें कळवला होता.

त्याच्या या विचारानें तिला समाधान वाटलेलें दिसत होतें आणि मालीच्या आशेला पालवी फुटूं लागल्याचा मला भास होत होता. माझें मत घेण्यासाठीं ती मजकडे येऊन म्हणाली—“ बायको–मुलाला न्यावं म्हणतोय तात्या ! ”

“ आजच का तहान लागली बायकोची त्याला ? बायकांचा तुटवडा नाहीं त्याला खरं म्हटलं तर ? ”

“ मींसुद्धां म्हटलं तसं. पण तसल्या चोरट्या संबंधाला विटलेला दिसतोय तो. त्या बायका विश्वासघातकी असतात अशी अद्दल घडलीय म्हणे त्याला ”

“ त्या बायका त्याला विश्वासघातकी वाटतात याचा अर्थ त्या याच्याशीं दगलबाजी करतात असं वाटतंय कीं काय तुला ? खरं असं आहे, कीं त्या याला कांहीं वेळानं नकोशा होतात आणि मग हा हकालपट्टी करतो त्यांची. मुक्ताबाईची हकीगत ऐकलीस ना तूं ? हंगामी बायकांना निरोप दिल्यावर एकटं राहायची पाळी येते ती नको आहे याला; आणि त्यासाठीं सोडून जाऊं शकणार नाहीं अशी सत्तेची बायको हवी, म्हणून मालीला आमंत्रण आहे हें. ”

“ कांहीं का असे ना ? न ोईनात का ? आणि काय नेम सांगावा ? ीहि सुधारील त्याला ! ”

IRBK-0101923
IRBK-0101923

देशमुख आणि कंपनी
१९१ शनिवार,
पुणें २

पुढील प्रकाशन—
बुद्ध आणि हिटलर
वि. स. खांडेकर